IRBK-0100504

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय चारित्र
दा क्र ५०४

IRBK-0100504
IRBK-0100504

दा. नों. ५०७४

बुद्धसोसायटी, मुंबई

पाली वाङ्मयांतील

तेरा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

2 9 MAR 1981

1 9 SEP 1981

मुद्रकः—रा. रा. महादेव सखाराम दाते खेडकर वैद्य, यांनीं आपल्या वैद्यकपत्रिका छापखान्यांत, शनिवार पेठ, घ. नं. १२१ पुणें, येथें छापिलें,

व

प्रकाशकः—प्रो. नारायण केशव भागवत एम्. ए. यांनीं शनिवार पेठ, घ. नं. ५२८ मेहुणपुरा, पुणें, येथें प्रसिद्ध केलें.

प्रकाशकानें सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

सदर पुस्तकाचें भाषांतर किंवा रूपांतर करण्याचा हक्क ग्रंथकर्त्यानें राखून ठेवला आहे.

# अर्पणपत्रिका.

माझे सन्मान्य, सुशील व उदार मित्र

आणि

भगवान् बुद्धाचे एकनिष्ठ

व

प्रेमळ भक्त

## डॉ. अनंतराव एल् ऊर्फ अण्णासाहेब नायर

यांस

IRBK-0100504

मित्रप्रेमाची खूण म्हणून हें पुस्तक

अर्पण केलें आहे.

ग्रंथकार.

# अनुक्रमणिका.


संक्षिप्त अक्षरांचा खुलासा.

प्रस्तावना.

उपोद्घात

| | | |
|---|---|---|
| रत्न १ लें | महाप्रजापति गौतमी | १ |
| रत्न २ रें | क्षेमा | १६ |
| रत्न ३ रें | उत्पलवर्णा | २८ |
| रत्न ४ थें | पटाचारा | ४६ |
| रत्न ५ वें | धर्मदिन्ना | ५८ |
| रत्न ६ वें | नन्दा ( सुंदरी नन्दा ) | ६८ |
| रत्न ७ वें | सोणा | ७७ |
| रत्न ८ वें | सकुला | ८५ |
| रत्न ९ वें | भद्रा कुण्डलकेशा | ९० |
| रत्न १० वें | भद्रा कापिला | १०६ |
| रत्न ११ वें | भद्रा काञ्चना | ११३ |
| रत्न १२ वें | कृशागोतमी | १२० |
| रत्न १३ वें | शृगालकमाता | १३० |

शुद्धिपत्र.

## संक्षिप्त अक्षरांचा खुलासा.

1: P. T. S. Pali Text Society.

2: Burmese Edition: Pali Text printed in Burmese Characters.

3: Hevavitarane Edition:—Edition printed in Ceylon by Dr. C. A. Hewavitarane.

# प्रस्तावना.

मुंबईस नुकत्याच स्थापन झालेल्या बुद्ध सोसायटींत काम करीत असतांना, महाराष्ट्रांतील आपल्या बांधवास बौद्ध धर्माची कांहीं तरी माहिती करून द्यावी, अशी इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. पालीवाङ्मयाचें परिशीलन करीत असतांना भगवान् बुद्धाच्या श्राविकांनीं बुद्धाच्या धर्मप्रसारणेचे कामीं केवढा भाग घेतला, ह्या प्रश्नाचा विचार करीत असतांना, अशा श्राविकांचीं चरित्रें महाराष्ट्र बंधूंसाठीं-पण मुख्यतः भगिनी-वर्गासाठीं लिहावींत-अशी प्रेरणा माझे मनांत उद्भूत झाली; व यंदाच्या बुद्धजयंतीच्या सुमुहूर्तावर—वैशाख शुद्ध पौर्णिमेस—हें पुस्तक बाहेर पडावें, या इराद्यानें कामास सुरवात करून फेब्रुवारीचे अखेरीस हें लेखनकार्य संपविलें.

पण छपाईची अडचण दत्त म्हणून उभी राहिली ! मुंबईच्या छापखानेवाल्यांस तर सवडच नाहीं; तेव्हां निराश होण्याचा प्रसंग येतो कीं काय, अशी धास्ती वाटूं लागली. पण माझे सन्मान्य मित्र डॉ. अण्णासाहेब नायर यांच्या प्रोत्साहनानें मी पुण्यास आलों; व निरनिराळ्या छापखान्यांत खेपा घातल्या.

शेवटीं, "वैद्यकपत्रिके" चे मालक श्रीयुत माधवराव दाते, यांनीं तें काम अंगावर घेतलें व कामास सुरवात केली; पण मध्यंतरीं विघ्नें उत्पन्न होऊन योजलेल्या दिवशीं पुस्तक बाहेर पडत नाहीं, अशी पूर्ण निराशा झाली. पण श्रीयुत दाते यांचा विश्वास मात्र दांडगा होय ! त्यांच्या आत्मविश्वासाचें फल म्हणजे आजच्या दिवशीं "भिक्षुणी-रत्नें" बाहेर पडणें, हें होय. तेव्हां प्रथम त्यांचे आभार मानणें अत्यन्त आवश्यक आहे. तसेंच माझे पुस्तकाची हस्तलिखित प्रत मी ठाणें येथील जनरल एज्युकेशन सोसायटीचे हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक श्रीयुत शंकरराव घैसास यांना दाखविली व त्यांनीं मला भाषेसंबंधीं उपयुक्त सूचना केल्या, याबद्दल मी त्यांचाहि आभारी आहे.

महाराष्ट्रांतील माझ्या भगिनीवर्गाला आपल्या गौतमकालीन भगिनींचीं चरित्रें वाचून समाजसेवा करण्याची व स्वार्थी विचारांना रजा देऊन उत्तम गृहिणी व उत्तम समाजशिक्षक होण्याची स्फूर्ति झाली, तरी माझें कर्तव्य मीं बजाविलें, याबद्दल मला समाधान वाटेल. माझ्या भगिनींना प्रव्रज्या घेऊन संसाराचा त्याग करण्याचें कारण नाहीं; तर संसारांत राहूनहि भिक्षुणीचें उदात्त ध्येय व्यवहारांत आणणें, हेंच त्यांचें प्रस्तुत कर्तव्य होय.

भगवान् गौतमबुद्ध म्हणजे कोणी परकी होते, अशी भावना अलिकडच्या सुशिक्षित वर्गानें तरी सोडून द्यावी. गौतमाचा धर्म म्हणजे दुःखविमोचनाचा एक मार्ग आहे, हें एकदां कळलें म्हणजे तो मार्ग कोणत्याहि पंथाच्या, धर्माच्या किंवा राष्ट्राच्या माणसानें अनुसरण्यास हरकत नाहीं.

शेवटीं, आजच्या या बुद्धजयंतीच्या दिवशीं त्याच्याच गाथेनें सर्वांचें कल्याण चिंतून वाचकांना पुस्तक वाचण्याची विनंति करतों.

“ सब्बे सत्ता सब्बे पाणा सब्बे भूताच केवला ।
सब्बे भद्रानि पस्सन्तु मा किञ्चि पापमागमा ॥ १ ॥ ”

मेहुणपुरा, शनवार पेठ,
पुणें शहर.
ता. ३०-एप्रील-१९२३.

ना. के. भागवत.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ग्रंथ
वा. क्र. ........ नों. दि ........
वि. ........

# उपोद्घात

> " जितुकें कांहीं आपणांसी ठावें । तितुकें हळुहळु शिकवावें ।
> शाहणे करुन सोडावे । बहुत जन ॥ "
>
> —दासबोध—१९. १०. १४.

प्रस्तुत ग्रंथाची रचना पालीवाङ्मयांतील ग्रंथांवर केली आहे. पालीवाङ्मय त्रिपिटक स्वरूपांत आहे. त्या पिटकांतील सुत्तपिटक म्हणून जो भाग आहे त्याचे पांच निकाय (समूह) आहेत.त्या निकायांपैकीं " अंगुत्तर " निकायांतील प्रथम संग्रहांत "एतदग्ग वग्ग " म्हणून जो विभाग आहे, त्यांतील पांचव्या प्यॅरिग्राफांत असें वाक्य आढळतें. " एतदग्गं भिक्खवे मम साविकानं भिक्खुणीनं ! " " भिक्षूंनों, माझ्या श्राविका-भिक्षुणींमध्यें ह्या अग्र आहेत. " अशा वाक्यानें आरंभ करून त्यांत तेरा भिक्षुणींच्या नांवाचा उल्लेख असून ज्या विशिष्ट गुणांत ती भिक्षुणी श्रेष्ठ आहे, त्याचा निर्देश केला आहे. या ग्रंथांत या शिवाय दुसरी माहिती दिलेली नाहीं; परंतु बुद्धघोषाचार्यांनीं निकायांवर ज्या अट्ठकथा ( भाष्यें ) लिहिल्या आहेत, त्यांपैकीं अंगुत्तरनिकायांतील " मनोरथपूरणी " या नांवाच्या अर्थकथेंत त्या भिक्षुणींचीं चरित्रें दिलेलीं असून त्यावरच प्रस्तुत ग्रंथांत भर दिलेला आहे. त्याप्रमाणेंच " खुद्दकनिकाय " म्हणून सुत्तपिटकाचा जो पांचवा निकाय आहे, त्यांतील पंधरा किरकोळ पुस्तकांपैकीं " थेरीगाथा " म्हणून एक ग्रंथ आहे.या ग्रंथांत बौद्धस्थविरा भिक्षुणींनीं ज्या गाथा गाइलेल्या आहेत,त्यांचा संग्रह केलेला आहे.त्याची भाषा म्हणजे अत्यन्त जुन्या पालीचा अस्सल नमुना आहे.त्या ग्रंथावर धर्मपाल नांवाच्या कांचीपुरस्थ स्थविरानें " परमत्थदीपनी " म्हणून जी टीका लिहिली आहे, त्यांतहि या तेरा भिक्षुणींचीं चरित्रें दिलेलीं आहेत. प्रस्तुत पुस्तकांत या दोहोंचाहि उपयोग केलेला आहे, हें वारंवार दिलेल्या टीपांवरून दिसून येईल. या शिवाय " धम्मपदअट्ठकथा " म्हणून धम्मपद ग्रंथावरील अट्ठकथा, व जातकांच्या अट्ठकथेच्या आरंभीं जोडलेल्या " निदानकथेचा " ही परामर्ष घेतला आहे.सारांश, हीं चरित्रें म्हणजे एका विशिष्ट पालीग्रंथाचें भाषांतर नसून शक्य तितक्या साधनांचा उपयोग करून घेऊन अधुनिक कल्पनांना विशेष जुळतीं होणारीं अशीं चरित्रें रूपांतर स्वरूपांत दिलेलीं आहेत.

आपल्या महाराष्ट्रांत पालीवाङ्मयाचा परिचय असणारे विद्वान् बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. बुद्धधर्माची खरी माहिती करून घेण्याची इच्छा, आमच्या पंडितांना अद्याप झालेली नाहीं, असें दुःखानें म्हणावें लागतें. परंतु बुद्धधर्माचें सम्यग्ज्ञान करून घ्यावयाचें असेल, तर पालीवाङ्मयाचें अध्ययन अत्यंत आवश्यक आहे. पालीवाङ्मय म्हण-

जें स्थविरवाद पंथाचें–ज्यास हीनयान असें नांव आहे–निदर्शक आहे; आणि बौद्ध संस्कृतवाङ्मय महायानपंथाचें निदर्शक आहे. हिंदुस्थानांतील संस्कृत पंडितांना भाषा सोकर्यामुळें बौद्ध-संस्कृत-वाङ्मयच अध्ययन करण्याची इच्छा होऊन, जरी तेवढाच त्यांनीं अभ्यास केला, तरी त्या योगानें गौतमाच्या धर्माचें यथार्थ स्वरूप त्यांना आकलन करून घेतां येणार नाहीं. पाश्चात्य भाषाशास्त्रविशारदांनीं व भाषेच्या इतिहास लिहिणाऱ्या पंडितांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, पालीवाङ्मय हें जुनें असून, महायानपंथाचा जेव्हां उदय झाला, तेव्हां हें बहुतेक वाङ्मय संस्कृतांत रूपांतरित होऊन शिवाय त्यांत पुष्कळच भर पडली. अशोकाच्या शिलालेखांच्या उद्गमानें पालीवाङ्मयाच्या कालासंबंधाच्या सर्व कल्पना विलक्षण रीतीनें बदलल्या आहेत. पाटलीपुत्र शहरांत अशोकाच्या वेळीं इ.सनापूर्वी २४६ त स्थविरवादपंथांची जी तिसरी संगीति भरली होती आणि तींत जें बुद्धशासन संग्रहित झालें, तें अद्यापिही सिलोन, ब्रम्हदेश व सयाम या देशांत शुद्ध स्वरूपांत असणाऱ्या पालीवाङ्मयाहून भिन्न नसावें असा त्यांचा निष्कर्ष आहे अशोकाच्या भाब्रा येथील शिलालेखावरून पालीवाङ्मयाची त्रिपिटकात्मक विभागणी खिस्ती शतकापूर्वी २४९ हि होती हें सिद्ध होतें याच सिद्धान्ताच्या पुष्ट्यर्थ सांची व बार्हुत येथील स्तूपांच्या भिंतीवर जीं चित्रें कोरलेलीं आहेत व तेथें जे शिलालेख सांपडलेले आहेत, यांचाहि विचार करणें आवश्यक आहे. सांची येथील दानलेखांत उल्लेखिलेल्या " पंचनेकायिक, पेटकी, धम्मकथिक, " वगैरे शब्दांवरूनहि खिस्ती शतकापूर्वी तिसऱ्याशतकांतील मध्याधींत पालीपिटकवाङ्मय अधुनिक स्वरूपांत होतें, हेंच सिद्ध होतें. या सर्वांचा विचार करून डॉ. वुईंटरनिट्झ या विद्वान् पंडितानें असें म्हटलें आहे कीं, " In fact, there must have existed—about the middle of the 3 rd Century B. C.—a Buddhist Canon, at least as far as Sutta Pitaka is concerned, which can't have been very unlike our Pali canon. " पुन: ते म्हणतात," The great mass of our Pali Tipitaka, on the whole, may not be so very different from the Magadhi Canon of the 3 rd Century B. C."; आणि हेंच पालीवाङ्मय सिलोनमध्यें वट्टगामिनी राजाच्या कारकीर्दीत अलुविहार येथें तिसऱ्या संगीतीनंतर सुमारें १६० वर्षांनीं लिहिलें गेलें. यावरून सुत्तपिटकाचा काल आमच्या वाचकांना ठरविण्यास बरें पडेल. ज्यावेळीं ही पालीपरंपरा अशोकाचा पुत्र महिन्द यानें सिलोनांत नेली, त्याचवेळीं या पालीग्रंथांवर सिंहलीभाषेंत अर्थकथा करण्यांत आल्या. त्यांचीं नांवें " महा, पच्चरिय आणि कुरुन्दिय " हीं आहेत. ह्या सिंहलीअट्टकथांचें पालीरूपांतर बुद्धघोषाचार्यांनीं सुमारें इ. स. ४३० मध्यें केलें. त्यावरून बुद्धघोषांची " मनोरथपूरणी " म्हणजे सिंहलीभाषेंतील अर्थकथेची पालीप्रतिकृति असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यानंतर धर्मपालानेंहि " परमत्थदीपनी " व 'धम्मपदअट्ठकथा' हे पालीग्रंथ लिहिलेले आहेत; व त्यानेंही अनुराधपुरांतील महाविहारांतील परंपरेचाच आश्रय करून आपलें ग्रंथ लिहिले असल्यामुळें त्यांचेंहि पुराणत्व आपोआपच सिद्ध होतें.

अशारीतीनें कालदृष्ट्या पाली ग्रंथांचा उहापोह केल्यानंतर प्रस्तुत पुस्तकांतील प्रतिपाद्यविषयाकडे वळूं. भगवान गौतमबुद्धानें धर्मप्रसार करण्यास सुरवात केल्यानंतर त्या धर्माच्या सरळ,साध्या, बुद्धीस सहजपटणाऱ्या व आर्यलोकांच्या मूळपरंपरेस विशेष विरुद्ध नसणाऱ्या नैतिक तत्वांनीं मोठमोठे विद्यासंपन्न, महानुभाव, धीरमति, संघाचार्य, आणि ब्रम्हचारी लोहचुंबकाप्रमाणें आकर्षिले जावेत, यांत आश्चर्यच नाहीं;कारण कर्मकांडाच्या विलक्षण दडपणानें व त्यांतील मंद व कंटाळवाण्या मार्गानें तेहि बिचारे कंटाळून गेले होते. त्यांचें जीवित म्हणजे ठशांत घालून ओतलेल्या पोलादाप्रमाणें झालेलें होतें. गौतमानें त्या त्यांच्या आयुष्यास निराळें वळण लावून दिलें. मानवाचें इतिकर्तव्य म्हणजे निव्वळ-परमार्थ संपादन करून स्वार्थी मोक्षसुखांत गर्क होणें हें नसून, त्याबरोबरच बहुजन-हित बहुजन-अनुकंपा, बहुजनसुख, देवांचा व मानवांचा फायदा, ह्याहि गोष्टी भिक्षूनें व भिक्षुणीनें अवश्यमेव पाहिल्या पाहिजेत, अशी गौतमाची आज्ञा आहे; एवढेंच नव्हे, तर आपणास बुद्धत्वाचा साक्षात्कार झाल्यावर त्यानेंहि आपल्या परिनिर्वाणापर्यंत हाच क्रम चालूं ठेवला होता. ह्या मानवीकर्तव्याच्या व्यापककल्पनेबरोबरच गौतमाच्या धर्मांत पुरुष व स्त्रिया यांच्या कर्तबगारीस सारखाच मान आहे, हेंहि तत्त्व आपण विसरतां कामां नये. प्रस्तुत चरित्रें वाचलीं असतां ह्याचें बरोबर आकलन होईल बुद्धधर्माचें हे विशेष फार महत्वाची आहेत. आदर्शवती अशा हिंदुधर्मांतील युवती व बौद्धधर्मांतील त्यांच्या भगिनी यांच्यामधील साम्य व फरक हीं पाहण्यासारखीं आहेत. ह्या चरित्रांवरून पुष्कळ गोष्टींचा बोध होण्यासारखा आहे. ज्या निरनिराळ्या परिस्थितींत सांपडून त्या भगिनी भिक्षुणीसंघांत प्रविष्ट झाल्या आहेत त्यांची भिन्नता दिसून येते; त्याप्रमाणेंच परिव्राजिका झाल्यावर कोणत्यामार्गाचा अवलंब करून भगिनींनीं अर्हतपदाची प्राप्ती करून घेतली हेंहि समजतें; ज्या हेतूंनें प्रेरित होत्सात्या, भगिनींनीं संसाराचा न्यास करून जगताचा संसार अंगीकृत केला ते हेतूहि किती भिन्न होते, हें कळून येतें खिरस्तीधर्माच्या इतिहासाकडे पाहिले असता खिरस्तांच्या सेविकांचीं चरित्रें व बौद्धभिक्षुणींचीं चरित्रें यांत पराकाष्ठेचें साम्य दृष्टीस पडतें व यावरून दिक् व काल यांनीं विभक्त झालेली मानवी प्रजा कशी समानशीला, समानधर्मा, व समानरूपा आहे याचेंहि प्रत्यंतर मिळतें. अस्तु.

प्रत्येक चरित्राचे दोन भाग पाडलेले आहेत. पहिला भाग पौराणिकस्वरूपाचा आहे, तर दुसरा भाग ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचा आहे. पण या दोन्ही भागांवरून एक तत्त्व दृष्टीस पडतें; तें हें कीं, कोणत्याहि स्पृहणीयस्थानाकरितां प्रथम उत्कंठेच्छा धरली पाहिजे व ती बुद्ध किंवा बुद्धश्रावक यांच्यासमोर प्रथित केली पाहिजे. पुढें येणारे जन्म म्हणजे त्या इच्छेच्या पोषणार्थ लागणारी तयारी करणारे होत. मानवाची परिणति एका जन्मांत होत नसून जन्मपरंपरा घेतल्या असतांच ती होणें शक्य आहे, व ती परिणति पूर्ण झाली असतां इच्छा सफल होण्यास अगदीं क्षुल्लक कारण सुद्धां पुरें होतें, हें तत्त्व या चरित्रांवरून सिद्ध होतें.

या चरित्रांचें महत्व सामाजिकदृष्ट्याहि फार मोठें आहे. या भगिनींच्या चरित्रां-वरून स्त्रियांच्या स्वातंत्र्यासंबंधानें बराच उलगडा होतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या भगिनी अर्वाचीन काळांतील पाश्चात्य स्त्रियांची बरोबरी करतात. व्यक्तिस्वातंत्र्य, पतीच्या बरोबरीनें हक्क असल्याची जाणीव, संसारांत जशी दक्षता, तशी व्यवहारांतहि जागरूकता, गृहांतील साम्राज्यांत जसा अप्रतिहतसंचार, तसेंच समाजांतहि वावरण्यास योग्य स्वातंत्र्य, वगैरे गोष्टी या चरित्रांवरून दृष्टीस पडतात. समाजांतील निरनिराळ्या पद्धति ,तत्कालीन लोकांचे विचार व कल्पना, नक्षत्रें व चमत्कार यांवरील विश्वास, समाजाचें वर्गीकरण, विवाहपद्धति, लांच खाण्याची प्रवृत्ति, वगैरे संबंधानें तत्कालीन समाजावर बराच प्रकाश पडतो. धार्मिक बाबतींतहि धर्माची कल्पना, धार्मिकपंथ, अधार्मिक प्रवृत्ति, **प्रत्येकबुद्धाचें** अस्तित्व व त्याविषयींच्या कल्पना, वगैरेवरहि प्रकाश पडतो. बुद्धाच्या संघांतील जीविताचें चित्र फारच मनोवेधक आहे. त्यांतील एकत्र राहणी, भिक्षुणींचें जीवनचरित्र, त्यांचें अध्ययन, त्यांच्यांत असणारी अधिकारी मंडळी, त्यांचें व श्रामणेरींचे संबंध, संघांतील निरनिराळे समारंभ, समाधि व ध्यानें यांच्याबद्दल तयारी, चीवर, पिण्डपात् विहारवास, विहारांतील कर्तव्यें, वगैरे संघांतील गोष्टी उत्तम रीतीनें समजून येतात. अर्हत्पद म्हणजे काय व त्यायोगानें चित्तविमुक्ति कशी साध्य होते, हेंहि कळतें.

पालीआख्यानांचा विचार करण्यास लागणारीं पुष्कळ साधनें यांत सांपडतात. गोष्ट सांगण्याची चटकदार पद्धत,मधूनमधून दृग्गोचर होणारा विनोद, गांभीर्य, करुणरस, शांतरस, व मनोवृत्तीचे खेळ हेहि पाहण्यासारखे आहेत. उत्पलवर्णेची गोष्ट म्हणजे उत्तम प्रकारची भपकेदार रंगांत उठविलेली कथाच आहे. यावरून गोष्टीचें वाङ्मयहि किती परिणतावस्थेला गेलें होतें, याची कल्पना करतां येते. पुराणांत दैवीअंश असल्यामुळें आख्यानाचें स्वारस्य नाहींसें होतें, पण बौद्धधर्मांत दैवीअंशाचा भागच नसल्यामुळें तीं आख्यानें जास्त स्वाभाविक दिसतात.

शेवटीं, या चरित्रांवरून दिसून येणारा असा एक विशेष सांगून हा उपोद्घात पुरा करूं. प्रस्तुत चरित्रांतील चित्रांवरून संसारापासून व्यावृत्ति हा बौद्धधर्मांतील विशेष प्रमुखत्वानें जरी दृग्गोचर होतो तरी या निवृत्तीबरोबरच दुसराहि महत्वाचा एक विशेष पटाचारा, क्षेमा,कुण्डलकेशा,कापिलानि भद्रा वगैरे भगिनींच्या चरित्रांवरून दृष्टीस पडतो. हिंदुधर्मांतील निवृत्ति व बौद्धधर्मांतील निवृत्ति यांहोंत फार मोठें अंतर आहे. हिंदुधर्मांतील वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम हे निवृत्तिमार्गाचे निदर्शक आहेत व या दोन आश्रमांचा हेतु म्हणजे मानवानें जगताच्या भानगडींतून आपलें अंग पूर्णपणें काढून घेऊन आत्मोन्नति व मोक्षसाधन या दोन गोष्टी लक्ष्य असावें, असाच आहे. बौद्धधर्मांतील गृहस्थाश्रमांतून अनगारीयांत प्रवेश करण्याचा आदेश प्रमुखत्वानें केला आहे व तदनुसार संघांत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक मनुष्यास प्रथम प्रव्रज्या घ्यावी लागते व नंतर त्याचा संघांत प्रवेश होतो; व संघांतील नियम पाळून निर्वाणपदास जाण्याचें ध्येय त्याच्यापुढें असतें. या

गोष्टीवरून बौद्धधर्म म्हणजे निवृत्तिपर अशी समज मोठमोठ्या महाराष्ट्रस्थ विद्वानांची-हि झाली आहे. पण मूळ पालीग्रंथांतरून लिहिलेल्या या भिक्षुणींच्या चरित्रांवरून हा त्यांचा समज किती चुकीचा आहे, हें दिसून येईल. संसारापासून व्यावृत्ति म्हणजे निव्वळ स्वार्थमोक्षासाठीं तयारी नसून, त्या मोक्षाच्या साक्षात्काराबरोबरच जगाच्या संसारांत पडण्याची तयारी–अर्थात् प्रवृत्तीच्या मार्गास आवश्यक लागणारी तयारी–असा तिचा अर्थ होतो. संघांत जातांना शपथ घेणें, त्रिरत्नांस शरण जाणें, दुःखाच्या नाशाकरितां ब्रह्मचर्याचरण करणें, म्हणजे सर्व मनोवृत्तींचा नाश करणें, त्या थंडावून टाकणें, त्यांच्यांतील चैतन्य घालवून टाकणें, त्या शक्ति निर्जीव करणें, असा यांचा अर्थ नव्हे; तर त्या सर्वांची निराळ्या मार्गांत प्रवृत्ति करून देणें, त्यांना उदात्तपणा आणणें, त्यांची संकुचित दृष्टि व्यापक करणें, सत्पुरुषांच्या आकांक्षांप्रमाणें पराभिहितरत, सुखमय, निरामय, मैत्री, करुणा, व मुदिता या मनोवृत्तिप्रचुर अशा आकांक्षा स्थिरतर करणें, असा या शपथांचा अर्थ आहे. जरी संघांतील शिस्त जरा कडक दिसली, तरी त्या शिस्तीबरोबरच पुढील समाजसेवेचा अनाना भिक्षुस किंवा भिक्षुणीस गिरवावा लागे. शिवाय अर्हत्पदप्राप्तीनंतर अर्हन्तास परार्थहित साधण्याचें कामीं एक समाधानाची जागा आहे. ती म्हटली म्हणजे त्याच्या कर्माचा विपाक होत नाहीं. व कर्मविपाकाचें भय न राहिल्याकारणानें व इतर सर्व पाश तुटल्यामुळें, "आपण स्वस्थ बसावें, किंवा अरण्यांत जाऊन राहावें, किंवा लोक-संग्रह करूं नये," अशी त्यास इच्छाच होणें अशक्य आहे; व म्हणूनच भगवान बुद्धाच्या श्राविका विश्वाशीं आपलें कोणतें नातें आहे, याचा साक्षात्कार करून घेऊन, त्या दयेच्या देवी, मानवाच्या निरपेक्ष अशा मैत्रिणी आणि उज्वलनीतियुक्त अशा सद्भगिनी, आपलें कर्तव्य करावयास लागत. कुण्डलकेशेनें सांगितल्याप्रमाणें (पृ. १०५—टीप पहा) राष्ट्र-पिंडावर राहणाऱ्या भगिनी राष्ट्राला जागवीत होत्या. उपासकांचें अन्न खावयाचें म्हणजे शरीरपोषणाकरितां किंवा अरण्यांत जाऊन राहण्याकरितां तें खावयाचें असा अर्थ नसून "ऋणमुक्त" झाल्यावर राष्ट्रांत हिंडून समाजशिक्षकाचें पवित्र कार्य करावयाचें व याकरितां समाजाचें अन्न खावयाचें, असा गौतमाच्या आज्ञेचाच अर्थ होता व त्याचे श्रावक किंवा श्राविका तो समजून घेऊन आपल्या अर्हत्पदप्राप्तीनंतर जगतीतलावर हिंडून एशियाटिक तार्तरीसारख्या डोंगराळ प्रदेशांत जाऊनहि तेथील रानटी, क्रूर, व बहुतेक पाशवी-स्थितींत असलेल्या जनतेला मानवीकोटींत आणण्याचें पवित्र कार्य करीत असत हें त्यांचें कार्य हिंदुस्थानांतील आमच्या बांधवांना जरी ठाऊक नसलें तरी फ्रेंच संशोधकांनीं तें जगताच्या निदर्शनास आणलेलें आहे. बौद्धधर्मांतील व्यावृत्तीचा हा विशेष लपवून ठेवण्याचा प्रयत्न करण्याचें कांहीं एक कारण नाहीं. हीनयानपंथ काय किंवा महायानपंथ काय, दोघांनींहि हें प्रवृत्तिपर कार्य आपल्या शास्त्याच्या हुकमानुसार अव्याहत सुरू ठेवलें होतें, हें आमच्या महाराष्ट्र बंधुभगिनींना अंशतः जरी कळलें, तरी आमच्या या श्रमाचें सार्थक झालें, असें आम्ही समजूं.

—ग्रंथकर्ता.—



भद्राकच्चाना ( यशोधरा )

( गौतमबुद्धाची पत्नी राहुलप्रव्रज्येनंतर

पृ. ११८.

By the courtesy of Navayuga. B. A. P. W.

म. ग्रं. सं. ठाणे वाचनालय ठाणे
५०८

# रत्न १ लें.

# महाप्रजापति गौतमी.*

## ( १ )

## पूर्वबुद्धकालीन–चरित्र.

फार च प्राचीन काळची गोष्ट. त्या युगांत पद्मोत्तर बुद्ध[1] उदयास आलेला होता. आतां जरी हिंदुस्थानच्या नकाशांत हंसवती नांवाचें शहर आपणास सांपडावयाचें नाहीं, तरी त्या काळीं मात्र ती नगरी अस्तित्वांत असून फार समृद्ध, अशी तिची ख्याति होती. त्या काळच्या मानानें हंसवतीचा व्यापार व उद्योगधंदाहि बराच जोराचा असला पाहिजे. त्या शहरांत एका आर्यकुलांत महाप्रजापति पूर्वजन्मास आलेली होती. पद्मोत्तर बुद्ध धर्मोपदेश करीत असतांना तिनें तो ऐकला होता;

---

* महाप्रजापति गौतमीः—( पालि–महापजापती गोतमी ) प्रस्तुत चरित्रांत दोन्हींही नांवांचा उपयोग केला आहे. तीं नांवें एकच व्यक्ति दर्शवितात.

१: पद्मोत्तर बुद्धः—बौद्धधर्मांत गौतम बुद्धाच्या पूर्वी चोवीस बुद्ध होऊन गेले, असें सांगितलें आहे. जेव्हां धर्माची अनास्था होऊन धर्मचक्र थंडावतें, तेव्हां त्यास चालना देण्याकरितां बुद्ध उत्पन्न होतो.कांहीं कांहीं कल्पांत तर चार चार बुद्ध निर्माण होतात;तर कांहींत एकच उत्पन्न होतो. दीपंकर बुद्ध हा पहिला बुद्ध असें मानतात. त्यापासून दहावा बुद्ध पद्मोत्तर बुद्ध होय. हा नारदबुद्धानंतर आला. त्याच्या काळांत पाखंडवादी नव्हते. सर्व देवमनुष्यें एकट्या बुद्धासच शरण गेलेलीं होतीं. त्याची राजधानी हंसवती, पिता आनंद, माता सुजाता, देवल आणि सुजात हे अग्रश्रावक, सुमन हा उपस्थायक, अमिता व असमा या अग्रश्राविका, शालवृक्षाखालीं त्यास ज्ञान प्राप्त झालें, वगैरे माहिती या बुद्धासंबंधानें सांपडते.( जातकट्ठकथा-निदानकथा-प्रो.कोसंबीकृत आवृत्ति, सन १९१५, पृष्ठ,४८ § ५६ )

आणि त्या शास्त्यानें आपल्या भिक्षुणींपैकीं एका ज्ञानसंपन्न व अनुभवी भिक्षुणीला आपल्या भिक्षुणीसंघांत अग्रस्थान दिलें, असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां आपणासहि तें महनीय स्थान प्राप्त व्हावें, अशी तिनें उत्कट इच्छा[1] धरली. आपलें सर्व आयुष्य दानधर्म करण्यांत घालवून, शिक्षापदाचें—बुद्धानें घालून दिलेल्या नियमांचें[2]—परिपालन करून, शील संपादून व उपवसथ[3] नियमानें पाळून तिनें आपलें आयुष्य घालविलें.

काळ व पाण्याचा ओघ कोणाकरतांहि थांबत नाहींत, असें म्हणतात. मानवाची इच्छा असो किंवा नसो, काळ हा एकसारखा पुढें चाललाच आहे. तर आमच्या त्या आर्यकन्यकेच्या बाबतींत त्यास अपवाद कसा येईल ? फार दीर्घ कालावधि लोटला. १०० कल्पें लोटलीं ! त्या अनंतकाळांत तिनें कितीएक जन्म घेतले ! जननमरणाच्या फेऱ्यांत किती तरी वेळां ती सांपडली ! पण त्यायोगानें जी परिणति होते, तीपासून तिचा अपूर्व फायदा झाला. पुण्यसंस्कारांची वृद्धि झाली, अपुण्य संस्कारांचा क्षय होत चालला व वाराणसी नगरांत ५०० दासींची दासीनायिका [ ज्येष्ठिका ] म्हणून ती जन्मास आली. फारसा उच्च कुलांत जरी तिचा जन्म झाला नव्हता, तरी तिच्या आत्म्याची उन्नति

---

१: पालीशब्द—" अधिकारकम्म. "

२: यांस " पञ्चसील " किंवा " अट्ठंगसील " असेंहि नांव आहे. ( १ ) प्राणघात न करणें. (२) चोरी न करणें (३) अब्रम्हचर्य न करणें.( ४ ) खोटें न बोलणें.(५) मद्यादि मादक पदार्थांचें सेवन न करणें—ह्या पांच नियमांस पञ्चसील असें म्हणतात.

याच पांच नियमांत आणखी तीन नियम मिळविले म्हणजे आठ नियम किंवा अट्ठंगसील होतें. ते तीन नियम म्हणजे(१) मध्याह्नानंतर न जेवणें,( २ )नृत्यगीतादि न पाहणें व ऐकणें आणि गन्धमाल्यादि पदार्थ धारण न करणें, ( ३ ) उंच आणि मोठ्या बिछान्यावर न निजणें.

३: उपवसथ— दोन्ही अष्टमी,पौर्णिमा व कृष्णचतुर्दशी या चार दिवसांस उपवसथदिन असें म्हणतात.त्यादिवशीं उपासक किंवा उपासिका विहारांत जाऊन धर्मश्रवण करतात; पांच किंवा आठ नियम पाळतात; आणि धर्मचिंतनांत काळ घालवितात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पावित्र्य व शुचित्व ह्या दोन गोष्टी त्या दिवशीं तरी पाळण्याचा शक्य तितका प्रयत्न बौद्धलोक करतात.

मागील जन्मांतील संस्कारांनीं फार झपाट्यानें झालेली होती. जन्मानें मोठेपणा किंवा उन्नति होत नसून तीं कर्मानेंच होतात. हें सत्य दासी-नायिकेच्यासंबंधीं पूर्ण लागू पडतें.

एका वर्षाकाळची गोष्ट. पावसाळा तोंडावर आला होता. सर्वजण बरसातीपासून आपलें रक्षण करण्याच्या कामीं गर्क झाले होते आता चार महिने पावसाळ्यांत हिंडतां फिरतां जरी आलें, तरी एकंदर कामें जवळ-जवळ बंदच पडणार, म्हणून चार महिन्यांची तरतूद प्रत्येकजण करीत होता. ते पहा पांच पुरुष! पीतवस्त्रांनीं त्यांचीं शरीरें आवृत आहेत. त्यांचा शिरोभाग मुंडित आहे. शेजारच्या नन्दमूल नावाच्या लेण्यांतून ते खालीं उतरून ऋषिपट्टण[1] शहरांत भिक्षाटणासाठीं चालले ते पहा. ते नेहमींचे भिक्षु दिसत नाहींत. त्यांच्या एकंदर स्वरूपावरून, टेहळणीवरून व गांभीर्यावरून ते खरोखर **प्रत्येकबुद्धच**[2] असले पाहिजेत. त्यांनीं शह-रांत प्रवेश केला. सायंकाळची वेळ. ते अध्यात्म वीर पहा! भगवान्

---

१: ऋषिपट्टण (पाली– इसिपतन मिगदाय) बनारसच्या उत्तरेस सुमारें तीन मैलांवर धामेक नांवाचें ठिकाण आहे. ऋषींचें राहण्याचें स्थान; पूर्वीं अरण्य असून मृगां-करितां योग्य, म्हणून मृगदाव. सध्यां तें सारनाथ म्हणून प्रख्यात आहे. ख्रिस्ती शतक पूर्वीं तिसऱ्या शतकांत अशोकानें तें स्थळ पाहिलें होतें व त्या गोष्टीच्या स्मरणार्थ एक प्रकारचा मनोरा ही बांधला होता. तो चिनी प्रवाशांनीं पाहिलाहि होता. त्याचा व सभोंवतालच्या इतर इमारतींचे अवशेष अद्यापिहि दृष्टीस पडतात. (General cunningham, Archaeological Reports 1862 vol i, pp, 103–130.)

२: प्रत्येकबुद्ध (पाली- पच्चेकबुद्ध) बौद्धधर्मांत बुद्धत्वाचे दोन मार्ग दाखविलेले आहेत. प्रत्येकबुद्धप्रातिपदा (मार्ग) व सम्यक्सम्बोधिप्रतिपदा (मार्ग)- दोघेही स्वबलावरच ज्ञानाचा साक्षात्कार करून घेऊन बुद्धत्व मिळवितात. पण **प्रत्येकबुद्ध** हे बुद्धत्व मिळाल्यावर लोकसं-ग्राहकाचें काम करीत नाहीं तो गेंड्याच्या शिंगाप्रमाणें **एकटाच** अरण्यांत किंवा पर्वता-वर राहत असतो. जगतापासून आलिप्त राहणें, हाच श्रेयस्कर मार्ग, असें त्याचें मत असते. सुत्तनिपात नामक ग्रंथांत ‘खग्गविसाणसुत्त’ म्हणून जें सुत्र आहे, त्यांत **प्रत्येकबुद्धाचा** मार्गच दाखविला आहे. भगवान् गौतमबुद्ध हे सम्यक् संबुद्ध होते. त्यांनीं बहुजनहिता-सार्टी प्रवृत्तीचा मार्ग स्वीकारून जगतीतलावर हिंडून उन्मार्गगामी लोकांना सन्मार्गावर आणलें. अर्हत्पदाच्या प्राप्तीनंतर हेंच कार्य विहित होय, असें त्याच्या एकंदर उपदेशावरून दिसून येतें. सम्यक्संबुद्धाचा हा विशेष फार महत्वाचा आहे.

बुद्धानें भिक्षूंना आंखून दिलेल्या मार्गाचें ते यत्किंचित्‌हि उल्लंघन करीत नव्हते. रस्त्यांतून शांत मुद्रेनें, खालीं दृष्टि लावून, हात न हालवितां, मोजून पावलें टाकीत ते चालले होते.[१] ते कोणत्या हेतूनें शहरांत सायंकाळच्या सुमारास चालले असावेत बरें? कोठें जावयाचें हें त्यांनीं अगोदरच ठरवून ठेवलें असलें पाहिजे. गांवांतल्या नगरशेटच्या हवेलीकडे ते चालले पहा. पण त्यांच्याकडे मागें वळून वळून चौकस रीतीनें पाहणारी, कटिप्रदेशावर पाण्याचा घडा घेतलेली, ही कोण बरें स्त्री ? तिनें आपल्या चाणाक्ष मुद्रेनें त्या प्रत्येकबुद्धांना ओळखिलें व आपण पाण्याहून परत येतांना विशेष चौकशी करूं, असें मनाशीं ठरवून ती झपाट्यानें पावलें टाकीत नदीकडे चालली. मध्यंतरीं ते पहा पांच भिक्षु, त्या श्रेष्ठीच्या हवेलीच्या मुख्य दरवाजाशीं उभे राहिले आहेत; व त्यांचा निरोप घेऊन देवडीवाला आंत गेला आहे. बराच वेळ वाट पाहिल्यावर तो बाहेर आला व तो त्यांस म्हणाला, “ आमच्या शेटसाहेबांना सवड नाहीं आतां. तुमचें काम मीं त्यांना सांगितलें.पण त्यांनीं तुम्हांस परत जाण्यास सांगितलें आहे. तुमचें कार्य ते करूं शकत नाहींत. ”

असें उत्तर मिळालें तरी चित्ताची समता यत्किंचित्‌हि न गमावितां ते पांच बुद्ध त्याच पावलीं माघारी परतले व नगरवेशींतून बाहेर पडून रस्त्याला लागणार, तों ती ज्येष्ठिका त्यांच्याकडे गेली व मोठ्या नम्रभावानें तिनें त्यांना वंदन केलें व ती त्यांना म्हणाली:—“ हे आर्य, नगरांत प्रवेश करून आपणांस फारसा वेळ झाला नाहीं; तोंच परत जाण्यांत आपला हेतु काय बरें? ”

“ उपासिके, आमचें कार्य झालें नाहीं, म्हणून आम्हीं परत चाललों आहों. ”

“ महाराज, आपलें कार्य कोणत्या स्वरूपाचें आहे ? मला कळवावयास कांहीं हरकत नाहीं ना ? ”

---

१ “प्रातिमोक्ष” ( पाली–पातिमोक्ख ) म्हणून भिक्षूंनीं पाळण्याच्या नियमांचें जें पुस्तक आहे, त्यांत ‘ भिक्षुधर्म ’ पहा.

" उपासिके, बिलकुल नाहीं. वर्षावासाप्रीत्यर्थ[1] या ऋषिपट्टणाजवळ कुटी बांधून मिळण्यासाठीं नगरशेटकडे आम्ही गेलों होतों. पण शेटजीस सवड नाहीं, असें उत्तर मिळाल्यामुळें आम्हीं परत चाललों आहों."

"महाराज, आपली कुटी ऐश्वर्यशाली व भाग्यशाली श्रीमंतांनींच बांधावयाची असते; किंवा दुर्गत अशा भिकाऱ्यांनींहि ती बांधली तरी चालेल?"

" उपासिके, कुटी कोणीहि बांधली तरी चालेल."

" तर, फारच उत्तम, महाराज! उद्यां आपण सर्वांनीं माझ्या घरीं भोजनास यावें, अशी विनंति आहे; म्हणजे सर्व व्यवस्था होईल."

या संभाषणानंतर त्या पांच बुद्धांनीं स्तब्ध राहून आपली अनुमति दर्शविली, व ते वाटेला लागले. इकडे ती ज्येष्ठिका पाण्याचा घडा कमेरवर घेऊन घरीं गेली, व परत येऊन पाण्याच्या वाटेवर उभी राहिली; पाणी घेऊन येणाऱ्या प्रत्येक दासीला हटकून तिनें तीस तेथेंच थांबविलें. अशा रीतीनें त्या सर्व दासी जमल्यावर तिनें त्यांना प्रश्न टाकला.

" मुलींनो, दररोज दुसऱ्याची सेवा करीत राहणार, की दास्यत्वांतून मुक्त होण्याची इच्छा आहे?"

---

१: वर्षावास ( पालि-वस्सावास ) वर्षाकालीं एके ठिकाणीं राहणें. बौद्धभिक्षूंनीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं हिंडलें पाहिजे, अशी बुद्धांची त्यांस आज्ञा आहे. पण वर्षाकाळांत मात्र त्यांनीं एके ठिकाणीं राहिलें पाहिजे, अशी अनुज्ञा मागाहून जोडण्यांत आली. आषाढ शुद्ध पौर्णिमेपासून कार्तिकशुद्ध पौर्णिमेपर्यंत भिक्षूंनीं एकेठिकाणी राहिलें पाहिजे. महावग्गांतील तिसऱ्या भागांत यापद्धतीस आरंभ कसा झाला हें सांगितलें आहे. त्यावरून बुद्धानें ही पद्धति इतर पंथांकडून उचलली असें दिसतें. वर्षाकाळांत भिक्षु आपल्या अध्यात्मिक उन्नत्यर्थ झटतात. लोकांना धर्माचा उपदेश करतात. लोकहि त्यांना अन्न आणून देतात. वर्षाकाळच्या शेवटीं चीवरें (वस्त्रें) देतात. ज्या महिन्यांत चीवरें अर्पण केलीं जातात. त्यास " चीवरमास " अशी संज्ञा आहे. विस्तारासाठीं महावग्ग पहा. ( Burmese Edition–विनय खन्धक–वस्सूपनायिक–पृष्ठें १७६ते२०० )

" आईसाहेब, आम्हीं आज स्वतंत्र होण्यास मागत आहोंत? "

" असें असेल तर आपापल्या पतीकडून त्या पांच अर्हतांचीं कामें एक दिवस करून घ्या. कारण त्यांना वर्षावासासाठीं कुटी हवी आहे व तें काम करण्यास त्यांना मजूर मिळत नाहींत. मीं त्यांना उद्यां निमंत्रण केलें आहे. त्यांना तुमच्या पतींच्याकडून एक दिवसाचें काम देववा. तुम्हां सर्वांना हें कबूल आहे ना? "

" कबूल! कबूल!! " असें म्हणून त्या निघून गेल्या.

सायंकाळीं अरण्यांतून पुरुष परत आल्यावर प्रत्येक दासीनें आपल्या नवऱ्यास त्या पांच प्रत्येकबुद्धांस मदत करण्यासाठीं आग्रहानें विनंति केली. त्या सर्वांनीं तें कबूल करून ते सर्व लगेंच ज्येष्ठनायिकेच्या घरासमोर जमा झाले; व ज्येष्ठनायिका त्या सर्वांना उद्देशून बोलूं लागली " माझ्या मित्रांनो, आपल्या एक दिवसाचें काम त्या अर्हतांस द्या. यापासून आपलें फार हित होईल. त्या पवित्र माणसांचें काम केलें तर तुम्हांस पुण्यच लागेल. पुण्याकरितां प्रत्येकजण किती धडपडत असतो? व तें प्राप्त करून घेण्याची संधि आली असतांना तुम्हीं मागेंपुढें पाहतां कामां नये. तुम्हीं सर्वजण तयार आहांत ना? "

बहुतेकांनीं होकार दिला. पण जे थोडे तयार नव्हते, त्यांची उपरोधिक भाषणांनीं निर्भर्त्सना करून व त्यांच्याकडूनहि कबुली मिळवून तिनें त्यांना माघारी पाठविलें. दुसरे दिवशीं त्या प्रत्येकबुद्धांनां अन्नसंतर्पण करून तिनें त्या दासीपुत्रांना बोलावून आणलें व त्यांना काय काय गोष्टी करावयाच्या हें समजावून सांगितलें.

एकीचें बळ केवढें आहे बरें? लगेंच त्यांनीं अरण्याचा मार्ग धरला. अरण्यांतून सर्व साहित्य आणल्यावर शंभर लोकांची एक टोळी अशा पांच टोळ्या करून प्रत्येक बुद्धाकरितां एक अशा पांच कुटी त्यांनीं

बांधल्या; व त्यांच्या भोंवतीं चंक्रमे[1] वगैरे कुठीच्या सर्व साधनीभूत गोष्टी तयार केल्यानंतर व त्यांत असणारे मंचे[2], पीठें[3], पाण्याचे घडे[4] वगैरे जिन्नस ठेवल्यानंतर त्यांनीं त्या बुद्धांस समर्पण केल्या; व त्या बुद्धांनींहि तेथें चार महिने राहण्याची प्रतिज्ञा केली. त्या ज्येष्ठनायिकेच्या सांगण्यावरून प्रत्येकानें आळीपाळीनें त्यांच्या भिक्षेचीहि सोय लावली. पाळी आलेला मनुष्य जर अन्न देण्यास असमर्थ असेल, तर मुख्यनायिकेच्या घरून त्यांस अन्न मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. अशा रीतीनें त्या बुद्धांना भिक्षा मिळत असे. वर्षाकाळांत त्यांची बरदास्त राखल्यावर त्या नायिकेनें प्रत्येक दासीकडून एकेक वस्त्र घेतलें. व अशा रीतीनें ५०० वस्त्रें एकत्र केल्यावर तीं देऊन त्याऐवजीं तीन चांगलीं चीवरें[5] तिनें मिळविलीं व त्या प्रत्येकबुद्धांना तीं अर्पण केलीं. अशा तऱ्हेनें वर्षावास संप-

---

१: चंक्रम (पालि-चंकम) बौद्धभिक्षूंच्या उपयोगार्थ विहारांतील चालण्याची जागा. एकाग्रतेनें इकडून तिकडे चालण्यासाठीं जी जागा तयार करितात, तिला चंक्रम असें नांव आहे. साधारणतः, चंक्रमाची भूमि विषम असूं नये. त्यावर झाडी वगैरे नसावी, त्यांच्या आसपास जंगल नसावें, तो आकुंचित नसावा किंवा अत्यन्त विशाळही नसावा. बुद्धगयेंत एक उत्तम चंक्रम आहे. ( जातकट्ठकथा निदान कथा—प्रो. कोसंबीकृत देवनागरी पुस्तक—पृष्ठ ८६११ )

२, ३, ४,: बौद्धभिक्षूंस निजण्यासाठीं शय्या किंवा मञ्च. जुन्या लेण्यांतूनहि भिक्षूंच्या ज्या खोल्या दृष्टीस पडतात, त्यांतहि दगडाचा एक ओटा असतो. खुर्ची किंवा स्टूल वगैरे बसण्याचें साधन म्हणजे पीठ. पाण्याचा घड म्हणजे भिक्षूस जें पाणी लागतें तें सांठविण्यासाठीं लागणारी मापाची घागर. सिंहलद्वीपांत एखाद्या विहारात हिंडल्यास तेथें या सर्व गोष्टी अद्यापिही दृष्टीस पडतात.

५: चीवर म्हणजे भिक्षूंनीं अंगावर घेण्याचें वस्त्र. या चीवराच्या स्वरूपाबद्दल, आकाराबद्दल, प्रमाणाबद्दल, वापरण्याबद्दल व परिग्रहाबद्दल, फार सूक्ष्म असे नियम आहेत. चीवराचें एकंदर तीन भाग पडतात. संघाटि, उत्तरासंग व अन्तरवासक. कमरेभोंवतीं गुंडाळण्याचें वस्त्र. त्यावर अंगावर पांघरण्याचें, व विहारांत असतांना अंगावर ठेवण्याचें द्विगुण असें जें वस्त्र त्यास संघाटि असें नांव आहे; व बाहेर पडतांना अंगावर घेण्याचें जें वस्त्र त्यास उत्तरासंग म्हणतात. पंसुकूलचीवर हें सर्वांत उत्तम प्रकारचें चीवर आहे (किसा गोतमीचें चरित्र पहा) महावग्गांत व प्रातिमोक्षांत त्यासंबंधीं सर्व नियम सांपडतील. बुद्धानें नग्नावस्था कधींही मान्य केलेली नाहीं. त्याकाळच्या दृष्टीनें त्याच्या भिक्षूंचें चीवर अत्यन्त सभ्यतादर्शक असेंच होतें.

त्यावर ते प्रत्येकबुद्ध त्यांच्या डोळ्यांदेखत हवेंतून उडून गंधमादन-पर्वतावरें परत गेले. इकडे त्याहि ५०० दासींनीं आपलें आयुष्य पुण्य-कर्मांत खर्च केलें; आणि मरणोत्तर त्यांना देवलोकांत जन्म मिळाला. आमची ज्येष्ठनायिकाहि तेथून च्युत झाल्यावर बाराणशी नगराजवळील एका विणकऱ्यांच्या खेड्यांत मुख्य विणकऱ्याच्या घरीं जन्मास आली. मागील संस्कारांनीं तिचें मन अगोदरच उन्नत झाल्यामुळें याहि जन्मांत तिच्या इंद्रियांची शक्ति तीक्ष्णतर झाली होती; बुद्धि परिणत झाली होती; बुद्धांच्या संबंधींचा तिचा पूज्यभाव वाढतच चालला होता, व तिची एकंदर चर्या सुप्रसन्न व तेजस्वी दिसत असे. तिच्या त्या आयुष्यांत एक प्रसंग घडून आला, तो असा:—

एक दिवस बनारसच्या राजाच्या निमंत्रणावरून पद्मावतीचे ५०० भिक्षु त्याच्या दरबारीं गेले. अर्थात् बुद्ध भिक्षु तेथें गेल्यावर इतरां-प्रमाणे विशेष संभ्रम किंवा गडबड न करितां शांतचित्तानें, संयतेन्द्रिय-त्वानें व भिक्षूंच्या शीलाचें यत्किंचित्‌ही उल्लंघन न करितां, तेथें उभे राहिले. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, राजाच्या दरबारांतील कोणाहि मनु-ष्यानें त्यांची वास्तपुस्त सुद्धां घेतली नाहीं. त्याबद्दलहि विषाद न मानतां ते तसेच माघारीं परतल व शहरांतील राजमार्गानें चालले असतां वाटेंत विणकऱ्यांचें गांव त्यांना लागलें. ते त्या गांवावरून चालले असतां त्या दारिकेनें त्यांना पाहिलें. लगेच गतजन्मांतरींची निष्ठा तिच्या अंतरंगांत उद्भूत झाली. ती त्यांना सामोरी गेली. तिनें त्यांना वंदन केलें आणि प्रेमानें त्यांना थांबवून तिनें भिक्षा आणली व त्यांना ती अर्पण केली. भिक्षा घेतल्यानंतर तेहि भिक्षू गंधमादनपर्वतावर निघून गेले. इकडे आप-ल्या भिक्षेचा भिक्षूंनीं स्वीकार केला. या विचारानें त्या दारिकेचें अन्तःकरण

---

१: गंधमादनपर्वत हें प्रत्येकबुद्धांचें आवडतें निवासस्थान दिसतें. हिंदुपुराणांतून मात्र या पर्वतावर यक्ष वगैरे दुष्ट प्राणी राहतात, असें वर्णन आहे.

२: उत्पलवर्णा—पूर्वबुद्धकालीन चरित्र पहा.

प्रीतीनें[1] भरून गेलें; व पुण्यसंस्कारांची अभिवृद्धि होत चालली. आयुष्यभर सत्यानें वागून, दान वगैरे कृत्यें करीत, तिनें आपलें चारित्र्य उज्वल राखिलें व त्याचा परिणाम म्हणजे तिचें देवांनां व मानवांनांही विस्मरण पडलें नाहीं. आयुसंस्कारांचा क्षय झाल्यावर ती पुन्हां उत्तम कुळांत जन्मास आली.

( २ )

## गौतमबुद्धकालीन चरित्र.

गतजन्मींची ज्येष्ठिका किंवा पेशस्कार-कन्या आपल्या सत्कर्मांनीं व पुण्यसंस्कारांनीं, पण मुख्यतः, ज्येष्ठिकेच्या जन्मांत केलेल्या उत्कटेच्छेच्या (प्रार्थनेच्या) जोरावर देवदहनगरांत[2] महासुप्रबुद्धाच्या[3] घरीं जन्मास आली. आधींच गतजन्मपरंपरेच्या योगानें झालेली परिणति, क्षत्रिय कुळांत जन्म, सुस्वभावी, सदाचारी व कर्तृत्ववान् मातापितरें, यांच्या योगानें या नूतन जन्मांत तर ती जास्तच तेजस्वी दिसावयास लागली. तिच्या शरीरावर महात्म्यांच्या अंगावरील लक्षणें दिसावयास लागलीं. तिचें कुलनाम गौतमी असें होतें. विख्यात सम्यक् सम्बुद्ध जो गौतम त्याची माता जी मायादेवी तिची ही धाकटी बहीण होय. मन्त्राध्यायक ब्राह्मणांनीं ह्या दोन्ही बहिणींसंबंधानें असें जातक वर्तविलें होतें कीं, ह्या दोघींच्याहि पोटीं येणारीं मुलें चक्रवर्ती होतील.

---

१: प्रीति—( पालि–पीति ) आनंद. आनंदानें अंतःकरण भरून जाणें हें समाधीच्या लक्षणांपैकीं एक लक्षण आहे. ही मनोवृत्ति हळू हळू चित्तांत उत्पन्न होऊन चित्त आनंदानें भरून जातें. भगवद्भक्त भगवंताच्या भजनांत रंगून जेव्हां आनंदी होतात, तेव्हां बौद्धधर्मातील परिभाषेप्रमाणें त्यांना प्रीतियुक्त हा शब्द लावण्यास हरकत नाहीं. वितर्क व विचार हीं अंगें नाहींशीं झालीं म्हणजे प्रीति प्रमुखत्वानें दृग्गोचर होते. तेव्हां तिसऱ्या ध्यानाचा उदय झाला, असें समजावें.

२: कोळियाची राजधानी. संस्कृत शब्द "देवदह". शाक्यांची कपिलवस्तु.

३: अज्जनकोळिय यांचा पुत्र. "Rhys Davids, Buddhism" कुलवृक्ष पहा. पृष्ठ. ५१.

देवदह नगराजवळच रोहिणी नदीच्या तीरावर कपिलवस्तु नांवाचें दुसरें एक नगर होतें. त्याठिकाणीं शाक्य कुलांतील राजे राज्य करीत होते. सिंहहनूचा पुत्र शुद्धोदन हा त्यावेळीं राज्य करीत होता. वयप्राप्त झालेल्या शुद्धोदनाचा या दोन्ही कन्यकांशीं विवाह झाला; व तो त्या दोघींना घेऊन कपिलवस्तूंत राहण्यास आला. शुद्धोदनाचें भाग्य फार मोठें होतें. कालेंकरून बोधिसत्वें तुषितभवनांतून[2] निघून मायादेवीच्या कुक्षींत प्रवेश करिता झाला; व दहा महिन्यांनीं वैशाख शुद्ध पौर्णिमेस शाक्यकुलांत लुंबिनी[3] नामक उद्यानांत मायेच्या पोटीं जन्मास आला! तो जन्मास आला त्यावेळीं निरनिराळे चमत्कार झाले, म्हणून पालिवाङ्मयांत लिहिलें आहे. महात्मे जन्मास येतात तेव्हां अद्भुत व आश्चर्य या दोन वृत्तींनीं लोकांचीं अन्तःकरणें भरून गेलेलीं असल्यामुळें, चमत्कार घडणेंहि संभवनीय आहे. मायादेवी बोधिसत्वाच्या जन्मानंतर सातवे दिवशीं वारली, व तिला तुषितभवनांत जन्म प्राप्त झाला! तिला अर्थात्‌च सुगति मिळाली. राजा शुद्धोदनास आतां मोठाच प्रश्न पडला. आपला पुत्र असामान्य आहे, हें त्याला ब्राह्मणांनीं अगोदरच सांगितलें होतें अशा असामान्य पुत्राची माता परलोकवासी झाली. त्याचें संगोपन करण्यास अत्यन्त प्रेमळ, निरपेक्ष, चतुर, करारी, व मातृपद घेण्यास तयार, अशी कोणती स्त्री तयार होईल, या विवंचनेंत तो होता. याच सुमारास महाप्रजापतीसहि नन्द या नांवाचा पुत्र झाला होता. त्यामुळें तीहि मोकळी नव्हती! पण मागील जन्मांचा संस्कार, बहिणीवरील निरतिशय प्रेम, व नवऱ्याची बिकट परिस्थिति या

---

१: बोधिसत्व-( पालि-बोधिसत्त ) बुद्ध होण्याची पात्रता ज्याच्या अंगीं आहे तो. ११ व्या चरित्रात दिलेली टीप पहा.

२: बौद्धांच्या स्वर्गमालिकेंतील चतुर्थ देवलोकाचें नांव. "कामसुगतिभूमि' असेंहि नांव अभिधम्मत्थसंगह या पाली ग्रंथांत दिलेलें आहे.

३: हें स्थान नेपाळांत तराईत आहे. त्याठिकाणीं अशोकाचा एक स्तंभ उभारला असून त्यावरील शिलालेखावरून या लुम्बिनीउद्यानाची जागा ठरविली आहे. यास सध्यां लुम्बिनदेई असें म्हणतात. ( Vincent Smith-Rulers of India Series-अशोक. किंवा J. R. A. S. १८९८ पहा. )

गोष्टी तिच्यापुढें उभ्या राहिल्या. बोधिसत्वासारख्या महानुभाव विभूतींची शुश्रूषा करण्याची सुवर्णसंधि आली असतां आपण स्वार्थ मागें टाकला पाहिजे व स्वार्थी विचारांना रजा दिली पाहिजे, असें तिला वाटलें. परार्थ व परहित यांविषयीं अगोदरच परायण अशा त्या साध्वीनें आपल्या मुलाचा लोभ तोडण्यासहि कमी केलें नाहीं ! आपल्या बालकास एका विश्वासू दाईचे हवालीं करून बोधिसत्वास तिनें स्तनपान करविलें ! स्वतःचा पुत्र म्हणजेच बोधिसत्व, अशा निधड्या छातीनें तिनें बोधिसत्वाचें अत्यन्त आस्थापूर्वक, प्रेमानें व वात्सल्यानें परिपालन केलें ! यावरून गौतमी केवढ्या धीराची, उत्साहाची व धडाडीची स्त्री होती, याची वाचकांस कल्पना होईल. सिद्धार्थाचें उत्तम प्रकारानें संगोपन करून त्याची शारीरिक व मानसिक वाढ करण्याचें विकट काम राजा शुद्धोदन पेक्षां तिनेंच जास्त काळजीपूर्वक केलें, असें म्हणणें भाग पडतें. गौतमाच्या पुढील आयुष्यांतील ज्ञानलालसा, कळकळ, उत्साह,कुशाग्रता, निरलसता, विशददृष्टि, कार्यक्षमता नायकपटुत्व वगैरे जे गुण दृष्टीस पडतात, त्याचें बरेंचसें श्रेय गौतमीकडेस जातें. अस्तु.

गौतमाचें चरित्र सांगण्याचा हा प्रसंग नाहीं. तो कसा सुखात वाढला[1], त्याला चार दृश्यें[2] कशीं दृष्टीस पडलीं, या जगतांतील दुःखांतून मुक्त होण्यास कोणचा मार्ग असावा, तो कसा सांपडेल, ह्याचा विचार करून, तत्प्रीत्यर्थ त्यानें संसारसुखास लाथ मारून कसें महाभिनिष्क्रमण[3] केलें, त्यानें आत्मक्लेशाचा मार्ग कसा आक्रमिला[4], पण मागून त्यानें विचार करून तो मार्ग कसा सोडला व शेवटीं नेरञ्जरा नदीच्या तरीं बोधिवृक्षाखालीं त्याला बुद्धत्वाचा कसा साक्षात्कार झाला, हें सांगण्याची येथें

---

१: अंगुत्तरनिकाय–तिकनिपात–पण्णासक १, वग्ग ४–P. T. S.–त्यांत "तीन-मद" कोणते हें सांगितलेलें आहे.

२: जातककथा–निदानकथा–प्रो. कोसंबीकृत देवनागरी पुस्तक. पृष्ठ. ७४,७५ § ६१, ६२.

३: सदरहू पुस्तक—पृष्ठें ७७–८०.

४: मज्झिमनिकाय–मूलपण्णासक–राजवाडेकृत देवनागरी पुस्तक. महासीहनादसुत.

आवश्यकता नाहीं. बुद्धत्व प्राप्त झाल्यावर भिक्षुसंघाची स्थापना करून धर्मप्रसाराचें काम त्यानें कसें नेटानें सुरू केलें होतें व पुढील सुमारें पंचेचाळीस वर्षें त्यानें उत्तरहिंदुस्थानांतील मुख्य गांवोगांवीं जाऊन लोकांना धर्माचें ज्ञानामृत पाजविण्यांत कशीं घालविलीं, हेंहि सांगण्याचें कारण नाहीं. आपल्या धर्माटनांत तो कपिलवस्तूसहि गेला होता; व ज्या ठिकाणीं सिद्धार्थ बोधिसत्त्व मोठ्या सुखांत व ऐषारामांत रहावयाचा, त्याच नगरीच्या प्रशस्त रस्त्यांतून तो कषायवस्त्रें परिधान करून, हातांत भिक्षापात्र घेऊन, प्रातःसमयीं भिक्षाटनास निघाला असतां त्याच्या पत्नीस—यशोधरेस—काय वाटलें असेल ? तेथें जाऊन गौतमानें पुष्कळांस बौद्धधर्माचा उपदेश केला. राहुलास श्रामणेराची दीक्षा दिली; शुद्धोदन स्रोतापन्न[२] झाला, नन्दास प्रव्रज्या मिळाली; अशा तऱ्हेनें धर्माभिसमयाचें काम करीत करीत शास्ता वैशालीस गेला व कूटागारशाळेंत जाऊन राहिला. महाप्रजापति या गोष्टी मोठ्या धीरानें पहात होती. तिनें सिद्धार्थ पाहिला होता—नव्हे त्याचें संगोपनच तिनें केलें होतें. त्यास बुद्धत्व कसें प्राप्त झालें, हें ऐकून त्यास कपिलवस्तु नगरांत भिक्षाटन करीत असतांनाहि तिनें पाहिलें. अनुत्तर अशा सम्यक् संबोधीस प्राप्त झालेल्या गौतमास पाहून तिला आनंद झाला. तिचा उत्साह द्विगुणित झाला, त्याविषयींचा तिचा गौरव वाढला व आपण अशा थोर विभूतीचें संगोपन करण्याचें अमूप पुण्यकार्य केलें, म्हणून तिला अभिमानहि वाटूं लागला. तिला घर आतां ओकें ओकें वाटावयास लागलें. घरांतल्या माणसांची वाताहात झाली होती. गोकुळासारखें गजबजणारें शाक्यांचें घर मुख्य मुख्य लोकांच्या प्रव्रज्येमुळें भयाण दिसावयास लागलें होतें. याच सुमारास श्वेतच्छत्राधिपति शुद्धोदन राजाहि अर्हत्पदास पोहोंचतांच गृहस्थाश्रमांतच असताना अस्तंगत झाला[३] ! महाप्रजापतीनें असा विचार केला कीं,

१: ११ व्या चरित्रांतील यासंबंधी टीप पहा.

२: अर्हत्प्राप्तीच्या मार्गावरील पहिली पायरी. ( पालि—सोतापन्न ).

३: श्रावकास संसारांत राहून अर्हत्पदाची प्राप्ति झालेलें हें पहिलेंच उदाहरण आहे; नाहींतर प्रव्रज्या घेतल्यानंतर अर्हत्पदाची प्राप्ति झालेली पुष्कळ ठिकाणीं दिसते. पण असा मात्र नियम आहे कीं, अर्हत्पदाप्रत पोहोंचलेला मनुष्य एकतर प्रव्रजित तरी झाला पाहिजे किंवा अस्तंगत तरी झाला पाहिजे. अर्हत्पदाप्रत गेल्यावर मनुष्य संसारांत राहणें अशक्य आहे.

दुःखमय अशा या संसारांत राहण्यापेक्षां अध्यात्मविचारांत जर आपण आयुष्याचीं राहिलेलीं वर्षे घालविलीं, तर फारच चांगलें होणार आहे. अगोदरच मागील जन्मजन्मांतरींच्या संस्कारांनीं तिचें मन सुसंस्कृत झालेलें होतें; व गौतमबुद्धानें धर्मप्रसारार्थ जी भिक्षुसंघ नांवाची संस्था काढली होती, ती ऐकून तर तिला फारच उत्साह चढला. जर पुरुषवर्गानें भिक्षु होऊन ब्रह्मचर्याचरण करून धर्मप्रसाराचें कार्य करावें, तर आम्हां स्त्रियांना तें कां करितां येऊं नये, हा विचार तिच्या मनांत आला. "आम्हींही सर्वसंगपरित्याग करूं, आम्हींही स्वार्थी संसारावर पाणी सोडूं, जगाचा संसार तोच आमचा संसार मानूं, उन्मार्गगामी लोकांस सन्मार्गावर आणूं व शान्त व शाश्वत अशा निर्वाणपदाची आम्हीं जोड करून घेऊं व दुसऱ्यास करून देऊं," हे विचार तिच्या मनांत आतां वारंवार येऊं लागले. रोहिणी नदाच्या तीरावर शाक्य व कोळीयांचा जो मोठा कलहविवाद झाला, त्यायोगानें तर तिचा निश्चयच ठरला व प्रथम गौतमबुद्ध तेथेंच असतांना तेथील ५०० कुमारींसह महाप्रजापति ज्येष्ठनायिका त्याजकडे जावयास निघाली. गौतम बुद्धाच्या शासनानें अलंकृत होऊन त्याच्याच देखरेखीखालीं आपण ब्रह्मचर्याचरण करूं, असा सर्वांचा एक निश्चय झालेला होता. अध्यात्मासाठीं, दुःखाच्या क्षयासाठीं, अर्हत्पदासाठीं, निर्वाणासाठीं, लोकसंग्रहासाठीं, भावी संसारावर तुळशीपत्र ठेऊन, ऐहिकगोष्टी विसरून जाऊन, निर्वाणप्राप्तीनंतर आपला मार्ग दुसऱ्यास दाखवून जगतांतील दुःखाचा अंत करण्यासाठीं हें ५०० स्त्रियांचें पथक गौतमाकडे चाललें होतें! प्रत्येकीच्या चर्येवर करारीपणा मूर्तिमंत दिसत होता!

अशा रीतीनें महाप्रजापति आपल्याबरोबर त्या ५०० कुमारींना घेऊन गौतमाकडे गेली व आमचा संघांत प्रवेश व्हावा, म्हणून तिनें त्याची याचना केली. पण गौतमबुद्धानें त्यांची विनंति अमान्य केली! खुद्द महाप्रजापतीचीहि इच्छा सफल झाली नाहीं! केवढा मोठा आशाभंग!! जबरदस्त वज्राघात!!!

त्यानंतर लवकरच शास्ता गौतम वैशालीस गेला. महाप्रजापति असामान्य स्त्री नव्हती. गौतमानें आपली परीक्षा केली नाहीं, हेंच शल्य

तिच्या हृदयास खात होतें. दारुण वेदनांनीं तिचें हृदय व्यथित झालें होतें. आपण भिक्षुणी होण्यास लायक नाहीं, ही शास्त्याची कल्पना आपण केव्हां दूर करूं, असें तीस होऊन गेलें होतें.

त्या सर्व विषण्णवदनांनीं पण निश्चयी अंतःकरणानेंच घरीं परत आल्या! महाप्रजापतीनें आपल्या सर्वांच्या केशांचें अवहरण करविलें; सर्वांनीं पीतवस्त्रें परिधान केलीं, व त्या चीवरयुक्त संन्यस्त देवता वैशालीस जावयास निघाल्या. त्या स्थिर चित्तानें, पूर्ण विचारानें व दृढनिश्चयी मुद्रेनें, चालल्या होत्या. समाज तर तें दृश्य पाहून स्तंभितच झाला! केवळ्या करारी स्त्रिया! प्रथम महाप्रजापति आनंदाकडे गेली. गौतम बुद्धाचा उपस्थायक आनंद यानें त्यांची भेट घेतली व त्यांच्यावतीनें भगवान् बुद्धाकडे जाऊन त्यानें त्यांच्या उत्कटेच्छेची जाणीव शास्त्यास करून दिली. ब्रह्मचर्याचरणांत पुरुष व स्त्री हा भेद ठेवतां कामा नये; दोघांनांही अर्हत्पदाची प्राप्ति करून घेतां येईल, असें गौतमानें पूर्वीच सांगितलें असल्यामुळें[1] आनंदाची रदबदली यशस्वी झाली! भिक्षुणीसंघाची स्थापना झाली! महाप्रजापति गौतमी व तिच्या ५०० कुमारी संघांत प्रविष्ट झाल्या. लौकरच फक्त आठ निर्बंधांशिवाय[2] त्यांना भिक्षूप्रमाणेंच सर्व स्वातंत्र्य मिळालें; लौकरच त्यांना उपसंपदा[3] हि मिळाली. महाप्रजापति ५०० कुमारिकांसह शास्त्याजवळ जाऊन त्यास प्रणाम करून एका बाजूस बसली. बुद्धानें त्या सर्वांस बौद्धशासनांतील तत्त्वें शिकविलीं; व ज्याच्या त्याच्या

---

१: चुल्लवग्ग-Oldenberg, X, 1. 2. 3.

२: त्यांना आठ ‘ पाराजिकधम्म ’ अशीहि संज्ञा आहे. ( भिक्खुनी पातिमोक्ख. Bu mese Edition-पृष्ठ ३१-३२.

३: उपसंपदा—याच्या योगानें भिक्षू आणि भिक्षुणी संघाचा एक नियत घटक बनतात. प्रव्रज्या म्हणजे संघांत प्रवेश करण्याची परवानगी होय.‘ अगारस्मा अनगारियं पब्बज्जा,’ असें म्हटलें आहे. गृहस्थाश्रमांतून अनगार्यावस्थेंत प्रवेश. पण संघांत प्रवेश व त्याबरोबरच त्यांच संघांतील सर्व हक्क प्राप्त होत नसतात. संघाच्या सर्व बाबींत मतदानाचा हक्क उपसंपदेनंतरच प्राप्त होत असतो. महावग्गांतील महाखन्धकांत उपसंपदा व पब्बज्जा यांचें विधान बरोबर दिलें आहे.


मानसिक उन्नतीप्रमाणें तीं तत्त्वें त्यांना समजलीं. मध्यंतरीं महाप्रजापतीस मात्र मागील संस्कारांच्या प्रभावानें व पूर्वचरित्रांत निर्दिष्ट केलेल्या उत्कटेच्छेच्या जोरावर कर्मस्थानें[1] करून समाधि लावतां येऊं लागली व प्रज्ञापारगंत होत्साती तिला अर्हत्पदाचा साक्षात्कार झाला! पुढें कालांतरानें त्या ५०० कुमारींसहि अर्हत्पदप्राप्ती झाली!

एक दिवस जेतवनांत अनाथपिण्डिकाच्या आरामांत गौतमबुद्ध बसले असतांना, भिक्षुणीसंघ जमला होता व शास्ता त्या संघांतील प्रत्येक भिक्षुणीचा दर्जा कोणचा, हें सांगत होता. जेव्हां गौतमीवर पाळी आली तेव्हां अनुभवी भिक्षुणींत गौतमी प्रमुख आहे, असा अग्रेसरत्वाचा मान त्यानें तिला दिला. भगवान् बुद्धानें तिचा सन्मान केला व त्या मानास ती योग्य नाहीं, असें आमच्या वाचकांपैकीं कोण म्हणेल बरें? '[2]

---

१: समाधि लावण्यासाठीं लागणारा विषय. हे एकंदर चाळीस आहेत. ( विसुद्धि-मग्ग. P.T.S. vol i, page 110.)

२: थेरीगाथेवरून तिची पुढील कामगिरी किती बहुमोल होती, ह्याची कल्पना होते. हजारों भगिनींना त्यांच्या विपत्काळीं संघांत आश्रय देऊन त्यांची उन्नति करण्याचें पवित्र काम या अनुभवी व हुषार स्त्रीनें केलं. तिची थोरवी काय गावी? अर्हत्पद प्राप्त करून घेतल्यावर ती स्वस्थ न बसतां, तिनें हें जें प्रवृत्तिपरकार्य केलें, त्यावरून बौद्धधर्माच्या तत्वाची खरी कल्पना येण्यास मदत होइल, अशी अपेक्षा आहे. ( थेरवथेरीगाथा – P. T. S.—Oldengber and Pischel- पृष्ठें १३८-१३९—गाथा १५७-१६२)



# रत्न २ रें.

## क्षेमा.*

( १ )

### पूर्वबुद्धकालीन-चरित्र.

जगताच्या नियमनासाठीं, धर्मचक्राचें प्रवर्तन करण्यासाठीं, भरतवर्षाची ख्याति उज्वल करण्यासाठीं, मानव कोटींतहि " नर का नारायण हो जायगा " या गोष्टीची जणूं काय सत्यता पटविण्यासाठीं आणि सर्वांत मानवजातिविषयींच्या निरपेक्ष व अकृत्रिम अशा मैत्रीसाठीं या भारतखंडांत जे मार्गदर्शक सम्यक् संबुद्ध होऊन गेले, त्यांचीं नांवें पालिवाङ्मयांत दिलेलीं आहेत. त्या सर्वांनीं मानवकुलांत जन्म घेऊन, मानवांच्या अधिभौतिक दृष्टीनें अत्यन्त स्पृहणीय अशा उत्तम व संपन्न कुलांचीं सौख्यें भोगीत असूनहि, त्यांना दूर करून, जगतामध्यें जें अनंतस्वरूपांत दृग्गोचर होणारें दुःख आहे तें निर्मूलन करण्याचा मार्ग शोधण्याच्या कार्यांत गर्क होऊन, आपल्या मानवीसाधनांनीं सन्मार्गाचा साक्षात्कार करून घेतला ! अनेक जन्म घेऊन बुद्धत्व प्राप्त करून घेण्या करितां जरूर असे जे परमावधीचे पूर्णावस्थेप्रत गेलेले दहा सद्गुण [1] आ-

---

* क्षेमा ( पालि-खेमा )-प्रस्तुत चरित्रांत दोन्हींही नांवें वापरलीं आहेत. तीं एकाच व्यक्तीचीं निदर्शक म्हणून समजावीं.

१: दहा सद्गुण-त्यांना पालीभाषेंत ' पारमिता ' असें नांव आहे. त्यांच्या योगानें मनुष्यास बुद्धत्व प्राप्त करून घेतां येतें; म्हणून त्यांस ' बुद्धकारक धर्म ' असेंहि विशेषण आढळतें. बोधिसत्वास निरनिराळे जन्म घेऊन त्यांत ह्या पारमितांचा पूर्तता करावयाची असते. त्यांचीं पालीनांवें हीं—दान, सील, नेक्खम्म, पञ्ञा, विरिय, खन्ति, सच्च, अधिट्ठान, मेत्ता आणि उपेक्खा. ( ' बुद्धलीलासारसंग्रह-प्रो. कोसंबीकृत-पृष्ठ २० पहा )

हेत त्यांच्यांत पारंगतता मिळविली आणि बुद्धत्व प्राप्त करून घेतलें. अशा पंचवीस विश्व-आचार्यापैकीं (गुरूपैकीं) गौतमबुद्ध हे होत; व हेच सर्वांना ख्यात आहेत. आपल्या हिंदूधर्मानें भगवान् विष्णूचा अवतार म्हणून त्यांचीच गणना करून त्यांच्या अननुपूर्व अशा कामगिरीची योग्य पारख केली आहे! ह्यांच्यापूर्वी या जगताच्या अनन्तगतकालांत अशींच मानवरत्नें निर्माण झालीं आहेत. जेव्हां जगताची घडी विसकटून जाते, जेव्हां मानवीप्राणी आपापलें अत्यन्त पवित्र नातें विसरून जाऊन सैतानासारखे भांडत सुटतात, मैत्री, करुणा, मुदितासारख्या सद्गुणांना पारखे होतात; व जडाच्या मोहिनीनें मोहून गेल्यामुळें विश्वाच्या अखंड भ्रमणाच्या प्रचंड भोवऱ्यांत भांबावले जाऊन इकडे तिकडे पहात सुटतात, तेव्हां योग्यमार्ग दाखविण्याकरिता, धर्माचा प्रकाश उज्वल करण्याकरितां; मानवांच्या हृदयांत नैतिकज्ञानाचा व अमूल्य अशा त्रिकालाबाधित कार्य-कारण तत्वाचा[१] उमज पाडण्याकरितां अनेक बुद्ध निर्माण झालेले होते! त्यांच्या मालिकेंत पद्मोत्तर बुद्ध यांचा दहावा नंबर लागतो. त्यांचें निवासस्थान हंसवती नगरी हेंच होय. याच नगरीचा उल्लेख मागें केलेला आहे. ह्या हंसवती नगरींत पदमोत्तर बुद्धाच्या काळीं एक पुरंध्री म्हणून क्षेमा प्रख्यातीस आली होती. पुरंध्री याचा अर्थ संस्कृतवाङ्मयांत जितका संकुचित आपण घेतों, तितका तो पालीवाङ्मयांत घेत नाहींत. समाजामध्यें सर्व मंगल प्रसंगीं जिला अग्रेसरत्वाचा मान मिळतो, तीच पुरंध्री होय. अशा प्रकारचा अलौकिक मान सद्गुणी, सदाचारी, विनय-

१: (पाली-पटिच्चसमुप्पाद.) बोधिसत्व गौतमास बोधिवृक्षाखालीं ज्याचें सम्यग्ज्ञान झालें तें याचेंच. जगतांत जें हें विविधप्रकारचें दुःख भरलें आहे, त्याचें निदान ठरवीत असतांना गौतमास ही कारणपरंपरा दिसली. अविद्येपासून संस्कार, संस्कारांपासून विज्ञान, विज्ञानापासून नामरूप, नामरूपांपासून षडायतनें, षडायतनांपासून स्पर्श, स्पर्शापासून वेदना, वेदनेपासून तृष्णा, तृष्णेपासून उपादान, उपादानापासून भव, भवापासून जाति (जन्म), जातीपासून जरा व मरण, शोक, परिदेव, दुःख, दौर्मनस्य, उपायास हीं उत्पन्न होतात. अशा रीतीनें दुःखाचा उद्गम होतो. व ह्या एकेक अंगाचा नायनाट करीत चाललें असतांना शेवटीं दुःखाचा निरोध होतो. ह्या प्रतीत्यसमुत्पादाचें महत्व बौद्धतत्वज्ञानांत फार आहे. (दीघनिकाय-Rhys Davids and Carpenter-P. T. S.-महानिदान सुत्तन्त-पृष्ठ-५५ व पुढें.)

वती, कुशल, व विलक्षण दूरदर्शी अशाच स्त्रीरत्नास मिळत असे. भगवान् पद्मोतर बुध्दाच्या धर्माचें रहस्य तिला कळलें असल्यामुळें तिनें तें सर्वांना समजावून सांगितलें होतें-नव्हे तिनें प्रत्यक्ष आचरणांत आणून दिलें होतें. ज्याप्रमाणें रत्नास पारखणारा रत्नपारखी लागतो, त्याप्रमाणें सद्गुरूची योग्यता पाहून त्याच्या योग्यतेची जाणीव समाजास करून देणें, हेंसुद्धां सोपें काम नाहीं; व तें काम प्रस्तुत नायिकेनें गतजन्मांत केलेलें होतें.

अशाप्रकारानें समाजांतलें पुरंध्रीचें स्थान तिनें पटकाविलें असतानां, तिचें मन संसाराच्या गोष्टींत फारसें लागत नव्हतें. पद्मोत्तर बुद्धाच्या धर्मोपदेशानें तिला दुसऱ्याप्रकारचें अग्रस्थान मिळवावयाची बलवती इच्छा उत्पन्न झाली होती. एक दिवस भगवान् पद्मोत्तर बुद्धाच्या दोन पट्टशिष्यांपैकीं सुजात नांवाचा स्थविर भिक्षेसाठीं हंसवतींत संचार करीत असतां, त्या पुरंध्रीच्या घराशीं आला. बौद्धभिक्षूचें तें शांत व प्रसन्नमुख पाहून तिच्या हृदयांत धर्माविषयींची उत्कटप्रीति उत्पन्न झाली; व तिनें त्यांस तीन मोदकांचें दान केलें. पण नुसत्या बाह्यदानानें तिचें समाधान झालें नाहीं. बौद्धधर्मांतील दान या शब्दाचें खरें रहस्य हिंदू–धर्मांतील नेहमींच्या दान या शब्दानें व्यक्त होत नाहीं. तिला अध्यात्मिकदानमंगल करावयाचें होतें. बौद्धवाङ्मयांत स्वतःच्या शरीराचा एखादा भाग दान म्हणून देणें, हें उत्तम दानाचें उदाहरण समजतात. स्वतःचें मांस देणें, डोळा देणें, शिर देणें ही दानयज्ञाचीं उज्वल उदाहरणें समजतात. त्या पुरंध्रीस निव्वळ मोदकाचें दान देणें हें महत्वाचें वाटलें नाहीं. स्त्रियांचें अत्यन्त बहुमोल व सर्वांकडून वाहलें जाणारें असें भूषण म्हणजे कुंतल. तिला वाटलें, जर आपणास आपला उच्चहेतु साध्य करून घ्यावयाचा असेल, तर आपण कांहीं तरी अध्यात्मिकदान केलें पाहिजे. म्हणून तिनें आपल्या सुंदरकेशकलापापैकीं कांहीं केशांचें कर्तन करून ते केश दुसऱ्यास विकायास काढले. पुरंध्रीचे केश ते! त्यांची किंमत फारच चढली. पुष्कळांनीं ती अत्यन्त पवित्र व बहुमोल वस्तु म्हणूनच मानली. ते केश विकून जो पैसा आला त्यांतून भिक्षूंना वापरण्यालायक व त्यांना विहित अशा वस्तु तिनें खरेदी केल्या व त्या वस्तु सुजातास दान करून, त्याकाळीं त्याच्यासमोर अशी दृढ-

आकांक्षा प्रथित केली कीं, "भविष्यत्कालीं जेव्हां भगवान् बुद्ध उत्पन्न होईल, तेव्हां मला प्रज्ञा प्राप्त व्हावी. मी महाप्राज्ञ म्हणून त्यांच्याकडून गणली जावें." अर्थात् तिनें आपलें सर्व आयुष्य त्या इच्छेच्या प्रबलतेमुळें तीस परिपोषक अशीं दानादि कुशलकर्मे करण्यांतच घालविलें व अस्तंगत झाल्यावर पुढें १०० हजार कल्पपर्यंत देवमनुष्यलोकांमध्यें निरानिराळे जन्म घेत घेत व जन्मजन्मांतरीं कुशलकर्में करून पुण्यकारक असा विपाकसंचय वाढवीत. पूर्वजन्मसंस्काराच्या बलावर भगवान् काश्यप बुद्धाच्या काळीं किकी नांवाच्या काशीराजाची कन्यका म्हणून ती जन्मास आली.

काशीराजास एकंदर सात कन्यका होत्या; त्यांपैकीं सर्वांत धाकटी म्हणजे आमची चरित्रनायिका होय. आपल्या संगतीं आपल्या बहिणींनाहि हजारों वर्षें कौमार्यव्रताचें आचरण करवीत करवीत, एका कल्पांत तर भगवान् बुध्दाकरितां एक वसतिस्थान तयार करवून तें विहारदान देऊन एक बुद्धान्तरपर्यंत देवमनुष्यामध्यें ती जन्म घेत होती. निरनिराळ्या जन्मांत निरानिराळ्या सद्गुणाचें आचरण व त्यांत नैपुण्य मिळवून आपल्या सद्वासनेस—सम्यक्संकल्पास परिपोषक अशी भूमि ती तयार करीत होती. मानवाचें आयुष्य म्हणजे अंतिम साध्याची तयारी आहे, ही दृढ भावना हृदयांत बाळगून जर मनुष्य वागेल, तरच त्याचें तें आयुष्य सत्कारणीं खर्च होऊन, त्याच्या उन्नतीस कारणीभूत होईल. आपल्या चरित्रनायिकेची जन्मपरंपरा म्हणजे अशाच स्वरूपाची होय. म्हणूनच भगवान् गौतमबुद्ध ज्या युगांत उत्पन्न झाले, त्यांत तिनें मद्रराष्ट्रांत सागर शहरीं राजकुळांत जन्म घेतला.

---

१ बुद्धान्तर (पालि—बुद्धन्तर) एक बुद्ध जाऊन दुसरा बुद्ध येईपर्यंत मध्यंतरीचा जो काळ त्यास बुद्धन्तर असें म्हणतात.

२ सम्यक् संकल्प (पालि—सम्मासंकप्पो) आर्यअष्टांगिक मार्गाचीं जीं आठ अंगें आहेत, त्यांपैकीं एक. इतर सात अंगें हीं:—सम्यग्दृष्टि, सम्यग्वाचा, सम्यक् कर्मान्त, सम्यगाजीव, सम्यग् व्यायाम, सम्यक् स्मृति व सम्यक् समाधि.

## ( २ )

## गौतमबुद्धकालीन—चरित्र.

मद्राधिपतीच्या कन्यकेचें नांव क्षेमा असें होतें. जन्मतःच तिची सुंदर अंगकान्ति दृग्गोचर होत होती. तिच्या त्या कुसुमसुकुमार शरीरयष्टीमुळें, इंद्रिय-सौष्टवामुळें व सुवर्णसदृश पिंजरकांतीमुळें तिचें क्षेमा हें नामाभिधान सार्थ होतें. तिच्या त्या सौंदर्यामुळें ती आपल्या आईबापांची लाडकी झाली. दिवसेंदिवस शुक्लेंदुवत् ती वर्धमान होत चालली. विवाहास योग्य अशी दशा तीस प्राप्त झाल्यावर ती मुग्धा नितांतरमणीय दिसावयास लागली. विवाहयोग्य अशा क्षत्रियकुमारांपैकीं प्रत्येक जण ती आपणास मिळावी म्हणून प्रयत्न करावयास लागला. मद्राधिपतीकडे तिच्याबद्दल मागण्या येऊं लागल्या. कोसलेश्वरानेंही मद्राधिपतीकडे मागणी केली. बिंबिसारराजा ह्मणजे कोसलांचा मायाळू पिता अशी त्याची सर्वत्र ख्याती झाली होती. त्यांतून त्याच्या समत्वभावामुळें तर तो सर्वांसच हवाहवासा वाटे. गौतमबुद्धाचा पहिला श्रावक राजा ह्मणजे बिंबिसार हा होय[1]. कोसलेश्वराची मागणी मद्राधिपतीनें मान्य केली; व क्षेमा कोसलेश्वराचे पट्टराणीच्या पदावर विराजमान झाली.

जन्मजन्मांतरींच्या नैतिकसौंदर्यामुळें या जन्मांत शारीरिक सौंदर्यहि क्षेमास प्राप्त झालें होतें. व एका सम्पन्न व विख्यात राजाची अग्रम-

---

१ सिद्धार्थानें ( गौतमाचें पहिलें नांव ) घर सोडल्यावर तो राजगृहनगरांतून प्रव्रजित होत्सातां भिक्षा मागत असतांना तेथील बिंबिसार नांवाच्या राजानें त्यास पाहिलें. तेव्हां त्यास पुष्कळ धनाची व राज्याची लालूच दाखवून परावृत्त करण्याचा राजानें प्रयत्न केला, पण तो फसला. तेव्हां राजानें त्यास सांगितलें कीं, ज्याअर्थी आपण परमाभिसंबोधि प्राप्त करून घेण्यास जात आहांत, त्याअर्थी ती आपणास प्राप्त झाल्यावर प्रथम आपण माझ्या राज्यात यावें. बोधिसत्वानें बरें म्हणून उत्तर दिलें व तेथून तो निघून गेला. पुढें बुद्धत्व प्राप्त झाल्यावर आपल्या वचनांतून मुक्त होण्यासाठीं तो राजगृह नगरास गेला. राजानें बुद्धाचा उपदेश ऐकून तो बुद्धाचा उपासक झाला; व त्यानें आपलें वेळुवन [illegible] दान केलें. अशा रीतीनें गौतमाचा पहिला श्रावक राजा बिंबिसार हा होय.

हिषी झाल्यामुळें तर त्याची पूर्तताच झाली. आपल्या उदारधी पतीच्या सहवासांत ती फारच आनंदांत व सौख्यांत वाढत होती. त्या समयीं बिंबिसारराजानें भगवान् गौतमबुद्धांस वेळुवन दान केलें होतें; व त्या वेळुवनांत शास्ता आपल्या संघासमवेत रहात होता. त्या गौतमाचा साधुवाद क्षेमेच्या कानावर वारंवार आला होता; व त्यांतून मुख्यतः शास्त्याविषयींच्या आपल्या पतीच्या उद्गारांनीं तिच्या मनावर परिणाम केलेलाच होता. पण दशबलांनीं सौंदर्याची अभिरुचि नाहीं, सौंदर्याची त्यांनीं कधींहि स्तुती केलेली नाहीं. उलट सौंदर्यांत दोष काढण्यांत दशबल पटाइत आहेत, ही वार्ता जेव्हां तिनें ऐकली, त्या बरोबर स्त्रीस्वभावास अनुसरून त्या सुंदरीचा मनोभंग झाला. अगोदरच ती रुपवती असल्यामुळें गौतमानें आपल्या सौंदर्याची स्तुति करावी, असें तिला वाटणें साहजिकच होतें. पण गौतमाची मनोभूमिका कोणत्या दर्जाची होती हें तिच्या सारख्या ऐहिकसुखांत व कल्पनांत दंग झालेल्या स्त्रीस समजणें, शक्य नव्हतें. इतर क्षत्रियकुलांतील राजे तिच्या सौंदर्याची स्तुति करीत; इतर दरबारचे लोक तिच्या सौंदर्याबद्दल गोडवे गात; तिच्या जातीच्या सुंद-

---

१: दशबल हें तथागताचें (गौतमबुद्धाचें) विशेषण आहे प्रस्तुत चरित्रावलिंत याचा वारंवार उल्लेख केला असल्यामुळें त्यावर येथेंच संपूर्ण टीप देणें आहे तथागतास एकंदर दहाबलें असतात. त्यांच्या जोरावर तो निर्भय असें स्थान प्राप्त करून घेतो, परिषदेंत सिंहनाद करतो, व ब्रह्मचक्राचें परिवर्तन करतो. तीं बलें हीं:--(१) स्थान स्वरूपतः व याथातथ्य असें पदार्थांचें ज्ञान असतें; (२) वर्तमान, भूत व भविष्यत्कालीं कोणत्या कर्माचा कोणता विपाक होतो, हें त्यास यथाभूत ठाऊक असतें; (३) सर्वत्रगामी मार्ग त्यास यथाभूत ठाऊक असतो; (४) प्राण्यांच्या विविध स्वभावाचें त्यास यथाभूत ज्ञान असतें; (५) निरनिराळ्या सत्वांच्या निरनिराळ्या अधिमुक्ति त्यास यथाभूत ठाऊक असतात; (६) परसत्वें व परपुद्गल यांचें इन्द्रियपरोपर्यत्व त्यास यथाभूत ठाऊक असतें; (७) बुद्धास ज्ञानविमोक्षसमाधिसमापत्ति व त्यांचें संक्लेश अवदान हीं यथाभूत ठाऊक असतात; (८) त्यास अनेक प्रकारच्या पूर्वनिवासांची अनुस्मृति असते; (९) तो दिव्यचक्षूनें सर्व सत्वांची च्युति किंवा जन्म पहातो; (१०) तो याच जन्मांत आस्रवक्षयानंतर अनास्रव होत्साता चेतोविमुक्ति व प्रज्ञाविमुक्ति जाणून व साक्षात्कार करून घेऊन रहातो. (मज्झिमनिकाय–मूलपण्णासक–राजवाडेकृत–देवनागरी पुस्तक–महासीहनादसुत्त–पृष्ठें ५१–५२.)

रींना ती लाजेनें मान खालीं घालावयास लावी; असें असतांना जर आपण शास्त्याच्या दर्शनास गेलों आणि त्यानें आपणाकडे पाहून आपणांत खोड काढली तर? या विचारानें व रूपमदानें मत्त होत्साती ती गौतमबुद्धाच्या दर्शनास जाण्याची टाळाटाळी करी-नव्हे तीं दर्शनास जाईना! इकडे तिचा पति बिंबिसार राजा भगवान् बुद्धाचा परमभक्तिमान् श्रावक, तर तिकडे त्याची अग्रमहिषी त्याच बुद्धाचे दर्शनासहि न जाणारी! हा विपरीतभाव राजास बिलकुल आवडला नाहीं. कांहीं तरी युक्ति काढून तिचा हा रुपविषयक गर्व नाहींसा केला पाहिजे, व तिच्या अन्तःकरणांत गौतमविषयक भक्ति उत्पन्न केली पाहिजे, असें त्यानें ठरविलें व त्यास लौकरच एक तोड सांपडली.

त्यानें आपल्या दरबारांतील भाटांना बोलावून आणलें व अत्यन्त चित्रोपम भाषेंत वेळुवनाचें काव्य तुम्हांस रचितां येइल कां, म्हणून त्यांना प्रश्न विचारला.

"होय, महाराज, आपली आज्ञा असेल, तर अशाप्रकारचा प्रबंध आम्हीं रचूं व आमची एवढी खात्री आहे कीं, तो आमचा काव्यप्रबंध आम्हीं आमच्या किनरीवर उत्तम आलापांत गायिला असतां केवढाहि नीरस मनुष्य असला तरी तो मोहून गेला पाहिजे."

"बरें, असें असेल तर वेळुवनाचें अत्यन्त मनोहर असें वर्णन करून आणा पाहूं व मग तें अग्रमहिषीच्या कानावर सहज रीतीनें जाईल अशी व्यवस्था आम्ही करूं. तुम्हांस आम्हीं अशा ठिकाणीं बसवून म्हणावयास सांगूं कीं, त्या ठिकाणाहून राणीचा महाल फार दूर असणार नाहीं. त्या तुमच्या कर्णमधुरआलापांनीं राणी मोहित झाली कीं, तुम्हीं अशा रीतीनें उद्यानाचें वर्णन करा कीं, तिच्या मनांत उद्यान पाहण्याची इच्छा उत्पन्न झालीच पाहिजे. तुम्हीं हें काम करूं शकाल नां?"

"अवश्य महाराज, महाराजांनीं एकवार आमची कारवाई पहावीच."

राजानें 'बरें' म्हणून त्यांची रवानगी केली. त्यांनींहि अतिशय परिश्रम घेऊन उत्तम रागदारींत तें काव्य बसविलें व राजास वर्दी

मिळाल्यानंतर राजानें योग्य ती तजवीज करवून क्षेमा राणीच्या कानीं तें काव्य पाडिलें. त्याबरोबर त्या सुंदरीस आतां तें उद्यान पाहण्याची प्रबळ इच्छा उत्पन्न झाली. दुसरेच दिवशीं ती राजाकडे गेली व महाराजानीं उद्यान पाहण्यास जाण्याविषयीं आपणास अनुमति द्यावी, अशी तिनें त्यांस विनंति केली. राजानें हंसून उत्तर केलें, "देवि, आपणांस वेळुवन पाहण्याची इच्छा झाली, हें मी माझें मोठें भाग्यच समजतों. वेळुवनाची वनश्रीच इतकी रमणीय आहे कीं, ती एकदां पाहिली ह्मणजे मनुष्य संसारच विसरून जाईल. पण आपण हें लक्षांत ठेवावें कीं, तेथें एकदां गेल्यावर भगवान् बुध्दाचें दर्शन करून त्यास प्रणाम केल्याशिवाय मात्र आपणास परत येतां येणार नाहीं—नव्हे परत येण्याला आपण समर्थ होणार नाहीं !"

देवीनें राजास कांहींच उत्तर केलें नाहीं. ती नुसती हंसली मात्र. त्या एका हंसण्यांत केवढा अर्थ भरला होता ! तिच्यासारखी मानी स्त्री, एकदां नाहीं म्हटल्यावर तिला गौतमास भेटण्याची इच्छा होईल? हें अगदींच असंभवनीय! तथापि आतांच प्रौढी न मारतां परत आल्यावर राजाला आपण ओळख देऊं,अशा इराद्यानें तिनें राजाची नुसती अनुमति मिळविली व ती आपल्या अनुचरांसह मार्गस्थ झाली. राजानें निघतांना मात्र तिच्या बरोबर असलेल्या आपल्या लोकांना असें सांगून ठेविलें कीं, उद्यान पाहून देवी माघारी येतांना भगवान् बुद्धाचें दर्शन घेण्यास जर गेली तर बरेंच, नाहींतर तुम्हीं "मात्र आम्हांस अशी राजाज्ञा आहे" असें म्हणून तिला त्यांचें दर्शन करवाच !

सर्व दिवसभर क्षेमाराणी उद्यानांत हिंडली व तिनें त्याची शोभा पाहिली. अगोदरच सुंदर असल्यामुळें तिला सृष्टींत जें सुंदर व हंसरें दिसलें, त्याकडे तिचें लक्ष आपोआपच वेधलें! पुष्पांनीं व फळांनीं बहारलेले वृक्ष, गन्धोद्दामित प्रदेश, वृक्षांभोवतीं स्वतःला गुंडाळून घेऊन राहिलेल्या वल्लरी, उज्वल रंगाचा विहंगवृंद व हरिणादि प्राणी, पहात पहात दिवस कसा चालला हें तीस समजलें सुद्धां नाहीं. राजवाड्यांतल्या कोंडलेल्या हवेंत व रेखीव राहणींत जणूं काय गुदमरून गेलेला तिचा

जीव आज याठिकाणीं स्वातंत्र्यच अनुभवीत होता. ! पिंजऱ्यांतून मुक्त झालेल्या रंगेल मैनेप्रमाणें तिची वृत्ति उल्हासित झाली होती. दमली असतां थकवा जाण्याकरितां राजसेवकांनीं अगोदरच सोय करून ठेवली असल्यामुळें तिला थकवा तर वाटला नाहींच; पण उलट द्विगुणित उत्साहानें व रसिकतेनें तिनें तें उपवन पाहिलें;व आतां 'परत फिरा' असा सेवकांस हुकूम दिला. जणूं काय, याठिकाणीं भगवान् बुद्धाचें वसतिस्थान आहे, ही गोष्ट ती अजिबातच विसरली होती ! तथापि राजसेवकांनीं राजाज्ञेची जाणीव तीस करून दिली व राणीनेंहि कांहीं मनोविकार न दाखवितां त्यांच्या मागोमाग ती जावयास निघाली. थोडक्याच वेळांत भगवान् गौतमाच्या वसतिस्थानाजवळ येऊन ती पोहोंचली.

भगवान् बुद्धानें ती राणी आपणाकडे येत आहे हें पाहून, आपल्या ऋद्धींच्या[1] सामर्थ्यानें एक स्वर्गीय सौंदर्याची पुतळी निर्माण करून ती एक ताडाचा पंखा हातांत घेऊन भगवानांना वारें घालीत आहे, असें दृश्य उत्पन्न केलें. क्षेमादेवी तेथें जाऊन पाहते तों आपणापेक्षांहि रूपवती स्त्री भगवान् बुद्धास वारें घालीत आहे,हें पाहून तर जागच्या जागींच ती थिजली व एकसारखी तिच्याकडे पाहूं लागली. आश्चर्याचा एक क्षण गेल्यावर ती विचार करावयास लागली, "अहारे कर्मा! माझा घात झाला! इतक्या सुंदर व स्वर्गीय स्त्रिया भगवान् दशबलाजवळ राहू शकतात, आँ ! मी ह्यांची दासी सुद्धां शोभणार नाहीं ! मला वाटतें, मनांत पापी-विचारांना थारा दिल्यामुळें मीं आपला केवढा घात करून घेतला आहे ?" असा मनाशीं विचार करीत तिचीं इन्द्रियें अंतर्मुख झालीं ! तिनें तोच समाधिविषय केला व त्यावर अचल दृष्टि ठेवून एकतानतेनें पहात असतांनाच, भगवान् बुद्धाजवळ उभी असून वीजन करणाऱ्या त्या मुग्धेची

---

१ ऋद्धि ( पाली—इद्धि ) दहाप्रकारच्या ऋद्धि असतात. ऋद्धि म्हणजे चमत्कार करून दाखवितां येणें. उदाहरणार्थ, एकरूपाचीं बहुरूपें करणें, बहुरूपाचें एकच रूप करून दाखविणें,गुप्त करून टाकणें,गुप्त जिन्नस उघड करून दाखविणें,आकाशाप्रमाणें भिंती, प्राकार, पर्वत, यांतून जाणें. उदकाप्रमाणें पृथ्वींत बुड्या मारणें, पक्षाप्रमाणें आकाशांतून जाणें, चंद्रसूर्यांस हात लावणें, वगैरे, ऋद्धि ध्यानाभिलाषी जनांना जरी प्राप्त होतात, तरी अर्हन्ताचा तो एक विशिष्ट हक्क आहे.

प्रथमादशा अतिक्रांत झाली. तिचें तें मुसमुसलेलें सौंदर्य कमी होऊन तिनें मध्यमावस्थेंत प्रवेश केला, असें क्षेमाराणीस दिसलें! व थोडयाच वेळांत ती वार्धक्यांत प्रवेश करीत असतांना तिनें तीस पाहिलें. तिचें तें सौंदर्य नष्ट झालें होतें; तिची ती अंगकांति निघून गेली; तिचा तो भ्रमरासहि लाजविणारा कचकलाप पांढरा झाला होता; गात्रें विकल झालीं; बांधेसूदपणा जाऊन त्याठिकाणीं शैथिल्य व वक्रत्व हीं आलीं होतीं. दांत खिळखिळे होऊन खण्डित झाले, सर्व शरीर सुरकुतलेलें दिसावयास लागलें! व देवीकडे पाहतां पाहतांच आपल्या हातांतल्या पंख्यासह ती मृत होऊन भूमीवर पडली!

"काय? माझें हें शरीर याच गतीस जाणार काय?" अशा रीतीनें त्या मानिनीच्या अंतःकरणांत विचारसूर्याचीं किरणें चमकावयास लागलीं, इतका वेळपर्यंत जी अज्ञानानें भरलेली होती, तिच्या विचारांत येवढी क्रांति व्हावयास लागली. मागील जन्मांच्या संस्कारांवर जें एक मोठें दडपण या जन्मीं पडलें होतें, तें भगवान् बुध्दाच्या या दृश्यानें पार उडून गेलें व पूर्वजन्मींच्या पुण्यसंस्कारांचें प्राबल्य झालें. ज्ञानरवीचीं किरणें पडून तिचें अंतःकरण शुध्द होत आहे, तोंच शास्त्यानें धर्मपदांतील पुढील अर्थाची गाथा म्हटली:—[1]

"स्वतः तयार केलेल्या जाळ्यांत सांपडणाऱ्या माकडाप्रमाणें ऐहिक सुखास भुलून त्यांस चिकटलेले लोक जन्ममरणाच्या प्रवाहांत पडतात; पण अनपेक्षी लोक त्या प्रवाहाचा छेद करून प्रव्राजित होत्साते कामसुखाचा नाश करतात."

---

१ मूळगाथा अशी:—"ये रागरत्तानुपतन्ति सोतं। सयंकतं मक्कटकोऽव जालं। एतम्पि छेत्वान वजन्ति धीरा। अनपेक्खिनो सब्बदुक्खं पहाय॥"

(धम्मपद-P. T. S.-गाथानुक्रमनंबर ३४७).

अशा अर्थाची गाथा ऐकतांच उभी असतांनाच क्षेमाराणीस पटिसंभिधाशास्त्रांचा पूर्ण साक्षात्कार झाला व तीस अर्हत्पद प्राप्त झालें. आतां बौद्धतत्त्वज्ञानाच्या समजुतीप्रमाणें असा नियम आहे कीं, संसारांत राहून अर्हत्पद प्राप्त झालेल्या मनुष्याचें त्या दिवशींच निर्वाण-तरी झालें पाहिजे, किंवा त्यानें प्रव्रज्या तरी घेतली पाहिजे. आपले आयुष्यसंस्कार संपले नाहींत, असें क्षेमाराणीनें जाणून प्रव्रज्या घेण्याविषयीं आपल्या पतीची अनुमति मिळण्यासाठीं ती शास्त्याला वंदन करून नगराकडे वळली. राजवाड्यांत जाऊन ती राजाच्या समोर गेली; पण त्यास अभिवादन न करितांच तशीच त्याचे समोर जाऊन उभी राहिली.

राजानें तिच्या एकंदर चर्येवरून ती अर्हत्पदास पोहोंचली असली पाहिजे, असा तर्क केला व तो तिला म्हणाला, "देवि, खरंच कां आपण भगवान् बुद्धांच्या दर्शनासाठीं गेला होता ?" "महाराज," तिनें गंभीरपणानें उत्तर दिलें " आपण भगवान् बुद्धाचें दर्शन वारंवार घेतां, पण तें वरवर; म्हणून अपुरें पडतें. मी मात्र त्यांचें दर्शन पूर्णपणें घेतलें असून त्यांना आपणांपेक्षा पूर्ण जाणलें आहे ! महाराज, मला प्रव्रज्या घेण्यास अनुमति द्या !"

---

१ पटिसंभिधा ( संस्कृत-प्रति+संभिद् ) अर्हन्ताच्या अतिमानुष ज्ञानाचे चार भाग पडूं शकतात. शील व समाधि यांच्यामुळें प्रज्ञा उत्पन्न होते, व प्रज्ञा प्राप्त झाल्यावर अर्हत्प्राप्ति होते. हें अर्हन्ताचें ज्ञान चतुर्विध असतें. त्याचा साक्षात्कार अर्हत्पद मिळतांनाच होतो. तें ज्ञान पाठान्तरानें मिळवावयाचें नसतें; त्याचा समाधींत साक्षात्कार करून घ्यावयाचा असतो. अर्थ, धर्म, निरुक्ति व प्रतिभान हे प्रतिसंभिधेचे चार भाग पडतात. अर्थज्ञान होणें हें मूलभूत ज्ञान होय; पालीसंहितेचें ज्ञान होणें हें दुसरें उच्च ज्ञान होय. शब्द, मूलधातू वगैरेचें जें ज्ञान त्यास निरुक्ति असें म्हणतात. अव्यभिचारी व एकान्तसत्य व पहिल्या तीन गोष्टींच्या सम्यग्ज्ञानाशीं संयुक्त असें जें ज्ञान त्यास प्रतिभान असें नांव आहे. अर्हत्पदाप्रत गेलेल्यास असें चतुर्विधज्ञान आपोआपच प्राप्त होतें.

२ अर्हत्पद—सोतापत्तिमग्ग, सकदागामिमग्ग, अनागामि मग्ग, व अरहत्तमग्ग असे निर्वाणमार्गाच्या वाटवरील जे टप्पे आहेत त्यांतील शेवटची पायरी म्हणजे अर्हत्पद. अर्हतावस्थेस पोहोंचलेला मनुष्य पुनर्जन्माच्या फेऱ्यांतून सुटून जाऊन निर्वाणाप्रत पोहोंचला, असें समजावें. या चारीहि मार्गासंबंधाची त्रोटक माहिती प्रो. कोसंबी यांच्या बुद्ध, धर्म, आणि संघ या पुस्तकांत पान ९९ वर पहा.

केवढी परीक्षेची वेळ! पण राजानें नुसतेंच ‘ देवि, फार चांगलें ’ म्हणून संमति दिली. व एका सुवर्णशिबिकेंत तिला बसवून तिची रवानगी भिक्षुणीसंघाच्या निवासस्थानाकडे करून दिली. तेथें तीस रीतसर प्रव्रज्या मिळाली. ज्याअर्थी संसारांत असतांनाच क्षेमाराणीस अर्हत्पदप्राप्ति झाली, त्याअर्थी ती महाप्राज्ञ असली पाहिजे, असा साधुवाद तिच्या संबंधानें प्रसृत झाला व अशा तऱ्हेनें जन्मजन्मांतरीची तिची उत्कटेच्छा सफल झाली.

एक दिवस शास्ता जेतवनांत बसला असतांना भिक्षुणीसंघ जमला होता व त्यांच्यांत निरनिराळ्या भिक्षुणींस निरनिराळें स्थान देत असतांना क्षेमास्थविरा म्हणजे **महाप्रज्ञावती** म्हणून तिची त्यानें अग्रभागीं स्थापना केली; व त्या लोभनीय स्थानास ती योग्यच होती, अशीच खात्री आमच्या वाचकांचीहि झाली असली पाहिजे[१].

---

१ संघांत तिचें चरित्र किती उज्वल होतें ह्याची कल्पना थेर व थेरीगाथेंतील तिनें गाईलेल्या गाथांवरून होते. मारानें ( संस्कृत-स्मर ) तिला मोह पाडण्याचा प्रयत्न केला असतां, तिनें त्यास फारच जोराचीं व निर्भीड उत्तरें दिलीं आहेत, तीं प्रश्नोत्तरें फारच परिणामकारक आहेत. ( थेरथेरीगाथा—P. T. S.—Oldenberg and Pischel-गाथा १३९ ते १४४ ) संयुक्त निकायांतहि बुद्धानें तीस आदर्श भिक्षुणी म्हणून ठरविली आहे. ( संयुक्त निकाय—P. T. S.—२.२३६ )

# रत्न ३ रें.

## उत्पलवर्णा.

### ( १ )

### पूर्वबुद्धकालीन चरित्र.

उत्पलवर्णा ( पालीः उप्पलवण्णा.) ही भगवान् बुध्दाची ऋध्दिमती अशी विख्यात स्थविरा होण्यापूर्वी तिच्या पूर्व आयुष्यांतील चरित्राचा संबंध प्रथम थेट भगवान् पद्मोत्तर बुध्द याच्या काळाशीं पोहोंचतो. त्या शास्त्याच्या काळांत हंसवती नगरींत एका कुलगृहांत तिचें जनन झालें होतें. बहुजनसमाजाबरोबर तीहि शास्त्यापाशीं गेली होती. व त्याच्या धर्माचा उपदेश तिच्याहि कानीं पडला होता. तत्कालीन भिक्षुणीसंघांत एका भिक्षुणीस शास्त्यानें ऋद्धिमती म्हणून अग्रस्थान देतांना, तिनें प्रत्यक्ष पाहिलें होतें. तिनें शास्त्यास भिक्षूसंघासह भोजनार्थ आपल्या घरीं बोलाविलें व दानकर्माविषयीं इतकें प्रेम तिच्या हृदयांत वसावयास लागलें कीं, एकसारखे ७ दिवस भिक्षुसंघास तिनें महादान दिलें व शेवटीं दानपूर्ततेच्या दिवशीं भगवन्तापुढें अशी उत्कटेच्छा प्रार्थित केली कीं, ‘ मलाहि तें महनीय असें ऋद्धिमती भिक्षुणीचें स्थान प्राप्त व्हावें ! ’

आयुष्यभर कुशलकर्में करीत मरणोत्तर जननमरणाचे फेरे फिरत फिरत काश्यपबुध्दाच्या काळीं ती वाराणशी नगरांत किकी राजाच्या घरीं जन्मास आली. त्या राजास ज्या सप्तकन्यका होत्या, त्यांच्यापैकीं ही एक होती. हिनें २०,००० वर्षे कुमारीब्रम्हचर्याचरणकरून आपल्या आयुष्यांत

भिक्षुसंघास परिवेणाचें[1] दान केलें व अशाप्रकारचें दान उत्तमप्रकारचें होय, असें बौध्दवाङ्मयांत वारंवार सांगितलें असल्यामुळें[2] त्या पुण्याच्या जोरावर देवलोकांत ती बराच काळपर्यंत राहिली व तेथून मर्त्यलोकांत प्रवेश केल्यावर तिचा जन्म एका खेड्यांत झाला व तिला पोटाकरितां स्वतः काबाडकष्ट करणारीचा जन्म घ्यावा लागला.

त्या जन्मांत एक दिवस सकाळीं ती शेतांतल्या झोंपडीकडे चालली असतां वाटेंत तिला एक सरोवर लागलें. प्रातःकालची ती प्रसन्न वेळ ! त्या सरोवरांत एक सुंदर पद्मपुष्प विकसलेलें पाहून ती त्याकडेस धांवलीच. पाण्यांत उतरून तिनें पानासकट तें कमळ तोडलें व शेतांत जाऊन कांहीं शालिशीर्षें छेदून तीं शेतांतल्या आपल्या कुटींत जाऊन बसली. त्या भाताच्या लोंब्या चोळून चोळून तिनें कोंडा व दाणे निराळे काढले व तिला ते मोजण्याची इच्छा झाली म्हणून तिनें ते मोजले; तों ते बरोबर ५०० भरले ! त्याचवेळीं गंधमादनपर्वतावरून निरोधसमापत्तींतून[3] एक प्रत्येकबुद्ध तेथें प्राप्त झाला व तिच्यापासून जवळच उभा राहिला. ती ते

---

१: परिवेणः–विहारांतील भिक्षूची खोली. विहारदान करणें हें ज्यांच्या शक्तीबाहेरचें असतें ते निदान एखादी खोली तरी बांधून संघास अर्पण करितात. राजा बिंबिसार गृहपति अनाथपिण्डिक, किंवा गणिका अम्बापाली यांनीं संघास विहाराचें दान केलें, असें सांगितलेलें आहे. भिक्षूंना राहावयास विहारांतील एखादी खोली जरी बांधून दिली तरी पुण्य लागतेंच. लेण्यांत मोठमोठे चौक असून चारी बाजूंस ज्या खोल्या असतात, त्या प्रत्येकीस परिवेण असें नांव आहे.

२: उदाहरणार्थ– "लेणत्थंच सुखत्थंच झायितुंच विपस्सितुं । विहारदानं संघस्स अग्गं बुद्धेन वण्णितं ॥" (चुल्लवग्ग–Oldenberg's Edition–पृष्ठे १५४–१६५).

३: निरोधसमापत्तिः–एकप्रकारच्या समाधीचें नांव. त्या अवस्थेंत संज्ञा व वेदना यांचाहि पूर्ण निरोध होतो. ही अत्यंत उच्च प्रकारची व सूक्ष्म अशी समाधि आहे. अशा समाधींत योगी सात दिवसपर्यंत राहूं शकतो. या समाधींत व मृत्यूंत एवढाच फरक आहे कीं, यांत कायसंस्कार, वचीसंस्कार व मनोसंस्कार यांचा फक्त निरोध झालेला असतो; तर मृत्यु प्राप्त झाला असतां त्यांत आयु व उष्णत्व यांचाहि निरोध झालेला असतो. बुद्धानें आपल्या परिनिर्वाणाच्या वेळीं पहिल्या ध्यानापासून आरंभ करून शेवटची पायरी सञ्ञावेदयितनिरोध ही गांठली, असें सांगितलेलें आहे. (दीघनिकाय–P. T. S.–Rhys Davids and Carpenter–महापरिनिब्बानसुत्त पृ. १५६)

५००दाणे घेऊन त्या कमलपुष्पासह बाहेर आली व त्या प्रत्येकबुद्धाच्या पात्रांत ते दाणे घालून त्यांवर त्या सपत्रकमलाचें तिनें झांकण घातलें. तो तेथून निघून रस्त्यानें चालला असतांना इकडे तिच्या मनांत असा विचार आला कीं, प्रव्रजिताला कमलपुष्पाचा कांहीं एक उपयोग नाहीं. आपणास तें निदान केसांत तरी घालतां येईल. हा विचार येतांच ती त्य बुद्धाच्या मागोमाग गेली व त्याच्या हातांतील तें पुष्प तिनें परत घेतलें.पण पुन्हां ती विचारांत पडली. "जर आर्यांना त्या पुष्पाची गरजच नसती तर त्यांनीं मला तें फूल पात्रावर ठेऊनच दिलें नसतें. तेव्हां खात्रीनें त्यांना तें हवेंच असलें पाहिजे." असा विचार डोक्यांत येतांच ती पुन्हां त्यांकडे गेली; व त्याची क्षमा मागून तिनें तें पात्र पुष्पानें पूर्ववत् झांकलें व त्यासमोर अशी प्रार्थना केली कीं, "या दानाच्या पुण्यानें मला या धान्याच्या दाण्यांइतके पुत्र होवोत! व त्या कमलदानाच्या प्रभावानें इतउत्तर जेव्हां मला जन्म प्राप्त होइल तेव्हां मी भूमीवरून चाललें असतां जेथें माझीं पावलें पडतील, तेथें पद्मपुष्प निर्माण होवो!" अशी प्रार्थना करून ती त्याकडे पहात असतांनाच तो प्रत्येकबुद्ध हवेंत उडून गंधमादनपर्वतावर गेला व तेथें तें पुष्प त्यानें नन्दमूल पर्वताच्या प्राग्भागीं प्रत्येकबुद्धांच्या चढण्याउतरण्याच्या सोपानपरंपरेजवळ त्यांची पादपूजा करण्यासाठीं तें तेथें लावून ठेवलें.

त्या कृत्याच्या पुण्याईनें उत्पलवर्णा देवलोकीं जन्मास आली, व त्या जन्मापासून जमिनीवर पडलेल्या तिच्या प्रत्येक पावलागणिक एक मोठें पद्मपुष्प निर्माण व्हावयास लागलें. तेथून च्युत झाल्यावर एका पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या एका तळ्यांतील मोठ्या पद्मपुष्पाच्या गर्भांत तिनें जन्म घेतला! त्या तळ्याशेजारींच एक तपस्वी रहात असे. एक दिवस प्रातःकाळीं तो तळ्याचे काठीं मुखप्रक्षालनार्थ गेला असतांना तें पुष्प त्याच्या दृष्टीस पडलें. त्यानें विचार केला: "हें पद्म इतरांपेक्षां मोठें दिसतें. दुसरीं कमळें पूर्णपणें उमललेलीं आहेत. पण हें मात्र अजून कळीवजाच आहे, ह्याचें कांहीं तरी मर्म खास असलें पाहिजे." म्हणून तो पाण्यांत उतरला व त्यानें ती कळी तोडली. त्याबरोबर ती आपोआप विकास पावली व त्या पुष्पाच्या गर्भांत निजलेली एक दारिका

त्याच्या दृष्टीस पडली! तीस पाहताच त्याच्या हृदयांत पितृवात्सल्य उत्पन्न झालें! त्यानें तीस त्या कमळासकट हातांत घेतलें व तीस घेऊन आपल्या पर्णकुटींत तो आला व त्यानें तीस मंचकावर निजविलें. लगेंच काय आश्चर्य झालें पहा! तिच्या पुण्यप्रभावामुळें त्याच्या हातच्या आंगठ्यास दूध फुटलें व ती त्याचें बोट चोखूं लागली! तिच्या जवळचें कमलपुष्प कोमेजल्याबरोबर त्यानें तें टाकून दिलें व दुसरें एक ताजेंपुष्प तळ्यांतून आणून तिजजवळ ठेविलें.

कालेंकरून ती मोठी झाली व इकडून तिकडे जमिनीवरून दुडदुड धांवतांना तिच्या प्रत्येक पावलागणीक कमळपुष्प उत्पन्न व्हावयास लागलें! तिच्या शरिराची कांति नयनमनोहर दिसावयास लागली. जरी पूर्ण देववर्णाप्रमाणें नव्हे, तरी मनुष्यवर्णापेक्षां जास्तच सौंदर्य त्यांत दृग्गोचर होत होतें. तिचा पिता जंगलांत कंदमुळें आणण्यास जातेवेळीं ती पर्णकुटींत एकटीच राही. या गोष्टीस कांहीं काळ लोटला. ती आतां वयांत आली होती. एक दिवस पिता अरण्यांत गेला असतां एका अरण्यकानें तीस पाहिलें. तो मनाशीं म्हणाला, "काय? अशाप्रकारचें रूप माणसांत तरी नाहीं सांपडणार? या गोष्टीचा तलास लाविला पाहिजे." तो वनचर त्या ठिकाणींच तो तपस्वी परत येण्याची वाट पहात राहिला. तपस्वी दुपारीं परत येत असतांना नित्याप्रमाणें ती त्याला सामोरी गेली व त्याच्या हातांतून कमण्डलु वगैरे घेऊन तीं दोघे माघारी पर्णकुटींत आलीं. पिता घरीं आल्यावर आराम करीत असतांना तिनें त्याला आपण केलेलें काम (पालीः—कारकवत्त) दाखविलें. व त्यावरून त्या वनचराची खात्री झाली कीं, ती मानुषीच असली पाहिजे त्या तपस्व्याला वंदन करून तो खालीं बसला व त्यानें आतिथीस कंदमुळें देऊन प्यावयास पाणी दिलें व मग तो त्यास प्रश्न विचारूं लागला. "वनचरा, तूं आमच्या सहवासांत राहणार कीं जाणार?" "महाराज" त्यानें उत्तर दिलें, "मी येथें कशास राहूं?" "तर मग येथून गेल्यावर तूं येथें जें पाहिलें आहेस, त्याबद्दल परिस्फुटता नाहींना करणार? तें गुप्त ठेवशीलना?" महाराज, आपली इच्छा नसेल तर मी तरी त्यासंबंधीं कशास बोलूं?"

यानंतर त्या तापसानें त्या वनचराची रवानगी करून दिली. पण त्या वनचरानें पुन्हां इकडे येतांना चुकभूल होऊं नये म्हणून,रस्त्याकडेच्या वृक्षशाखांवर खुणा ठेवल्या. थेट वाराणशीस जाऊन त्यानें राजाची भेट घेतली व राजानें येण्याचें कारण विचारलें असतांना, तो त्यास म्हणाला, " महाराज, मी आपला वनरक्षक आहें मी आपल्या नेहमींच्या कामावर गेलों असतांना पर्वताच्या पायथ्याशीं एक स्त्रीरत्न पाहिलें. म्हणून मी महाराजांना त्याची वर्दी देण्याकरितां आलों आहे. " अशी प्रस्तावना करून त्या तपस्व्यानें आपली रवानगी करून देईपर्यंतची हकीकत त्या रक्षकानें राजाच्या कानांवर घातली.

राजानें ती हकीकत ऐकल्याबरोबर त्या स्त्रीरत्नाची प्राप्ति आपणास कशी होईल.ह्या विचारांत तो गढून गेला. लगेच त्यानें शिकारीच्या मिषानें त्या पर्वताकडे कूच केलें. व त्या पर्वताच्या पायथ्याजवळच आपला तळ दिला व स्वतः वनरक्षकासह निवडक अनुयायांस बरोबर घेऊन तो पर्णकुटीकडे चालूं लागला. त्यावेळीं त्या तापसानें आपलें सर्व विहित कार्य उरकलें असून तो स्वस्थ बसला होता. अशा वेळीं राजा तेथें गेला. राजानें त्यांस वंदन केलें व कुशल प्रश्न विचारून झाल्यावर तो एका बाजूस जाऊन उभा राहिला. त्याच्या चरणापाशीं तापसास योग्य अशा जिनसा ठेऊन तो त्यास म्हणाला, " महाराज, येथें येऊन आम्हांला काय करावयाचें आहे? जातों आम्हीं आतां " यावर त्या तापसानें उत्तर दिलें, "राजा, बरं तर जा ". राजाची या उत्तरानें अगदीं निराशा झाली. पण पुन्हां एकवार प्रयत्न करण्याच्या इराद्यानें राजा त्यास म्हणाला, " महाराज, आम्हीं जातोंच.पण मीं असें ऐकलें आहे कीं,आपणांजवळ स्त्रीजातीचे कांहीं लोक आहेत. मला वाटतें कीं, त्यांच्या अस्तित्वामुळें आपल्या तपास अडथळा होत असेल नाहीं? कारण तो प्रपंचच मोठा! माझ्या बरोबर त्या स्त्रीजनास पाठवीत असाल तर बरें होईल! " "मनुष्याच्या चित्तांत नेहमी दुष्ट आशय वास करीत असतात. तेव्हां इतक्या लोकांत माझी कन्यका कशी राहूं शकेल? " असें तपस्वी म्हणाला. "येवढेंच ना. " राजा जरा ऐटींत म्हणाला, " तीस आपल्या ताब्यांत घेऊन इतरांपेक्षां सर्वांत श्रेष्ठ अशा स्थानीं तिची स्थापना करण्यास आम्हीं समर्थ आहोंत! "

यावर तापसानें, "बाळ, पद्मा, बाहेर ये पाहूं" म्हणून मुलीस हाक मारली. त्याबरोबर ती रूपयौवनसंपन्ना बाहेर आली व पित्याला वंदन करून त्याजवळ उभी राहिली. मग तो तापस तिला म्हणाला, "बाळ, आतां तूं वयांत आली आहेस,व राजानें तुला आज पाहिलें आहे, तेव्हां इतउप्पर तू येथें राहणें उचित नव्हे. तर बाळे, राजाबरोबर तूं जावेंस हेंच योग्य." पित्याची आज्ञा-नव्हे उपदेश-ऐकून ती अश्रुपूर्ण नयनांनीं त्याचे समोर उभी राहिली. तेव्हां आतां बाप अडथळा घेतो कीं काय न जाणों ? या विचारानें राजानें आपल्या नोकरांकडून तेथल्यातेथें सुवर्णनाण्यांची एक रास करविली व त्यावर त्या कन्येस तीवर बसवून तिला अभिषेक केला.

नंतर तिला घेऊन राजा आपल्या नगरास परत आला व तिला राजवाड्यांत नेल्यापासून तो इतर स्त्रियांकडे दुर्लक्ष करूं लागला. तिच्या संगतींत सर्वकाळ रममाण होऊं लागल्याकारणानें स्वाभाविकच राजाच्या इतर राण्या तिचा द्वेष करूं लागल्या; व जेणेंकरून त्या दोघांत बिघाड होईल, तें करण्याचा हरप्रयत्न करूं लागल्या.एक दिवस त्या सर्वत्र जमल्या व राजाकडे भेटण्यास गेल्या. कुशल प्रश्न झाल्यावर त्यापैकीं मुख्य राणी बोलूं लागली.'महाराज,' ती म्हणाली,'आम्हां सर्वांवरील आपलें प्रेम कमी झालें असलें तरी आमचें आपणाविषयीं मात्र विरुद्ध प्रमाणांत वाढत चाललें आहे.ह्या राणीसाहेबांच्या सौंदर्यानें व इतर गुणांनीं त्यांनीं आपलें मन आकर्षण केलें आहे,त्यांत आम्हांला कांहींच वैषम्य वाटत नाहीं. पण एका गोष्टीसंबंधानें मात्र आपणास सावध करण्यास आम्हीं आज येथें आलों आहों. महाराजांच्यासंबधी आमचें अंतःकरण तिळतिळ तुटत आहे. आपण ह्या राणीसाहेब कोण आहेत याची चौकशी केली आहे काय ?' राजानें प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं; पण त्या मुख्य राणीच्या मायावी भाषणानें व इतर स्त्रियांच्या चिंतापूर्ण व दुःखित मुखकमलांनीं त्याच्यावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. तो स्तब्ध व विचारपूर्ण बसला आहे, असें पाहून ती पुढें बोलूं लागली, "महाराज,त्यांचें जनन मनुष्याच्या कुलांत झालेलें नाहीं. मानवी प्राण्याच्या पावलागणिक कमलपुष्प उत्पन्न होतें, असें आपण कधीं आपण ऐकलें आहे काय ? महाराज, ही मानुषी नव्हे,यक्षिणी आहे. यक्षिणी किती मायावी असतात, वरवर प्रेम दाखवून

व मनुष्यास वश करून घेऊन, शेवटीं त्या त्याचा कसा घात करतात, हें आपणास सांगावयास कां पाहिजे ? आपल्या संरक्षणासाठीं आमचा प्राण गेला तरी बेहेत्तर; पण आपली गांठ घेऊन आपल्या कानांवर ही गोष्ट घालावी, म्हणून आह्मीं आज येथें आलों आहों. महाराज, हिला आपण घरांत ठेऊन घेऊं नका.ही घराची राखरांगोळी करील" अशा रीतीनें सद्गदित होऊन त्यांनीं राजास विनंति केली व त्या जावयास निघाल्या. आपल्या या भाषणाचा परिणाम राजाच्या मनावर झालेला आहे, हें त्यांनीं ताडलें. राजाहि त्याविषयीं कांहींच न करितां सचिन्त राहिला.

लौकरच सरहद्दीवर बंड सुरू झालें. राजास बंड मोडण्यास जावयाचें होतें. नवीन राणीनें आपण येणार असा फार आग्रह धरिला; पण ती गरोदर असल्यामुळें तिला बरोबर नेणें योग्य होणार नाहीं, असा विचार करून तो एकटाच त्या प्रांताकडे निघून गेला व ही एकटीच इकडे राहिली.

इकडे पद्मावती राणी एकटीच राहिली व तिच्या नाशाविषयीं उद्युक्त झालेल्या तिच्या सवतींना पुष्कळच अवसर मिळाला. त्यांनीं तिच्या खास दासीला लांच दिला व तिला आपणांकडे वळवून घेतली व तिला सांगितलें कीं, तुझ्या राणीला मूल झाल्याबरोबर तें दूर कर; व त्या जागीं एक लांकडाचा रक्तानें माखलेला ओंडा ठेव." तिनें त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें करण्याचें कबूल केलें. लौकरच पद्मावती प्रसूत झाली व महापद्मकुमार हा एकटाच कुक्षिगत म्हणून जन्मास आला. बाकीचे चारशें नव्याण्णव मुलगे, महापद्मकुमार हा आईच्या कुशींतून बाहेर पडून भूमीवर ठेवण्याचे काळीं तिच्या स्वेदापासून(किंवा संस्वेदज म्हणून)जन्मास आले ! त्यासमयीं पद्मावती अजून शुध्दीवर आली नाहीं, हें पाहून त्या दासीनें लांकडाचा एक ओंडा रक्तानें माखला व त्याठिकाणीं ठेवला व इतर दासींना आंत बोलाविलें. त्या दासींपैकीं प्रत्येकीनें एकएक मूल अशा रीतीनें ५०० दासींनीं तीं मुलें घेतलीं व त्या लोहाराकडे गेल्या. त्या लोहारानें त्यादासीकडून एकेकमूल एकेका करण्डकांत निजवून त्यावर झांकण घालून ते सर्व बंद केले व प्रत्येकराणीकडे एकेक असे ते पाठवून दिले.

मध्यंतरीं पद्मावती शुद्धीवर आली व तिनें आपल्या दासीला

विचारलें " अम्मा, मला काय झालें आहे ?" त्या दासीनें जरा निर्भर्त्सनेच्या स्वरांतच उत्तर दिलें, " तुम्हांला, राणीसाहेब, मूल कुठलें होणार ! हा पहा आपल्या पोटांतून निघालेला दारक" असें म्हणून तिनें तो ओंडा तिच्या पुढें केला ! तो पाहिल्या बरोबर राणीला फार वाईट वाटलें, व ती म्हणाली, " उचलनचल तो अगोदर. तो फोडून टाक. ने माझ्या डोळ्यांसमोरून. जर कोणी तो पाहिला तर मला लज्जेनें मरून चूर होण्याची पाळी!" त्या दासीनेंहि मोठ्या आतुरतेनें तो फोडून टाकला व ते तुकडे चुलींत फेंकून दिले.

राजानें सरहद्दीवरील बंड मोडून टाकून सर्वत्र शांतता प्रस्थापित केली. व घरीं परत आल्यावर सुमुहूर्तानें शहरांत शिरावें म्हणून शहराच्या बाहेर छावणी टाकून तेथें तो राहिला. त्या पांचशें सवती त्या राजाकडे गेल्या व त्यास अभिवादन करून भीतभीत त्याला म्हणाल्या, महाराज आमच्यावर विश्वास ठेवणार नाहींत, व आम्हीं कांहीं तरी वाष्फळ बडबडतों, असें म्हणतील, हें आम्हीं जाणून आहों. पण महाराजानीं प्रथम राणीसाहेबांच्या खास दासीस बोलवावेंच व तिला विचारावें, आपल्या राणीसाहेबांना एक लांकडाचा ओंडा झाला आहे कीं नाहीं ! राजानें त्या स्त्रियांच्या हेतूकडे लक्ष न देतां खात्रीनेंच ती मनुष्य जातीपैकीं नाहीं, असें ठरवून पद्मावतीस घरांतून काढून लावलें. ती राजगृहांतून बाहेर पडल्याबरोबरच तिचीं पद्मपुष्पें नाहींतशीं झालीं. आणि तिचा शरीरवर्ण कोमेजून गेला ! एकटीच बिचारी रस्त्यांतून चालली होती ! एका वयातीत स्त्रीनें तिला अशा विपन्नावस्थेंत पाहिलें व ती तीस म्हणाली, " मुली, तूं कोठें बरें चाललीस ? " " परकीय लोकांमध्यें राहण्यास योग्य असें स्थळ शोधण्यासाठीं मी चाललें आहें. " " चल तर मग; चल माझ्याबरोबर. " असें म्हणून तिनें तिची राहण्याची व खाण्यापिण्याची सोय लावली.

पद्मावती राणीचा कांटा काढून टाकल्यावर त्या पांचशें राण्या एकोप्यानें व आनंदांत राहूं लागल्या व राजाचेंही प्रेम पूर्ववत् त्यांच्यावर बसलें. त्या एक दिवस छावणींत राजाकडे गेल्या व त्यास म्हणाल्या, " महाराज, आपण लढाईवर जाऊन छावणी टाकलीत, त्यावेळीं आम्हीं

गंगेला असा नवस केला होता कीं, 'जर महाराजांना लढाईंत यश आलें, तर महाराज परत आल्यावर त्यांच्या बरोबर आम्हीं सर्वजणी बलिकर्मे उरकल्यावर जलक्रीडेसाठीं गंगेवर येऊ.' महाराजांना हें कळविण्यासाठीं आम्हीं आज येथें आलों आहों." राजा त्यांच्या शब्दांनीं फार संतुष्ट झाला व त्याच्याबरोबर उदकक्रीडेसाठीं गंगेवर जावयास निघाला. त्या स्त्रियांनीं प्रत्येकीनें आपापला करंडक लपवून बरोबर घेतला व पाण्यांत उडी टाकतांच तो सोडून दिला. अशा रीतीनें पाण्याच्या प्रवाहांत सोडलेले ते सर्व करण्डक प्रवाहाबरोबर वहात जाऊन प्रवाहाच्या बरेंच खालीं लाविलेल्या एका जाळ्यांत अडकले. इकडे राजाची क्रीडा आटोपल्यावर राजा परत जाण्यास निघाला; व धीवरांनीं टाकलेलीं आपली जाळींही वर काढलीं; तों त्या जाळ्यांत ते करण्डक त्यांना सांपडले. त्यांनीं मोठ्या उत्सुकतेनें ते सर्व राजाकडे नेऊन त्याला सादर केले. राजानें तें पाहून त्यांना विचारलें "कायरे, या करण्डकांत काय आहे?" "महाराज, आम्हाला हें कांहींच ठाऊक नाहीं; पण एकसारखे असे ५०० करण्डक पाहून आम्हांस आश्चर्य वाटलें व यांत कांहीं तरी विशेष असलें पाहिजे, असा तर्क करून आपणापाशीं ते घेऊन आम्हीं आलों आहोंत! महाराजांनीं याचा निर्णय करावा." राजानें ते सर्व करण्डक उघडण्याचा हुकूम केला. पहिला उघडल्याबरोबर त्यांना महापद्मकुमार दृष्टीस पडला. त्या सर्वांचे करण्डक उघडले; तों तीं सर्व मुलें जिवंत अशीं दृष्टीस पडलीं. त्या करण्डकांत त्यांना ठेवल्या दिवसापासूनच प्रत्येकाच्या अंगुष्ठात पुण्यऋध्दीच्या बलानें दूध उत्पन्न झालेलें होतें. देवेन्द्र जो शक्र त्यानें राजाचा संशय निरसन करण्यासाठीं करण्डकांच्या आंत अशीं अक्षरें लिहून ठेवलीं होतीं, "हे कुमार पद्मावतीच्या उदरांतून जन्म पावले असून, ते वाराणशीराजाचे पुत्र आहेत. पद्मावतीच्या पांचशें सवतींनीं त्यांना करंडयांत घालून त्यांनीं ते पाण्यांत टाकून दिलेले आहेत." राजाला ही गोष्ट समजली. राजानें प्रत्येक करंडकांत हीं अक्षरें वाचल्याबरोबर त्याच्या हृदयांत लख्ख प्रकाश पडला. तावडतोब त्यानें महापद्मकुमारास हातावर घेतलें व आपल्या लोकांस हुकूम सोडले. "चला चला," तो म्हणाला, "रथ तयार करा. घोडे जोडा. आजच्या आज मी नगरांत प्रवेश करणार व कित्येक स्त्रियांना मी आज आनंदी करणार आहें." असें म्हणून त्यानें लौकरच शहरांत प्रवेश केला

व तो राजवाड्यांतील आपल्या गच्चीवर गेला व त्याच्या हुकमानें एका हत्तीच्या मानेभोंवतीं एक हजार नाण्यांची पिशवी बांधण्यांत आली. व भेरी वाजविण्यांत आल्या. "जो कोणी पद्मावतीला पाहून तिचा पत्ता लावून देईल, त्याला हीं नाणीं बक्षीस मिळतील," अशी सर्वत्र दवंडी पिटली. व ती बरोबर तो हत्तीहि चालूं लागला.

जेव्हां पद्मावतीनें ती दवंडी ऐकली, तेव्हां ती त्या वृद्धस्त्रीला म्हणाली, "आई, ऐकलेंस कां? तूं जा ना आणि त्या हत्तीच्या गळ्यांतलें हजार नाण्यांचें गांठोडें मिळविनास!" "नको नको, माझ्याच्यानें नाहीं जावबत व ती रक्कम घेववत," तिनें उत्तर दिलें. पण पद्मावतीनें तिला तीनवेळां आग्रह केला व शेवटीं ती म्हणाली, "मुली, मी काय करूं म्हणजे मला तें बक्षीस मिळेल!" पद्मावती म्हणाली, "आई, तूं दुसरें कांहीं करूं नकोस; फक्त हत्ती उभा असेल तेथें जा व तेथें असलेल्या अधिकाऱ्यांना सांग, माझी मुलगीच पद्मावती राणी आहे." शेवटीं काय होईल तें होवो, असा विचार करून ती म्हातारी गेली व जेथें हत्ती उभा होता तेथें जाऊन तिनें त्याच्या गळ्यांतून १००० मोहोरांची पिशवी काढून घेतली. त्याबरोबर राजपुरुष तिला विचारूं लागले, "काय बाई, तुम्ही पद्मावतीराणीसाहेबास पाहिलें आहे काय?" "मी नाहीं पाहिलें तिला. पण माझ्या मुलीनें तिला पाहिलें आहे," असें तिनें उत्तर दिलें. "कोठें बरें तुझी ती मुलगी; दाखीव पाहूं," असें म्हणून ते तिच्या बरोबर गले व त्यांनीं पद्मावतीस ओळखिलें. ते म्हणाले, "खरोखर ह्या स्त्रीचें केवढें मोठें नुकसान केले गेलें आहे! पहा, ही राजाची राणी आणि असल्या उघड्या जागेंत राहात आहे". असें म्हणून त्यांनीं लगेच पद्मावतीच्या वसतिस्थानाभोंवती पडदे उभारले व दारावर पहारा ठेवला; व राजाकडे जाऊन त्यांनीं त्यास वर्दी दिली.

राजानें लौकरच एक सुवर्णशिबिका तेथें पाठविली. पण ती तेथें जाऊन पोहोंचली तरी पद्मावती त्यांत बसून जाण्यास कबूल होईना. ती म्हणाली, "मी अशी नाहीं राजगृहीं जाणार! माझ्या या वसतिस्थानापासून तों राजवाड्यापर्यंत रस्त्यावर भारी किंमतीचे सुंदर वेलपत्तीचे गालीचे पसरले पाहिजेत, व वर सुवर्णतारकामंडित छत लाविलें पाहिजे

व मग मी पाठविलेल्या सर्व भूषणांनीं अलंकृत होऊन पायानेंच जाणार. अशा तऱ्हेनेंच नगरवासीयांनीं माझें वैभव पाहिलें पाहिजे. "

राजानें पद्मावतीच्या आवडीप्रमाणें सर्व गोष्टी करण्याविषयीं हुकूम सोडले, व राणीहि मोठ्या वैभवानें मार्गावरून चालूं लागली. ती चालली असतां पाऊल पडल्या ठिकाणीं, ते गालिचे फाडून वर पद्मपुष्पें दिसावयास लागलीं! अशा तऱ्हेनें बहुजनसमाजास आपलें वैभव दाखवीत, ती राजनिवेशनांत शिरली; व मग ते सुंदर व बहुमोल सर्व गालिचे तिच्या हुकुमानें त्या वृद्धस्त्रीस, पद्मावतीस सांभाळल्याचें बक्षीस म्हणून, देण्यांत आले. राणी पद्मावती राजास भेटली व राजानें आपण केलेल्या पापाचें प्रायश्चित म्हणून त्या ५०० स्त्रियांना आपणापुढें आणविलें व पद्मावतीकडे वळून तो तिला म्हणाला "देवि, ह्या ५०० स्त्रिया तुला तुझ्या दासी म्हणून मी बहाल करतों." "फार उत्तम", तिनें उत्तर केलें, "पण ही गोष्ट सर्व शहराला जाहीर झाली पाहिजे." राजानें एक जाहीरनामा काढला व त्यांत ज्या ५०० स्त्रियांनीं पद्मावती राणीचें अत्यन्त नुकसान केलें होतें, त्यांना तिच्या दासी केलें असल्याचें जाहीर केलें. पण तिला असें आढळून आलें कीं, ह्या गोष्टीकडे लोकांचें जावें तसें लक्ष गेलें नाहीं. म्हणून ती एक दिवस राजाकडे गेली व म्हणाली, "महाराज, माझ्या दासींची मुक्तता करण्याची माझी इच्छा आहे. आपली अनुमति असावी." "जशी तुझी इच्छा," राजानें उत्तर दिलें. म्हणून राजाकडून तिनें भेरी वाजवून असें जाहीर केलें कीं, पद्मावती राणीनें आपल्या सर्व ५०० दासींना आजपासून बंधमुक्त केलें आहे. अशारीतीनें त्या मुक्त झाल्यावर तिनें आपल्या ५०० पुत्रांपैकीं एकेकास प्रत्येकीच्या हवालीं केलें व त्यांचें संगोपान करण्यास त्यांना बजाविलें, व खुद्द महापद्मकुमारास स्वत: जवळ ठेवून घेतलें.

कालें करून तीं मुलें मोठीं झालीं; व खेळण्याच्या वयांत आल्यावर राजानें त्यांच्याकरितां निरनिराळीं उपवनें व क्रीडांगणें तयार करविलीं. त्यांना सोळावें वर्ष लागलें. एक दिवस ते सर्व खेळत असतां त्यांची दृष्टि जवळच असलेल्या मंगलपुष्करणीकडे गेली. त्यांत नानाप्रकारचीं कमलें भरलेलीं असून त्यांतील नूतन कलिका उमलत होत्या

व जीर्ण झालेलीं फुलें वृक्षापासून च्युत होत होतीं! ह्या अस्तोदयनिदर्शक देखाव्यानें त्याचें मन व्यग्र झालें. त्यांनीं विचार केला "पहा, या पुष्पांच्या वृद्धींचीं कारणें नाहींतशीं झाल्याबरोबर हीं पुष्पेंसुद्धां निमीलित झालीं! याच दृष्टीनें विचार केला तर मानवांच्या शरीरांच्या वृध्दींचीं कारणें नाहींतशीं झाल्यावर ह्यांची कोण दशा होणार? ह्यांचीहि गति तीच होणार ना?" ह्या तात्विक विचारानें लौकरच त्यांच्या मनांत प्रत्येकबोधिज्ञानाचा उद्गम झाला; व प्रत्येकजण एकेका कमलावर अधिष्ठित झाला.

त्यांच्या बरोबर असणाऱ्या राजपुरुषांनीं पुष्कळच वेळ झाला, दिवस संपत आला, असें पाहून, ते त्या राजपुत्रांकडे गेले, व म्हणाले, "आर्यपुत्रानों, कितीवेळ लोटला याची तुम्हांस कल्पना तरी आहे काय?" ते स्तब्धच राहिले. ते कांहींच उत्तर देत नाहींत, असें पाहून ते राजाकडे गेले व त्यांनीं राजास ही बातमी सांगितली. राजानें "त्यांस त्याच्या मर्जीप्रमाणें बसूं द्या" असें त्यांस सांगितलें. त्या कमलपुष्पांवर अधिष्ठित होत्साते ते सर्व रात्रभर तेथें असतांनाच अरुणोदय झाला. राजपुरुष पुन्हां सकाळीं तेथें आले व कुमारांनीं कितीवेळ लावला आहे बरें? असा त्यांनीं त्यांना प्रश्न केला. त्या राजकुमारांनीं उत्तर दिलें, "आम्हीं कुमार नाहीं, आम्हीं प्रत्येकबुध्द आहोंत." "आर्यांनों, तुम्ही कांहींतरी बोलत आहां झालें! प्रत्येकबुध्द काहीं तुमच्या सारखे नसतात. दोन अंगुलमात्र त्याचे केश व दाढी असते आणि त्यांच्या अंगावरच श्रमणास आवश्यक अशा आठ गोष्टी असतात." "तुम्हींच कांहींतरी म्हणत आहांत झालें," असें म्हणून त्या राजकुमारांनीं आपआपला उजवा हात डोक्यावरून फिरविला; त्याबरोबर त्यांचीं गृहस्थाश्रमांचीं चिन्हें नाहींशीं झालीं; व फक्त आठ श्रमणपरिष्कार त्यांच्या शरीरांवर प्रमुखत्वानें दिसावयास लागले! व ते राजपुरुष पहात असतांनाच ते पांचशें प्रत्येकबुध्द नन्दमूलक प्राग्भारपर्वतावर आकाशमार्गानें गेले!

जेव्हां पद्मावतीस ही वार्ता कळली, तेव्हां तिला फार वाईट वाटलें. मातेच्या अन्तःकरणावर मोठा आघात झाला. "माझीं इतकीं मुलें असून मी आज पुत्रविहीन झालें! ५०० मुलांची माता व एकहि पुत्र आपला

म्हणावयाला नाहीं!" या पुत्रशोकामुळें तिचें शरीर खंगत चाललें, व क्षीण झालेलें तिचें शरीर लौकरच भूमिगत झालें! अशा रीतानें पद्मावती राणीचा अंत झाला!

पुढील जन्मीं राजगृहनगराच्या द्वाराजवळील एका खेड्यांत तिचा जन्म झाला! तिचें कुळ उत्तम प्रकारचें नव्हतें. त्यांतील सर्व लोक कामकरी होते; व त्यांच्याबरोबर तीहि मोठी झाल्यावर काम करूं लागली. कालेंकरून ती वयांत आली व लग्नाला योग्य झाल्यावर शेतांत काम करणाऱ्या एका कामकऱ्याबरोबर तिचें लग्न झालें.

एक दिवस ती शेतावर काम करणाऱ्या आपल्या नवऱ्याकरितां कांजी घेऊन चालली होती. त्यावेळीं रस्त्यावरून चालली असतां आकाशाकडे तिनें पाहिले, तों तिच्या गतजन्मांतल्या पांचशें पुत्रांपैकीं आठ प्रत्येकबुद्ध आकाशांतून उडून चालले होते. ती वेळ भिक्षाटनार्थ जाण्याची असल्यामुळें ते भिक्षेकरितांच चालले असावेत. मागीलजन्मीच्या मातृप्रेमाचा तिच्या हृदयांत उद्गम झाला व झपाझप ती पावलें टाकीत चालली. लौकरच ती शेतावर गेली व आपल्या नवऱ्याला भेटून म्हणाली, "आर्य, पाहिलेत कां, ते प्रत्येकबुद्ध आकाशांतून खालीं येत आहेत. त्यांना निमंत्रण करून मी भोजन देऊं कां?" तो म्हणाला, "काय? तुला वेड तर नाहीं लागलें? ते पक्षी आहेत, श्रमण नाहींत. नेहमीं ते अशा रीतीनें आकाशांत भ्रमण करीत चालले असतात. ते प्रत्येकबुध्द नव्हेत." पण तो असें बोलत आहे तोंच ते प्रत्येकबुध्द त्या जोडप्यापासून जवळच उतरले. ती त्यांच्या जवळ गेली व आपल्या शक्त्यनुसार त्यांना अन्न देती झाली; व तिनें त्या आठ बुद्धांस पुन्हां अशी विनंती केली कीं, "आपण दररोज माझ्याकडून अन्नाचा स्वीकार करीत जावा." यावर ते आठ प्रत्येकबुद्ध तीस म्हणाले, "उपासिके, फार चांगलें. पण येथें मांडलेल्या आठ आसनांवरून तुझ्याजवळ फक्त आठ प्रत्येकबुध्दांचाच सत्कार करण्यापुरती सामुग्री आहे, असें दिसतें. पण आमच्या बरोबर दुसरे वर पुष्कळ प्रत्येकबुध्द आले, तर त्यांची व्यवस्था येथें कशी होणार?"

दुसरे दिवशीं तिनें आठ आसनें तयार केलीं व आठ प्रत्येकबुध्दांचा सत्कार करण्याची तयारी ठेवली व त्यांची वाट पहात ती बसली.

इकडे निमंत्रित अशा त्या आठ प्रत्येकबुध्दांनीं आपल्या दुसऱ्या प्रत्येकबुध्दांस खबर दिली. "आयुष्मन्" ते म्हणाले, "आज तुम्ही दुसरीकडे कोठें जाऊं नका. आज आपण सर्वजण तिच्याकडे जाऊन आपल्या त्या मातेवर अनुग्रह करूं." त्या सर्वांनीं हें ऐकलें. व ते सर्व मिळून राजगृहाच्या वेशीजवळ जाऊन दृश्य झाले.

आपण ज्यांस आज बोलाविलें होतें त्याशिवाय दुसरेहि पुष्कळ प्रत्येकबुध्द येथें आलेले आहेत, हें पाहून सुध्दां तिचें चित्त कम्पित झालें नाहीं. अगदीं शांत व प्रसन्न चित्तानें तिनें त्या सर्वांना आपल्या घरांत बोलाविलें व आसनांवर बसावयास सांगितलें. निमंत्रित आठ बुद्ध ओळीनें आपापल्या स्थानापन्न झाल्यावर नवव्या बुध्दानें आणखी आठ आसनें उत्पन्न केलीं व आपण स्वतः आसनावर बसला व त्या ओळींतील आठ आसनें गुंतल्यावर नवव्या बुद्धानें आणखी आठ आसनें उत्पन्न केलीं, व आपण स्वतः आसनावर बसला व त्या ओळींतील आठ आसनें गुंतल्यावर नवव्या बुद्धानें आणखी आठ आसनें उत्पन्न केलीं. अशा रीतीनें आसनाची संख्या वाढत असतां तें घरहि मोठें होत चाललें; व ५०० बुद्धांचीं आसनें त्या घरांत समाविष्ट झालीं. ते सर्व याप्रमाणें आसनावर बसल्यावर त्या उपासिकेनें आठ बुद्धांकरितां तयार केलेलें अन्न त्यांस वाढावयास सुरवात केली. पण काय चमत्कार पहा! तिनें तें तयार केलेलें अन्न संपेनाच! त्या सर्व प्रत्येकबुद्धांस तें पुरलें! व तिनें अन्नसंतर्पण केलें. भोजन उरकल्यावर तिनें आठ मुठभर नीलोत्पलें आणून तीं त्या सर्वांच्या चरणीं अर्पण केलीं व त्यांच्यापुढें अशी प्रार्थना केली कीं, "भविष्यकाळीं जेव्हां माझा जन्म होईल तेव्हा माझी अंगकांती ह्या नीलोत्पलांच्या अन्तर्गर्भाप्रमाणें असावी!"

त्या प्रत्येकबुद्धांनीं आपल्या आईस "तथास्तु" असें म्हणून ते गंधमादन पर्वतावर निघून गेले. इकडे त्या स्त्रीनें राहिलेलें आयुष्य पुण्यकर्मे करण्यांत वेंचल्यावर ती विगतायु झाली. तिला देवलोकांत पुनर्जन्म प्राप्त झाला, व तेथून गौतमबुद्ध जन्मास यावयाच्या सुमारास श्रावस्ती नगरींत एका संपन्न श्रेष्ठीची कन्यका म्हणून ती जन्मास आली. तिचा शरीरवर्ण नीलोत्पलाच्या अन्तर्गर्भाप्रमाणें तेजस्वी व कांतिमान् झाला; म्हणून तिचें नांव तिच्या आईबापांनीं उत्पलवर्णा असें ठेविलें!

## (२).

## गौतमबुध्दकालीन चरित्र.

कालेंकरून ती शुक्लेन्दुवत् वाढत चालली; व वयांत आल्यावर तिचें सौंदर्य व मुख्यतः तिचा उत्पलवर्ण सर्वांना दिपवून टाकावयास लागला. जंबुद्वीपांतील निरनिराळ्या राष्ट्राधिपतींच्या राजकुमारांनीं व श्रेष्ठीनीं तिच्या बापाकडे तिजविषयीं मागणी घातली. त्या श्रेष्ठीस मोठाच प्रश्न पडला. त्या सर्वांस खुष करणें शक्य नव्हतें. एकास खुष करावयाचें म्हणजे इतके दुसरे शत्रू उत्पन्न करून घेण्यासारखें होणार. संसारी मनुष्यास इतर विचार सुचणार कोठचा? त्याचें मन विचारांनीं पर्याकुल झालें. अशा स्थितींत त्याला एक युक्ति सुचली, पण ती युक्ति अमलांत आणण्यास त्याला धीर होईना. पण पुढें सोडवावयाचा प्रश्न व त्याचे परिणाम डोळ्यांसमोर उभे राहिले म्हणजे, डोळ्यावर कातडें ओढून त्याला त्या युक्तीचा अवलंब करणेंच आवश्यक वाटूं लागलें.

अशाप्रकारें काय करावयाचें हें ठरविल्यावर तो आपल्या कन्येकडे गेला. आपल्या पित्याची केविलवाणी स्थिति तिच्या ध्यानांत आली नव्हती, असें नाहीं. तिनें पित्यास उत्थापन दिलें व पिता बसल्यावर त्याची दुःखी मुद्रा तिच्या दृष्टीस पडली. त्याचा चेहरा म्लान झालेला असून त्याच्या मनावर कसलें तरी जबरदस्त दडपण आहे, हें कळणें कांहीं कठीण नव्हतें. "बाबा, तुम्हास कांहीं होतें कांहो? तुमची काय ही अवस्था!" असें ती म्हणाली. तिच्या या कोमल व हृदयस्पर्शी शब्दांनीं तर त्याच्यावर आघातच केला; पण मोठ्या प्रयत्नानें मनास स्थिर करून तो तिला म्हणाला, "मुली, मी हल्लीं कोणत्या पेंचांत आहे, हें तुला कळलेंच आहे, असें मी समजतों. तुझ्याकरितां जंबुद्वीपांतल्या सर्व राजकुमारांनीं व श्रेष्ठीपुत्रांनीं मजकडे मागणी केली आहे. तुझ्यासारखें हें कन्यका रत्न असल्यावर त्यांवर उड्या कां पडणार नाहींत! पण त्यायोगें माझी मात्र स्थिति केवढी धोक्याची झाली आहे, याचा तूं विचार कर! मी आतां जें तुला विचारणार आहे, त्यावरून माझी तूं एकदमच परीक्षा करूं नकोस! माझें तुझ्याविषयीं केवढें वात्सल्य आहे,

ह या हृदयासच ठाऊक आहे.पण मी तरी आतां काय करणार! मुली, प्रव्रज्या घेण्याची तुझी तयारी आहे काय?"

हें शेवटचें वाक्य उच्चारतांना त्यांचे चर्येवर एकप्रकारचा करारीपणा दृग्गोचर झाला होता. उत्पलवर्णेनेंहि आपल्या पित्याचें भाषण व तें उच्चारीत असतांना मनोविकारांचें त्यांच्या मनांतील तुंबळ युध्द हीं जाणलीं होतीं. आपल्यामुळेंच आपल्या पित्याला आपण केवढया पेंचांत आणीत आहों, ह्याची आतां तिला चांगली कल्पना झाली व डोळ्यांत आसवें आलीं असतां तीं पुसून काढून मोठया हिय्यानें व कुमारीसुलभदिव्यतेनें ती म्हणाली "बाबा, तुह्मांस वाईट वाटून देऊं नका. बाबा मी कुलकुमारी आहे. माझ्या पित्याचें जें कल्याण तेंच मी केलें पाहिजे; व तेंच मी करणार!" शिवाय, मागील जन्मांच्या संस्कारांमुळें तिला बापाचें म्हणणें फारच पटलें. हे त्याचे शब्द तर तिला अमृततुल्य असेच भासले; जणूं काय १०० वेळां शुध्द केलेल्या तेलाचें आपल्या डोक्यावर कोणी सिञ्चन केलें आहे, असें तिला वाटलें. ती लगेच आपल्या पित्यास ह्मणाली "बाबा, मी या क्षणीं प्रव्रज्या घेण्यास तयार आहे." बापाचे डोळे भरून आले. अन्तःकरणांतील प्रेमळमनोवृत्तीच्या पुरामुळें शब्द बाहेर पडेना. त्यानें तिला हृदयाशी धरून तिचा सत्कार केला; व मग तो तिला भिक्षुणीसंघाकडे घेऊन गेला; व तेथें तिला प्रव्रज्या मिळाली.

उत्पलवर्णेला नवीन आश्रमांत फार गोडी लागली. तिला आपण मोकळे झालों असें वाटावयास लागलें. व उपसंपदेनंतर तिनें अध्यात्मिक उन्नत्यर्थ अभ्यास करण्यास सुरवात केली. संघांत राहून त्रिपिटकांचें अध्ययन करून तिनें सीलसंपदा प्राप्त करून घेतली; व समाधिभावनेचा साक्षात्कार करण्याच्या मार्गास ती लागली, एक दिवस संघांतील उपवसथागाराची व्यवस्था करण्याची पाळी तिजवर आली. उपोसथाच्या दिवशी प्रातिमोक्ष म्हणण्यासाठीं उपोसथशाळा[१] झाडून साफसूफ करून त्यांत

[१] उपवसथागार (पाली—उपोसथागार) ज्याठिकाणीं भिक्षुसंघ उपवसथाचे दिवशीं एकत्र जमून संघकृत्यें करतात, ती शाला. उपवसथाचे दिवशीं मुख्यतः चतुर्दशी व पौर्णिमा या दोन दिवशीं- उपोसथ शालेची व्यवस्था करण्याचें काम आळीपाळीनें संघां-

दिवा वगैरे तिनें लावून ठेवला;[1] व त्या दीपज्योतीपासूनच सुरवात करून तेजोकसिणारम्मपणानें युक्त असें ध्यान उत्पन्न करून घेऊन त्याच पादकध्यानावर अर्हतपदाचा तिनें साक्षात्कार करून घेतला.[2] अर्हत्पदाचें फल साध्य झाल्याबरोबर ऋध्दि व चमत्कार करणें यांत ती पारंगत झाली.

पुढें शास्त्यानें ज्या दिवशीं यमकपाटिहारियं[3] म्हणून चमत्कार करून दाखविला, त्या दिवसाची गोष्ट. शास्त्यानें चमत्कार करून दाखविल्यावर ती त्याच्यासमोर गेली; व "मीहि भगवन्तापुढें चमत्कार करून दाखविणार" म्हणून तिनें सिंहनाद[4] केला!

---

तील भिक्षूंवर किंवा भिक्षुणींवर येतें. त्या दिवशीं प्रातिमोक्ष (पाली-पातिमोक्ख) म्हणून भिक्षूंनीं टाळण्याच्या आपत्तींचें जें पुस्तक आहे तें म्हणावयाचें असतें. चार पाराजिक नांवाच्या अत्यंत भयंकर आपत्तींपासून सुरवात करून ७५ "सेखियधम्मा" सारखे किरकोळ नियमभंगाचाहि त्यांत समावेश केलेला असतो. भिक्षुसंघ जमला असतांना संघस्थविर संघास विज्ञापना करतो. आपण सर्वजण कां जमलों आहों. हें सांगतो. व एकामागून एक से नियम म्हणून दाखवितो. त्या नियमांपैकीं कोणी जर एखादा मोडला असेल तर त्यानें उठून तो कबूल करावा लागतो व त्याबद्दल संघाची जी शिक्षा असते, ती भोगावी लागते. अस्तु. विनयपिटकांतील महावग्ग, चुल्लवग्ग आणि प्रातिमोक्ष या ग्रंथांत या सर्वांचा विस्तार केला आहे.

१: या सर्व गोष्टींना पूर्वकृत्य ( पाली-पुब्बकिच्च ) असें म्हणतात " सम्मज्जनी पदीपो च उदकं आसनेन च । उपोसथस्स एतानि पुब्बकिच्चऽन्ति वुच्चति ॥" ( द्वेमातिका-Burmese Edition-पृष्ट १ लें. )

२: तेजोकसिण-समाधीचा विषय होणारीं जीं चाळीस कर्मस्थानें बुद्धघोषाचार्यांनीं विशुद्धिमार्गांत सांगितलेलीं आहेत; त्यांपैकीं जीं दहा कृत्स्नें ( पालि-कसिणें) आहेत, त्यांत तेजोकसिणाचा अन्तर्भाव होतो. तेजाच्या विस्तृतस्वरूपाचें एकदम आकलन करून त्यावर समाधि लावणें शक्य नसल्यामुळें, तेजोयुक्त असा दीप वगैरे पदार्थ घेऊन त्याला आलम्बन करून त्यावर ध्यान लावणें हाच पाया आहे; व याच मूलभूत पायावर समाधिभावना वाढवून प्रज्ञायुक्त होऊन अर्हत्पदाचा साक्षात्कार उत्पलवर्णेनें करून घेतला.

३: यमकपाटिहारियं:—म्हणजे दुहेरी चमत्कार. एकाच वेळीं स्वभावभिन्न वस्तु एकत्र आणून दाखविणें.

४: सिंह हा प्राणी ज्याप्रमाणें निर्भयपणानें सर्वत्र नाद करितो, त्याप्रमाणें निर्भयपणानें व पूर्णखात्रीपुरस्सर एखादी गोष्ट आपण करणार, म्हणून छातिठोकपणानें सांगणें. यास पालींत सिंहनाद असें म्हणतात.

ह्यामुळेंच एक दिवस शास्ता जेतवनांत संघासमवेत बसला असता त्यानें भिक्षुणींना निरनिराळें स्थान देण्यास सुरवात केली; व जेव्हां उत्पलवर्णेची पाळी आली, तेव्हां तिच्या सिंहनादाचा निर्देश करून, त्यानें तिची योजना ऋध्दिमती भिक्षुणींमध्यें श्रेष्ठपदावर केली; व अशा रीतीनें उत्पलवर्णेचेही इच्छा परिपूर्ण झाली.[1]

---

१: उत्पलवर्णेसंबंधीं पुढील जास्त माहिती थेरीगाथेंत दिलेली आढळते. समाजांतील माता व दुहिता हें नातें विसरून जाऊन सापत्नभाव उत्पन्न झाल्यामुळें संवेग उत्पन्न होऊन इंद्रियांच्या सुखांत, केवढें दुःख भरलें आहे. हें दाखविण्याच्या इरायानें उत्पलवर्णा तीन गाथा ह्मणते, असें दाखविलें आहे ( गाथा—२२४ ते २२६ ). ऋध्दि व अभिज्ञा यांचा साक्षात्कार झाल्यामुळें आनंदपूर्ण व सुखी होत्साती ती दोन गाथा ( गाथा २२७, २२८ ) गाते, असें दाखविलेलें आहे. बुद्धाच्या अनुमतीनें ती एक चमत्कार करून दाखविते. ऋद्धींच्या सामर्थ्यानें चार घोडयांनीं युक्त असा एक रथ निर्माण करून त्यांत बसून ती बुद्धाच्या चरणापाशीं गेली आहे, असें सांगितलें आहे. मारानें तिला विचल करण्याचा प्रयत्न केला असतांना तिनें त्याची खरडपट्टी काढून त्यास तेथून निघून जाण्यास सांगितलें आहे. " मीं तृष्णेचा नायनाट केला आहे व तमाचा विध्वंस केला आहे. अशा प्रकारची मी असल्यामुळें, हे पापी मारा, तुलाहि मीं नष्ट केला आहे," असें निर्भयपणानें तिनें त्यास उत्तर दिलें आहे. अंगुत्तरनिकायांतहि बुद्धानें संघांत तिची योग्यता 'क्षेमा भिक्षुणीबरोबर केली आहे. ( थेर आणि थेरीगाथा–P. T. S.–Oldenberg and Pischel गाथा २१४ ते २२५ )

# रत्न ४ थें.

## पटाचारा.

### ( १ )

### पूर्व बुध्दकालीन–चारित्र.

या तेरा स्त्रीरत्नांच्या पूर्वचरित्रांतील हा एक विशेष आहे कीं, त्यांचें पूर्वचरित्र बहुतेक सारखेंच आहे. तीन भिक्षुणीं-च्या पूर्वचरित्रांतील हकीकत जवळ जवळ एकच आहे. कारण सारखी तयारी असल्याशिवाय सारखेंच फळ मिळणें शक्य नाहीं. बौद्धधर्मांतील हाहि दुसरा विशेष पाहण्यासारखा आहे. तयारी असल्याशिवाय फळ मिळत नाहीं. बौद्धधर्मांत परमेश्वर हा कर्ता करविणारा असतो, ही कल्पना रूढ नाहीं. देवतांचें अस्तित्व बौद्धधर्मांत आहे, पण त्यांच्या अंगीं मानवाचें कर्म बदलण्याचें सामर्थ्य नाहीं. कर्माचा बंध देवापासून मानवापर्यंत सर्वांस सारखाच आहे. सन्मार्गानें चालून व सत्कृत्यकरूनच उन्नति करून घेतली पाहिजे व मोक्ष मिळविला पाहिजे. हिंदूधर्मांत आत्मोद्धाराची कल्पना परमेश्वराच्या सर्व सामर्थ्याच्या कल्पनेमुळें कमी बलवत्तर झाली आहे. पण आत्मा हाच आत्म्याचा नाथ आहे, दुसरा जगन्नाथ नाहीं, ह्या शिकवणीमुळें बौद्धधर्मीयांना स्वावलंबन व आत्मप्रयत्न यांचें जणूं बाळकडूच मिळालें आहे! ह्या तेरा स्त्रीरत्नांनींहि गौतम बुद्धकालीन प्राप्त करून घेतलेलें महनीय स्थानहि पूर्वजन्मींच्या पुण्य संस्कारांचें फळ आहे. व जरी त्यांना निरनिराळे उच्चनीच, सुखमय व दुःखमय जन्म घेणें भाग पडलें, तरी

शास्त्याचें दर्शन, त्यांच्या समोर केलेली प्रतिज्ञा, व तत्सिध्दच्यर्थ केलेलीं निरनिराळीं कुशल कर्मे हीं सर्वांच्या बाबतींत सारखींच आहेत. म्हणून इतउप्पर पूर्व चरित्राचा संक्षेपच करण्याचें आम्हीं योजिलें आहे. अस्तु.

पटाचारेचा पूर्वजन्महीपदमोत्तर बुध्दाचे काळींच झाला होता व त्या शास्त्याच्या हसंवती नगरींतच एका अभिजात कुलांत ती जन्मास आलेली होती. एक दिवस इतर लोकांप्रमाणें तीहि शास्त्याच्या दर्शनास गेली होती व त्याच्या मुखांतून धर्मोपदेशामृताचें पान तिनें केलें व त्याच सुमारास एक दिवस शास्त्यानें एका भिक्षूणीस विनयसंपन्न[1] अशा भिक्षुणीमध्यें अग्रस्थान दिलें, असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां आपणासही तें स्पृहणीय स्थान एक दिवस प्राप्त व्हावें, अशी प्रार्थना[2] तिनें शास्त्यासमोर पृथित केली. उरलेलें आयुष्य पुण्यकर्मे करण्यांत वेंचल्यावर मृत्यूनंतर तिला देवलोकांत जन्म आला. पुण्यक्षीण झाल्यावर पुनरपि मनुष्यलोकांत जन्म घेत घेत काश्यप बुध्दाच्या काळीं किकी राजाच्या सात बहिणींपैकीं एक बहीण म्हणून ही जन्मास आली व त्या जन्मांत २०,००० वर्षे कुमारी व्रताचें ब्रह्माचर्याचरणं करून तिनें भिक्षुसघास एक परिवेण दान केलें व पुन्हां देवलोकांत जन्म घेऊन एक बुध्दांन्तरापर्यंत वैभवाचा उपभोग घेत भगवान् गौतम बुध्दाच्या काळीं ती श्रावस्ति नगरांत एका संपन्न श्रेष्ठीची कन्यका म्हणून जन्मास आली.

## ( २ ).

## गौतमबुद्धकालीन चरित्र.

श्रावस्ती नगरांत जीं संपन्न अशीं श्रेष्ठीकुळें होतीं त्यात अत्यंत श्रेष्ठ अशा कुलांत तिला जन्म आल्यामुळें तिचें संगोपन व संवर्धन किती काळजीपूर्वक झालें असलें पाहिजे. हें सांगणें अनवश्यक आहे. तिच्या

---

१: विनयसंपन्ना:-विनयशास्त्रांत पारंगत. बौद्धवाङ्मयाचें धर्म व विनय असे मुख्यत्वेंकरून दोन भाग पडतात. विनयास ' विनयपिटक ' असेंहि नांव आहे. त्यांत भिक्षूंनीं व भिक्षुणींनी संघांत कसें रहावें यासंबंधाचे नियम एकत्र करून ठेवलेले आहेत. त्याचे एकंदर पांच भाग पडतात.पाराजिक, पाचित्तिय, महावग्ग, चुल्लवग्ग आणि परिवारपाठ या सर्वांत भिक्षु व भिक्षुणी यांच्या शीलांचा विचार केलेला आहे.

२: प्रार्थना ( पाली-पत्थना ) cf. अधिकारकर्म ( पाली-अधिकारकम्म ).

आईबापांना तर ती म्हणजे जीवाचा कलिजा वाटे. बाल्यावस्थेंतून हळूं-हळूं वर चढत ती तारुण्यांत प्रवेश करावयास लागली. अगोदरच नैसर्गिक सौंदर्य व त्यांत ती आपल्या वयांत यावयास लागलेली, त्यामुळें तिचें दर्शन श्रावस्तीच्या संपन्न तरुणांना विद्ध करावयास पुरेसें होतें. तिच्या आईबापांनींहि तर तिच्यासाठीं वरसंशोधनाची खटपट चालविली होती. कुलशील गुणांनीं सर्वतोपरी योग्य असा वर त्यांनीं शोधून काढि-ला व लौकरच तिचें लग्न त्या तरुणाशीं होणार ही वार्ता सर्वत्र ख्यात झाली.

परंतु खुद्द कन्यकेचें मन त्या वराकडे आकर्षित झालें होतें काय? ज्याच्याशीं आपणांस जन्म कंठावा लागणार तो तिच्या मनांत उतरला होता काय? आईबापांनीं आपल्या कन्यकेला आपण निवडलेला मुलगा पसंत आहे किंवा नाहीं याची विचारपूस केली होती काय? त्या कन्य-केची व भावी वराची गांठ, भेट, दृष्टादृष्ट तरी झाली होती काय? या प्रश्नांचीं उत्तरें नकारार्थीच देणें प्राप्त आहे. तिचें मन त्या तरुणावर आसक्त झालें नव्हतें. खरें प्रेम हें आधळें असतें, ह्या वाक्याची प्रतीति तिच्या बाबतींत दृष्टिगोचर होतें. आईबापांनीं ठरविण्याच्या अगोदरच तिनें एका तरुणास मनानें वरलें होते. तो श्रीमंत नव्हता, तो त्यांच्या कुलाला अनुरूप असा नव्हता; समाजाच्या दृष्टीनें त्याचा दर्जा खालींच लागला असता. पण तो तरुण असून खऱ्या प्रेमानें तिच्याशीं बांधला गेला होता. तिचेंहि प्रेम त्याच्यावर बसलें होतें! त्यांचा एकमेकांना वरण्याचा निश्चयहि झाला होता! चिरसहवास, एकमेकांचें विचारप्रद-र्शन व विनिमय व समानच्छंद व समवयस्कता या योगानें तारुण्याच्या उद्यानांत दोन हृदयपुष्पें निगडित झालीं होतीं व त्यायोगानें त्यांच्या त्या भावनाप्रधान हृदयांना हें आपलें मीलन किती व्यवहार्य होईल याची कल्पनाहि शिवली नव्हती!

पण वर सांगितल्याप्रमाणें श्रेष्ठीकन्यकेचा विवाह तिच्यासाठीं आईबापांनीं मुद्दाम पसंत केलेल्या तरुणाबरोबर लौकरच होणार ही बातमी हांहां म्हणतां त्या तरुणीच्या कानावर गेली व तिच्यावर आका-शाची कुऱ्हाड कोसळली! आपल्या हृदयाशीं पूज्य म्हणून बाळगलेल्या

प्राणेश्वराची प्रतिमा आतां फेकून द्यावी लागणार व त्या ठिकाणीं अगदीं अपरिचित व रंगेल अशा तरुणाला आपला प्राणेश्वर मानून त्याची प्रतिमा हृदयाशीं ठेवावी लागणार, ह्या विचारानें ती शून्यमनस्क झाली! एक सायंकाळची वेळ. भगवान् सहस्ररश्मी नुक्ताच अस्तंगत झाला होता व रजनीनाथ उदयाचलावर आरूढ झाला होता. सृष्टिदेवीहि त्याकाळीं कांहीं अनुनुभूत सुख अनुभवीत होती. अशावेळीं ती मुग्धा तरुणी उद्यानांत प्रविष्ट झाली व एकटीच एका पुष्करणीपाशीं मोठ्या व्यग्र चित्तानें त्यांतील पाण्याकडे पहात राहिली. मोठ्या उत्कंठेनें ती कोणाची तरी वाट पहात असावी, असें दिसत होतें. इतक्यांत पावलांचा आवाज ऐकूं येऊं लागला व एखाद्या हरिणीप्रमाणें तिनें कान लावले. त्याबरोबरच एक आकृति तिला दिसावयास लागली व त्यामुळें तिला पुष्कळच धीर आला व समाधान झालेसें वाटलें. ज्या तरुणावर तिचें प्रेम जडलें होतें तोच तिच्याकडे येत होता. त्यांची गांठ झाली! व प्रेमानें डोळ्यांतून अश्रुसिंचन झालें! इतक्यांत त्या तरुणीनें स्वतःस स्थिर केलें व दृढ निश्चयाच्या कठोर स्वरांत ती बोलूं लागली, "तुम्हांस गांवांत पसरलेली अशुभ वार्ता कळली आहे काय? परवांपासून माझ्या भोंवतीं शेकडों परिचारिकांचा गराडा पडेल. मग आपली भेट काय—पण माझें दर्शनहि तुम्हास मिळणें अशक्य? मग आपला वियोग अशा रीतीनें झाला तर तुम्हास तो पसंत आहे काय?"

त्या तरुणानें तिच्यापुढें हात जोडले! "हे देवते, तूं कोण? व मी कोण? ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. माझा दर्जा तुझ्या वडिलांचा नोकर म्हणून, किती खालीं आहे, हें मीं जाणून आहें; पण तुझ्या उज्वल प्रेमानें मीहि आपला दर्जा विचारांत घेतला नाहीं. आपण प्रेमरज्जूनें बद्ध झालों आहों! पण आतां आपला वियोग होणार हें स्पष्ट दिसतेंच आहे."

पुढें त्यास बोलूं न देतां ती तरुणी मध्येंच म्हणाली, मग काय, हे तरुणा, तूं रडत बसणार? तुझ्या करितां मी कोणताही स्वार्थत्याग करावयास तयार आहे. तुझ्या अंगीं कांहीं सामर्थ्य असेल तर येथून आपण उद्यांच्या उद्यां देशांतरीं निघून गेलें पाहिजे. प्रत्येक क्षण मौल्यवान् आहे. मग काय? रडत बसण्याची ही वेळ नाहीं. कार्य करण्यास एकदम तयार

होण्याची ही वेळ आहे. आहे तयारी माझ्या म्हणण्याप्रमाणें करण्याची? नाहींतर हीच एकमेकांची शेवटची भेट. तुझा मार्ग तुला मोकळा आहे, माझा मार्ग मी पाहीन." हे निश्चयाचे व निर्वाणीचे शब्द ऐकून त्या तरुणाच्या अंगात संचार झाल्यासारखें होऊन तोहि ताठ उभा राहिला. त्यानें लगेंच एक निश्चय केला व आपली कल्पना आपल्या प्रियतमेपुढें मांडली. तिलाहि ती पसंत पडली व लगेंच " उद्यां किंवा कधींच नाहीं " येवढे शब्द उच्चारून ती तेथून निघून गेली.

× × ÷ ×

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं श्रावस्तीवरून जाणाऱ्या एका मोठ्या रस्त्यावरून एक हत्तीण जोरानें चालली होती व तिच्या पाठीवर दोन माणसें गुप्त वेशांत बसली होतीं. त्यांचें लक्ष इतर गोष्टीकडे नसून फक्त त्या हत्तीणीच्या गतीकडे लागलेलें होतें. तीहि बिचारी आपल्या धन्याच्या इच्छेप्रमाणें शक्य तितक्या गतीनें चालली होती. चंद्रमा जरी वर येत चालला होता, तरी त्या रस्त्यावरील दोहोंकडच्या गर्द झाडीमधून त्याचीं किरणेंच कायतीं आंत प्रवेश करीत होतीं. रात्रभर त्यांनीं प्रवास चालविला होता. त्यांपैकीं कोणीहि फारसें बोलत नव्हतें. सुमारें पहाटेचे सुमारास त्यांनीं मुख्य रस्ता सोडला व एका साधारण आडरस्त्यानें मार्ग आक्रमण्यास सुरवात करून सकाळीं ती संपन्न श्रेष्ठीकन्यका आपल्या हृदयवल्लभाच्या सांगातीं एका दूर गांवीं वास करावयास गेली. अशा तऱ्हेनें आपल्या प्रियकराच्या संगतीसाठीं तिनें घरच्या सुखाची व संपत्तीची पर्वा केली नाहीं; उलटपक्षीं निष्कांचन अशा तरुणाबरोबर हालांत दिवस काढण्यास ती राजी झाली व अशारीतीनें खऱ्या प्रेमाचा विजय झाला! त्या दिवशीं आपण मोठ्या सुखांत आहोंत, असेंच तिला वाटलें.

त्या तरुणाबरोबर एका झोपडींत मोठ्या आनंदानें संसाराचा गाडा याप्रमाणें ती हकीत असतांना लौकरच ती निसर्गाच्या नियमानुसार गरोदर झाली व प्रसूतिकाळ जसजसा जवळ येत चालला तसतसें तिच्या डोळ्यांवरील अभ्रपटल दूर व्हावयास लागलें. स्त्रीचें अबलत्व तिच्या हृदयाचें पाणी करावयास लागलें. एक दिवस ती आपल्या पतीस

म्हणाली.स्वामी,ह्या ठिकाणीं आपण अनाथ व मित्रहीन व ज्ञातिहीन आहोंत. चला गडे, आपण माझ्या घरीं परत जाऊं. त्याबरोबर आपल्या घराचें चित्र तिच्या डोळ्यापुढें उभें राहिलें व मातापितरें व बहीण भाऊ व सगे सोयरे या सर्वांची तीस आठवण झाली ! तिच्या पतीनें तिला बरें म्हणून समजाविण्याचा प्रयत्न केला व तो दिवस कसा तरी घालविला. पण ह्या असहाय व बिकट परिस्थितींत तिला तेथें अगदीं भयाण वाटावयास लागलें. तिला आपल्या उत्सुकतेबरोबरच दिसणारी नवऱ्याची दिरंगाई कशीशीच वाटावयास लागली. नवऱ्याबद्दल तिच्या मनांत चमत्कारिक मनोभावना उत्पन्न झाली,व त्याबरोबर त्याचा तीस राग आला. आपण किती उत्सुकतेनें त्याची बिनवणी करीत आहों व तो किती शांतपणानें एक एक दिवस लांबणीवर टाकीत आहे, हें पाहून तिचें मन पर्याकुल झालें व एक दिवस तो घरीं नसतांना ती उठली व श्रावस्तीच्या मार्गाला लागली.

इकडे नवरा परत येऊन पहातो तों घरांत ती कन्यका नाहीं.तेव्हां ती निघूनच गेली असली पाहिजे, असा तर्क बांधून, व त्याला सर्वस्वी आपण कारणीभूत आहोंत, हें पाहून तर त्याची कंबरच खचली. "माझ्यामारख्या दुर्दैवी तरुणाच्या प्रेमांत सांपडून त्या संपन्न व सुकुमार श्रेष्ठी तरुणीनें आपल्यावर केवढी आपत्ति ओढून आणली बरें !अरेरे किती मी दुष्ट! अशा प्रकारें तो स्वतःची निर्भत्सना करूं करावयास लागला; पण लागलीच धैर्य धरून तो तसाच तिच्या मागोमाग निघाला व लौकरच तिला त्यानें गांटलें. कारण गरोदर आणि त्यांतून जास्याच न जूक असल्यामुळें तिला फार चालवत नव्हतेंच. त्यांची गांठ पडली व त्यांनीं एकमेकांच्या मानेवर मान ठेऊन अश्रु गाळले; पण तिथेंच त्यांच्यावर आपत्ति कोसळली.तेथेंच तिला प्रसूतिवेदना व्हावयास लागल्या. तेव्हां ती म्हणाली " ज्यांसाठीं मी घरीं जाण्याची धडपड करीत होतें ती तर गोष्ट येथेंच घडून येणार ! आतां घरीं जाण्यांत काय हंशील आहे ? म्हणून प्रसूति व्हावयाच्या आंतच मोठ्या शिकस्तीनें ती खेडयांत आली व तिला मुलगा झाला !त्याबरोबर दोघानांहि आनंद झाला व त्यांनीं आपला पुढील संसार सुखांत चालविला. आणखी चार पांच वर्षांनीं पुन्हां मागील परिस्थिति उत्पन्न झाली. तिचा धीर सुटत चालला. घरीं जाण्याची उत्कंठा वाढत चालली. नवऱ्यानेंहि दिरंगाई चालविली. तिचें चित्त पर्याकुल झालें, व ती तशीच

ग्रं. क्र. ... ता. ... 
प्रा. वि. ... 
वि. ...

नवरा घरीं नसतांना मुलास बरोबर घेऊन घरांतून निघून श्रावस्तीस जावयास निघाली व मार्गास लागली. थोड्या वेळानें नवरा घरीं परत आला तों आपली पत्नी घरीं नाहीं व तो चपापला! त्याला मागची आठवण झाली. मोठ्या वेगानें तो तीस शोधण्यास चालूं लागला! थोड्याच वेळांत त्यानें तीस गांठलें व पुन्हां दोघांचें मीलन झालें; पण ही वेळमात्र दोघांना दुःखाची झाली, लहान मूल बरोबर; बायको आसन्नप्रसववेदना व तशांत जंगलाच्या जवळ ते उभे राहिलेले. इतक्यांत सोसाट्याचा वारा सुटून आकाश काळेंकुट्ट झालें; व फार जोराची वृष्टि होणार, अशीं चिन्हें दिसावयास लागलीं. बरें, माघारी जाणें दुरापास्त झालें! कारण त्या स्त्रीस वेदना व्हावयास लागल्या व ती प्रसूत झाली! तेव्हां त्या पुरुषानें मोठ्या धीरानें जवळच असलेल्या झोंपडीवजा खोपटांत प्रवेश केला; पण त्यास वरचें छपर नव्हतें, म्हणून झाडाच्या डाहळ्या तोडून त्यानें त्यावर घातल्या व शेजारीं वारुळाजवळ गवत वाढलेलें होतें; तें कापून वर टाकूं, अशा हेतूनें तो तें कापावयास लागला. पण त्याचें कर्मच त्यावेळीं त्याच्या पुढें आडवें पडलें! इकडे सायंकाळ झाली. आकाश कृष्णवर्ण नभांनीं व्याप्त झाल्यामुळें अंधार जास्तच पडला. व त्यावेळीं तो तरुण गवत कापीत असतांना वारुळांतून एक कृष्णवर्ण साप बाहेर पडला व त्याच्या पायाला चावला. त्याबरोबर तो मृत होऊन भूमीवर पडला!

इकडे त्या तरुणीस बाहेर पडतां येईना. त्याची वाट पहात पहात ती अगदीं चिंताग्रस्त झाली! बाहेर जाण्याची सोय नाहीं, पाऊस पडावयास सुरवात झालेली, बरोबर एक लहान मूल व दुसरें नुकतेंच जन्मलेलें! तिनें ती रात्र तेथें मोठ्या शिकस्तीनें काढली! "नवरा परत कां नाहीं आला," या विचारानें ती अगदीं श्रमिष्ट झाली! "आपणास नवरा टाकून गेला काय?" हा विचार तीस दुःसह होऊन ती तेथेंच मटकन् बसली.

सकाळ झाली; आकाश निरभ्र झालें. सूर्य उदयास आला व मग ती एका हातांत तान्हुलें व दुसऱ्या हातांत लहान छोकरा बोटानें धरून, नवऱ्याच्या शोधार्थ निघाली. मार्ग काढीत काढीत ती त्या वारुळाजवळ येऊन पाहते, तों नवऱ्याचें प्रेत! त्याबरोबर ती निःसंज्ञ झाली.

थोड्या वेळानें शुद्धीवर येऊन, खरोखर आपला नवरा आपल्याकरितां शेवटीं कसा मेला, हें आठवून तिनें आकांत मांडला! गरीब बिचारें मूल आईकडे पहातच उभें राहिलें! खरोखर दगडासहि पाझर फोडणारा तो प्रसंग होता! मूळ रस्ता चुकलेला! त्यांतून ती दुःखवेडी झालेली! व त्यामुळें वाटेनें चालतां चालतां ती एका ओढ्याच्या कांठीं आली. एक हातांत एक मूल व दुसऱ्या हातांत तान्हुलें. आतां दोघांनाही एकदम नेणें शक्य नव्हतें, व तो ओढा तर पार करावयाचा होता. तेव्हां तिनें थोरल्या मुलास अलिकडच्या कांठावर ठेवलें व लहानास हातांवर घेऊन ओढा पार करून प्रथम त्या तान्हुल्यास पलीकडच्या काठांवर ठेवावें, म्हणून ती पाण्यांत शिरली, पाण्याच्या मधोमध गेली व तेथून हळूंच पलीकडच्या काठांवर जाऊन एका फडक्यावर त्या तान्हुल्याला ठेऊन माघारी पाण्यांत शिरून, अलिकडच्या तीरावरील मुलास आणण्यास निघाली. ती मधोमध येते, तों एक बहिरीससाणा त्या तान्हुल्यावर झडप घालावयास आला. त्याला वाटलें, एक मासांचा गोळा त्या कांठावर असावा! आतां तिची मात्र स्थिति फार विलक्षण झाली! पलीकडच्या काठावर तान्हुलें! पाण्याच्या मधोमध ती उभी व अलीकडच्या कांठावर मूल! तिनें त्या बहिरीससाण्यास हांकून लावण्यास हात वर केले, तों त्या अलिकडच्या मुलाला वाटलें कीं, आई आपणांस बोलावीत आहे; म्हणून तें मूल पाण्यांत शिरलें, व पाय घसरून पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून गेलें! तिकडे त्या बहिरीससाण्यानें ती तेथें जाऊन पोहोंचण्याच्या आंत तें तान्हुलें चोचींत घेतलें व तो उडून गेला! या दुःखातिशानें ती वेडी बनली व त्या वेडाच्या भरांत तिच्या तोंडून शोकगीताच्या पुढील ओळी बाहेर पडल्याः—

दोन्हि पुत्र ते मृत झाले
मार्गी माझा पति मेला ॥[1]

अशा रीतीनें वेडांत गाणें म्हणत म्हणत, जंगलांत हिंडत हिंडत, ती श्रावस्तीस जाऊन पोहोंचली; व संपन्न लोकांच्या हवेल्या ज्या मोहोल्यांत होत्या, तिकडे जावयास निघाली. पण दुःखातिरेकानें तिला आपलें घरही

---

१: मूळ पाली गाथा अशी आहे—उभो पुत्ता कालकता । पन्थे मय्हं पती मतोऽति ॥

ओळखूं येईना. ती लोकांना दीनवाणें तोंड करून विचारावयास लागली, " कायहो ! अशा अशा नांवाचा श्रेष्ठि कोठें राहतो हो ! त्याचें घर कोठें आहे, तें दाखवतां कां हो ! "

लोकांनीं तिच्या विपन्नावस्थेबद्दल सहानुभूति न दाखवितां त्यांनीं तिला सांगितलें कीं, त्या कुटुंबाबद्दल आतां चौकशी करून फायदा नाहीं. त्यांची हवेली नुक्तीच वाऱ्याच्या तुफानांत सांपडली व जमीनदोस्त झाली. त्यांतील सर्व माणसें त्यांत सांपडलीं व चिरडून मेलीं ! "जा आतां पाहायला ! त्यापलीकडे जळणाऱ्या चितेवर तीं सर्व जळून खाक झालीं आहेत !" ह्या त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळें त्या आधींच वेड्या झालेल्या तरुणीवर फारच दारुण आघात झाला ! "काय सांगताहो तुम्हीं हें, "म्हणून तिचें वेड अधिकच वाढलें. त्या भरांत तिनें अंगावरचे कपडे पार फेंकून दिले व हात वर करून रडत रडत ती चितेजवळ गेली व मागील दोन ओळींस पुरवणी जोडून तिनें पुढील गाणें गाण्यास सुरवात केली:–

दोन्हि पुत्र ते मृत झाले
मार्गीं माझा पति मेला
आईबाप मम ते बंधू
एक चितेवरि ते जळती ॥ १ ॥[1]

अशा रीतीनें विलाप करीत, गात गात, ती श्रावस्तीच्या रस्त्यांतून चालली असतां तिला लोक कपडा देत, पण तो लगेच ती काढून टाकी व भिरकावून देई, व भटकत चालत असतां तिच्यामागें लोकांचा घोळका जाई. ज्या अर्थी ती अंगावर कोणतेंहि वस्त्र ठेवीना, त्याअर्थीं तिला लोक " **पटाचारा** " म्हणून लागले.

एक दिवस भगवान् गौतमबुद्ध बहुजनसमाजापुढें धर्मकथन करीत असतांना ती विहारांत शिरली व तेथील परिषदेच्या मागें उभी

---

१: पुरवणी गाथा अशी आहे,– " माता पिता च भाता च ।
एकचितकस्मिं डय्हरेऽति ॥

राहिली. बुद्धांनीं हें पाहून तिचें अंतरंग मैत्री भावनेनें[1] भरून टाकलें व मोठ्या प्रेमानें तिला सांगितलें. "भगिनी, शुद्धीवर या ! भगिनी, शुद्धीवर या ! ! " शास्त्यानें उच्चारलेले हे शब्द ऐकून ती अत्यंत लज्जायमान झाली, व उभ्या असलेल्या जागींच चोरून बसावयास लागली.[2] त्याबरोबर शेजारच्या एका माणसानें तिच्या अंगावर आपलें एक वस्त्र टाकलें; व तिनें तें परिधान करून शास्त्याचें धर्मकथन श्रवण केलें व शास्त्यानें धर्मपदांतील पुढील अर्थाची गाथा म्हटली:—

---

१: मैत्रीभावना,–( पाली–मेत्ता ) पालीवाङ्मयांत मैत्री याचा अर्थ अत्यंत व्यापक स्वरूपाचा आहे. उच्च प्रकारच्या ज्या चार स्थिति ( विहार ) बौद्धवाङ्मयांत वारंवार आढळतात, त्यांस " ब्रह्मविहार " असें नांव आहे. त्यांचीं नांवें, मेत्ता, करुणा, मुदिता, आणि उपेक्खा. मैत्रीभावना म्हणजे दुसऱ्याबद्दल आपल्या अन्तःकरणांत प्रेम ठेवणें तो आपला मित्र असो किंवा शत्रु असो, त्याबद्दल सर्वकाळ, सर्वत्र, संपूर्ण, विस्तृत प्रेम बाळगणें ह्याचें नांव मैत्री. मैत्रीभावनेच्या जोरावर गौतमबुद्धानें कित्येक अहंकारी, मत्सरी, दुष्ट, जाज्वल्य व उन्मत्त लोकांचीं मनें प्रेमानें भरून टाकलीं आहेत. ख्रिस्ती धर्मांतील Love व बुद्धाची मेत्ता यांत जरी पराकाष्ठेचें साम्य असलें, तरी त्याबरोबरच ख्रिस्तीधर्मांतील Love पेक्षां बौद्धधर्मांतील मेत्ता जास्त व्यापक व उदात्त स्वरूपाची आहे. पुढील भाषांतरावरून मैत्रीभावनेबद्दल कल्पना होईल.:–" सर्वप्राणी आनंदित होवोत, ते परस्परांना त्रास न देवोत, कोणीहि परस्परांचा अपमान न करोत, क्रोधानें आणि द्वेषबुद्धीनें परस्परांना दुःख देण्याची इच्छा न धरोत ! आई जशी एकुलत्या औरस पुत्राला आपलें आयुष्य खर्ची घालूनहि पाळते, त्याप्रमाणें सर्व प्राण्यांविषयीं अमर्याद प्रेम धरावें. सर्व लोकांविषयीं वर, खालीं, आणि चोहोंकडे, असंबाध, अवैर, असपत्न मैत्रीची भावना आपल्या मनांत वाढवावी " ( सुत्तनिपात-उरगवग्ग-मेत्तसुत्त–गाथा, ५, ६, ७. Burmese Edition. )

२: यानंतर धम्मपालस्थविरानें आपल्या " थेरीगाथा " या ग्रंथावरील " परमार्थदीपनी " नांवाच्या टीकेंत पटाचारीबद्दल जास्त माहिती दिली आहे. थेरीगाथा म्हणजे बुद्धभिक्षुणींनीं निरनिराळ्या प्रसंगीं गाइलेल्या गाथा. त्या गाथा संकलित स्वरूपांत ज्या ग्रंथांत आढळतात त्यास " थेरीगाथा " असें नांव आहे. त्या टीकेंत पुढें असें सांगितलें आहे कीं, पटाचारा भगवान् बुद्धाजवळ आपल्या दुःखाची कहाणी सांगू लागली, व अमुक कारणानें आपण दुःखी आहे, असें जेव्हां ती शास्त्यास म्हणाली, तेव्हां शास्त्यानें तिला सांगितलें कीं, जननमरणाच्या मागील संसारांतहि ती अशीच शोक करीत होती, तो

" अन्तकानें हल्ला केला असतां पुत्र किंवा पिता किंवा बंधू कोणीहि रक्षण करण्यास समर्थ नाहीं ज्ञातीच्या अंगीं रक्षण करण्याचें सामर्थ्य नाहीं.

" अशा रीतीनें अर्थ समजावून घेऊन शहाणे लोक शीलानें संवृत होत्साते निर्वाणाप्रत पोहोंचविणारा मार्ग विशुद्ध करून घेतात."

ती कथा ऐकल्याबरोबर उभी असतांच तिला स्रोतापत्ति फळांचा साक्षात्कार झाला.मग शास्त्याजवळ जाऊन त्यास वंदन करून प्रव्रज्येची ती याचना करूं लागली.त्यानें तीस अनुमति देऊन भिक्षुणीगृहाकडे जा व मग संघांत प्रवेश करा,म्हणून तिला सांगितलें. मग तिला उपसंपदा प्राप्त झाल्यावर लौकरच अर्हतत्व प्राप्त झालें व मग बुद्ध वचनाचें चांगलें अध्यन करून विनयामध्यें ती पारंगत झाली

---

शोक एवढा मोठा होता कीं, त्याच्यापुढें चारी समुद्रांचें पाणीहि कमीच टरेल. याकरितां विनाकारण शोककरून जीवित फुकट कां घालवावें ? असा त्यानें तीस उपदेश केला, व तिचें दुःख हलकें झालें. यानंतरची माहिती प्रस्तुतचरित्रांत दिल्याप्रमाणेंच आहे.

[ पहाः परमत्थदीपनी-Hevatarane Edition, Singhalese characters. पृष्ठें ८८ ते ९९.]

१ः मूळ गाथा अशा आहेतः- न सन्ति पुत्ता ताणाय, न पिता नाऽपि बन्धवा ।
अन्तकेनाधिपन्नस्स नत्थि ञातीसु ताणता ॥१॥
एतं अत्थवसं ञत्वा पण्डितो सीलं संवुतो ।
निब्बानगमनं मग्गं खिप्पमेव विसोधये ॥ २ ॥
( धम्मपद-P. T. S. Edition गाथानुक्रम नं. २८८, २८९ ).

२ः स्रोतापत्तिफल ( पाली-सोतापत्ति फल ). निर्वाणाप्रत जाण्याकरितां जो मार्ग आहेत त्यांत चार टप्पे आहे. पण पालीवाङ्मयांत त्यांस मार्ग ( मग्ग ) असें नांव आहे. हे चारमार्ग म्हणजे सोतापत्तिमग्ग, सकदागामिमग्ग, अनागामिमग्ग आणि अरहत्तमग्ग प्रत्येक मार्गाचें मार्ग व फल असे पुन्हा भाग पाडलेले आहेत; व अशारीतीनें एकंदर आठ भाग पडतात. स्रोतापत्तिमार्गस्थ स्रोतापत्तिफलस्थ ही एक जोडी; व अशाच रीतीनें दुसऱ्या तीन मार्गांच्या तीन जोड्या होतात. जे यापैकीं कोणत्याहि पायरीवर नाहींत; त्यांना पृथग्जन ( सामान्य लोक ) असें नांव आहे. सत्पुरुषदर्शनानें किंवा सद्धर्मश्रवणानें हि स्रोतापत्तिफलाचा लाभ होतो. जननमरणाच्या प्रवाहांत पडलेल्या प्राकृतजनापेक्षां असा मनुष्य एक पायरी श्रेष्ठ होय. पटाचारेस गौतमाचें दर्शन झालें, व सद्धर्मश्रवणाचा लाभ झाल्यामुळें तिला पहिल्या मार्गांतील फलाचा साक्षात्कार झाला, असें म्हटलें आहे.

एक दिवस जेतवनविहारांत उत्सव सुरू होता; व शास्ता आसनावर बसून भिक्षुणींना त्यांचें अनुरूप स्थान देत होता. जेव्हां पटाचारेची पाळी आली, तेव्हां त्यानें विनयधरामध्यें तिला अग्रस्थान दिलें! अशा रीतीनें पद्मोत्तर बुद्धाच्या काळीं ज्या स्थानाविषयीं तिनें उत्कटेच्छा धरली होती, तें स्थान शेवटीं तिला त्यावेळीं प्राप्त झालें! धर्मप्रसाराचे कामींहि पटाचारेची कामगिरी अपूर्व आहे, असेंच म्हणावें लागतें. ती उत्कृष्ट प्रकारची धर्मकथिका व संघनायिका होती. पटाचारेचें भाषण फार जोरदार व परिणामकारक असे. एके प्रसंगीं तिनें तीस भगिनींना फारच कळकळीचा उपदेश केला आहे. ती म्हणते, "मनुष्यें हातांत मुसळ घेऊन धान्य कांडतात,व कांडलेल्या धान्याच्या योगानें मुलाबाळांचें पोषण करितात, तसेंच धनहि प्राप्त करून घेतात.बुद्धशासनाप्रमाणें वागा! कारण त्याप्रमाणें वागाल तर अनुताप करण्याचा प्रसंग येणार नाहीं. लौकर पाय धुवा, व शुचिर्भूत होत्सात्या एकान्तांत जाऊन, अंतःकरण शान्त करून बुद्धोपदेशाप्रमाणें ध्यान करा!" याप्रमाणें उपदेश केल्याबरोबर त्या तीस भगिनींनीं त्याप्रमाणें केलें;व त्यांचें चित्त विमुक्त झालें[1]. त्याचप्रमाणें तिनें पुत्रशोकादिकांनीं गांजलेल्या ५०० मातांना आपल्या उज्ज्वल उपदेशानें शांति आणून दिली व त्यांना दीक्षा दिली. यावरून अर्हत्पदप्राप्तीनंतर तिनें लोकसंग्रहाचें काम केवढ्या आस्थेनें चालविलें होतें,याची कल्पना होते.[2]

---

१: पहा: "थेरव थेरीगाथा" (भिक्षु व भिक्षुणींनीं गाइलेल्या गाथा) P.T.S:- by Oldenberg and Pischel.-पटाचारा -पृष्ठ. १३५. गाथा ११७ते १२१.

२: पहा: सदरहु पुस्तक.-पञ्चशता पटाचारा.-पृष्ठें १३६-१३७ गाथा १२७ते१३२.

# रत्न ५ वें.

## धर्म--दिन्ना.

### ( १ )

### पूर्वबुद्धकालीन--चरित्र.

गौतम बुद्धाच्या भिक्षुणीवर्गांत धर्मकथा सांगण्यांत निष्णात अशी स्थविरा म्हणजे धर्मदिन्ना ही होय. इच्या पूर्वकालीन चरित्रास इतर भगिनींप्रमाणेंच भगवान् पद्मोत्तर बुद्धाच्या काळापासून आरंभ होतो. त्याचा अर्थ तिचा जन्म त्या शास्त्याच्या काळांत प्रथमच झाला, असा नव्हे. तर ज्यासंबंधांत धर्मदिन्ना गौतम बुद्धाच्या काळीं प्रख्यातीस आली, त्या संबंधाचा मूलारंभ पद्मोत्तर बुद्धाच्या काळांत झाला. म्हणून तिच्या चरित्राला आरंभ त्या बुद्धाच्या काळापासून झाला, असें आम्ही म्हटलें. नाहींतर जननमरणाच्या या चक्रांत सांपडून त्या बुद्धाच्या काळापूर्वींहि किती एक जन्म तिनें घेतले असले पाहिजेत. अस्तु. भगवान् पद्मोत्तर बुद्धाच्या काळीं ती एका दासीच्या जन्मास आली. हंसवती नगरींत तिचा जन्म झाला; व पद्मोत्तर बुद्धाच्या दोन अग्र श्रावकापैकीं सुजात नांवाच्या स्थविराची सेवा करून त्याच्या समोरच धर्मकथिकेचें महनीय स्थान आपणांस प्राप्त व्हावें,म्हणून तिनें उत्कटेच्छा दर्शविली. तदनंतर आपलें उरलेलें आयुष्य पुण्यकर्मे तत्परतेनें करण्यांत घालवून ती स्वर्गलोकांत पुनः जन्मास आली.

पुढें भगवान् फुस्साच्या[1] काळांत त्या शास्त्याच्या तीन सापत्न भावांनीं चालविलें एक दानगृह होतें; त्यावरील एका नोकराच्या घरांत ती राहूं लागली, त्या नोकराकडे आर्थिजनास दान देण्याचें काम असे. ही मोठी झाल्यावर तें काम तो हिलाच सांगावयास लागला; तेव्हां मागीलजन्मींच्या संस्कारामुळें म्हणा किंवा अन्यकारणानें म्हणा, ती दान देण्याच्या कामांत फारच औदार्य दाखवी. एखाद्या गरीबास जर एकपट दान कर, असें तिला सांगितलें तर ती दुप्पट करी! अशा तऱ्हेनें मोठ्या उदार मनानें सर्व दान करीत करीत देहावसानानंतर, नवे जन्म घेत घेत, ब्याण्णाव कल्पें लोटून गेलीं! व भगवान् काश्यप बुद्धाच्या[2] काळांत वाराणसी नगराचा अधिपति जो किकीराजा त्याच्या सप्तकन्यकांपैकीं एक कन्यका म्हणून ती जन्मास आली. त्यानंतर २०,००० वर्षेपर्यंत ब्रह्मचर्याचें आचरण करून, बुद्धाच्या भिक्षुसंघास एका विहाराचें दान करून एक बुद्धन्तरपर्यंत देव व मनुष्य लोकांत जन्म घेत घेत, भगवान् गौतम बुद्धाच्या काळीं एका कुलगृहांत तिनें जन्म घेतला व विवाह काळास योग्य झाल्या वेळीं राजगृह नगरांत विशाखश्रेष्ठीची सहधर्मचारिणी म्हणून त्याच्या गृहांत तिनें प्रवेश केला.

---

१: फुस्सः—भगवान् पद्मोत्तर बुद्ध च्यानंतर ८ वा बुद्ध म्हणजे फुस्स हा होय. त्याचे तीन श्रावकसमूह होते. त्याचें नगर काशी हें होतें. पित्याचें नांव जयसेन, श्रीमती हें आईचें नांव, सुरक्षित व धर्मसेन हे अग्रश्रावक, सभ्य हा उपस्थायक, चाला व उपचला या अग्रश्राविका, आमलक वृक्षाखालीं त्यास बुद्धत्व मिळालें, वगैरे माहिती या बुद्धासंबंधानें मिळते. (जातकट्ठकथा—निदानकथा— प्रो कोसंबीकृत देवनागरी पुस्तक.–पृष्ठें. ५२–५३§६८ ).

२: काश्यपबुद्ध–( पाली—कस्सपबुद्धो ) हा भगवानफुस्साच्या नंतरचा सहावा बुद्ध होय. त्याच्या काळांत ककुसंध. कोणागमन कस्सप आणि गोतम असे चार बुद्ध एकाच कल्पांत उत्पन्न झाले. कस्सपाचा एकच श्रावक समूह होता; त्यांत २०,००० भिक्षु होते. त्याचा जन्म वाराणसी नगरांत झाला; त्याचा पिता ब्रह्मदत्तब्राह्मण, धनवती ही माता, तिष्य व भारद्वाज हे अग्रश्रावक, सर्वमित्र हा उपस्थायक, अनुला व उरुवेला या अग्रश्राविका, न्यग्रोध वृक्षाखालीं त्यास ज्ञानप्राप्ति झाली वगैरे माहिती या बुद्धासंबंधानें सांपडते. ( निदानकथा— प्रो. कोसंबींचें पुस्तक. पृष्ठें ५५–५६§७०. )

## ( २ )

## गौतमबुद्धकालीन--चरित्र.

भगवान् गौतमानें सम्यक् सम्बुध्दत्वाचा साक्षात्कार करून घेतल्यानंतर तो कालेंकरून राजगृहास गेला. तेथील बिंबिसार राजानें त्याचा पुरस्कार केला. त्याच राजानें पूर्वी गौतमास संसारास रामराम न ठोकण्याविषयीं हरप्रयत्न करून पाहिला होता; पण गौतमानें आपला निश्चय कायम ठेविला होता. आतां बिंबिसार राजानें जेव्हां गौतमाचें सुप्रसन्न मुख व त्याची अत्याजमनोहर शांति ही पाहिली, तेव्हां त्या गुरूच्या चरणीं तो विलीन झाला व त्यानें त्या गुरूचें उपासकत्व पत्करिलें आपल्या नगराजवळील वेलुवन नांवाचें उद्यान शास्त्याच्या भिक्षुसंघास दान केलें. त्या काळीं राजाबरोबरच त्याच्या अत्यंत जीवलग मित्रांपैकीं जे बुद्धास शरण गेले, त्यांत विशाखश्रेष्ठि हा एक होता. विशाखानें दशबलास शरण जाऊन जेव्हां त्याच्या धर्मश्रवणाचा लाभ घेतला, तेव्हां त्यास स्रोतापत्ति फळाचा[1] साक्षात्कार झाला व पुढील मार्ग त्याच अप्रमत्ततेनें आक्रमित आक्रमित त्याला अनागामि फलाचीहि[2] प्राप्ति झाली. अशा श्रद्धावान् उपासकाची सहधर्मचारिणी होण्याचें भाग्य धर्मदिन्नेस लाधलें होतें. ति-

---

१: स्रोतापत्तिः ( पाली--सोतापत्ति ) संसाराच्या प्रवाहांत पडलेला मनुष्य. स्रोतापत्ति हा ४ ईश्वप्राप्तीच्या मार्गातील पहिला टप्पा आहे. बौद्धधर्मोप्रमाणें मानवाच्या उन्नतिपंथांत आडवीं येणारीं अशीं दहा संयोजनें आहेत. त्यापैकीं पहिल्या पांच संयोजनांशीं प्रस्तुत कर्तव्य आहे. त्यास पालीभाषेंत "ओरंभागिय" असें नांव आहे. तीं म्हटलीं म्हणजे, सक्कायदिट्ठि, विचिकिच्छा, सीलब्बतप्परामास, कामराग व पटिघ हीं होत. जीवात्मा आहे असें मानणें, संशय, शील व व्रतें यांवर विश्वास, काम व कोप असे त्याचे अनुक्रमें विशेषअर्थ आहेत. आतां ह्यापैकीं **पहिलीं तीन** संयोजनें नाहींतशीं झालीं म्हणजे मनुष्य स्रोतापन्न होतो.

२: अनागामि फल--अनागामि मार्ग हा तिसरा टप्पा आहे. स्रोतापन्नानंतर मनुष्य सकृदागामि होतो, व त्यानंतर अनागामि होतो. अनागामि मार्गांत मनुष्य गेला म्हणजे पहिलीं पांच संयोजनें नाहींतशीं होतात. या मार्गावर असतांना फलाचा साक्षात्कार झाला म्हणजे त्या माणसाला पुन्हा या जगतीतलावर पुनर्जन्म घ्यावा लागत नाहीं: ( न+आगामि ). अर्हत्पद त्यास मिळणारच. सकृदागामि मात्र एकदांच ( सकृत् ) जन्म घेतो. व पुढें त्यास अर्हत्पद प्राप्त होतें.

च्या सुदैवानें तिचा पति जैसा श्रद्धाळू व भक्तिनम्र अन्तकरणाचा होता, तसाच तो प्रेमीही होता. धर्मदिन्नेचें व विशाखाचें प्रेम अपूर्व होतें. त्या पतिपत्नींची हृदयें प्रेमरज्जूनें निगडित झालेलीं होतीं. आपल्या पतीस प्रिय अशी गोष्ट करण्याशिवाय धर्मदिन्नेला दुसरा छंदच राहिला नाहीं. पति बाहेर गेला म्हणजे तो घरीं परत येतो केव्हां आणि आपण त्यास भेटावयास जातों केव्हां, असें तिला होई; परंतु अद्याप मात्र तिला बुद्धाचा अनुग्रह किंवा त्याचें दर्शन झालेलें नव्हतें. विशाखानें आपल्या पत्नीच्या मनावर बुद्धाची भक्ति करण्याचा बोजा घातला नाहीं. त्याची अशी समजूत होती कीं, आपल्या पत्नीची जेव्हां आपोआप खात्री होईल, व जेव्हां तिला गौतमाच्या अपूर्वतेचें सम्यक्ज्ञान होईल, तेव्हां ती आपण होऊनच गौतमाच्या दर्शनास नेण्याविषयीं आपणास विनंति करील. विशाखानें आपल्या पत्नीस पूर्ण स्वातंत्र्य दिलें असल्यामुळें, तिनेंही त्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला नाहीं. विशाखाच्या मनावर मात्र गौतमाच्या धर्मशिक्षणाचा परिणाम हळू हळू व्हावयास लागला होता. आपल्या पत्नीच्या दिव्य प्रेमाचें त्यास अलीकडे विशेष कांहीं वाटेनासें झालें होतें. जसजशी अध्यात्मिक उन्नतीची एकेक पायरी तो चढून जावयास लागला, तसतसा संसाराच्या बंधनांनीं तो कमी कमी बध्द होऊं लागला. तथापि आपल्या प्रेमळ पत्नीस त्यानें न दुखविण्याचा शक्य तेवढा प्रयत्न चालविला होता. अशा स्थितींत त्याला अनागामि फळाची प्राप्ति मिळण्याजोगी त्याची मनोभूमिका तयार झाली.

एक दिवस सायंकाळची गोष्ट. धर्मदिन्ना घरच्या कामांत अगदीं गर्क असल्यामुळें तो दिवस कसा गेला, हें सुद्धां तिला कळलें नाहीं. दिवस तर गेला. तेव्हां आतां आपला पति परत येईल म्हणून नित्य नियमाप्रमाणें जिन्याच्या पहिल्या पायरीपाशीं ती उभी राहण्यास गेली. दिवसभर काम करवून घेण्याच्या श्रमानें अगोदरच ती श्रांत दिसत होती. त्यांत आज तिला कसेंसेंच वाटत होतें. कां वाटत होतें, हें तिला समजेना! पण वाटत होतें खास! तिनें खिडकींतून आपल्या पतीस पाहिलें, व त्याबरोबर ती मोठ्या उत्साहानें जिन्याच्या पहिल्या पायरीशीं जिन्याच्या कठड्यावर एक हात सोडून उभी राहिली. रोजच्या

पद्धतीप्रमाणें नवरा वर येईल व आपण खालीं सोडलेला हात त्यानें हातांत घेत-ला म्हणजे आपण त्याला वर ओढून घेऊं,अशा मनोराज्यांत ती गर्क होती! पण ,तिच्या मनाप्रमाणें त्या दिवशीं व्हावयाचें नव्हतें ! विशाखश्रेष्ठि जो थेट आला तो झपाझप पायऱ्या चढून वर गेला ! मग त्याचें लक्ष उभ्या असलेल्या धर्मदिन्नेकडे गेलेंच नाहीं किंवा तिजकडे त्यानें मुद्दामच दुर्लक्ष केलें, हें सांगतां येणार नाहीं. त्याचें मन आज असल्या ऐहिक गोष्टी-कडे नव्हतें. हें खास! त्यास अनागामिफलाची नुकतीच प्राप्ति झाली होती ! धर्मदिन्नेच्या मनोरथाचा अशा रीतीनें भग झाला ! तिच्या अगोदरच श्रान्त झालेल्या हृदयास ही मोठीच जखम झाली! तथापि त्याहि परिस्थितींत तिनें आपल्या मनाचें समाधान करण्याचा प्रयत्न केला; व तशीच ती पाकगृहांत गेली. तिनें आपल्या पतीच्या भोजनाची व्यवस्था केली व ती त्याच्या आगमनाची वाट पाहूं लागली. थोडक्याच वेळांत विशाखश्रेष्ठि तेथें आला; तरी काय? त्याचा नेहमींचा आनंदी स्वभाव आज दिसत नव्हता. रोजची विनोद करण्याची चर्या आज तेथें नव्हती ! तो मुकाट्यानें जेवावयास बसला व जेवण चाललें असतांनाहि 'अमुक वाढ' किंवा 'अमूक जिन्नस नको,' म्हणून चकारशब्द नाहीं ! धर्मदिन्नेनें हातांत वाढावयास घेतलें होतें व ती वाढीत होती. पण आतां मात्र तिच्यानें स्वस्थ बसवेना. मोठ्या प्रयत्नानें तिनें अन्न वाढलें; व आपल्या पतीचें भोजन उरकलें, हें पाहून ती त्याच्या समोर विद्ध चर्येनें उभी राहिली, "महाराज, माझ्या हातून आज असा अपराध तरी कोणता घडला?" "तुझ्या हातून कोणताहि अपराध घडला नाहीं," श्रेष्ठीनें शांतपणानें उत्तर दिलें. "पण आजपासून मात्र आपलें प्रेममय जीवित बंद झालें ! आपण एकत्र बसणें व आपण एकत्र उठणें ह्याचें नांवच नको. जेव्हां जेव्हां तूं मोठ्या प्रेमानें मला कांहीं खावयास घेऊन यावेंस, तेव्हां तेव्हां तें मी बिनतक्रार—तुझा हुकूम म्हणून खावें हें तर आतां स्वप्नांत सुद्धां नको!" ह्या एकेक वाक्याचा जणूं काय तिच्यावर वज्राघातच होत होता ! हे आपल्या पतीचे शब्द तिच्या कर्णविवरांतून भयंकर वेदना उत्पन्न करीत चालले होते! तिच्या तोंडा-तून एकहि शब्द बाहेर पडत नव्हता. तिनें मोठ्या प्रयत्नानें शांतता राखली होती; पण श्रेष्ठीला त्याचें काय? तो पुढें बोलूं लागला, "अशा

रीतीनें जर तुझी राहण्याची इच्छा असेल, तर माझें घर तुला मोकळें आहे. जर आपल्या पित्याच्या घरीं जावयाची तुझी इच्छा असेल, तरीहि माझी ना नाहीं. जितकें लागेल तितकें द्रव्य घे, अलंकार घे, व आपल्या घरीं खुशाल चा." आतां मात्र हद्द झाली ! धर्मदिन्नेच्या सहनशीलतेची परमावधि झाली. तिच्यानें हे शब्द सोसवेनात. तिच्या हृदयांत विलक्षण आवेश उत्पन्न झाला. सतीचा सात्त्विक कोप उद्भूत झाला. ती म्हणाली, "महाराज, आपण काय बोलतां आहां व कोणास बोलत आहां? जीवर आपलें एवढें प्रेम होतें, तिलाच उद्देशून आपण बोलत आहात काय ? आजपर्यंत मी सौख्याच्या शिखरावर आरूढ झालें होतें; पतिपत्नीच्या दिव्य प्रेमाचा आस्वाद घेत होतें. पण तें असो ! आपली जशी इच्छा तसे. आपण जे कुत्र्याच्या तोंडावर टाकल्याप्रमाणें जिन्नस व वित्त नेण्याविषयीं मला सांगत आहांत, तेंहि मी नेणार नाहीं; व येथें राहणारहि नाहीं. एखाद्या गुलामाप्रमाणें येथें राहणार नाहीं किंवा अपराधानें भ्रष्ट झालेल्या कैद्याप्रमाणें घरींहि जाणार नाहीं. या जगास रामराम ठोकण्याची मला परवानगी द्या, एवढेंच माझें आपणास मागणें आहे. गृहामध्यें राहून गृहिणीच्या स्पृहणीय पदावर इतउप्पर आरूढ होण्याची माझी इच्छा नाहीं. मी संसाराचा त्याग करणार ! मला अनुमति द्या !! "

विशाखश्रेष्ठीनें 'बरें तर' म्हणून म्हटलें व एक सुवर्णशिबिका आणविली, व भिक्षुणी-गृहाकडे तिची रवानगी करून दिली. धर्मदिन्नेची ऐहिक वस्तूंविषयींची आसक्ति जन्मजन्मांतरींच्या कुशलकर्मांनीं व परिणतीनें बरीच नाहींशी झाली होती व तिचा भिक्षुणीसंघात प्रवेश झाला. परंतु झालेला हा प्रकार इतक्या अकल्पितरीतीनें घडून आला होता कीं, तिच्या मनांतून तो एकदम जाणें अशक्य होतें ! वारंवार तिच्या डोळ्यापुढें मागील वर्षांचा एवढा मोठा चित्रपट एकसारखा चालत असे. तिच्या अंगावर भिक्षुणीचें चीवर होतें, पण तिचें अतरंग मात्र अद्याप प्रेमळ तरुणीचेंच होतें! ती म्हणाली, " खरोखर या श्रेष्ठीनें जगतांत राहूनच गृहस्थाश्रमांत दुःखाचा अंत करून घेतला आहे. पण प्रव्रज्या घेतल्यापासून माझे विचार मात्र जास्त ऐहिकच बनत चालले आहेत. व दुःखाचा अन्त करून घेण्याचेऐवजीं मी दुःखांत जास्त गुरफटत मात्र चाललें आहे. हें कांहीं चांगलें नाहीं.

आतां मला दुःखाचा अंत करून घेतलाच पाहिजे. नवीन मार्गांत प्रवेश केल्यावर माझा मागील आश्रमांतील संबंधच तुटला! आतां पुढचा मार्ग आक्रमण केला पाहिजे. म्हणून ती आपल्या भिक्षुणी-आचार्य व भिक्षुणी--उपाध्यायांकडे गेली व त्यांना नम्रपणें म्हणाली, "आर्या, या गर्दीच्या ठिकाणीं माझें चित्त लागत नाहीं. कोठें तरी शांत व एकांत स्थळीं जावें असें मला वाटतें. ग्रामवासास चलाल तर माझ्यावर मोठे उपकार होतील."

त्यांनींहि असा विचार केला कीं, मोठ्याच्या कुलांतून प्रव्रज्या घेऊन भिक्षुणी झालेली ही स्त्री. तिच्या चित्तास त्रास होईल, असें तरी कां करावें? हिला कोठें तरी शांत अशा स्थळीं घेऊन जावें हेंच बरें." तिला घेऊन एका निर्जन व नितांत रमणीय अशा स्थळीं घेऊन गेल्या. ध्यानप्राप्तीच्या मार्गांत शब्द किंवा मोठा आवाज हा कंटकसदृश आहे. धर्मदिन्नेस त्या प्रशांत, एकांत, व सृष्टिरमणीय अशा स्थळीं पुष्कळच आनंद झाला. अगोदरच गतजन्मांत ती संस्कारांचे

१: भिक्षुणी–आचार्य व भिक्षुणी–उपाध्याय:– (पाली–आचरिय व उपज्झाय) संघांत प्रवेश करतांना प्रथम उपाध्यायाची गरज भासते. त्या उपाध्यायानें संघांत प्रवेश करणारास मदत करावयाची असते, त्यास संघाच्या पुढें हजर करावयाचें असतें व संघाकडून त्यास प्रव्रज्या मिळवून द्यावयाची असते. उपाध्यायाच्या या उपकाराबद्दल त्या प्रव्रजितानें आपल्या उपाध्यायापाशीं संघांत राहिलें पाहिजे अशा रीतीनें आपल्या उपाध्यायाजवळ राहिलेल्या प्रव्रजितास "सद्धिविहारिक" असें म्हणतात. याशिवाय दुसरेंहि एक नातें संघांत प्रविष्ट झाल्यावर निर्माण होतें. जरी उपाध्यायानें सद्धिविहारिकाचा संघांत प्रवेश करून दिलेला असतो, तरी बुद्धशासनाचा अभ्यास करण्यासाठीं त्या नूतन शिष्यास संघांतच एक गुरु गांठावा लागतो, व त्याच्या हाताखालीं अभ्यास करावा लागतो त्या गुरूस आचार्य ही संज्ञा आहे; अशारीतीनें गुरूच्या हाताखालीं शिकत असलेल्या शिष्यास 'अन्तेवासिक' असें नांव आहे. गुरूच्या घरीं १२ वर्षें अध्ययनास जावयाचें ही जी गुरुकुलाची जुनी कल्पना त्यांत गौतमानें फरक करून गुरूंनाच संघांत आणवून संघांत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आधुनिक Jesuit Collegeच्या धर्तीवर कशी केली होती. हें पाहण्यासारखें आहे. संघांत बापाची जागा उपाध्यायानें, व गुरूची जागा आचार्यानें घेतली होती. महावग्गांतील महाक्खन्धांत उपाध्याय, आचार्य, सद्धिविहारिक, अन्तेवासिक, व त्यांची एकमेकांविषयींची कर्तव्यें यांचा विस्तार केलेला आहे.

दमन करण्यास शिकली होती; व ध्यानाच्या जोरावर लवकरच तिला पाटिसंभिधांचा साक्षात्कार झाला, व त्यावरोबरच तिला अर्हत्प्राप्ति झाली. ती कर्तव्यांतून पार पडली. इतर अन्य जन्मापासून ती मुक्त झाली. ब्रम्हचर्याचें योग्य आचरण तिच्या हातून झालें व या जगती-तलावर तिला मनुष्यत्व किंवा दुसरी कोणचीहि योनि प्राप्त होण्याचा संभव राहिला नाहीं. तिनें विचार केला, 'माझें कार्य परिपूर्ण झालें! आतां येथें राहून काय फायदा! आतां राजगृहास जावें हेंच चांगलें, तेथें मी जाऊन पुष्कळशा माझ्या ज्ञातिबांधवांस पुण्यकर्मे करावयास तरी लावूं शकेन." असा विचार करून ती स्थविराद्वयांस बरोबर घेऊन माघारी आली.

विशाखश्रेष्ठीस ही बातमी समजली. त्याबरोबर,ही इतक्या लौकर कां आली असावी, याचा तो विचार करावयास लागला! "भिक्षुणी-च्या जिवनक्रमाला ती कंटाळली तर नसेल ना? पाहूं एकदां. आपण तेथें गेलेंच पाहिजे" असें म्हणून तो एकदिवस सायंकाळीं विहारांत धर्मदिन्नेकडे गेला व तिला अभिवादन करून एका बाजूस जाऊन बसला. एकदमच मनांत असलेल्या प्रश्नास सुरवात करणें बरें नव्हे, म्हणून त्यानें प्रथम तीस पंचस्कंधा[1] सारखे तत्वज्ञानासंबंधीं प्रश्न विचारण्यास सुरवात केली.एखादा मनुष्य खड्गानें कमळनाळें ज्याप्रमाणें छेदून टाकतो,त्याप्रमाणें धर्मदिन्नेनें त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें विचारतां विचारतांच द्यावयास सुरवात केली. ती अगदीं बेफिकिरपणानें न कचरतांच उत्तरें देत आहे, असें जेव्हां उपासक श्रेष्ठीनें पाहिलें, तेव्हां त्यानेंहि आपणास प्राप्त झालेल्या

---

१: पञ्चस्कन्ध (पाली—पञ्चक्खन्ध) बौद्धतत्वज्ञानाच्या समजुतीप्रमाणें सर्व पदार्थांचा उद्गम पञ्चस्कन्धांनीं झालेला आहे. पदार्थांचा जन्मच, जेव्हां पांच स्कन्ध एकत्र मिळतात तेव्हां होतो, व हे विभक्त झाले म्हणजे तो पदार्थ नाहींसा होतो. सर्व लोकांतील प्राणी सुद्धां पञ्चस्कन्धान्वित असतात. मरणोत्तर, कर्माच्या जोरावर नवीन स्कन्ध निर्माण होतात व प्रतिसन्धि ( जन्म ) प्राप्त होते. हे पांच स्कन्ध म्हणजे रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान हे होत. कर्माच्या योगानें कर्म व स्कन्धसमूह यांची चूकभूल न होतां एकाच विशिष्ट नांवाच्या प्राण्याच्या जननमरणाचा संसार अव्याहत चालतो. ह्याचमुळें आत्मा मानण्याचें कारण नाहीं, असें बौद्ध लोक म्हणतात.

तीन मार्गासंबंधानेंच ओळीओळीनें तिला प्रश्न विचारण्यास सुरवात केली. ते प्रश्नही स्थूलस्वरूपाचेच नसून सूक्ष्म दृष्टीनें विचार करणारा-सच कळण्यासारखे होते अशा रीतीनें तीन मार्गांतरगत सर्व प्रश्न खुलास करून चवथ्या मार्गा संबंधानेंहि प्रश्न करण्यास तो उत्सुक झाला. उपासक-श्रेष्ठि अनागामि झाला होता, हें धर्मदिन्नेस ठाऊक होतें; म्हणून तिस-न्या मार्गापर्यंतचे प्रश्न तिनें त्याला विचारूं दिले, व त्यांचीं उत्तरेंहि तिनें भराभर दिलीं व तीं त्यांस समजलीं. पण यापुढें मात्र तो आपल्या मर्या-देचा अतिक्रम करीत आहे, असें पाहून तिनें त्यास थांबविलें व ती त्यास म्हणाली, "आयुष्मन् विशाख, आपल्या ज्ञानेंद्रियांना अगोचर अशा विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें तुम्हांस समजणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ, निर्वाणाचा प्रश्न, ब्रह्मचर्याचीं कर्तव्यें कोणतीं याविषयींचा प्रश्न, निर्वाणाच्या अन्त्यसुखाचा प्रश्न व निर्वाणपर्यवसानान्तरगत प्रश्न या सर्वांचें आकलन करणें तुम्हांस कठीण आहे; आणि त्यांतूनहि जर त्यांचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची तुमची इच्छा असेल, तर तुम्ही भगवान् बुद्धाकडे जा व यासंबंधीं त्यांना प्रश्न करा. तुम्हाला त्यांच्याकडून जें ज्ञान प्राप्त होईल, तेंच चित्तांत सांठवा." विशाखश्रेष्ठि भगवंताकडे गेला व भिक्षूणीशी त्याचीं जीं प्रश्नोत्तरें झालीं होतीं, तीं सर्व त्यानें त्यांच्या कानांवर घातलीं. तें सर्व ऐकून घेऊन ते ह्मणाले, " माझ्या मुलीच्या मनांत वर्तमान, भूत किंवा भविष्यत्कालच्या स्कन्धांविषयींची तृष्णा नाहीं." असें म्हणून त्याच्याच समर्थनार्थ धर्मपदांतील पुढील गाथा त्यांनीं ह्मटली.:—

" ज्यास भविष्य किंवा भूत किंवा विद्यमान कालीं कोणतेंहि (बंधनकारक) असें आत्मीयत्वच नाहीं, त्यासच अकिंचन म्हणतां येईल. जो अशा अर्थानें अकिंचन व निरासक्त आहे, त्यालाच मी ब्राह्मण ह्मणतों "[1]

असें ह्मणून शास्त्यानें धर्मदिन्नेस साधुवाद दिले. तो विशाखास ह्मणाला, "उपासका, भिक्षुणी धर्मदिन्ना मोठी पंडित आहे व

---

१: मूळगाथा अशी आहे:–

यस्स पुरे च पच्छा च मज्झे च नत्थि किञ्चनं ।
अकिञ्चनं अनादानं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ॥
(धम्मपद–P. T. S.–गाथानुक्रम नंबर ४२१)

महाप्रज्ञावती आहे. तूं जर मला हे प्रश्न विचारले असतेस, तर धर्मदिन्नेनें ज्याप्रमाणें त्यांचीं उत्तरें दिलीं, तशींच मीहि तुला दिलीं असतीं. तिनें जो अर्थ सांगितला, तोच खरा अर्थ आहे व तोच तूं ध्यानांत ठेव."

पुढें एक दिवस जेतवनामध्यें शास्ता बसला होता. भिक्षूणीसंघहि जमला होता. व त्या संघांत निरनिराळ्या भिक्षूणींचा दर्जा तो ठरवित होता. त्यावेळीं त्यानें ह्याच वर सांगितलेल्या चूळवेदल्लाचा[1] अनुवाद करून धर्मदिन्ना स्थविरेस या शासनाच्या वीथिकेंत कथिकांच्या वर्गांत अग्रस्थान दिलें व अशा रीतीनें तिची दीर्घकाळापासूनची उत्कटेच्छा सफल झाली.[2]

---

१: चूळवेदल्ल-वेदल्ल याचा अर्थ बुद्धघोषाचार्यांनी " वेदं च तुट्ठिं च लद्धा पुच्छितसुत्तन्ता ", असा केला आहे. ज्या सूत्रांत विचारलेल्या प्रश्नांच्या सुंदर व समाधानकारक व्याख्यानामुळें संतोष होतो तें वेदल्ल होय. पाली वाङ्मय त्रिपिटकांच्या स्वरूपांत येण्यापूर्वी तें नवांग स्वरूपांत असावें असें वाटतें. तीं नऊ अंगें अशीं:- सुत्त, गेय्य, वेय्याकरण, गाथा, उदान, इतिवुत्तक, जातक, अब्भुतधम्म आणि वेदल्ल. चूळ म्हणजे लहान, वेदल्ल म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें असणारें सूत्र. हें चूळवेदल्ल सुत्त मज्झिमनिकायांतील मूलपण्णासकांत आहे. त्या सूत्रांत विशाखश्रेष्ठीनें धर्मदिन्नेस निरनिराळे प्रश्न विचारून तिच्याकडून त्यांचीं उत्तरें मिळविलेलीं आहेत. जीवात्मा आहे कीं नाहीं, जीवात्म्याची समज कशी उत्पन्न होते, आर्य अष्टांगिक मार्ग कोणता, संस्कार म्हणजे काय, वेदना म्हणजे काय, वगैरे अत्यन्त कठीण प्रश्न श्रेष्ठीनें धर्मदिन्नेस विचारलेले आहेत. ( मज्झिमनिकाय–राजवाडेकृत देवनागरी पुस्तक–सुत्त ४४ ).

२: धर्मदिन्ना ही संघांतील अत्यन्त प्रमुख अशी भिक्षुणी होती, असें थेरी गाथेवरून सिद्ध होतें. धर्मकथिका म्हणून तर ती प्रख्यात होतीच. आपल्या सुंदर धर्मव्याख्यानांनीं तिनें कित्येकांचीं मनें आकर्षण करून घेतलीं होतीं. तिनें आपल्या कित्येक भगिनींना धर्मकथा सांगण्यांत निष्णात केलें होतें. तिच्या अनुयायांपैकीं एक अत्यंत उज्वल उदाहरण म्हणजे शुक्रे होय. ती धर्मदिन्नेची शिष्या होय. एक दिवस शुक्रेनें राजगृहांतील एका समाजापुढें अत्यन्त सुश्राव्य असें व्याख्यान दिलें; तें सर्वांनीं सावधान चित्तानें व एकतानतेनें ऐकलें. धर्मदिन्नेची दुसरी शिष्या म्हणजे वड्ढेसी. देवदहनगरांतील भिक्षुणीसंघाची ती नायिका होती. अशारीतीनें धर्मदिन्नेनें लोकसंग्रहाचें काम उत्तमरीतीनें चालविलें होतें. ( Psalms of the Sisters-P. T. S. Mrs. Rhys Davids—Pages, 16, 40 and 50 ).

# रत्न ६ वें.

## नन्दा ( सुंदरी-नन्दा. )

### ( १ )

### पूर्वबुद्धकालीन-चरित्र.

गौतमबुद्धाच्या भिक्षुवर्गांत ध्यानाभिरत असे पुष्कळ स्थविर झालेले आहेत, व त्यांची त्यानें पुष्कळ ठिकाणीं स्तुतीहि केलेली आहे. ध्यान करणें हें फार अवघड कार्य आहे. गौतमाच्या धर्माचा मुख्य भर मनावर असल्यामुळें[1] मनाची एकाग्रता घडवून आणण्यास समाधिसारखें दुसरें साधन नाहीं, असें त्याचें मत होतें. म्हणून सर्वसाधारण शीलांमध्यें पारंगतता मिळाली म्हणजे बौद्धभिक्षु हे समाधीची दुसरी पायरी चढण्यास सुरवात करीत व त्या समाधीची परिपूर्णताहि निरनिराळीं ध्यानें लावूनच करून घेतां येते. स्त्रिया जेव्हां संघांत प्रवेश करूं लागल्या व अशा रीतीनें भिक्षुणीसंघ जेव्हां बुद्धानें स्थापन केला. तेव्हां प्रथम प्रथम स्त्रियांचे मुख्य कर्तव्य म्हणजे निरनि-

---

१: बौद्धांच्या वाङ्मयांत मनाचें महत्व फार आहे. विश्वांतील मूलभूत पदार्थ कोणते यासंबंधानें बौद्धांनीं विचार केला आहे; त्यांत पहिलें स्थळ " चित्त " या पदार्थाला दिलेलें आहे. चित्त व मन हे दोन्ही शब्द समानार्थक आहे. "अभिधम्मत्थसंगह" या पुस्तकांत चित्ताचा विस्तार केला आहे. धम्मपदांतील पहिली गाथा चित्ताच्या महत्वासंबंधानें आहे. जगतांतील सर्व गोष्टी ( धर्म ) मनावरच अवलंबून आहेत, मनानेंच श्रेष्ठ आहेत; आणि मनोमयच आहेत; याप्रमाणें मनाचें महत्व व स्तुति गाइलेली आहे. " मनोपुब्बंगमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया, " ही धम्मपदांतील पहिली ओळ आहे.

राळे आठ गुरुधर्म[1] पाळणें हेंच होतें. पापापासून विरती जेणें करून साध्य होईल अशा प्रकारचें शील पाळणें, हेंच पाहिल्याप्रथम भिक्षुणींचें उच्चतम कर्तव्य होऊन बसलें. पण स्त्रियांतहि अत्यन्त करारी व खडतर व्रतें चालविणाऱ्या भिक्षुणी होत्या. त्यांनीं बुद्धाच्या अनुशासनाप्रमाणें वागून ध्यानांतहि प्रगति मिळविली व अशा ध्यानाभिरत भिक्षुणींपैकीं नन्दा ही प्रमुख होय.

हिचा पूर्वकालीनचा प्रथम उल्लेख पद्मोत्तर बुद्धाच्या काळापासूनच होतो. हंसवती नगरींत एका कुलगृहात तिचा जन्म झाला होता. इतर आपल्या भगिनींप्रमाणें तीहि पद्मोत्तर बुद्धाच्या धर्मश्रवणास गेली होती; व त्यायोगानें तिच्या अंतःकरणांत धर्मप्रकाश पडला होता. तिनें बुद्धाच्या शिष्यांचाही परामर्ष घेतला होता. एक दिवस ती बुद्धाकडे गेली असतां शास्त्यानें आपल्या भिक्षुणीसंघापैकीं एका भिक्षुणीस ध्यानाभिरत भिक्षुणींत अग्रस्थान दिलें,हें तिनें पाहिलें.तेव्हां आपणासहि तें अत्यन्त लोभनीय पद प्राप्त व्हावें,अशी उत्कटेच्छा तिनें बुद्धासमोरच प्रार्थित केली. त्यानंतर उरलेलें आयुष्य त्या स्थानास योग्य होण्याकरिता अनुकूल अशाचगोष्टी करण्यात-म्हणजे शीलांचे परिपालन करण्यांत,उपोसथ पाळण्यांत दान करण्यांत वगैरे घालवून तिचें पर्यवासन झालें.त्यानंतर हजार कल्पपर्यंत तिनें निरनिराळे जन्म घेतले.कधीं देवलोकांत तर कधीं मनुष्यलोकांत ती जन्म घेत होती, व त्या सर्व जन्मांचा परिणाम म्हणजे तिची उन्नति होणें हा होय. एका जन्मांत मनुष्याची परिणति होणें शक्य नाहीं. मनु-

---

१: अट्ठगरुधम्मा:–भिक्षूंच्या बाबतींत जसे चार पाराजिक म्हणजे अत्यन्त भयंकर स्वरुपाचे गुन्हे आहेत, त्याप्रमाणें भिक्षुणींच्याहि बाबतींत आठ गुन्हे सांगितलेले आहेत. " भिक्षुणी प्रातिमोक्ष " नांवाच्या पुस्तकांत हे आठ नियम दिलेले आहेत. गरुधम्म मोठे नियम. अर्थात् भिक्षुणी व भिक्षु एकत्र आल्याकारणानें जे गुन्हे सहज होण्याचा संभव आहे, ते टाळण्याकरितां या नियमांचा उल्लेख आहे. भिक्षुणींनीं आपलें चित्त कामविकारांनीं बिल्कुल विचलित होऊं देतां कामां नये. मैथुनादि व्यभिचाराचा यत्किंचित् जरी अपराध घडला, तरी त्या भिक्षुणींस संघांतून घालवून देत असत विशेष विस्तारासाठीं " भिक्खुणी पातिमोक्ख "–Burmese Edition–पृष्ठें ३१ व ३२ पहा.

त्याचा नाथ म्हणजे मनुष्य स्वतःच होय.[1] उत्कटेच्छेचा जोर हाच उन्नतीस प्रारंभ व त्याची परिणति होण्यासाठीं त्यास जन्म घेतले पाहिजे. बौद्धधर्मांतील हें उत्क्रांतीचें तत्व अत्यन्त महत्वाचें आहे. अस्तु. अशा रीतीनें जन्म घेत घेत, नन्दा ही गौतमबुध्दाच्या जन्माच्या अगोदर, प्रजापतीच्या उदरीं जन्मास आली. तिचें नांव नन्दा असें ठेविलें होतें. तिला रूपनन्दा असेंहि म्हणत असत. महाप्रजापति गौतमी ही कोण, हें आतां वाचकांस ठाऊक झालेंच आहे. तिची ती कन्यका होती. एवढें सांगितल्यावर तिचें पाहिलें आयुष्य कसें गेलें असलें पाहिजे, तिचें संगोपन कसें झालें असलें पाहिजे, तिला सर्व सुखें कशीं अनकूल असलीं पाहिजेत, व रूपांमध्यें आनंद मानण्याची तिची प्रवृत्ति होण्यास कोणतीं कारणें झालीं असलीं पाहिजेत, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. ती अत्यन्त रूपवती होती. त्यामुळेंच तिला लोक " जनपदकल्याणी ( देशाची रमणी ) असें म्हणत असत.

## ( २ )

## गौतमबुध्दकालीन–चरित्र

सुंदरीनन्दा अशा प्रकारच्या अनुपमेय सौंदर्याचा उपभोग घेत होती. जें जें सर्व सुंदर, नूतन, प्रफुल्लित, नयनमनोहर व वनश्रीचें लाडकें त्या त्या सर्वांमध्यें आनंद मानीत होती. पण शाक्यांच्या घरांत त्याच वेळीं सिद्धार्थाच्या निष्क्रमणानें केवढा हाःहाःकार उडून गेला

१: आत्मोद्धाराचें तत्व बौद्धधर्मांत जास्त स्पष्टपणानें आढळून येतें. बौद्धांच्या काळीं परमेश्वराच्या शक्तीवर पूर्ण भरंवसा ठेऊन स्वावलंबनाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति वाढत चालली असावी, असेंच दिसतें, मनुष्यानें आत्मोन्नति व आत्मोद्धार प्राप्त करून घेण्याकरितां यज्ञयागादि करावेत किंवा ईश्वराची व जगन्नाथाची भक्ति करावी किंवा तीर्थांचे ठिकाणीं जाऊन स्नान करावें, म्हणजे आपोआपच त्याचा उद्धार होई', ह्या कल्पना सररहा रूढ झाल्यामुळें, स्वावलंबन, आत्मविश्वास, आत्मोन्नतिप्रीत्यर्थ धडपड करण्याची आवश्यकता वगैरे गोष्टी मागें पडूं लागल्या. जगन्नाथाच्या विश्वासरूप पांगुळगाड्यानें जनता परावलंबी झालेशी पाहून गौतमानें ईश्वराच्या अस्तित्वाची कल्पना मागें टाकली. बुद्ध म्हणजे मोक्ष देणारा देव नसून मार्ग दाखविणारा वाटाड्या आहे: कोणासहि आपलें कर्म टाळतां येणार नाहीं. कर्मबंधांनीं देवसुद्धां बद्ध आहेत. " अत्ताहि अत्तनो नाथो कोहि नाथो परो सिया । " ह्या बुद्धधर्मांतील शिकवणींत हाच अर्थ भरलेला आहे.

होता! गोकुळासारखें शाक्यांचें घर! संतति, संपत्ति व सुख यांत हार जाणारें नव्हें! लोकांत दरारा, मान, चहा यांतही कमी नाहीं! पण त्या घरांतील मोहरा सिद्धार्थ घरांतून बाहेर गेला असल्यामुळें त्या घराला प्रेतकळा आली होती! शुद्धोधन राजा बोलून चालून ऐहिक गोष्टींत रममाण झालेला! या जगतांत राहून, सर्व सुखें भोगून, धर्माच्या आज्ञा पाळून, सदाचरणांत काळ घालवून संसार करावयाचा, क्षत्रिय म्हणून जे कर्तव्य विहित तें करावयाचें व अंतीं स्वर्गाप्रत जावयाचें, असें ज्याचें मत, त्यांच्यापैकीं तो एक होता. सिद्धार्थानें घर सोडलें, नाना प्रकारचे देहदंड सोशिले, तत्कालिन सद्गुरूंचें[1] शिष्यत्व पत्करून खरा मार्ग शोधण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण शेवटीं नेरञ्जरा नदीच्या तीरावर अश्वत्थ वृक्षाच्या मूळाशीं ज्ञानाभिरत होत्साता, त्याला दुःखनिरोधाचा मार्ग सांपडला. या जगतांतील त्रिकालाबाधित असलेल्या कार्यकरणाच्या अनाद्यनन्त अशा धर्माचा साक्षात्कार त्यास झाला. प्रतीत्यसमुत्पादाचे दुवे समाधीच्या तल्लीनतेंत स्पष्टपणें त्याला दृग्गोचर व्हावयास लागले; व ह्या दुक्खस्कंधाचा नाश कशा रीतीनें होतो, हें त्याला दिव्य दृष्टीनें दिसलें. अशा प्रकारानें त्या दशबलाला सम्बोधि प्राप्त झाली. तो सर्वज्ञ झाला! सम्यक् सम्बुद्ध झाला! तो विमुक्त झाला! निर्वृत झाला!

त्यानंतर विमुक्तिसुखाचा दीर्घकाल अनुभव घेऊन, ब्रह्मयाचेनेनंतर धर्मचक्राचें प्रवर्तन करण्याच्या निश्चयानें तो वाराणसी नगरांत गेला व तेथून हळूंहळूं भिक्षुसंघाची वाढ करीत करीत, उपासक व उपासिका वर्गाची प्राणप्रतिष्ठा करीत करीत, तो गंगायमुनेच्या दुआबामधील

---

१: आळारकालाम व उद्दकरामपुत्त ह्या दोन गुरूंचें शिष्यत्व गौतमानें पत्करिलें होतें. आळार कालाम हा राजगृहाजवळ एका आश्रमांत रहात असे. योगशास्त्रांत तो पारंगत होता. गौतमानें त्याजजवळ राहून आकिञ्चन्यायतन या नांवाची समाधि लावण्याची कला साध्य करून घेतली; पण त्यास दुर्वासनांचा समूळ उच्छेद करून घ्यावयाचा असल्यामुळें ह्यापासून विशेष फायदा आहे, असें त्यास वाटेना. म्हणून तो त्या गुरूचा निरोप घेऊन उद्दकरामपुत्र याजकडे गेला. त्याजवळ तो नैवसंज्ञानासंज्ञा नांवाची व सर्व समाधींत श्रेष्ठ अशी समाधि लावण्यास शिकला. पण हा समाधिमार्ग निर्वाणाप्रत नेणारा नाहीं अशी त्याची खात्री झाली. ( बुद्धलीलासारसंग्रह– प्रो॰ कोसंबीकृत–पृष्ठें १२६ ते १३२ पहा. )

प्रदेशांत धर्मप्रसारकाचें काम करीत, निरनिराळ्या ठिकाणीं नवीन नवीन विहार स्थापीत, कपिलवस्तूला आपल्या जनकाच्या व ज्ञातिबांधवांच्या भेटीस गेला. त्यावेळचें त्याचें वैभव क्षत्रियाना दुःसह झालें. अध्यात्मिक तेज म्हणजे काय, हें त्यांना कळत नव्हतें, असें नाहीं. पण जडावरील आसक्तीच्या प्रभावानें ते आंधळे झाले होते. म्हणून गौतमाच्या सम्यक् सम्बुद्धत्वाचा त्यांच्यावर प्रथम प्रथम परिणाम होईना. पण हळूंहळूं पितृ-प्रेमानें शुद्धोदनाच्या हृदयांत भरतें आलें. पितापुत्राची, पतिपत्नीची व इतर ज्ञातिबांधवांची भेट झाली व गौतमानें आपल्या अव्याज मनोहर अशा वाणीनें, पावित्र्यानें, सौजन्यानें, निरहंकारानें व मैत्रीभावनेनें त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली; बौद्धधर्माच्या सर्व साधारण तत्वांची माहिती करून दिली; आपल्या धर्माचें रहस्य त्यांच्या गळीं उतरविलें; भिक्षुसंघांची कल्पना व त्या संस्थेचा तत्कालीं होणारा देशास उपयोग हीं समजावून दिलीं. आत्मकर्तव्य, नैतिक तत्वें पाळण्याची आवश्यकता,परहिता विषयी जागरूकता,व मोक्षाची खरी कल्पना यांच्य विषयींचा ज्ञानप्रकाश आपल्या जातिबांधवांच्या हृदयांत उद्भूत केला ! त्या वेळीं भराभर लोक गौतमाच्या धर्माचा स्वीकार करूं लागले. पीत-वर्णवस्त्रांनीं सर्वत्र विजय संपादन केला ! नवीन संसारास व आयुष्यक्रमास आरंभ झाला. नन्द व राहुल यांनीं प्रव्रज्या घेतली व अशा रीतीनें अपूर्व विजय संपादन करून गौतमबुद्ध कपिलवस्तूहून निघून गेला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं शुद्धोदन राजाचें देहावसान झालें, महाप्रजापतीगौतमी व राहुलमाता ( यशोधरा ) या शास्त्याकडे गेल्या व त्यांनींहि प्रव्रज्या घेतली.

अशा प्रकारानें शाक्यांच्या कुलांत केवढा मोठा परिवर्त घडून आला ! जुनी पिढी लयास गेली. नवीन पिढी राज्य करूं लागली. अशावेळीं सुंदरीनन्देच्या डोक्यांतहि विलक्षण कल्पना उत्पन्न व्हावयास लागल्या ! संसार व ऐहिक सुख याशिवाय आजपर्यंत जिच्या मनांत दुसरा विचार आला नाहीं, तिच्यावर ह्या परिवर्तानें जबरदस्त परिणाम केला ! तिला मनुष्याच्या क्षणिकत्वाची, संस्कारांच्या उत्पत्तीची, स्थितीची, आणि व्ययाची यथातथ्य कल्पना व्हावयास लागली.शुध्दोदन राजाच्या निर्वाणामुळें तर ती जास्तच निर्विण्ण झाली

व महाप्रजापति गौतमी व राहुलामाता यांनीं संघांत प्रवेश केल्यावर तर तिला सर्वत्र उदासीनता भासावयास लागली. तिला या जगांत भयाणता वाटावयास लागली. " आतां माझें तरी या जगांत काय उरलें आहे ? " असा प्रश्न ती स्वतःस विचारूं लागली ! मागें आपली स्थिती कोणत्या प्रकारची होती, तो काळ कसा होता, त्यावेळीं कोणतें चित्र आपण पहात होतों, आतां आपली स्थिती कोणत्या प्रकारची आहे, हा काळ कसा आहे, व कोणतें चित्र आपण पहात आहों, हे विचार तिच्या हृदयास सारखे त्रास देऊं लागले. गृहवास तिला रमणीय वाटेना. प्रव्रज्या घेणें म्हणजेच मोकळें होणें, असें तिला वाटावयास लागलें. ती आपल्या पूर्वाश्रमिच्या आईकडे-महाप्रजापति-गौतमीकडे गेली. तिला लौकरच प्रव्रज्या मिळाली व तिचा भिक्षुणीसंघांत प्रवेश झाला !

भिक्षूणीसंघांतील नियमाप्रमाणें तिला आपलें आयुष्य बनवावें लागे. एकंदर संघांतील आयुष्याची कल्पना तिला हळूं हळूं येत चालली होती. कधीं कधीं पूर्वाश्रमीच्या संसाराचें चित्र तिच्या डोळ्यापुढें उभें राही; पण ती नवीन आयुष्यक्रमास सरावत चालली होती. तथापि मागच्या आयुष्याचें सतत स्मरण करून देणारी एक गोष्ट तिच्या जवळ अद्यापि होती. ती म्हटली म्हणजे म्हणजे,तिचें रूप ! पीतवस्त्रांनीं जरी ती आवृत होती, तरी तिचें रूप तितकेंच रमणीय होतें ! तिला संघांत असें कळलें कीं, रूपवती स्त्रिया बुद्धांना आवडत नाहींत.शास्ता हा रूपाचा द्वेष्टा आहे.त्या बातमीनें तिला फार वाईट वाटलें. आपलें रूप तर बदलतां येणें शक्य नाहीं.शास्त्याकडे धर्मानुशासन,किंवा धर्मोपदेश घ्यावयास तर जावें लागणार व आपण गेलें म्हणजे शास्ता आपली निर्भर्त्सना करणार. त्या मानवती भिक्षुणीला ही कल्पना दुःसह झाली ! आपली पाळी आली म्हणजे ती दुसऱ्या भिक्षुणीला आपल्याबदली पाठवूं लागली. निव्वळ ऐकीव गोष्टींवरून शास्त्याकडे जाऊन धर्मोपदेश व उन्नति करून घेण्याचें कामीं ती टाळाटाळ करूं लागली ! या गोष्टीस कांहीं दिवस गेले. शास्त्याचें आपल्या संघावर आपत्यवत् प्रेम असल्यामुळें प्रत्येक कन्यकेची तो अत्यंत काळजी घेत असे.संसारांतल्या मानापमानाच्या कल्पना त्यांच्या मनांतून एकदम जाणें

अशक्य होय,हें तो जाणून होता. म्हणून नवीन येणाऱ्या कन्यका संघांत येऊन मार्गास लागेतोंपर्यंत त्यांच्याविषयीं तो विशेष तत्पर असे. रूपनन्दा आपणाकडे इतर कन्यकांबरोबर धर्मश्रवणास येत नाहीं किंवा गुरूसंबंधीं व्रतें किंवा कर्तव्यें पार पडण्याची टाळाटाळ करते, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां एकदिवस त्यानें अशी आज्ञा केली कीं, " उपदेशग्रहणास ज्याचे त्यानेंच जातिनिशी आलें पाहिजे. दुसरी भिक्षुणी बदली पाठवितां कामा नये." या आज्ञेनुसार आतां रूपनंदेस स्वतःच जाणें भाग पडलें. दुसरा मार्ग न राहिल्यामुळें ती शास्त्याकडे ठराविक दिवशीं जावयास निघाली. शास्त्याजवळ जाऊन शिरस्त्याप्रमाणें तिनें शास्त्याला वंदन केलें, तों तिला एक अपूर्व दृश्य दिसलें! शास्त्यानें आपल्या बलानें एक स्वर्गीय लावण्यवती स्त्री निर्माण केली असून, ती हातांत पंखा घेऊन शास्त्यास वारा घालीत आहे, अशा प्रकारचें दृश्य तिला दिसलें. त्या कन्यकेचें अपूर्व व अलौकिक लावण्य पाहून रूपनन्दा थक्कच झाली! किती मी मूर्ख' ! ती मनांत म्हणू लागली." माझ्या रूपसंपदेनें प्रमत्त होऊन मी शास्त्याजवळ येत नव्हतें. पण एथें काय ? अशा प्रकारच्या रूपवती स्त्रिया सुद्धां निर्भयचित्तानें शास्त्याजवळ वावरतात नां ? माझें रूप तर हिच्या पासंगास सुद्धां लागावयाचें नाहीं; अशा विचारांत गर्क होऊन त्या पुतळीवर निश्चल दृष्टी करून ती उभी राहिली. शास्त्यानें तिची स्थिती अवलोकन केली व जन्मजन्मांतरीं सांठवून ठेवलेल्या हेतूंच्या उच्चतम शिखरास ती पोहोंचली आहे, हें जाणून त्यावेळीं धर्मपदांतील पुढील अर्थाची गाथा म्हटली.:–

' मांस व रक्त यांनीं लिप्त असा अस्थींचा हा किल्ला बनविलेला आहे; व त्याच्यांत जरा, मृत्यु हे राज्य करीत असून मान व म्रक्ष्य हें त्यांत भरलेले आहेत. '

---

१: मूळ गाथा अशी:--

अट्ठीनं नगरं कतं मंसलोहितलेपनं
यत्थ जरा च मच्चू च मानो मक्खो च ओहितो ॥
( धम्मपद–P. T. S.–गाथानुक्रमनंबर १५० ).

त्यानंतर " चिरं वा यदित्रा तिट्ठं निसिन्नो यदि वा सय " यानें आरंभ असलेल्या सूत्राचें धर्मप्रवचन केलें.[1]

त्या शास्त्याच्या निमित्तमात्र कारणानें तिला रूपाचें ठिकाणीं क्षय व व्यय कसा ठेवलेला आहे, याचें सम्यक् ज्ञान होऊन, तिला अर्हत्पद प्राप्त झालें. त्या काळापासून तिला ध्यानानंदाशिवाय दुसरा आनंदच नाहींसा झाला व अप्रमत्ततेनें सर्वकाळ ध्यान लावण्यांत गर्क झाल्यामुळें लौकरच ती इतर भगिनीवर्गांत श्रेष्ठ झाली. मनुष्याला नरका नारायण होण्यास पूर्व संस्कृति असल्यास अगदीं क्षुल्लक परिस्थिती सुद्धां कशी उपयोगी पडते, हें आमच्या वाचकांनीं येथ पर्यंत पाहिलेंच असेल. मनुष्याच्या गतकालांतील संचित केलेली तयारी त्याच्या भविष्यत्कालच्या पारिणतीस कशी उपयोगी पडते, हें सत्य ह्या भिक्षुणींच्या चरित्रांवरून दिसणारें आहे, व तेंच नन्देच्या बाबतींतहि लागू पडतें.

एक दिवस जेतवनामध्यें संघासंबंधी कांहीं उत्सव व्हावयाचा होता. भगवान् गौतमबुद्ध आसनावर बसला होता. व तो आज नामसंमतकरण[2] नांवाचा समारंभ पार पडणार होता. भिक्षूणी संघ जम-

---

१: सुत्तनिपात नांवाच्या पालीग्रंथांत उरगवग्गांतील अकराव्या सूत्रांत ही ओळ आहे. त्या सूत्राचें नांव " विजय सूत्र " असें आहे. यांत शरीराचें यथार्थ तया ज्ञान होण्यास काय केलें पाहिजे, ह्याचें विवरण आहे. अस्थि, स्नायु, वगैरेंनीं बद्ध असें हें शरीर आहे; व त्यांत नानाप्रकारच्या दुर्गंधि भरलेल्या असून, स्मशानांत गेल्यावर इतस्ततः पसरलेलीं प्रेतें पाहून कायेवरील आसक्ति नाहींशी होते. हा कायछंद नाहींसा करण व शेवटीं अमृत व शांत अशा निर्वाणाचा साक्षात्कार करून घेणें हाच खरा विजय आहे, हें तत्व त्यांत शिकवलेलें आहे. ( सुत्तनिपात–Burmese Edition–उरगवग्ग–विजयसुत्त-पृष्ठ १७२ ).

२: नामसम्मतकरण:-बुद्धाच्या संघांत नानाप्रसंगीं निरनिराळे समारंभ होत असत. उपवसथ पाळणें, प्रातिमोक्ष म्हणणें, वर्षावास करणें, पवारणा करणें. उपसंपदा व प्रव्रज्या देणें वगैरे संघांतील समारंभ वर्षांतून असावयाचेच; पण एखाद्या भिक्षूचा किंवा भिक्षुणीचा सन्मान करून त्याचें नांव प्रथित करणें, त्याच्या किंवा तिच्या कर्तबगारीचें चीज करणें, असा समारंभ म्हणजे विशेष महत्वाचा म्हणून समजत असत. एखादे दिवशीं एखादा भिक्षु धर्मप्रवचन करीत असतांना आपल्या गाढ विद्वत्तेनें सर्वांस खूष करून टाकी व संघाकडून साधुवाद मिळवी. गौतमबुद्धहि अशा वेळीं त्या भिक्षूचें नांव प्रख्यात करी. अशा समारंभास " नामसम्मतकरण " असें नांव असे.

ला होता. आपापल्या जागीं त्या बसलेल्या होत्या. शास्ता त्या पैकीं अत्यन्तयोग्य अशा भिक्षुणींस अनुक्रमानें त्यांच्या अनुरूप असें स्थान देत होता. इतक्यांत नन्देची पाळी आली. ती स्तब्ध बसली होती. इतर तिच्या भगिनी तिच्याकडे पहात होत्या. आतां काय होतें हें पाहूं, अशा विचारांनीं त्या सभागृहांत शान्तता पसरली होती. इतक्यांत शास्त्यानें नन्देला ध्यानसंपन्न व ध्यानाभिरत अशा भिक्षुणींच्या वर्गांत अग्रस्थान दिलें, व तिची दीर्घकालची इच्छा परिपूर्ण केली ![1]

---

१: थेरीगाथेवरील टीकेंतहि धर्मपालानें नन्देची गोष्ट दिलेली आहे. त्यांत व मनोरथ पूरणींतील कथेंत बहुतेक साम्य आहे. थेरीगाथेंत नन्देनें गाइलेल्या गाथा फारच हृदयस्पर्शी आहेत. रूपांत आनंद मानणारी नन्दा या गाथांत रूपाची छाननी करून शरीराचे दोष दाखवित आहे. ती म्हणते, " नन्दे, रोगट, अशुचि, कुजलेल्या व दुर्गंधि अशा ह्या शरीराचे निरीक्षण कर. अशुभभावनेची भावना कर व चित्तास एकाग्रता आण. शरीराची जी गोष्ट तीच तुझी गोष्ट, तुझी जी गति तीच शरीराची गत. समाहित चित्तानें रात्रंदिवस तूं यावर भावना कर, म्हणजे सौंदर्याच्या गुलामगिरींतून मुक्त होत्साती तूं आपल्या प्रज्ञेच्या योगानें या कायस्वरूपाचें योग्य आकलन करून शांत अशा दृष्टीचा लाभ करून घेशील. " अशारीतीनें स्वतःस उपदेश करून तिनें कायगता स्मृतीच्या जोरावर कायनिर्वेदना प्राप्त करून घेतली; व ती मोठ्या आनंदानें म्हणते, " मी अप्रमत्त, विसंयुक्त व उपशान्त झालेली असून निर्वाणाच्या शांततेचा आस्वाद घेत आहे !"

( थेर आणि थेरीगाथा–P. T. S.–Oldenberg and Pischel—पृष्ट. १३२ गाथा ८२–८६ ).



# रत्न ७ वें.

## सोणा.

—०—

### (१)

### पूर्वबुद्धकालीन चरित्र.

गौतम बुद्धाच्या तत्वज्ञानाचा सगळा भर स्वकष्टावर होता. गौतमानें आपल्या अनुयायांच्या मनांत सम्यक् प्रयत्नांची जाणीव वारंवार भरून दिलली होती. मनुष्य भिक्षु झाला याचा अर्थ तो आळशी, आयत्या पिठावर रेघा ओढणारा, दुसऱ्याच्या धर्मावर पुष्ट होणारा, आळसांत दिवस काढणारा, आत्मोन्नति विषयीं बेफिकीर राहणारा, भिक्षूच्या चीवराशिवाय अन्तःशुद्धीस लागणारे आत्म्याचे इतर सद्गुण ज्यांत दिसत नाहींत असा, संसारी माणसापेक्षांहि लोभी, गृहस्थापेक्षांहि प्रांपचिक, ऐहिक सुखास लांचावल्यापेक्षांहि लाचार, असा नव्हे. कुलपुत्रांनीं गृहस्थाश्रमाचा त्यागकरून भिक्षु-आश्रमाचा अंगीकार करणें यांतच आत्मार्पणाची परमावधी झाली पाहिजे, असा त्याचा दृढ ग्रह होता. एकदां अशा रीतीनें स्वतःच्या चिमुकल्या संसारावर पाणी सोडून स्वतंत्र साम्राज्यांत मनुष्य शिरला म्हणजे तर त्याची जबाबदारी फारच वाढली ! शक्य तितक्या त्वरेनें आपली उन्नति करून अर्हत्पद प्राप्त करून घेतलें पाहिजे, व अर्हत्पद प्राप्त करून घेतल्यावर विश्वाच्या प्रचंड प्रपंचांत भाग घेतला पाहिजे. विश्वाच्या प्रपंचांत अविरत प्रयत्नांनीं, निष्काम बुद्धीनें, देवमनुष्यांच्या हिताकरिता, अर्थी

करितां, त्यांच्यावर अनुकंपा दाखविली पाहिजे; त्यांच्यामध्यें सन्मार्गाचा दीप प्रज्वलित केला पाहिजे व आपल्या बरोबर, जिवंतजीव असे तोपर्यंत त्यांचीहि उन्नति करण्याचा प्रचंड प्रयत्न केला पाहिजे, ही तर बुद्धाची आपल्या भिक्षूनां अनुशासनी होती! " जगांत सर्वत्र भडका पेटला असतां, लोक हाय हाय करीत असतां, तृष्णेच्या जाळ्यांत सांपडून बंधनांचें दुःख जनता सोशीत असतां, कुठला आनंद आणि कुठलें हास्य [1] उठा तयार व्हा, अप्रमत्त व्हा, वीर्याची कांस धरा. अध्यात्मिक वीर बना, व या लढ्यांत पडून माराच्या सेनेचा पराभव करा व लोकांचें दुःख निवारण करा हाच, उपदेश बुद्धानें भिक्षूनां काय किंवा भिक्षूणींना काय केलेला आहे! त्याच्या कळकळीच्या उपदेशानें हजारों लोक या संसारावर तिलांजलि देऊन बाहेर पडले. व बौद्ध वीरांनीं भारत वर्षांतच नव्हे तर सिरिया, अलेक्झांड्रीया, पॅलेस्टा-

---

१: धम्मपदांतील पुढील गाथा पहा:—

को नु हासो किमानन्दो निच्चं पज्जलिते सति ।
अन्धकारेन ओनद्धा पदीपं न गवेसथ ॥

( धम्मपद-P. T. S.—गाथानुक्रमनंबर १४६ ).

२: बुद्ध, ख्रिस्त व झोरोआस्टर यांच्या धर्मांत चांगलें व वाईट हीं जी जगतांतील मूलभूततत्वें आहेत, त्यांचा प्रमुखत्वानें उल्लेख आहे. जगतात सुष्ट व दुष्ट यांचा एकसारखा झगडा सुरू असून त्यांतच नैतिक शास्त्राचा उगम आहे. " मार " ( सं. स्मर ) हा वाईट तत्वाधिपति म्हटलें असतां अयथार्थ होणार नाहीं. ख्रिस्ती धर्मांत त्यासच " सैतान " हें नांव आहे. झोरोआस्ट्रियनधर्मात त्यासच " अहरिमान " हें नांव आहे. प्रस्तुत बुद्धधर्मांतील माराच्या कल्पनेशी आपणांस कर्तव्य आहे. त्या माराची मोठी सेना असून तो स्वसेनेनिशी शत्रूवर चाल करून जातो. खुद्द गौतमबुद्ध नेरञ्जरा नदीच्या तीरावर बसला असतां मारानें त्यास ऐहिक सुखाची लालूच दाखवून त्याला निर्वाणमार्गापासून च्युत करण्याचा प्रयत्न केला. पण जेव्हां गौतम ऐकेना, तेव्हां त्यानें आपलें सैन्य त्यावर सोडलें. काम, अरति, क्षुत्पिपासा, स्त्यान, भीरुत्व, विचिकिच्छा, कापट्य, लाभ, कीर्ति, सत्कार, खोटं यश, आत्मप्रशंसा व परावजानना वगैरे वीर त्यांचे सैन्यांत होते. गौतमबुद्धानें त्यांना तोंड दिलें, व त्यांचा पराभव केला. प्रत्येक भिक्षूसहि माराचा पराभव करण्यासाठीं नेहमींच तयार असावें लागतें. ख्रिस्तालाहि सैतानानें असेच वेढलेले होते. माराशी झालेल्या युद्धाची हकीकत सुत्तनिपात ग्रंथांत महावग्गांतील पधानसुत्तांत दिलेली आहे.

ईन, वगैरे सारख्या दूरदूर ठिकाणीहि जाऊन लोकांना धर्मोपदेशाचें श्रवण करविलें आहे. ह्या सर्वांचें रहस्य म्हणजे त्यांच्या प्रयत्नांची परमावधी. भगीरथ प्रयत्न करणें किंवा विश्रांति न घेणें या गुणांत भिक्षुणी वर्गापैकीं सोणा हि भिक्षुणी प्रख्यात आहे.

तिचा प्रथम उल्लेख पद्मोत्तर बुद्धाच्या काळीं केला जातो. हंसवती नगरांत ती एका कुलगृहांत जन्मास आली, व शास्त्याच्या उपदेशामृतानें पुनीत होऊन एक दिवस ती शास्त्याकडे गेली असतां भिक्षुणीसंघ जमला असून शास्ता निरनिराळ्या भिक्षुणींनां त्यांच्या योग्यतेनुरूप स्थान देण्यांत गुंतला आहे, असें तिनें पाहिलें. मोठ्या श्रध्दायुक्त अन्तःकरणानें तिनें तो सर्व समारंभ पाहिला व जेव्हां एका भिक्षुणीस वीर्यसंपन्न व प्रयत्नांत निष्णात अशा भिक्षुणी वर्गांत अग्रस्थान देतांना तिनें पाहिलें, तेव्हां आपणांसहि तें स्पृहणीय स्थान प्राप्त व्हावें, अशी तिनें उत्कटेच्छा धरिली व शास्त्यापुढें ती प्रकटहि केली. तत्प्रीत्यर्थ अवश्यक अशी तयारी करण्यासाठीं आपल्या आयुष्याचा उपयोग ती करूं लागली. तिला २० हजारवर्षेंपर्यंत जननमरणाच्या चक्रांत भटकावें लागून आपली उन्नति करून घ्यावी लागली. आणि गौतमबुध्दाच्या काळीं श्रावस्ती नगरांत एका कुलवान् अशा गृहांत तिचा जन्म झाला.

( २ )

## गौतमबुद्धकालीन–चरित्र.

सुदैवानें ती उत्तम प्रकारची गृहिणी म्हणून प्रख्यातीस आली. संसार करून तिला संपत्ती व संपत्तीहि मुबलक होती. ती पुष्कळ पुत्रांची व कन्यकांची जननी झाली व त्यांचे योग्य संगोपन करून त्यांना शिक्षण देऊन,त्यांना आयुष्यांत सुखानें व सदाचरणानें कसें राहतां येईल एतदर्थ शक्य ती तजवीज तिनें केली"माझ्यां पश्चिम वयांत ती माझी काळजी घेतील म्हणून,मला तरी संपत्तीची काय जरूरी आहे"या विचारानें तिनें आपणाजवळील सर्व संपत्ति आपल्या पुत्रांस व कन्यकांस वाटून दिली.

पण बिचाऱ्या सोणेच्या कपाळीं दुःखाचा केवढा दारूण आघात होणार होता? लियर राजाला आपल्या मुलींची कृतघ्नता पाहून वेडच लागलें. सोणेची स्थिती तितकी वाईट झाली नाहीं. आपलीं मुलें पुढें पुढें किती कृतघ्न झालेलीं आहेत, हें तिला कळूं लागलें. ज्या पुत्रांनीं व स्नुषांनीं सोणेला प्रथम प्रथम नुसती झेलून धरली होती, जीं तिला बहुमान मरातब देऊन तिची मर्जी संपादन करण्यासाठीं शक्य तो प्रयत्न करीत होतीं, त्यांचा धनलाभाचा हेतु साध्य झाला व तीं तिच्याकडे ढुंकूनही पाहीनांत! 'माता' म्हणून तिला भेटतसुध्दां नसत. तिच्यासंबंधानें पूज्यबुध्दी तर दूरच राहिली; पण जनलज्जेस्तव तिचा परामर्षसुध्दां घ्यावयाचें त्यांनीं टाळलें. सोणेच्या हृदयांत निरनिराळ्या मनोवृत्तींनीं कालवा कालव करून सोडली. जगांतहि असाच कां कृतघ्नपणा असेल? या विचारानें तिला सतावून सोडलें. ह्या रसाळगोमटच्या फळांचा तिला तिटकारा आला. तिचें मन निर्विण्ण झालें. "आपण आतां जगावें तरी कां" हा प्रश्न तिच्यापुढें उभा राहूं लागला. संसाराच्या शृंखला तिला आतां अवजड वाटावयास लागल्या. अशा अनुकंपनीय अवस्थेंत तिला सुखाचा एक किरण तरी दृष्टीस पडला असतां तर तिकडे तरी धांवत गेली असती. तिला प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यांकडून सुख मिळालें नाहीं. आतां दुसरें कोण तिच्या या नव्या झालेल्या व्रणांवर औषधोपचार करून तिला समाधान देईल बरें? तिला भिक्षुणींची प्रसन्नमुखें दिसावयास लागलीं. ऐहिकपाश तोडून टाकून आत्म्याचा उन्नतीसाठीं व जगताच्या सेवेसाठीं या दयेच्या दूतिका तिच्या नजरेसमोर खेळूं लागल्या व तिला तावडतोब बरें वाटलें. तिला धीर आला. तिला उमेद चढली व ती भिक्षुणीसंघांत जाऊन शाक्यपुत्रीय श्राविका म्हणून राहूं लागली!

संघांत गेल्यावर तेथील राहणी तिला प्रथम प्रथम फारच जाचक झाली. संसारांत असतांना सुखांत व ऐषआरामांत राहिल्यामुळें तेथें गेल्यावर भिक्षुणीनें पाळण्याचे नियम फारच जाचक वाटूं लागले. बंधांत राहण्याची तिला संवय नसल्यामुळें वारंवार तिच्याहातून विहितकर्मे होत नसत व संघाच्या दृष्टीनें अयोग्य अशा गोष्टी तिच्या हातून वारंवार होत. त्यामुळें भिक्षुणी तिला संघसम्मत अशा शिक्षाही करीत. त्या दण्डकर्मांनीं तिला त्रास होई; पण तीं कर्मे करणें तिला भाग पडे. तिच्या मनाला हें केवढेंतरी

शिक्षण, मिळत होतें ! पण येथेंहि तिच्या दुष्टपुत्रांनीं व कन्यकांनीं तिला छळण्यास कमी केलें नाहीं. ती दण्डकर्म करीत असतांना त्यांनीं तिच्याकडे जावें व म्हणावें, “काय आहे ग भिक्षुणी ! तुसतीं शिक्षापदें सुद्धां तिला ठाऊक नाहींत व त्यांचा अतिक्रम ती करते. काय होणार आहे भिक्षुणी, हें दिसतेंच आहे ”? अगोदरच विदारित झालेल्या सोणेचें हृदय ह्या त्या कृतघ्न पुत्रांच्या शब्दबाणांनीं ज्यास्तच विद्ध होई, व पश्चत्तापानें तिचें हृदय भरून येई. आपला हा मार्ग सुविशोधित करण्या करितां कांहीतरी व्रत आपण अंगीकारलें पाहिजे, असा दृढनिश्चय करून तिनें द्वत्तिंसाकार म्हणून बत्तीस प्रकारांनीं युक्त अशी कायगतास्मृति[1] कायम ठेवण्याचा नियम धरला. तिचा आळस पार नाहींसा झाला. ती सदैव जागृत झाली. तिची जागृतावस्था प्रवरतर व्हावयास लागली. “बहुपुत्रिका”

---

१: कायगतास्मृतिः-( पाली—कायगता सति )—गौतमबुद्धानें निरनिराळ्या सुत्तन्तांतून या स्मृतीची प्रशंसा केली आहे. ही स्मृति वाढविली असता, मनुष्याच्या हृदयांत संवेग उत्पन्न होतो, त्याचा महदर्थ साधतो, तो योगक्षेमाप्रत जातो, त्याला ज्ञानदर्शन प्रतिलाभाची जोड मिळते, व ह्या आयुष्यात सुखानें राहणें त्यास शक्य होतें, अशी ह्या स्मृतीची योग्यता आहे. अरण्यात किंवा एकांतात जाऊन या स्मृतीची भावना करावयाची असते. या शरीरासंबंधाची खरी कल्पना तत्त्वज्ञानदृष्ट्या करून घ्यावयाची असेल, तर ही स्मृति वाढविली पाहिजे. ही प्राप्त करून घेण्याचे निरनिराळे मार्ग आहेत. मनुष्यानें आपल्या आश्वासावर व प्रश्वासावर ध्यान लावून त्याचा उगम, त्याची स्थिति, व व्यय यांचा अभ्यास केला असतां, शरीर स्थिरतर होतें व कायगतास्मृतीची प्राप्ति होते. पण हा अवघड मार्ग जरी सोडून दिला, तरी, इतर सोपे मार्गही सांगितलेले आहेत. त्यांपैकीं “द्वत्तिंसाकारकम्मट्ठान” हा एक मार्ग आहे; व तो बराच सोपा आहे. या मार्गानुरूप चालावयाचें असल्यास मनुष्यानें एकांतात जाऊन या शरीरातील केश, स्मश्रु, नख, दन्त, त्वक्, मांस, स्नायु, अस्थि, अस्थिमज्जा, वृक्क, हृदय, यकृत, क्लोम, प्लीहा, फुप्फुस, आंतडें, आंतड्याची दोरी, कोठ्यातील पदार्थ, करीष, पित्त, श्लेष्म, पू, रक्त, खेद, मेद, अश्रु, वसा, थुंकी, शेंबूड, लस आणि मूत्र असे जे प्रकार आहेत, त्यांचा विचार करावयाचा असतो. त्यायोगानें चित्तांत शरीराविषयीं निर्वेदना उत्पन्न होते; चित्ताची जागरुकता दृढ होते, आलस्य व तन्द्रि नाहींतशी होतात व आरब्धवीर्यत्व प्राप्त होतें. याच स्मृतीच्या सहायानें सोणेच्या हृदयांतील शल्य दूर झालें. ( विशेष माहितीकरितां विसुद्धिमग्ग—P. T. S.-C. A. F. Rhys Davids —Vol I, Pages 239—266; पहा. )

सोणास्थविरा म्हणून जें तिचें पहिलें नांव होतें तें जाऊन "आरब्धवीर्या" सोणास्थविरा म्हणून तिला संघांतील लोक संबोधूं लागले. एक क्षण जरी सांपडला, तरी ती द्वत्तिसाकार म्हणण्यांत घालवूं लागली. अशा रीतीनें तिच्या एकंदर आयुष्यक्रमांत फरक पडत चालला असतां, एक दिवस कांहीं भिक्षुणी विहाराकडे जावयास निघाल्या; व जातांना सोणेस म्हणाल्या "सोणा, भिक्षुणीसंघाकरितां जरा पाणी गरम कर बरें!" असें म्हणून त्या निघून गेल्या. पाणी ऊन करावयास ती अग्निशालेकडे चालली, तरी चालतां चालतां सुद्धां तिनें आपलें नित्यकर्म सोडलें नाहीं. ती अशा रीतीनें अग्निशालेंत जाऊन प्रवेश करते न करते तोंच तिच्या अध्यात्मिक दृष्टीची पूर्णता झाली! तिचें पाणी अजून तापावयाचेंच होतें; पण तिची विपश्यना मात्र पूर्ण वाढली. त्याबरोबर, जरी शास्ता त्या शालेपासून दूर अशा आपल्या गंधकुटी नामक आवासांत बसला होता, तरी तेथेंच त्यानें पुढील अर्थाची धर्मपदांतील गाथा म्हटली; व तिनेंहि ती दिव्यज्ञानानें ऐकली.

"उत्तमधर्म न पाहतां जो शंभर वर्षें जगतो, त्याच्या त्या जगण्यापेक्षां उत्तम धर्म पहात असतांनां एक क्षण जगणें व श्रेयस्कर आहे."[१]

ही गाथा पुरी झाल्याबरोबरच तिला अर्हत्पद प्राप्त झालें. त्या लोभनीय पदाचा साक्षात्कार झाल्यावर ती आपणाशींच म्हणूं लागली, "मला अर्हत्पद मिळलें आहे. तथापि माझ्या भगिनी माघारी आल्यावर त्यांना हें ठाऊक असणें शक्य नाहीं व त्यांनीं सांगितलेलं काम न केल्यामुळें माझी अवहेलना करून त्या मला बोलणारच. आणि मी कांहीं बोललें नाहीं म्हणजे माझ्यावर दोषारोप होणार. तेव्हां अशा परिस्थितींत त्यांना माझ्या ह्या अवस्थांतराचें ज्ञान होण्यासाठीं कांहींतरी विशेष गोष्ट केली पाहिजे." असा विचार करून तिनें उदकभाजन चुलीवर ठेवलं, पण खालीं विस्तव मात्र पेटविला नाहीं, व ती तेथें तशीच राहिली.

---

१: अशा प्रकारानें गौतमबुद्धानें गाइलेल्या गाथेस "ओभास गाथा" असें म्हणतात. मूळगाथा अशी:—

> यो च वस्ससतं जीवे अपस्सं धम्ममुत्तमं ।
> एकाहं जीवितं सेय्यो पस्सतो धम्ममुत्तमं ॥
> (धम्मपद-P. T. S.-गाथानुक्रमनंबर-११५).

इकडे त्या भिक्षुणी माघारी आल्या; पण चुलीखालीं विस्तव नाहीं हें पाहून मोठ्या रागानें म्हणाल्या " त्या म्हातारीला भिक्षुणीसंघा करितां पाणी तापवावयास सांगितलें; पण अजून तिनें पाण्याखालीं जाळहि कीं हो नाहीं लावला?" सोणेनें अगदीं शांतपणें उत्तर दिलें," भगिनीनों, तुम्हांला अग्नीशी काय करावयाचें आहे बरें? न्हावयाची इच्छा असेल तर भांड्यांतून पाणी घ्या व न्हा." " असेल तिचें तिलाच ठाऊक," असें म्हणून त्या चुलीपाशी गेल्या व पाण्यांत हात घालून पाहूं लागल्या, तों त्याना पाणी ऊन झालेलें आढळून आलें. असें पाहून त्यानीं एक लहान भांडें आणलें व त्यानें पाणी बाहेर काढलें तों काय चमत्कार? मूळच्या भांड्यांत पाणी पुन्हा भरलेलें !

त्या बरोबर सर्वांची खात्री झाली. " सोणा अर्हत्पदाला पोहोंचली आहे," असें त्या म्हणूं लागल्या. तिच्याहून लहान वयाच्या भिक्षुणींनीं तिला पंचांग नमन केलें व तिच्या पायाशीं जाऊन आम्हीं चुकलों, आम्हांस क्षमा करा, इतके दिवसपर्यंत आमचा आपणाविषयीं गैरसमज झाला, त्यामुळें आम्हीं आपणांस छळलें, दुखविलें, व आपली हेळसांड केली. त्याची आम्हांस माफी करा' म्हणून तिची विनवणी करूं लागल्या. त्या प्रमाणेच तिच्या पेक्षां वयानें ज्या मोठ्या होत्या, त्याहि तिच्या पुढें गुडघे टेकून तिची क्षमा मागूं लागल्या. तिनें त्या सर्वांना क्षमा केली व त्यांना वाईट वाटून न घेण्याविषयीं सांगितलें. त्या काळापासून म्हातारपणींहि अर्हत्पद-फलप्राप्ती करून घेतल्यामुळें ती स्थविरा आपल्या गुणांनीं प्रख्यातीस आली.

एक दिवस जेतवनांत भिक्षुणीसंघांत मोठीच गडबड उडून राहिलीहवाती. त्या दिवशीं नामसम्मतकरण नांवाचा समारंभ व्हावयाचा होता. त्या करितां शास्त्यास बोलाविलें असून तो आल्यवार आसनावर बसला होता. सर्व भिक्षुणी आपल्या चीवरांनीं युक्त अशा तेथें आल्या व शास्त्यास वंदन करून आपापल्या जागेवर जाऊन बसल्या. शास्ता भिक्षुणींना त्यांच्या योग्यते प्रमाणें, व अध्यात्मिक उन्नतीनुरूप स्थान देण्यात गुंतला होता. इतक्यांत क्रमाक्रमानें सोणेची पाळी आली. सर्वत्र शांतता पसरली; व त्या शांततेतच शास्त्यानें वीर्यवती भिक्षुणींच्या वर्गांत सोणे-

ची अग्रभागीं स्थापना केली? वयाचीहि अडकाठी न येतां तिनें अत्यन्त व अविरत प्रयत्न करून यश मिळविलें, या मुळें तिला मिळालेलें अग्रस्थान योग्यच होतें, असें आमचे वाचकहि म्हणतील.

---

१: थेरीगाथेंतहि सोणेचा उल्लेख आलेला आहे. धर्मपालानें परमत्थदीपनींत दिलेली गोष्टहि मनोरथ पूरणींतील गोष्टीप्रमाणेंच आहे. तिला मनोरथ पूरणींत " बहुपुत्तिका " म्हणून संबोधिलें आहे. पण थेरीगाथेंत सोणेनें गाइलेल्या ज्या गाथा आहेत, त्यात मला दहा पुत्र झाले असें सांगितलेलें आहे. टीकाकार मात्र दहा पुत्र याचा अर्थ " दहा पुत्र व दुहिता ' असाच घेतात. दहा मुलें होणें म्हणजे कांहीं विशेष आहे, असें नाहीं. सोणा भिक्षुणीनें गाइलेल्या गाथा हृदयास पीळ पाडणाऱ्या आहेत. ती म्हणते, " माझ्या पोटीं दहा पुत्र झाले. त्यानंतर मी दुबल व जीर्ण झाल्यें, व मग भिक्षुणींकडे गेल्यें. त्यांनीं मला स्कन्ध, आयतन व धातु यांनीं युक्त असा धर्म शिकविला. तो मीं श्रावण केल्यावर प्रव्रज्या घेतली. मी शिक्षित असतांना मला दिव्यचक्षु व पूर्वनिवासानुस्मृती, यांचा लाभ झाला एकाग्र व सुसमाहित होत्साती मी निर्वाणावर भावना करावयास लागलें; व मार्ग व फल यांचा एकामागून एक साक्षात्कार झाल्यावरहि अनन्तराविमोक्षाचें ठिकाणीं निरासक्त होऊन, पुढें मी निर्वृत झाल्यें. पंचस्कन्धांचें मला ज्ञान झालें आहे. छिन्नमूलक होत्साते ते आतां राहिले आहेत. पुढील वृद्धि बंद झाली आहे. मीहि आतां स्थिरतम झाल्यें आहे. आतां मला पुनर्जन्म नाहीं ! " केवढा हा विश्वास! अशा मातांचा समाजास कांहींच उपयोग झाला नसेल काय ? (थेर व थेरीगाथा–P. T.S.–Oldenberg and Pischel–पृष्ठें १२३–१२४–गाथा १०२ ते १०६).

# रत्न ८ वें.

## सकुला.

### (१)

### पूर्वबुद्धकालीन—चरित्र.

बौद्ध धर्म हा चमत्कारांना पारखा नाहीं, चमत्कार तेथेंही आहेत; पण हिंदुधर्म व बौद्धधर्म यांमध्यें या चमत्कारांच्या बाबतींत असा भेद आहे कीं; हिंदुधर्मांत चमत्कारांची गणना दैवी गोष्टींत केली जाते; पण बौध्दधर्मांत मात्र ती मानवीशक्तीच्या आटोक्यांतील एक गोष्ट म्हणून समजली जाते. गौतमबुध्द देवांना मानीत नाहीं, असें नाहीं. त्याच्या धर्मग्रंथांतून इंद्र, ब्रह्मा, कुबेर, विष्णु वगैरेंचाहि उल्लेख आहे. पण देवकोटि व मनुष्यकोटि यांच्यामधील फरक एवढाच कीं, देव हे अध्यात्मिक दृष्ट्या उच्चतम परिणतीचे मानव आहेत;व मानव मात्र तसे नाहींत. मनुष्यासहि शील, समाधि, व प्रज्ञा यांच्या जोरावर देव होता येईल, असें त्यांचें म्हणणें होतें. बौध्दधर्माच्या शासनाप्रमाणें योगावचर भिक्षूची समाधींत पूर्ण परिणती झाली म्हणजे, त्यास योगबलावर निरनिराळ्या ऋद्धि साध्य करून घेता येतात. त्यांस अभिज्ञा असेंहि म्हणतात. त्या एकंदर सहा आहेत. त्यांपैकीं दिव्यचक्षु असणें ही एक अभिज्ञा म्हणून मानली आहे. यायोगानें योगावचाराची दृष्टि मानवीचर्मचक्षूच्या दृष्टीपेक्षां जास्त सूक्ष्म होत जाते. त्या दृष्टीच्या योगानें त्याला अदृश्य असें म्हणून कांहींहि असत नाहीं. भिंती कपाटें, कवाडें, व वातावरण यांत अदृश्य

असें कांहींहि रहात नाहीं. याच शक्तीनें मनुष्याच्या मरणानंतर त्याची अवस्था, सुगति किंवा दुर्गति हीहि योगी पाहूं शकतो. खुद्द गौतमबुध्दानें या शक्तीचा वारंवार उपयोग केला आहे. त्यांनीं आपल्या भिक्षूंसहि ह्या अभिज्ञा कशा प्राप्त करून घ्याव्या हें शिकविलें होतें. व त्याप्रमाणें कित्येक भिक्षू यांत निष्णातहि होते. पण त्यापेक्षां प्रज्ञेचा लाभ करून घेणें ज्यास्त प्रशस्त आहे असे, ते म्हणत असत. भिक्षुणींनाहि ह्या अभिज्ञा प्राप्त करून घेणें अशक्य नाहीं. फार काय, तर स्त्रियांनांहि अर्हत्पदाची प्राप्ती झालेली आहे, हेंच प्रस्तुत चरित्रें लिहून दाखविण्याचा उद्देश आहे. ह्या अभिज्ञांपैकीं 'दिव्यचक्षु' असणाऱ्या भिक्षुणींवर्गात सकुला ही श्रेष्ठ आहे.

हिच्या चरित्राची विशेष माहिती बुद्धघोषाचार्यांना असावी, असें दिसत नाहीं. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ती पद्मोत्तर बुद्धाच्या काळात हंसवती नगरींत एका कुलगृहांत जन्मास आलेली, म्हणून प्रथम ती दृष्टीस पडते. ती वयांत आल्यावर, एक दिवस शास्त्याचा धर्मोपदेश श्रवण करण्यास विहारांत गेली, व तेथें तिनें एका भिक्षुणीचा अग्रस्थानीं प्रतिष्ठा करतांना शास्त्यास पाहिलें. ती भिक्षुणी दिव्यचक्षु असलेल्या भिक्षुणीवर्गांत अग्र म्हणून जेव्हां शास्त्यानें तिला महनीय स्थान दिलें; तेव्हां आपणांसहि तें प्राप्त व्हावें. म्हणून तिनें शास्त्यासमोरच आपला दृढ निश्चय कथित केला. नंतर पुढील आयुष्य भर शीलांचे परिपालन करून, उपवसथ पाळून व पुण्यकृत्यें करून तिनें तें संपविलें.

त्यानंतर कित्येक कल्पें तिला जनन मरणाचें संसरण करावें लागलें. नानाप्रकारच्या जन्मांत निरनिराळ्या परिस्थितींत आयुष्य घालवून

१: या ज्ञानास पालीवाङ्मयांत सत्वांच्या जनन मरणाचें ज्ञान (पालि: सत्तानं चुतूपपातञाणं) असें नांव आहे. महापरिनिर्वाण सूत्र'त भगवान् बुद्ध हे नादिकेंत गिञ्जकावसथ नावाच्या विहारांत रहात असतांना आनंद तेथें गेला, असें सांगितलें आहे. भगवन्तांना वंदन केल्यावर त्यानें मृत झालेल्या निरनिराळे उपासक व उपासिकांविषयीं त्यांना प्रश्न केला; व त्यांनीं आपल्या या शक्तीनें त्या त्या लोकांची मरणोत्तर गति आनंदास निवेदन केली. (दीघनिकाय-P. T. S.-Rhys Davids and Carpenter-महापरिनिब्बानसुत्त-पृष्ठें ९१-९२)

आपल्या मूळच्या दृढनिश्चयाला परिपोषक अशीच भूमिका ती तयार करीत होती. चेतनेच्या[1] जोरावर मनुष्यास काय करतां येणार नाहीं ! जगतांमधील सर्व गोष्टी मनोमय आहेत, हें तर आदितत्व बौद्धधर्मांत प्रतिपाद्य आहे.सकुलेनें निरनिराळ्या जन्मांत आपल्या आयुष्याचा एकच ध्रुवतारा कायम ठेवला;व तो म्हटला म्हणजे आपला निश्चय सफल करून घेणें. हा होय, म्हणून निरनिराळे जन्म घेतल्यावर, तिची बहुतेक तयारी झाली व गौतमबुद्धाच्या जन्माच्या सुमारास ती श्रावस्ती नगरांत एका कुलगृहांत जन्मास आली.

## ( २ )

## गौतमबुद्धकालीन—चरित्र.

या स्थविरेच्या चरित्रांत एक विशेष हा आहे कीं, ती आपल्या इतर भगिनींप्रमाणें दुःखानें गांजल्यावर भिक्षुणी झालेली नाहीं. संसारांतील विविध दुःखांनीं पीडित होऊन मग समाधान होण्याकरितां व दुःखबंधांतून मुक्त होऊन, अर्हत्पदप्राप्तीनतर जगताच्या संसारांत पडण्याकरितां सर्व भगिनी प्रव्राजित झालेल्या दिसतात. पण सकुलेची गोष्ट फार भिन्न होती असें वाटतें. तिला प्रापंचिक सुख चांगलेंच असलें पाहिजे, पण निव्वळ गौतमबुद्धाच्या धर्मश्रवणानें त्यांच्या बद्दल तिच्या हृदयांत बलवती श्रध्दा उत्पन्न झाली बौध्दधर्मांत श्रध्देचें महत्व फार गाइलेलें ह आहे. भगवान बुध्द, अर्हत् सम्यक् बुध्द, सुगत, लोकाविदू, मानवी प्राणी व इतर प्राणी याना वळणावर आणणारा देवमनुष्यांचा शास्ता, अशाप्रकारच्या बुद्धाच्या धर्मश्रवणानें ऐकणाराच्या मनात जें एक प्रामोद्य उत्पन्न होतें, तें अपूर्व होय. त्यायोगानें शास्ताविषयीं मोठा श्रध्दा

---

१: चेतनाः चेतना याचा अर्थ इच्छा असा आहे. “ चित्त ” याचा अर्थ वाटणें, जाणणें, इच्छा करणें असा होतो. त्याच धातूपासून चित्त हा शब्द निघाला आहे. मनांत जसा विचार उत्पन्न होईल तसें मानवाच्या हातून कर्म घडेल. कुशलविचार उत्पन्न झाला, तर कुशलकर्म घडेल व अकुशलविचार उत्पन्न झाला तर,अकुशलकर्म घडेल.बुद्धानें कर्मापेक्षां चेतनेसच प्राधान्य दिलें आहे.“ चेतना अहं भिक्खवे कम्मं वदामि ” या वाक्यावरूनच इच्छेचें महत्व दिसून येईल.

उत्पन्न होतें व अशा श्रध्देनें सकुलेचें अन्तःकरण भरून गेलें. तिला संसार रिक्त वाटावयास लागला. संसारांतील सुखें तुच्छ वाटावयास लागलीं. पारलौकिक अर्थ शोधण्याच्या कामीं ती गर्क झाली व शास्ताच्या संघांत प्रविष्ट झाली श्रध्देमुळें भिक्षुणीसंघांत तिला संघांतील आयुष्य सुध्दां कंटाळवाणें वाटत नसलें पाहिजे. त्याठिकाणीं मनाचा उल्हास, कर्तव्याची जागरूकता, भिक्षुणींचें उदाहरण व सर्वत्र नैतिकशुध्दीनें भरलेलें वातावरण या सर्वांच्या योगानें ती लौकरच अर्हतपदाप्रत गेली. पण यानंतर तिला दिव्यदृष्टि मिळविण्याची प्रबलेच्छा झाली व त्याकरितां तिनें आटोकाट प्रयत्न केले व त्यामुळें लौकरच ती त्या मार्गांत पारंगत झाली व तिला दिव्यचक्षूची शक्ति प्राप्त झाली.

त्यानंतर एकदिवस शास्ता जेतवन विहारांत आसनावर बसून भिक्षुणींच्या योग्यतेप्रमाणें त्यांना स्थानें देण्यांत गुंतला होता; त्यावेळीं त्यानें सकुलेस दिव्यचक्षु प्राप्तझालेल्या भिक्षुणींवर्गांत अग्रस्थान दिलें व अशा रीतीनें सकुलेची दीर्घकालची इच्छा सफल झाली.[१]

---

१: सकुलाः–अंगुत्तर निकायाच्या टीकेंत बुद्धघोषाचार्यांनीं जरी या भिक्षुणीसंबंधानें कांहींच माहिती दिली नसली, तरी थेरी गाथेवरील "परमत्थदीपनी" नामक टीकेंत धर्मपालानें पुष्कळच नवीन माहिती दिली आहे. अगोदर हिच्या नांवासंबंधानें थेरीगाथेंत व अंगुत्तर निकायांत फरक आहे. थेरीगाथेंत "पकुला" असेंहि नांव आढळतें. पण अंगुत्तर निकायांत "सकुला" असें एकच नांव आढळतें. थेरीगाथेवरील टीकेंत असें सांगितलें आहे कीं, पदुमोत्तर बुद्धाच्या काळीं सकुला ही हंसवती नगरचा राजा जो आनन्द त्याची कन्यका व शास्त्याची ( पदुमोत्तर बुद्धाची ) सावत्रबहिण म्हणून जन्मास आली असून, त्या जन्मांत तिचें नांव 'नन्दा' असें होतें. तिनें शास्त्यापुढें उत्कटेच्छा प्रदर्शित केली वगैरे माहिती नवीन नाहीं. पुढें जन्म घेत घेत ती कश्यपबुद्धाच्या काळीं ब्राह्मणी म्हणून जन्मास आली; व त्याच जन्मांत संसाराचा त्याग करून परिव्राजिका म्हणून एकांतांत राहूं लागली. एके दिवस भिक्षेसाठीं हिंडत असतां तिनें पुष्कळ तेल जमा केलें; व शास्त्याजवळ जाऊन सर्व रात्रभर "दीपपूजा" केली. तेथून च्युत झाल्यावर तावतिंस लोकांत जन्म घेऊन गौतमबुद्धकालांत श्रावस्तींत एका ब्राह्मण कुलांत जन्म घेती झाली. तिचें नांव सकुला असें ठेविलें होतें. शास्त्यानें अनाथपिण्डिकाच्या जेतवन विहाराचा अंगीकार केला; त्यावेळीं तिच्या हृदयांत शास्त्याविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली व उपासिका होतसाती पुढें एका अर्हतपदाप्रत पोहोंचलेल्या भिक्षुणीजवळ, धर्माचा अभ्यास करून

पुढें तिनें प्रव्रज्या घेतली, वगैरे माहिती परमत्थदीपनींत दिलेली आहे. (Hevavitarne Edition, Singhalese characters—1918 पृष्ठ ७२.)

तिनें ज्या गाथा गाइलेल्या आहेत, त्यांत ती म्हणते. " गृहिणी म्हणून रहांत असतांना भिक्षूंचा धर्म मीं श्रवण केला व निर्वाणाचा मार्ग म्हणजे जो विरजधर्म तो मीं पाहिला. लगेच मीं पुत्रकन्यका व धनधान्य यांचा त्याग करून प्रव्रज्या घेतली. लौकरच मीं दिव्य चक्षूचा लाभ करून घेतला. पुढें सर्व आस्रवांचा नाश करून शांत होत्साती आतां मी निवृत्त झालेली आहे."

(थेर व थेरीगाथा—P. T. S.—Oldenberg and Pischel पृष्ठ १३३.)



# रत्न ९ वें.

## भद्रा कुण्डलकेशा.*

### (१)

### पूर्वबुद्धकालीन—चरित्र.

भिक्षुणीसंघांत अत्यन्त अल्पावकाशांत जिनें दिव्यशक्ति (अभिज्ञा) प्राप्त करून घेतल्या तिचें नांव कुण्डलकेशा भद्रा असें आहे. बौद्धसंघांत पथ्यकर अशी चढाओढ नेहमीं चालेच. शास्त्याकडून मोठे म्हणवून घेणें, हें तर संघांतील लोकांचें आद्यकर्तव्य असे. गौतमहि त्यांना प्रोत्साहन देई. जगाच्या संसारांत पडण्यापूर्वी आत्मोन्नति करून घेणें, हें प्रव्रजिताचें पहिलें कर्तव्य असें; किंवा आत्मोन्नति याचेंच नांव जगाच्या संसारांत पडण्याची पूर्वतयारी. बौद्धभिक्षूनां व भिक्षुणींना हें जें विशिष्ट प्रकारचें शिक्षण मिळे; त्यामुळें समाजांत "शाक्यपुत्रिय श्रमण"[1] या

---

* भद्रा कुण्डलकेशा (पालि–भद्दा कुण्डलकेसा) चरित्रांत भद्रा हेंच नांव उपयोगांत आणलें आहे. भद्रा हें नांव प्रस्तुतच्या चरित्रमालिकेंत तीन वेळां आल्या कारणानें त्या नांवापुढें त्याचें विशेषण जोडलेलें आहे.

१: शाक्यपुत्रिय श्रमण (पाली—सक्यपुत्तिय समण) शाक्यपुत्र म्हणजे गौतमबुद्ध त्याचे श्रमण, त्यांचे अनुयायी. बुद्धकालांत श्रमण हें नांव सर्वसाधारण होतें. निरनिराळ्या पंथांत निरनिराळे श्रमण होते. पाश्चात्य किंवा चिनी प्रवाशांनीं हिंदुस्थानांत येऊन जीं वर्णनें लिहिलेलीं आहेत त्यांत श्रमण आणि ब्राह्मण असे दोन निरनिराळे वर्ग निर्दिष्ट केलेले आहेत. पालीवाङ्मयांतहि "केचि समणा वा ब्राह्मणा वा" असा वाक्यांश नेहमीं आढळतो. भिक्षूंच्या विशिष्ट प्रकारच्या राहणीमुळें त्यांनीं लोकांवर एवढा मोठा परिणाम केला होता कीं, ते त्यांना शाक्य पुत्राचे श्रमण म्हणून संबोधूं लागले.

नांवानें ते ख्यात होते. संघामध्यें स्त्री किंवा पुरुष हा भेद आत्मोन्नतीच्या मार्गाला येत नाहीं, हा बौध्द धर्माचा विशेष आहे. मोठमोठ्या विद्वान् भिक्षूप्रमाणेंच भिक्षुणींनींहि अर्हत्पदाचा साक्षात्कार करून घेऊन विशिष्ट क्षेत्रांत कसें प्राविण्य मिळविलें होतें, हें आतांपर्यंतच्या चरित्रांवरून वाचकांच्या ध्यानीं आलेंच असेल. कित्येक बाबतींत तर स्त्रियांनीं आपली बुध्दिमत्ता उज्वल रीतीनें दाखविलेली आहे व गौतमानेंहि ती कबूल केली आहे; इतकेंच नव्हे तर त्यांची योजना अग्रस्थानीं करून आपला गुणग्राहीपणा दाखविला आहे. स्थविरा कुण्डलकेशेची गोष्ट तर विशेष महत्वाची आहे. वादविवादामध्यें अपूर्व चातुर्य दाखविणाऱ्या कामीं स्त्रियांनाहि त्याकाळीं केवढें प्रोत्साहन मिळत असे, हें तिच्या गोष्टीवरून स्पष्ट होत. वादविवाद करण्यांत पारंगत अशा एका स्त्रीस बौध्दसंघांतील एका खंद्या वीरानें [1] जिंकून तिला संघांत कसें आणिलें, ही कथा मागील कथेपेक्षां जास्त हृदयंगम आहे.

हिचा प्रथम उल्लेख पदमोत्तर बुध्दाच्या काळींच सांपडतो. त्या शास्त्याच्या काळांत हंसवती नगरींत एका कुलगृहांत तिचें जनन झालेलें होतें. शास्त्याच्या धर्मप्रवचनास ती गेली होती व एके दिवशीं शास्त्यानें भिक्षुणीसंघांतील क्षिप्राभिज्ञ भिक्षुणींमध्यें [2] एका भिक्षुणीस अग्रस्थान दिलेलें पाहून आपणासहि तें लोभनीय स्थान प्राप्त व्हावें, अशी उत्कटेच्छा त्याच्यासमोर तिनें प्रथित केली. पुढील आयुष्यक्रम पुण्यकर्मांत खर्च

---

१: सारिपुत्तानें. सारिपुत्तास "धर्म सेनापति" असें नांव देण्यांत आलें होतें.

२: क्षिप्राभिज्ञ (पाली-खिप्पाभिञ्ञ) ज्यास किंवा जीस आभिज्ञाची प्राप्ति सौकर्यानें व लौकर झाली आहे तो किंवा ती. बुद्धघोषाचार्यांनीं आपल्या विशुद्धिमार्ग नांवाच्या ग्रंथांत 'किती प्रकारची समाधि ?" असा उपन्यास करून त्याचें उत्तर देतांना क्षिप्राभिज्ञतेचा विस्तार केलेला आहे. योग्यास अहितकर अशा गोष्टींचा अंगीकार केल्यामुळें त्याचा मार्ग दुःखद होतो व त्यास आभिज्ञा मिळण्यास फारच विलंब लागतो; पण योगावचर भिक्षु किंवा भिक्षुणी जर फक्त पथ्यकारक गोष्टींचाच अंगीकार करून समाधीचा मार्ग आक्रमण्याचा प्रयत्न करील, तर त्याला किंवा तिला अभिज्ञा फारच लौकर प्राप्त होतील. प्रतिपदा–समाधीचा मार्ग. ( विसुद्धिमग्ग–Vol. I–P. T. S.–Mrs. Rhys Davids–पृष्ठ. ८७ ).

करून पुण्यसंस्कारांची वाढ केल्यावर देवलोकीं व मनुष्यलोकीं जन्म घेत असतांना हजारकल्पें लोटलीं. त्यानंतर काश्यप बुध्दाच्या काळीं किकी राजाच्या सप्त कन्यकांपैकीं एक कन्यका म्हणून ती जन्मास आली व २०००० वर्षें शीलांचे संगोपन करून कुमारब्रम्हचर्याचरण करून तिनें भिक्षुसंघाकरिता एक निवास स्थान बांधवून तें संघास दान केलें. पुढें एक बुध्दन्तरपर्यंत देवमनुष्यांमध्यें संसरण करीत करीत गौतमबुध्दाचें जन्मकाळीं राजगृहनगरांतील एका श्रेष्ठीकुलांत तिनें जन्म घेतला. तिचें नांव भद्रा असें होतें.

## ( २ )

## गौतमबुद्धकालीन–चरित्र.

कर्मधर्मसंयोगानें ज्यादिवशीं भद्रेचा जन्म झाला; त्याचदिवशीं त्याच नगरांत राजाच्या पुरोहितालाहि एक पुत्र झाला. त्याच्या जन्मकाळीं राजवाडयांतल्या हत्यारांपासून तों तहत पौरजनाच्या घरात असणारींहि सर्व आयुधें प्रज्वलित दिसूं लागलीं. दुसरे दिवशीं सकाळीं राजपुरोहित राजगृहीं गेला व "महाराजाना सुखानें निद्रा आली ना" असा त्यानें त्यास नेहमीप्रमाणें कुशल प्रश्न विचारला "आचार्य झोंपेच नांवकशाला घेतां?" राजानें उत्तर दिलें सर्व रात्रभर राजवाडयांतील आयुधें प्रज्वलित दिसावयास लागल्यामुळें झोंप येणार कशी" पुरोहित म्हणाला 'महाराजांनी त्याबद्दल आतां काळजी करूं नये. आपल्याच राजवाडयांतील आयुधें उज्वल झालीं असें नाहीं, तर सर्व नगरांतील आयुधें अशाप्रकारानें चकचकित झालीं होतीं "याचें कारण काय बरें. आचार्य?" "माझ्या घरीं चौर्य नक्षत्रावर एक मूल जन्मास आलें आहे. तो सर्व शहराचा भावि शत्रु म्हणूनच काय, जन्मास आला आहे. त्याचे हें पूर्व चिन्ह. त्यापासून आपणा स्वतःला कांहीं अनिष्ट नाहीं. तथापि महाराजांची इच्छाच असेल, तर त्याला दूर करतां येईल."

"नको नको," राजानें उत्तर केलें, जोंपर्यंत त्याच्यायोगानें आमचें अनिष्ट होणार नाहीं, तोंपर्यंत त्याला दूर करण्याचें आम्हांस प्रयोजन नाहीं."

इकडे राजपुरोहितानें त्याचें नांव " शत्रुक " असें ठेविलें; कारण त्याला वाटलें कीं, आपल्या जन्माबरोबरच आपलें नांव बरोबर घेऊन तो आला आहे.

याप्रमाणें राजपुरोहितगृहीं शत्रुक वाढत चालला होता व श्रेष्ठीच्या गृहीं भद्रा वाढत चालली होती. इकडे तिकडे रांगतां धांवता येऊं लागल्यापासूनच जेथें शत्रुक जाई, तेथील वस्तु दृष्टीस पडल्याबरोबर ती तो आपल्याबरोबर आणी व अशा रीतीनें तो आईबापांचें घर भरी. पित्यानें शिक्षा करून चौरकर्मापासून त्याला परावृत्त करण्याचा कितीक वेळां प्रयत्न केला; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कालेंकरून तो वयांत आला; पण सर्व प्रकार करूनहि त्याची ही प्रवृत्ति नाहींशी होत नाहीं, असें दिसून येतांच, त्याच्या बापानें दोन निळ्या रंगांचीं वस्त्रें त्यास दिलीं; व घर फोडण्याचीं सर्व उपकरणें त्याच्या हवालीं करून तो त्यास म्हणाला, " जा, याच धंद्यावर आपलें उदरपोषण कर ". इतकें बोलून त्यास त्यानें घराबाहेर घालवून दिलें.

त्या दिवसापासून शत्रुकाचा मार्ग खुला झाला. लोकांच्या घरावर घोरपडीची गरज भागविणारें असें एक यंत्र टाकून, त्याच्यासाह्यानें वर चढून भिंती वगैरे बांधकामास तो भोंके पाडी व घरांत शिरत असे. दुसऱ्यांच्या घरांत इकडे तिकडे पसरलेले सर्व जिन्नस, जणूं काय आपलेंच व आपणच ठेवले आहेत, अशा रीतीनें ते घेऊन तो चालता होई. यामुळें लौकरच संबंध शहरांत शत्रुकानें, न फोडलेलें असें एकहि घर राहिलें नाहीं.

एक दिवस राजरथांत बसून राजाची स्वारी नगरांतून चालली असतां, राजाचें लक्ष घरोघर दृश्य होत असलेल्या घरफोडाकडे गेलें व त्यानें त्याबद्दल आपल्या सारथ्यास प्रश्न केला. सारथ्यानें उत्तर दिलें, " महाराज, या नगरांत शत्रुक नांवाचा चोर प्रख्यातीस आला असून तो शहरवासीयांच्या घरांच्या भिंती फोडून त्यांतील चीजवस्त हरण करतो. त्याचा हा प्रताप आहे. "

राजवाड्यांत गेल्यावर राजानें नगरच्या कोतवालास बोलावून घेतलें व त्यास विचारलें, " कायहो ! या नगरांत शत्रुक नांवाचा चोर

असून त्यास तुम्ही कां पकडीत नाहीं? " "महाराज" कोतवालानें उत्तर दिलें."त्यास प्रत्यक्ष पाहण्याची आम्ही शिकस्त केली पण तो आमच्या दृष्टी-सच पडत नाहीं." "तें कांहीं नाहीं; जर आज तुम्ही त्या चोराला पकडलें नाहीं, तर तुम्हांस राजदण्ड भोगावा लागेल". कोतवालनें जेव्हां राजाचा हा निर्वाणीचा हूकूम ऐकला, "तेव्हां बरें महाराज, मी चोर हुडकून काढतो," असें म्हणून तो तेथून गेला व सर्व शहरभर आपल्या हाताखा-लील लोकांना पाठवून त्यानें जागजागी पहारे बसविले व रात्रीच्या समयीं तो चोर घर फोडून माल नेत असतांनाच, त्याला कोतवालानें पकडलें, व त्यास राजासमोर नेऊन उभें केलें.

राजानें असा हूकूम सोडला कीं, त्या चोरास नगरच्या दक्षिण द्वारानें घेऊन जावें व तेथें त्याला प्राणदण्डाची शिक्षा द्यावी राजाज्ञा ऐकून कोतवाल त्या चोरास राजदरबारांतून घेऊन गेला व चौकाचौका-वर त्या चोराच्या पाठीवर हजार फटके लगावून त्यास दक्षिण द्वाराकडे घेऊन चालला.

त्यावेळीं श्रेष्ठीकन्या (सु) भद्रा आपल्या दिवाणखान्यांत बस-ली होती. तिच्या कानावर नगरवासीयांचा कलकलशब्द येऊं लागला; तेव्हां तो कसला असावा बरें? हें पाहण्यासाठीं तिनें आपल्या दिवाण-खान्यांतील रस्त्यावरील खिडकी उघडली तों शत्रुक तिच्या दृष्टीस पडला. राजाधिकारी कोतवाल त्यास वधस्थानाकडे घेऊन चालला होता! त्यास पाहिल्या बरोबर—व तोहि त्या अवस्थेंत—तिनें आपल्या हृदयावर आपले दोन्हीही हात धरले. ती आपल्या शयनाकडे गेली व पलंगावर खालीं मान घालून अधोमुख होत्साती पडून राहिली. त्या कुलांतील सुभद्रा म्हणजे एकुलती एक कन्यका! तिच्या मुखावर यत्किंचित् हि जरी फरक झाला तरी तिच्या ज्ञातकांस तो पाहवत नसे! अर्थात् ती जेव्हा अशारीतीनें पलंगावर जाऊन पडून राहिली आहे, ही बातमी त्याना लाग-ली, तेव्हां ते लगेंच तिच्या भोंवती जमा झाले व तिला म्हणाले, "हे तूं काय करतेस, बाळे! तुला काय होत आहे!" "तुम्ही तो वध्यस्थाना-कडे चालविलेला चोर पाहिलांत काय?" तिनें शांतपणानें त्यांना विचा-रलें "होय, बाळे, आम्हीं पाहिला बरें!" "जर तुम्ही त्याला मजकडे

आणवून माझ्या हवालीं कराल, तर मी वांचेन; नाहीं तर मी मरणार म्हणून समजा !" ही असली अशक्य मागणी तिनें मागूं नये, म्हणून त्यांनीं हरएक उपाय केले, पण व्यर्थ ! तेंव्हां तिच्या मरणापेक्षां तिला वांचविणें हेंच श्रेयस्कर आहे, असा त्यांनीं निश्चय केला, लगेच तिचा पिता नगरसंरक्षकाजवळ गेला व त्यास हजार रुपयांचा लांच देऊन त्याची विनवणी करून त्यानें त्यास सांगितलें, "माझ्या मुलीचें मन त्या चोरावर बसलें आहे. कसेंहि करा, पण ह्या चोराची मुक्तता करा!" कोतवालानें 'बरें' आहे म्हणून उत्तर दिलें; व श्रेष्ठि निघून गेला. इकडे कोतवालानें सायंकाळ होईतोपर्यंत शत्रुकास शहरांतून इकडे तिकडे हिंडविलें व सूर्यास्त झाल्यानंतर काळोख पडत चालला असतां, बंधनागारांतून एका चोरास आणण्याचा हुकूम केला. तो आल्यावर शत्रुकाची बंधनांतून मुक्तता करून, त्यानें त्यास श्रेष्ठीच्या घरीं रवाना केलें; व त्याच बंधनांनीं त्या आणलेल्या चोरास बांधून शहरच्या दक्षिण द्वारानें नेऊन त्याचा वध केला ! श्रेष्ठीच्या दूतांनीं शत्रुकास आपल्या धन्याच्या घरीं नेऊन त्याच्या स्वाधीन केलें. आतां आपण आपल्या लाडक्या कन्यकेची इच्छा पुरी करूं, असें म्हणून त्या श्रेष्ठीनें शत्रुकास आपल्या चाकराकडून उटणें वगैरे लावून सुवासिक अशा पाण्यानें न्हाऊ घातलें व त्याला सर्व प्रकारच्या आभरणांनीं मण्डित करून, त्यास घेऊन तो आपल्या कन्यकेच्या महालांत गेला व त्यानें त्यास तिच्या हवालीं केलें. तिच्या आनंदास पारावार राहिला नाहीं ! "माझे मनोरथ आज परिपूर्ण झाले", असें म्हणून तिनें उत्तमोत्तम व मूल्यवान वस्त्रें परिधान करून ठेवणीचें अलंकार अंगावर घातले, व अलंकारविभूषित होत्साती तिनें त्याचें स्वागत केलें, व तदनंतर त्याची ती परिचर्या करूं लागली.

शत्रुक हा अशा प्रकारचें अनुपम सुख भोगीत असतां, कित्येक दिवस गेले. श्रेष्ठीचा जांवई होण्याचा मान मिळाला असतां, आपलें मागील वर्तन बदलून सद्वर्तनानें वागावयाचें, हाच पथ्यकर मार्ग त्याच्यापुढें होता; पण जन्मापासून चौर्यकर्माकडे प्रवृत्ति असल्यामुळें, त्याची दृष्टि आपल्या पत्नीवरच नठरतां फक्त तिच्या त्या उत्तमोत्तम अलंकारांवरच गेली. एकदिवस तो मनाशीं म्हणूं लागला, "तिच्या अंगावरील ते उत्तमोत्तम

व माल्यवान दागिने मला मिळालेच पाहिजेत. वाटेल तें करीन आणि ते बळकावीन." असें म्हणून लौकरच तो व ती कन्यका एकांतसुखांत बसली असतांना तो भद्रेला म्हणाला, "माझ्या मनांत पुष्कळ दिवसांपासून तुला एक गोष्ट सांगावयाची आहे, ती मला एकदां सांगितलीच पाहिजे." भद्रेचा आनंद गगनांत मावेना. आपल्या प्राणवल्लभानें आपण होऊन आपणास आपल्या गुह्याची गोष्ट सांगण्याची उत्कंठा दाखवावी, यापरतें दुसरें सौख्य तिला कोणतें वाटावें! जणुंकाय, सहस्रनाणीं प्राप्त झाल्याचा आनंद तिला झाला व ती म्हणाली, "आर्य, हें काय सांगणें! अगदीं निःशंक रीतीनें सांगावें बरें!"आतां आपला डाव टाकावयास योग्य वेळ आहे, असें पाहून तो बोलूं लागला, " लाडके, तुला असें वाटणें साहजिक आहे कीं, तुझ्यामुळें माझा जीव वांचला. खरें म्हटलें असतां गोष्ट फार निराळी आहे. जेव्हां मला कोतवालाच्या दूतांनीं पकडलें,तेव्हां आतां आपण या संकटांतून मुक्त होण्याकरितां कोणाचा तरी धांवा केला पाहिजे, असा विचार करून चोरप्रपात नांवाच्या पर्वतावर असलेल्या देवीचा मी धांवा केला व मनांत असा नवस केला, 'जर मी यांतून जिवंत राहिलों तर हे देवी, तुला मी एक बलि समर्पण करीन!' त्या देवीच्या कृपेमुळें आज मी वांचलों पहा! आतां एकदां लौकरच तो नवस फेडला पाहिजे नव्हे?"

सुभद्रेनें उत्तर दिलें, हें काय बरें विचारावयाचें? आपल्या इच्छेप्रमाणें वागावयाचें हें तर माझें व्रतच आहे. ही पहा; मी आतांच तयारीस लागतें, असें म्हणून तिनें झटकन् बलिकर्माची तयारी केली व आपल्या सर्व भूषणांनीं विभूषित होऊन ती आपल्या नवऱ्याकडे गेली व 'तयारी झाली आहे, आतां निघावयास हरकत नाहीं," असें तिनें त्यास सांगितलें. नंतर पित्याचे दास बरोबर घेऊन तीं दोघे एका यानांत बसून पर्वताकडे जाण्यास निघालीं. पर्वताच्या पायथ्याशीं आल्यावर सर्वजण वर चढावयास लागले.

आतां शत्रुकापुढें मोठा प्रश्न पडला.जर सर्वजण तो पर्वत चढावयास लागून आपणाबरोबर आले तर तिचीं आभरणें काढून घेऊन पळावयास अवकाश सांपडणार नाहीं. म्हणून एकटीलाच घेऊन वर चढलें

पाहिजे, असा निश्चय करून आपल्या पत्नीच्या आज्ञेनें त्यानें बरोबर आलेल्या सर्व नोकरांस मागेंच रहावयास लाविलें; व बलीकर्माचें भाजन घेऊन तीं दोघेंच वर जावयास लागलीं. पर्वत चढत असतां त्याच्या मुद्रेवर नानाप्रकारच्या विकारांची छटा उमटत होती. "स्वभावो दुरतिक्रमः" हें सुभाषित किती यथार्थ आहे ? तिच्या अलौकिक प्रेमाची त्याला काय खातरजमा होती? जन्मापासून चोरी करणें, हेंच इतिकर्तव्य होऊन बसल्यामुळें त्याचें सर्व लक्ष्य त्या सुंदर युवतीकडे किंवा तिच्या दिव्यप्रेमाकडे नसून फक्त तिच्या शरीरावरील बहुमोल आभरणांवर होतें.त्याच्या अन्तःकरणांत दुर्वासनांचेंच साम्राज्य असल्यामुळें तेथें सद्वासनेचा एखादा किरणहि उद्भवणें अशक्यच होतें. शेवटीं त्यानें भयंकर मुद्रा धारण केली व मधेंच थांबून तिच्याकडे तोंड केलें व तो तिला म्हणाला " भद्रे, तुझ्या अंगावरचें हें वस्त्र काढ व त्यांत तुझ्या अंगावरचे सर्व दागिने घालून एक बोचकें तयार कर पाहूं."

शत्रुकाचें मध्येंच थांबणें, आपणाकडे तोंड करणें, व धमकीवजा वाक्य उच्चारणें, या सर्वांचा त्या कोमळ व प्रणयसर्वस्व कन्यकेवर फारच विलक्षण परिणाम झाला ! ज्याला आपण फांसावरून माघारीं आणला, ज्याला आपण आपलें जीवनसर्वस्व करून टाकलें, ज्याच्यासाठीं आपण कोणतीहि गोष्ट करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, त्याच मनुष्यानें आपल्या स्वभावाचें असें आविष्करण करावें, यास काय म्हणावें, हेंच तिला कळेना. एखादीस या कृतघ्नपणामुळें वेडच लागलें असतें.पण भद्रा इतकी दुदुखुळी नव्हती. प्रथम तिला आपला अबलासुलभस्वभाव दूर करतां येणें शक्य नव्हतें; म्हणून ती त्यास म्हणाली, " स्वामी, या दासीकडून काय अपराध घडला ? " ह्या कोमल व कातर वाणीनें उच्चारलेल्या प्रश्नाचा शत्रुकावर काय परिणाम होणार ! त्याचें मुखावर एकप्रकारचें विकटहास्य मात्र विलसावयास लागलें व त्यामुळें त्याचा चेहरा त्यास्थळीं सुभद्रेस ज्यास्तच भेसूर दिसावयास लागला. " पोरी, " तो म्हणाला, "तुला असें वाटलें कां, मी येथें जो आलों आहे तो बलिकर्म करण्यासाठीं ! फार काय सांगू, या देवतेचें यकृत (पाली-यकन) सुद्धां बाहेर काढून खाऊन टाकण्याची धमक माझ्या अंगांत आहे. बलिकर्माच्या निमित्तानें

तुझ्या दागिन्यावर डल्ला मात्र मारण्यासाठीं मी तुला येथें घेऊन आलों आहे. समजलीस ".

"महाराज, हे दागिने कोणाचे ? व मीहि कोणाची ?" मोठ्या काकुळतीच्या स्वरांत तिनें त्याला प्रश्न केले. "मी तें कांहीं जाणत नाहीं," त्यानें उत्तर दिलें, "तुझी चीजवस्त निराळी, माझी चीजवस्त निराळी, मी तुझी चीजवस्त घेणार हें जाणतों."

अशा नरपशूशीं वाद करण्यांत कांहीं हंशील नाहीं, असा तिनें विचार केला. तिच्या ह्या निसर्गतः प्रणयप्रचुर अन्तःकरणावर दारुण आघात झाला! तिचें तें अलोट प्रेम अस्तगत झालें. तिच्या प्रकृतिप्रमत्त स्वभावाचें वज्रमय अन्तःकरणांत रूपांतर झालें. एखादें गरीब बिचारें मांजर सुद्धां कोंडून ठेवल्यास जिवावर उदार होतें. मग ती तर बोलून चालून मनुष्य होती. तिनें लगेंच मनाचा निश्चय केला; पण मुखावर कांहींहि परिणाम न दाखवितां त्यास ती म्हणाली, "प्राणनाथ, फार उत्तम. आपली इच्छा पुरी करणें हेंच तर माझें ध्येय! पण दासीची शेवटची एक इच्छा आहे, ती आपण नाहीं कां पुरविणार! या माझ्या शरीरावरील अलंकारांनीं युक्त असतांनाच आपणांस आलिंगन द्यावें, अशी या दासीची इच्छा आहे. ती आपण नाहीं कां सफल करणार ?"

स्त्रीजातीच्या " अशिक्षितपटुत्वा"ची कविकुलगुरु कालिदासानें कितीं यथार्थकल्पना आणून दिली आहे ! त्या शत्रुकास दागिन्यांच्या लोभापुढें इतर कांहींहि दिसत नव्हतें. त्याची सर्व धूर्तता त्या एका विचारानें लुप्तप्राय करून टाकिली होती. तिच्या या मागणींत काय हेतु आहे, हें यावेळीं समजण्याची अक्कल त्याच्या अंगीं नव्हती. तो विवेकभ्रष्ट झाला होता! त्यानें तिचें म्हणणें लगेंच कबूल केलें; व 'चल आटप,' असें दर्शविणाऱ्या मुद्रेनें तो तिच्यासमोर उभा राहिला!

सुदैवानें म्हणा किंवा दुर्दैवानें म्हणा, तें जोडपें जेथें उभें होतें, तो पर्वताचा प्रपात होता. तें जेथें उभें होतें, तेथें त्यांच्या डोक्यावर सुळक्यासारखा एक पर्वत गगनास भेदित गेला होता, तर त्यांच्या पायांपासून जवळच एक खोल दरी आ करून पसरली होती. शत्रुक

उभा राहिला असतां तिनेंहि मोठ्या प्रेमदर्शक मुद्रेनें त्याला आलिंगन दिलें, व आलिंगन देतां देतां मोठ्या धैर्यानें तो असावध असतांना, आपण जरा दूर उभें राहून त्यास खालच्या दरींत ढकलून दिलें. वातावरणांतून खालीं पडत पडत तो खालील दरींत चूर्णविचूर्ण होऊनच पडला. त्यावेळीं त्या पर्वतस्थ देवतेनें सुभद्रेचें हें विलक्षण हुषारीचें कृत्य पाहून तिची स्तुती करण्याच्या हेतूनें पुढील अर्थाच्या गाथा म्हटल्या.[1]:—

"१ सर्वच ठिकाणीं पुरुष शहाणे म्हणून दिसून येत नाहींत; तर निरनिराळ्या ठिकाणीं स्त्रीसुद्धां विचक्षण म्हणून ठरते !"

"२ सर्वच ठिकाणीं पुरुषच शहाणे म्हणून दिसून येत नाहींत, तर मुहूर्तभर विचार करून स्त्रीहि पंडित होऊं शकते !"

या धाडसाच्या कृत्यानंतर सुभद्रा शुद्धीवर आली; व तिनें आपल्या परिस्थितीचें नीट अवलोकन केलें. ती आपल्याशीच म्हणूं लागली, " अशा परिस्थितींत आतां घरीं परत जाण्याचें तर नांवच नको. आतां उत्तम उपाय म्हटला म्हणजे निर्ग्रंथांच्या[2] आरामामध्यें जाऊन प्रव्र-

---

१: मूळ गाथा अशा:—

न सो सब्बेसु ठानेसु पुरिसो होति पण्डितो ।
इत्थीऽपि पण्डिता होति तत्थ तत्थ विचक्खणा ॥ १ ॥
न सो सब्बेसु ठानेसु पुरिसो होति पण्डितो ।
इत्थीऽपि पण्डिता होति मुहुत्तमपि चिन्तयेऽति ॥ २ ॥

२: निर्ग्रन्थ ( पाली–निगण्ठ ) जैनांचें नांव. बुद्धाच्या काळीं जे मोठे गणाचार्य, संघाधिपति, आचार्य, व लोकसम्मत असे शिक्षक होते, त्यांच्यांत निर्ग्रन्थ नाथपुत्त याचीहि गणना होते. नाथपुत्त किंवा नातपुत्त असे दोन्हीहि शब्द रूढ आहेत. त्यांचा संस्कृतपर्याय म्हणजे " ज्ञातिपुत्र " असा आहे. जैनांचा शास्ता जो महावीर त्याचें हें नांव आहे. महावीर गौतमापेक्षां वयानें मोठा होता. त्याच्याहि अनुयायांचे आराम असत; व एकावेळीं जैन व बुद्ध हे दोन धर्म उत्तरहिंदुस्थानांत रूढ असून, पुढें बुद्धधर्माचा विजय झाला. जैनाचा मुख्य भर आत्मक्लेशावर होता. त्यांचें म्हणणें दुःसह अशा तपांनीं, उपवासांनीं व देहदंडांनीं सुखाची प्राप्ती करून घ्यावयाची असते. अर्थात् गौतमास हा मार्ग सर्वस्वी संमत नव्हता. त्यास तो "अत्तकिलमथानुयोग" असें म्हणे. जैनमताचा थोडक्यांत अनुवाद मज्झिमनिकायाच्या मूलपण्णासकांतील " चूळदुक्खक्खन्ध-सुत्तांत " केला आहे. ( पहा–राजवाडेकृत देवनागरी पुस्तक पृष्ठ. ६८–६९. )

ज्या देण्याविषयीं त्यांना याचना करणें; व आयुष्याच्या पुढील क्रमास सुरवात करणें हा होय. असा निर्धार करून,तीत्या डोंगरावरून खालीं उतरली व निर्ग्रंथाच्या आरामांत जाऊन ती आरामाधिपतीकडे गेली व त्यास वंदन करून म्हणाली, ‘ महाराज, सर्वसंगपरित्याग करून मी आपणाकडे प्रव्रज्या मागण्यास आलें आहें; तरी ती मला देण्याची कृपा करावी.” त्यानें उत्तर दिलें “ भगिनी, प्रव्रज्या देण्यास माझी संमति आहे. तुला कोणच्या विधीनें प्रव्रज्या घेण्याची इच्छा आहे ?” जें विधान अत्यंत कठीण, अतएव अत्यंत श्रेष्ठ असेल, त्या विधानाचा अवलंब करून प्रव्रज्या घेण्यास मी तयार आहें,असें तिनें त्यास उत्तर दिलें ! ‘ बरें ’ असें म्हणून त्या निर्ग्रंथांनीं तालपर्णाच्या चिमट्यानें तिच्या केशांचें लोचन केलें; [1] व तिला प्रव्रज्या दिली ! पुन्हां जेव्हां केस वाढले तेव्हा कुंडलाप्रमाणें कुरळे होत होत ते वाढत गेले, व तेव्हांपासून तिला कुंडलकेशा हें नामाभिधान प्राप्त झालें. भद्रेनें प्रव्रज्या धारण केल्यापासून त्याच आरामांत राहून जैन शासनाचा अभ्यास करण्यास सुरवात केली. कुशाग्रमतीच्या जोरावर ती त्यांत थोड्याच काळांत पारंगत झाली; व आतां शिकावयाचें कांहीं एक राहिलें नाहीं, असें पाहिल्यानंतर ती गांवोगांव विद्यासंपन्न लोकांचे शोधाकरितां हिंडूं लागली. ज्याच्याजवळ जी नवीन विद्या असेल, ती शिकावी व पुढें जावें, असा तिनें क्रम ठेविला. याचा परिणाम म्हणजे तिच्यापुढें उभे राहून वादविवाद करण्यास कोणीहि धजेना; व आपणाशी आतां कोणीहि वाद करण्यास समर्थ नाहीं, अशी तिची खात्री पटल्यावर तिला आतां वादविवाद करून जयपत्रें मिळविण्याची इच्छा झाली व तदर्थ ती मोठमोठीं गांवें, शहरें व राजधान्या हिंडावयास लागली. तिचा क्रम असा असे:-नगरांत प्रवेश करण्यापूर्वी नगरद्वाराजवळ वाळूची एक रास करावयाची

[1]: केशलोचन-केस उपटणें-जैनसाधू हे वैराग्यार्थ स्वतःचे केश उपटून काढतात. ब्राह्मणऋषि केश वाढवून त्यांत प्राण्यांना आश्रय देतात. पण हें जैनांना संमत नाहीं. प्रस्तुत लेखकास बारामती येथें हा केशलोच समारंभ पहावयास मिळाला. जैनसाधूंच्या मनाची तयारी जरी खंबीर असली, तरी हा देहदण्ड आत्म्याला त्रासदायक तर खराच! कुण्डलकेशेनें जैनांच्या अत्यंत खडतर अशा पद्धतीनें केशलोच करवून घेतला व आपला करारीपणा व्यक्त केली.

व त्यांत जंबुवृक्षाची एक शाखा रोवून ठेवावयाची. शेजारीं जमलेल्या पोरकांना सांगून ठेवावयाचें कीं,' बाळकांनो,'तुमच्या गांवांतील जो कोणी माझ्याशीं वाद करण्यास समर्थ असेल, त्यानें ही शाखा उपटून मोडून तोडून टाकावी." जर सात दिवसपर्यंत कोणीहि ती उपटली नाहीं, तर त्या गांवांत आपणाशीं वाद करण्यांस कोणीहि समर्थ नाहीं, असें समजून ती त्या गांवाहून निघून जाई. अशा रीतीनें जयपत्रें मिळवून विद्येच्या मदानें उन्मत्त होत्साती ती गांवोगांव व शहरचीं शहरें हिंडून,भगवान् बुद्ध श्रावस्ती नगरांत अनाथपिण्डिकाच्या आरामात राहात असतां, श्रावस्ती नगरच्या वेशीच्या द्वाराशीं येऊन पोहोंचली. आपल्या नेहमींच्या शिरस्त्या-प्रमाणें तिनें वाळूची रास बनविली व त्यांत जंबुवृक्षाची एक शाखा रोवून शेजारच्या जमलेल्या बालकांपाशीं आपला निरोप ठेऊन, तिनें शह-रांत प्रवेश केला.

त्याच सुमारास धर्मसेनापति सारिपुत्त हा भिक्षुसंघ अगोदरच गांवांत गेल्यामुळें, एकटाच शहरांत प्रवेश करण्याच्या इराद्यानें नगरच्या द्वाराशीं आला; व तेथें एक वाळूचा ढीग व त्यावर दिसणारी जंबुवृक्षाची एक शाखा पाहून, त्याला कौतुक वाटलें. व शेजारच्या मुलांच्या नेहमींच्या स्वभावानुसार त्यांनीं सर्व हकीगत सारिपुत्तास कथन केली. "असें जर असेल" तो म्हणाला, "तर मुलांनो, तुम्हींच ती शाखा उपटा व तुडवा पायाखालीं." कांहीं जण तसें करण्यास धजावले नाहींत.पण इतरांनीं लगेच जाऊन त्या फांदीचे तुकडे तुकडे करून टाकले. इतकें झाल्यावर सारिपुत्त निघून गेला.

मध्यंतरीं आपलें भोजनकृत्य उरकून कुण्डलकेशा नगरद्वाराशीं येऊन पाहते तों आपल्या फांदीची विपन्नावस्था झालेली. हें पाहून त्याबद्दल चौकशी करण्यास तिनें सुरवात केली व लौकरच तिला सर्व हकीकत कळून चुकली. "अशा रीतीनें माझ्या फांदीची दुर्दशा करणारा मनुष्यहि मोठाच असला पाहिजे, त्याशिवाय असलें काम करण्यास तो धजला नाहीं खास ! आपण तर बोलून चालुन क्षुद्र. तेव्हां एकट्यानेंच याचा निकाल न लावतां, गांवांतील सर्वांना बोलावून सर्वांच्या समक्ष याचा निकाल करून घ्यावा," असा विचार करून प्रथम नगरांतील नि-

निराळ्या परिषदांना[१] ही हकीकत सांगून त्यांना तिनें निमंत्रण केलें व अशा रीतीनें ८०,००० कुटुंबांना ही बातमी कळली व तीं एकत्र झालीं. मग त्यासह ती सारिपुत्ताकडे गेली. त्या वेळीं तो स्थविर भोजनकृत्य सारून एका वृक्षमूलाशीं बसला असतां, ती एका मोठ्या जनसंमर्दास बरोबर घेऊन त्याकडे गेली, व कुशल प्रश्न झाल्यावर एकीकडे जाऊन बसली असतां तिनें त्यास पुढील प्रश्न विचारला. " भन्ते, आपल्याच अनज्ञेनें माझी वृक्षशाखा बुडवली गेली काय ! " होय, भगिनी, मींच सांगितल्यावरून दारकांनीं तिची तशी वासलात लावली, " ठीक आहे, असें असेल तर तुमच्या बरोबर आमचा वादविवाद झाला पाहिजे." सारिपुत्तानें उत्तर दिलें, "फार उत्तम. आपणांपैकी प्रथम कोणी कोणास प्रश्न विचारावयाचे, व कोणी कोणास उत्तरें द्यावयाचें!" "अर्थात् प्रथम प्रश्न विचारणें हा माझा हक्क आहे," तिनें वरा तोऱ्यांत व उत्तर दिलें. सारिपुत्तानें शांतपणानें सांगितलें, " कांहीं हरकत नाहीं. आपणास जें अवगत असेल, त्यांतून आपण मला प्रश्न विचारावेत. "

सर्व जनसंमर्द तटस्थ राहिला! कुण्डलकेशा प्रश्न विचारीत होती, व सारिपुत्त तिला उत्तरें देत होता. समाजांतून साधुवाद निघत होता. अशारीतानें तिनें शक्य तितके प्रश्न त्याला विचारले, व त्या सर्वांचीं उत्तरें तिला समाधानकारक मिळालीं; व ती स्तब्ध झाली.

तिच्या मनाची अशी स्थिति पाहून सारिपुत्त तीस म्हणाला, " भगिनी, ! आपण मला पुष्कळ प्रश्न विचारले; व या समाजासमोर

---

१: परिषद् ( पाली–परिसा ) समाज–जमात–संघ. या शब्दावरून तत्कालीन समाजाची रचना किंवा विभागणी कोणत्याप्रकारची होती, याची कल्पना करितां येते. उपनिषदकालापासूनच परिषद् या शब्दास प्रामुख्य आलें आहे. " श्वेतकेतु हा पांचालांच्या परिषदेकडे गेला," अशा प्रकारचें वाक्य उपनिषदांत सांपडतें. विद्वान् किंवा पण्डित लोकांचें मंडळ किंवा सभा या अर्थावरून पुढें समाज किंवा जमात असा अर्थ झाला असावा पालीवाङ्मयांत चार प्रकारच्या परिषदा सांगितलेल्या आहेत. त्यांची नांवें अशीं:—खत्तियपरिसा, ब्राह्मणपरिसा, गहपतिपरिसा व समणपरिसा. याशिवाय स्वर्गलोकांतील चार निरनिराळ्या परिषदांचाहि उल्लेख आहे. या निरनिराळ्या परिषदांच्या योगानें समाजांतील निरनिराळ्या जाति सुसंबद्ध असत. गुजराथेंत अद्यापीहि " महाजन " म्हणून संस्था आहे; तींत व परिषद् यांत बरेंचसें साम्य आहे.

मी आपणांस त्यांची उत्तरें हि दिलीं आहेत. मलाहि आतां आपणांस प्रश्न विचारण्याचा अधिकार अर्थातच प्राप्त झाला आहे. मी आपणांस आतां एकच प्रश्न विचारूं कां ! "

आतां कुण्डलकेशा काय उत्तर देते; याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले. समाज अगदीं उत्कंठित झाला होता. इतक्यांत कुण्डलकेशेनें शांतपणानें सांगितलें, " भन्ते, आपण एक प्रश्न खुशाल विचारावा." " तर मग, भगिनी, आपणांस मी एकच प्रश्न विचारतों, त्याचें उत्तर आपणास कळेल तसें द्या." "एक म्हणजे काय[1] !" याचें उत्तर आपण द्या. आतां मात्र श्रोतृसमाज अगदीं, अधीर झाला होता. त्यांच्या चित्तावरचा ताबा सुटत चालला होता. आतां कुण्डलकेशा काय उत्तर देते, या एकाच प्रश्नानें त्यांना भंडावून सोडलें होतें. कुण्डलकेशेचा धीर सुटत चालला होता. तिनें तो प्रश्न शांतपणानें ऐकला खरा; पण तिच्या अन्तरंगांत कोलाहल चालला होता. जयोन्मादाचा झटका आतां उतरत चालला होता. सारिपुत्त अगदीं शांतपणानें तिच्याकडे पाहात होता. इतक्यांत तिनें उत्तर

---

१. एक म्हणजे काय ? ( पाली—एकं नाम किं ? ) तत्त्वज्ञानांत जीं निरनिराळीं कूटें आहेत त्यांपैकीं हें एक आहे. हा प्रश्नच जरा अनिश्चित स्वरूपाचा आहे. " ज्यास एक ही संज्ञा आहे, तें कोणतें । " असा स्पष्ट प्रश्न होऊं शकेल. किंवा " सर्व सृष्टीस सरसहा लागूं पडणारी अशी एक गोष्ट कोणती ? " असाहि या प्रश्नाचा अर्थ होऊं शकेल. कुण्डलकेशा जर उपनिषदांतील तत्त्वावर विश्वास ठेवणारी असती. तर तिनें पटकन् सारिपुत्तास उत्तर दिलें असतें. कारण "एकमेवाद्वितीयम्। एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति।" अशा प्रकारचीं ब्रह्मप्रतिपादक वाक्यें उपनिषदांत पदोपदीं सांपडतात. सारिपुत्तानें सुद्धां हा जो प्रश्न तिला विचारला तो विचारण्यांत तिनें उपनिषदासारख्या ग्रंथांतील शिकवणीनुसार उत्तर द्यावें, अशी त्याची अपेक्षा नसावी, हेंच स्पष्ट होतें. म्हणून जरी कदाचित् असें धरून चाललें कीं, तिला उपनिषदांतील हीं ब्रह्मप्रतिपादक अशीं वाक्यें ज्ञात असती, तरी तिनें त्याचा उपयोग सारिपुत्तास उत्तर देण्याचे कामीं केला असतांच. बौद्धवाङ्मयांत अशाप्रकारचे प्रश्न आहेत, हें तिला ठाऊक नसावेंसें दिसतें. उदाहरणार्थ, खुद्दकपाठांत, " कुमारप्रश्न ", म्हणून जो भाग आहे, त्यांत " एकं नाम किं, " असा प्रश्न विचारला असुन त्याचें उत्तर, " सब्बे सत्ता आहारट्ठितिका ", असें उत्तर दिलेलें आहे. सर्व प्राणी आहारावर जगतात, ह्या उत्तरावरून " आहार " हाच एक सर्वसाधारणधर्म होय, असें उत्तर मिळावें अशी सारिपुत्ताची अपेक्षा असावी असें दिसतें.

दिलें,"भन्ते, मला या प्रश्नाचें उत्तर ठाऊक नाहीं""काय? भगिनी आपणास जर एवढ्या लहान प्रश्नाचें उत्तर ठाऊक नाहीं, तर आपणास इतर काय ठाऊक असणार बरें?" ह्या प्रश्नामुळें ती पूर्णपणें त्याच्या ताब्यांत गेली. ती त्याच्या पायां पडली व म्हणाली." महाराज,मी आपणांस शरण आल्यें आहे!" भगिनी मला शरण यावयाचें नसून सदेवक अशा लोकांमध्यें श्रेष्ठतर जे बुद्ध ते शेजारीं महाविहारांत राहत आहेत.त्यांच्याकडे जा व त्यांना शरण जा." "बरें महाराज, मी तसें करण्यास तयार आहे." असें तिनें उत्तर दिलें.

इकडे समाज निरनिराळे तर्क करीत,बुद्धाची तशीच त्याच्या श्रावकांची स्तुती करीत, व कुण्डलकेशच्या प्रौढीची निंदा करीत विस्कळित झाला व सर्वजण घरोघर गेले.

सायंकाळीं शास्ता धर्मदेशना करीत असतांना ती त्याच्याकडे गेली, व त्यास पञ्चाङ्गिक[1] नमस्कार करून एका बाजूस जाऊन उभी राहिली. शास्त्यानें तिचें संस्कारमर्दन करण्याच्या इराद्यानें धर्मपदांतील पुढील गाथा म्हटली. " अनर्थपदसंहित अशा हजारों गाथा जरी येत असल्या, तरी अर्थपूर्ण अशा एखाद्या गाथेची एकच जरी ओळ आली, तरी ती श्रेयस्कर होय? कारण ती ऐकून उपशम तरी प्राप्त होईल."[2] ही गाथा पुरी झाल्याबरोबरच, ती उभी असतांनाच तिला चारी पटिसंभिदांसह अर्हत्पद प्राप्त झालें. लगेच तिनें प्रव्रज्या मिळण्याबद्दल भगवंताची याचना केली,भगवंतानीं तीस प्रव्रज्या देण्याविषयीं अनुमती दिली. ती भिक्षुणीसंघाकडे गेली व मग तिला तेथें प्रव्रज्या मिळाली; व भिक्षुणीसंघांत तिला स्थान प्राप्त झालें.

---

१: पञ्चाङ्गिक-मराठींत ज्यास साष्टांग नमस्कार म्हणतात तो. मूळांत " पञ्चपतिट्ठितेन " असा शब्द आहे. ज्यांत पांच अंगें भूमीवर प्रतिष्ठित झालेलीं आहेत, असें वंदन.

२: मूळगाथा अशी:—

सहस्समपि चे गाथा अनत्थपदसंहिता ।
एकं गाथापदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ॥
( धम्मपद—P. T. S.—गाथानुक्रमनंबर १०१ )

जेव्हा कुंडलकेशेच्या अर्हत्पदसाक्षात्काराची बातमी सर्वत्र पसरली, तेव्हां चारीहि परिषदांमध्यें तिच्याबद्दल चांगली चर्चा सुरू झाली. "काय हो" लोक म्हणाले, "ही कुण्डलकेशा किती हुषार असली पाहिजे? कारण चार ओळींची एक गाथा संपण्याबरोबर तिला अर्हत्पदाची प्राप्ती व्हावी!" शास्त्याच्या कानावर तिच्याविषयींचा धन्योद्गार आला.

एक दिवस शास्ता संघासमवेत बसला असतां त्यांस भद्रा कुण्डलकेशेच्या धन्योद्गाराची आठवण झाली व याप्रसंगीं त्यानें अभिज्ञा लवकर जाणणाऱ्या भिक्षुणीमध्यें कुंडलकेशेस अग्रस्थान दिलें; अशा रीतीनें कुण्डलकेशेची फार प्राचीन काळापासून प्रथित केलेली इच्छा पुरी झाली.[1]

---

१: थेरीगाथेंत कुण्डलकेशेच्या तोंडीं पांच गाथा घातलेल्या आहेत. परमत्थदीपनींतील तिची गोष्टहि मनोरथपूरणींतील गोष्टीप्रमाणेंच आहे. जैनपंथांत असतांना तिच्या वादविवादपटुत्वाचा फायदा बौद्धधर्मांत आल्यावर तिला पुष्कळच झाला असला पाहिजे. थेरीगाथेंत तिला " पुराणनिगंठी " असें म्हटलें आहे; कारण ती बौद्धधर्मांत येण्याच्यापूर्वी निर्ग्रंथांच्या आरामांत होती. ती म्हणते, " केशलोच करून, शरीरास पंक लावून एकवस्त्रधरा, अशा स्वरूपांत मी पूर्वी रहात होत्यें. निंद्य व अनिंद्य यांतील फरक मला कळत नव्हता. पण मी एक दिवस विरज अशा बुद्धाचें दर्शन घेतलें; व त्यास वंदन करून त्यांच्यापुढें अञ्जली करून उभी राहिल्यें. त्यानें ' भद्रे ये ' म्हणून मला उपसंपदा दिली. मी आज ५० वर्षें ऋणमुक्त होत्साती अंग, मगध, वज्जी, काशी व कोसल या देशांतून हिंडत असून राष्ट्रपिंडावर उपजीविका करून राहिलें आहे. ज्या उपासकांनीं मला पिंडपात दिला आहे, त्यांनाहि पुष्कळ पुण्य मिळालें आहे. अशारीतीनें ५० वर्षें जी भिक्षुणी देशांत हिंडून राष्ट्रपिंडावर उपजीविका करून राष्ट्राला जागवित होती, तिच्या हातून समाजाचें कांहींच कार्य झालें नाहीं काय ? (थेर व थेरीगाथा-P.T.S.-Oldenberg and Pischel पृष्ठ-१३४, गाथा १०७–१११ ).



# रत्न १० वें.

## भद्रा कापिला.*

### ( १ )

### पूर्वबुध्दकालीन चरित्र.

पूर्वजन्मांची स्मृति प्राप्त झालेल्या भिक्षुणींमध्यें भद्रा कापिलानी या भिक्षुणीनें अग्रस्थान पटकावलें आहे. हिच्या चरित्रासही इतर भगिनींप्रमाणेंच आरंभ पद्मोत्तरबुद्धाच्या काळापासून होतो. हंसवती नगरींत एका कुलगृहांत हिचा जन्म झालेला होता. शास्ता पद्मोत्तरबुद्ध धर्मचक्रप्रवर्तनाचें[1] कार्य अव्याहत करीत असतां, तिनेंहि त्याच्या धर्मदेशनेचा फायदा करून घेतला होता. एक दिवस त्याच्या धर्मकथाश्रवणास ती गेली असतांना शास्त्यानें एका भिक्षुणीस पूर्वजन्मस्मरणानें संपन्न असलेल्या भिक्षुणींमध्यें अग्रस्थान देतांना तिनें पाहिलें व आपणासहि तें स्थान प्राप्त व्हावें, अशी उत्कटेच्छा तिनें शास्त्यासमोर प्रार्थित केली; व पुढें शीलांचें पूरण करीत योग्य काळीं ती मरण पावली.

---

* भद्रा कापिला-( पाली-भद्राकापिलानि )प्रस्तुत चरित्रात दोन्हींहि नांवें वापरलेलीं आहेत, तीं एकाच व्यक्तीचीं निदर्शक म्हणून समजावीत.

१: धर्मचक्रप्रवर्तन ( पाली-धम्मचक्कप्पवत्तन ) धर्मप्रसारणेस सुरवात. शब्दशः-धर्मरूप चक्रास चालना देणें. पुढें पुढें तर धर्मचक्र हें बौद्धधर्माचें चिह्नच होऊन बसलें.जसा ख्रिस्तीधर्माचा क्रॉस तसेंच बुद्धधर्माचें चक्र हें चिन्ह आहे. अद्यापसुद्धां लेण्यांतून चक्र हें चिन्ह दर्शनीं दृष्टीस पडतें.

त्यानंतर शतसहस्रकल्पपर्यंत देवमनुष्यांच्या लोकांमध्यें जनन-मरणाच्या फेऱ्यांत ती सांपडली होती. या जन्मांचा उपयोग बुद्धधर्माच्या मताप्रमाणें पुढील स्थान प्राप्त करून घेण्याची तयारी करण्याकडे होतो. ज्या काळांत शासितबुद्धच जन्मास आला नव्हता, त्या काळांत तिचा जन्म वाराणसी नगरांत एका कुलगृहांत झाला होता. योग्य वेळीं तिचें लग्न झालें, व ती आपल्या पतीच्या घरीं राहावयास गेली.

एक दिवस ती व तिची जाऊ यांच्यामध्यें कलह झाला, व त्या-कलहाचें पर्यवसान एका वाईट गोष्टींत झालें. कारण त्या जावेनें एका प्रत्येकबुद्धास भिक्षापात्र भरून अन्न दिलें असता भद्रेस तें आवडलें नाहीं. अगोदरच त्या कलहामुळें तिच्या पोटांत रोष होताच; म्हणून त्या पुण्यकारक कृत्याची तिला कल्पनाच होईना. तिला वाटलें कीं, ही माझी जाऊ ह्या प्रत्येकबुद्धाला अन्न देऊन त्यास आपल्या ताब्यात आणण्या-चा प्रयत्न करीत आहे. या विचारानें पिसाळून जाऊन ती त्या प्रत्येक-बुद्धाकडे गेली व त्याच्या हातातून तें भिक्षापात्र हिसकावून घेऊन त्यांतील अन्न तिनें फेंकून दिलें व त्यांत चिखल भरला, व मग तें पात्र त्याच्या हातांत दिलें. शेजारच्या लोकांना ह्या तिच्या राक्षसी कृत्याचा फार राग आला व त्यांनीं तिची खूप खरडपट्टी काढली, ते म्हणाले, "भद्रे तू किती मूर्ख आहेस. तुझें व तुझ्या जावेचें भांडण व तू त्या जावेला तर कांहींच केलें नाहींस. त्या प्रत्येकबुद्धानें तुझा काय अपराध केला होता? ह्यांत तिला कांहींच शिक्षा झाली नाहीं. उलट तुला मात्र त्या पवित्र व सच्छीलमाणसास विनाकारण छळल्याबद्दल दण्ड होईल. हें ठाऊक आहे काय?" ह्या त्यांच्या कानउघाडणीनें तिला आपल्या मूर्खपणाच्या कृत्याबद्दल लाज उत्पन्न झाली. ती त्या प्रत्येकबुद्धाच्या मागें गेली; तिनें त्याच्या हातातून त्याचें भिक्षापात्र परत घेतलें. त्यांतील चिखल फेंकून दिला. तें धुवून टाकून गन्धचूर्णानें स्वच्छ घांसून काढलें व तें चतुर्विध अशा मधुर पदार्थांनीं भरून, तिनें त्या प्रत्येकबुद्धाच्या हवालीं केलें; व पद्मगर्भाच्या वर्णाप्रमाणें त्यांतील तूप भासमान् होत असतांना ती पुढील प्रार्थना उद्गारली, "ज्याप्रमाणें या पात्रांतील हा पिण्डपात उज्वल दिसत आहे, त्याप्रमाणेंच माझें हें शरीर तसेंच होवो!"

या तिच्या कृत्यानंतर तिला पुष्कळ जन्म आले. भगवान् काश्यपबुध्दाच्या काळांत ती एका संपन्न श्रेष्ठीच्या कुलांत जन्मास आली. पण मागील जन्मींच्या अकुशल कर्मानें तिचें शरीर दुर्गन्धिमय झालें. जो तो तिला टाळण्याचा प्रयत्न करूं लागला. श्रीमंताची कन्या, अलंकारांनीं सजलेली, पण स्वतःसुद्धां तीस खन्तिष्ट वाटे. इतराजवळ जावयास सुध्दां ती धजत नसे. अशा स्थितींत तिला आपलें जीवित कंटाळवाणें वाटावयास लागावें, यांत आश्चर्य नाहीं. शेवटीं तिला कोणीं एक उपाय सांगितला. तिनें आपल्या अंगावरील सर्व दागिने आटवून त्यांचा एक गोळा केला आणि बुध्दविहारांत जाऊन बुध्दापुढें तो ठेविला व कमलानीं भरलेली अज्जलि बुध्दापुढें करून तिनें त्यास वंदन केलें. तिच्या या अनन्यशरणभावनेमुळें तिच्या अंगाची दुर्गन्धि नाहींशी झाली व तिचें शरीर नितांतरमणीय भासावयास लागून तारुण्याची माधुरी त्यावर दिसावयास लागली.

त्यानंतर तिचें लग्न झालें, व संसारांतील सर्व सुखें आपल्या प्रेमळ पतीच्या संगतींत तिनें भोगिलीं. पण त्याबरोबर कुशल कर्माचें फळ तिला कळून चुकल्यामुळें तिनें तीं कर्मे करण्यांत कसुर केली नाहीं. ऐहिक यात्रा संपल्यावर तिचा पुनर्जन्म स्वर्गांत झाला व स्वर्गीय सुखें व आनंद ह्यांचा आस्वाद घेत घेत, ती तेथें बराच काळ राहिली. तेथील मर्यादा संपल्यावर या पृथ्वीवर वाराणसी नगरच्या राजाची कन्या म्हणून ती जन्मास आली. त्याहि जन्मांत राजघराण्यांतील सुखें भोगण्यांतच ती गर्क झाली नाहीं. मागील जन्मांच्या संस्कारांमुळें ती दानकर्मांत अत्यंत आनंद मानी. मुख्यत: दानमंगलांत तिनें पुढाकार घेतला, व प्रत्येकबुद्धांना दान देणें, त्यांचा परमार्ष घेणें, त्यांच्या सर्व गरजा भागविणें, त्याच्या संगतींत काल घालविणें व धर्मजिज्ञासा तृप्त करून घेणें, अशा रीतीनें तिनें आपल्या आयुष्याचा बराच काळ घालविला; परंतु ते बुद्ध एक दिवस निघून गेले; व त्यांच्या गमनानें ती फारच अस्वस्थ झाली. तिचें लक्ष घरांत लागेना. सर्वसंगपरित्याग करून अरण्यांत जावें व तपकर्मादि साधनें आचरावींत, असा विचार करून त्याप्रमाणें तिनें गृहत्याग केलाच! वनांत जाऊन ती राहिली व तेथें तिनें योगाभ्यास

केला व निरानिराळीं ध्यानें लावण्यांत ती निष्णात झाली. आयुर्मर्यादा संपल्यावर तिचा जन्म ब्रह्मलोकांत झाला व त्या ठिकाणीं भावनारामांत काळ लोटल्यावर ती पुन्हां अवनीतलावर सागल ग्रामांत कौशिकगोत्रीय ब्राह्मण कुलांत अवतीर्ण झाली.

( २ )

## गौतमबुध्दकालीन–चरित्र.

तें ब्राह्मणकुल संपन्न होतें. तिचें बाळपणहि मोठ्या सुखांत व ऐषआरामांत गेलें. तिला यौवनावस्था प्राप्त झाली, व तिचा विवाह मगधराष्ट्रांतील महातीर्थ म्हणून ब्राह्मणीगांवांतील एका संपन्न तरुणाशीं झाला. त्याला काश्यप किंवा पिप्पली अशीं दोन्हींही नावें होतीं. हिलाहि भद्रा कापिलानि असें नांव मिळालें; कारण ती कपिलेची मुलगी होय. महाकाश्यप व भद्रा हें अत्यंत प्रेमळ जोडपें होतें. दोघांच्याहि घरची स्थिति उत्तम प्रकारची, दोघेहि अनुरूपवय, अनुरुपशील, व अनुरुपगुण. त्यांचा संसार फार सुखानें चालला होता. त्याचें एकमेकावर पराकाष्ठेचें प्रेम होतें. एकाचें जें सुख तेंच दुसऱ्याचें सुख; एकाचें जें दुःख तेंच दुसऱ्याचें दुःख. महातीर्थग्रामांत हें आदर्श दंपत्य अशारीतीनें संसाराचा मौक्तिक प्रेमगाडा चालवीत असतांना, गौतमबुद्धाचें धर्मप्रसारणेचें कार्य चाललें होतें. अमृताचें द्वार खुलें झाल्यामुळें कित्येक दुःखी अन्तःकरणें तिकडे धांव घेत होतीं! ऐहिक सुखांत गर्क झालेलीं कित्येक अन्तःकरणें गौतमाच्या उज्वल तेजानें, वंदनीय आकृतीनें, प्रेमळ, शांत व हृदयस्पर्शी शब्दांनीं, किंवा चित्रोपम धर्मव्याख्यानांनीं खडबडून जागीं होऊन ज्ञानरवीच्या किरणांनीं जागृत होत्सातीं संसारावर पाणी सोडून जगाच्या संसाराची तयारी करण्यासाठीं त्या लोकोत्तर शास्त्याच्या निशाणा खालीं आपलीं नांवें नोंदवीत होतीं! कितीतरी तरुण गौतमाचे भिक्षु झाले होते! भिक्षु होणें हें काम म्हाताऱ्यांचें नव्हे, मध्यमवयस्थ लोकांचें नव्हे, तर तरुणांचे होय. मगधराष्ट्रांत गौतमानें तत्काळीं केवढी प्रचंड खळबळ उडवून दिली होती! "आला हा महाश्रमण!" अशाप्रकारचे भीति

अस्त उद्गार तेथील कुटुंबांतून बाहेर पडत. अशा परिस्थितींत तरुणकाश्यप स्वस्थ कसा बसला असेल? त्याला संसारांतील सुखें तुच्छ वाटावयास लागलीं! आपल्या प्रेमळ पत्नीच्या प्रेमाचें त्याला कांहींच वाटेनासें झालें! संसारावरील आसक्ति कमी झाली! त्यानें वैयक्तिक संसारावर तिलाञ्जलि दिली, आपली सर्व संपत्ति आपल्या प्रियतमेच्या हवाली केली, व तो गौतमाकडे निघून गेला. अशावेळीं भद्रा काय करीत होती? एखाद्या बलहीन युवतीप्रमाणें ती झुरणीस लागली होती? किंवा एखाद्या खुनशी स्त्रीप्रमाणें तिच्या प्रेमाचें सुडांत रूपांतर झालें होतें? किंवा संसारांतील आसक्तीमुळें आपल्या पतीच्या या चित्तविक्षेपाकडे तिचें लक्ष्यच गेलें नाहीं? किंवा तिला गौतमाच्या या धार्मिक व नैतिक चळवळीचें निदानच करतां न आल्यामुळें तीहि त्यास इतराप्रमाणें शिव्या देत सुटली होती? अशाप्रकारचे नानाविध प्रश्न वाचकांच्या मनांत उभे राहणें साहजीक आहे. पण आम्ही त्यांना एकच सांगतों कीं, तिनें यांपैकीं कांहींहि केलें नाहीं. तिला आपल्या पतीच्या ज्ञानासंबंधानें, त्याच्या विचारसरणीसंबंधानें, त्याच्या उदात्त स्वभावासंबंधानें, त्याच्या स्वाभाविक कुशाग्रबुद्धीसंबंधानें पूर्ण कल्पना आली असल्यामुळें तिनें दुसरें तिसरें कांहीं केलें नाहीं. आपला पति सर्वसंगपरित्याग करून प्रव्रज्या घेऊन शाक्यपुत्रीय श्रमणांच्या संघांत प्रवेश करण्यास चालला आहे, हें पाहून तिनेंहि आपली सर्व संपत्ति आपल्या ज्ञातिबांधवांना देऊन टाकली! तिनेंहि गृहिणीपदावर पाणी सोडलें, जी गोष्ट करणें आपल्या नवऱ्यास श्रेयस्कर वाटतें, ती आपणासहि श्रेयस्करच असली पाहिजे, अशी तिची खात्री पटली होती! इतकें दोघांचें एकीभवन झालेलें होतें! ज्या दिवशीं तें प्रेमळ जोडपें संसारावर पाणी सोडून त्या महातीर्थाच्या बाहेर पडलें, व मोठ्या उल्हासानें, व करारीपणामुळें बिलकुल विकृत न होतां मार्गास लागलें, त्या दिवशीं त्या गांवच्या लोकांना काय वाटलें असावें, याची कल्पना करणें आम्ही वाचकांवरच सोंपवितों. गौतमाच्या उज्वल स्वार्थत्यागानें व निःसीम पराभिहितबुद्धीनें व महाकारुणिकत्वानें मगधांतील स्त्रीपुरुषांवर केवढा जबरदस्त परिणाम केला असला पाहिजे याची अंधुक कल्पना त्यांना यामुळें करतां येईल. अस्तु.

भगवान् बुद्धानें भिक्षुसंघच सुरूं केला होता. अद्याप भिक्षुणीसंघांस सुरवात व्हावयाची होती. अद्याप शास्ता कपिलवस्तूस जावयाचा होता. अद्याप शाक्यांच्या कुलांतील महापरिवर्त घडून यावयाचा होता. अद्याप महाप्रजापती गौतमी ५०० शाक्यस्त्रियांसमवेत शास्त्याकडे विनंती करण्यास जाऊन तिची निराशा व्हावयाची होती. अद्याप आनंदाच्या मध्यस्थानें भिक्षुणीसंघाची स्थापना व्हावयाची होती. महाकाश्यपास गौतम बुद्धाकडे जातां आलें; तो व भद्रा बरोबर घराच्या बाहेर पडलीं खरीं; पण महाकाश्यपानें उजव्या हातचा रस्ता धरला; कारण त्या रस्त्यानें गेलें म्हणजे बहुपुत्रक न्यग्रोधवृक्षाखालीं बसलेल्या शास्त्याकडे जातां येत होतें. तो त्या मार्गानें गेला; कारण त्याची खात्री होती कीं, शास्त्याच्या भिक्षुसंघांत आपण प्रविष्ट होऊं. भद्रेची स्थिती याहून निराळी होती. भिक्षुणीसंघ स्थापन व्हावयास अवघ्या पांचवर्षांचा अवधि होता. तोंपर्यंत बुद्धाकडे जाणें शक्यच नव्हतें. म्हणून ती डाव्या रस्त्याच्या मार्गाला लागली व परिव्राजिकारामामध्यें प्रविष्ट झाली व तेथें तिनें पांच वर्षें घालविलीं.

मध्यंतरीं महाप्रजापतीनें भिक्षुणीसंघाची स्थापना केली; व ही बातमी ऐकल्याबरोबर भद्रेच्या मनांतहि आपण त्या संघांत प्रवेश करावा असें आलें. ती संघाकडे गेली व महाप्रजापतीकडूनच तिला प्रव्रज्या व उपसंपदा प्राप्त झाल्यानंतर विपश्यना वाढवून परिकर्म करीत असतांना तिला अर्हत्पदाची प्राप्ती झाली, व त्यांतहि पूर्वनिवासानुस्मृतींत ती विशेष रीतीनें पारंगत झाली.

इकडे महाकाश्यपहि संघांत प्रख्यातीस आला. पुढें पुढें संघांत जीं बंधनें शिथिल व्हावयास लागलीं, तीं पुन्हां दृढ करण्याच्या कामीं महाकाश्यपाची कामगिरी बहुमोल आहे! भगवान् बुद्धानें आपलें पंसुकूलचीवर त्याला देऊन त्याची योग्यता केवढी मोठी आहे, हें संघाच्या निदर्शनास आणून दिलें! गौतमाच्या परिनिर्वाणानंतरहि महाकाश्यपानें ५०० भिक्षूंची प्रथम महासंगीति भरविली व बौद्धशासनाचें परिशोधन करून त्याला बळकटी आणली व त्याचें एकीकरण केलें. जसें महाकाश्यपानें भिक्षुसंघांत नांव केलें, तसेंच भद्रेनेंहि भिक्षुणीसंघांत अग्रस्थान पटकावलें. शिवाय धर्मकथिका म्हणूनहि ती विख्यात झाली.

एक दिवस शास्ता जेतवनांत भिक्षुणींना त्यांच्या योग्यतेनुरूप स्थानें देत होता, त्या वेळीं भद्राकापिलानी हिच्यावर पाळी आली. तेव्हां शास्त्यानें पूर्वनिवासानुस्मृति असणाऱ्या भिक्षुणींमध्यें तिची अग्रस्थानीं योजना केली; व अशारीतीनें तिची दीर्घकालीनची इच्छा सफल झाली.[1]

---

१: संघांत प्रवेश केल्यावरहि भद्रेस काश्यपाच्या योग्यतेसंबंधानें केवढी मोठी जाणीव होती याची कल्पना थेरीगाथेंतील तिच्या तोंडीं घातलेल्या गाथांवरून करितां येते. ती त्यास "बुद्धाचा पुत्र व दायाद" म्हणून संबोधिते. तो त्रैविद्याधिपति असल्यामुळें तो खरोखरच ब्राह्मण आहे असें ती म्हणते. स्वतःबद्दल ती म्हणते, " काश्यपाप्रमाणेंच मीहि तिन्ही विद्या हस्तगत केल्या आहेत; मृत्यूवर जय मिळविला आहे; ससैन्य माराचा पराभव केल्यामुळें हा माझा शेवटचा जन्म आहे. जगतांत संकटें फार हें जाणून आम्हीं दोघांनींहि प्रव्रज्या घेतली, व त्यानंतर क्षीणास्रव (अर्हत्) होऊन, दान्त व शान्त होत्साते आम्हीं निवृत्त झालों आहों." अशा प्रकारें ह्या पूर्वाश्रमांतील दंपतीनें आपल्या आयुष्याला निराळें वळण देऊन दोघांनींहि आपलें कर्तव्य बजाविलें. भद्रा ही उत्तम प्रकारची धर्मकथिकाहि होती, ( पहाःविनय-Oldenberg's Edition-iv-290-292) संघांत शिरून प्रव्राजित झाल्यावर जगताचा संसार करण्यास मोकळीक आहे, अशी प्रामाणिक समजूत बुद्ध बरोबरच भिक्षूंची व भिक्षुणींचीहि असल्यामुळें बहुजनहितासाठीं प्रव्रज्या घेणें ही अत्यावश्यक गोष्ट आहे, ही तत्कालिन कल्पना स्पष्ट होते. बहुतेक भगिनींनीं अर्हत्पद प्राप्त करून घेतल्यावर पुढें लोकसंग्रहाचेंच काम केलेलें आहे, असें दिसून येतें. भद्रा कापिलानीचें चरित्रासाठीं थेरथेरीगाथा-Oldenberg and Pischel पृष्ठ. १३० गाथा ६३-६६ पहा.

# रत्न ११ वें.

## भद्राकाञ्चना *

### ( १ )

### पूर्वबुध्दकालीन-चरित्र.

भिक्षुणीसंघांत जीस महाभिज्ञा प्राप्त झाल्या आहेत, अशी एकटीच भद्राकांचना ही होय. बौध्द शासनाप्रमाणें प्रत्येक बुध्दास महाभिज्ञासंपन्न असे चारच श्रावक असावे लागतात. इतरांस अभिज्ञा[1] प्राप्त होतात, नाहीं असें नाहीं. पण त्या " महाभिज्ञा " नसतात. इतर श्रावकांस फक्त शतसहस्रकल्पपावेतोंच गतजन्मांचें ज्ञान असूं शकतें, परंतु या चार श्रावकांना मात्र, महाभिज्ञा प्राप्त झाल्यानंतर असंख्य युगांचें ज्ञान असतें. शतसहस्र अशा असंख्येयांच्या पलीकडीलहि स्मरण त्यांना होऊं शकतें !

---

* भद्राकाञ्चना ( पाली-भद्दाकच्चाना ) प्रस्तुत चरित्रांत दोन्हींहि नांवें वापरलेलीं आहेत; ती एकच व्यक्ति दाखवितात.

१: अभिज्ञा ( पाली-अभिञ्ञा ) दिव्यशक्ति. अशाप्रकारच्या शक्ति पांच आहेत, पाली नांवें-इद्धिविध, दिब्बसोत, परचित्तविजानन, पुब्बेनिवासानुस्सति, आणि दिब्बचक्खु. कांहींच्या मतें या शक्ति सहा आहेत. वरील यादींत आसवक्खयञाण हें मिळविलें म्हणजे झालें. निरनिराळे चमत्कार करणें, दिव्यश्रोतृ असणें, दुसऱ्याचें मन जाणणें, पूर्वजन्माचें स्मरण असणें, दिव्यचक्षु असणें, आणि आस्रवांचा क्षय झाला आहे हें ज्ञान उत्पन्न होणें, असा वरील पालीशब्दांचा अर्थ आहे. भगवान् बुद्धाच्या मतानें या शक्ति समाधिबलावर योगी आपोआपच मिळवूं शकतो. पण तें ध्येय मात्र नव्हें. त्यावर आसक्ति नको.

गौतम बुध्दाच्या कालांत अशाप्रकारची महाभिज्ञा असलेले प्रथम दोन अग्रश्रावक होते. सारिपुत्त व मोग्गल्लान यांना अशाप्रकारची शक्ति होती; त्यांच्यानंतर स्थविर बाकुल आणि भद्रा काञ्चना या दोघांसहि अशी शक्ति प्राप्त झाली होती. इतर कोणत्याहि भिक्षूस किंवा भिक्षुणीस एवढी मोठी शक्ति आलेली नव्हती. म्हणूनच भिक्षुणीसंघांत भद्राकच्चाना हीच महाभिज्ञा म्हणून अग्रेसर होती. हिची शरीरकान्ति बावनकशी सुवर्णा ( काञ्चन ) प्रमाणें असल्यामुळें हिला भद्रा कच्चाना हें नामाभिधान मिळालें होतें. प्रथम तिला भद्रा काञ्चना म्हणत असत, पण हें नांव जाऊन भद्राकच्चाना असें जास्त सुलभ नांव तेथें आलें; व शेवटीं निव्वळ 'कच्चाना' हेंच नांव टिकलें. अर्थात् राहुलमाता व कच्चाना हीं दोन्हींहि एकाच माणसांचीं नांवें आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तिच्या प्रथमाश्रमींचें नांव यशोधरा किंवा राहुलमाता व प्रव्रज्या घेतल्यानंतरचें नांव 'कच्चाना' म्हणून प्रसिध्द झालें. अस्तु.

भगवान् पद्मोत्तर बुध्दाच्या काळांत हिचें जनन हंसवती नगरांत एका कुलगृहांत झालें; व आपल्या इतर भगिनींप्रमाणेंच तिलाहि बुध्दाच्या धर्मकथांचा छंद लागला; व ती वारंवार बुध्ददेशनेस जात असे. एक दिवस नित्याप्रमाणें ती विहारांत गेली असतां, संघ जमला होता, व त्याप्रसंगीं भगवान् बुध्द भिक्षुणींना त्यांच्या योग्यतेनुरूप स्थानें देत होते. त्यांत एका भिक्षुणीची भगवन्तांनीं महाभिज्ञासंपन्न भिक्षुणी म्हणून अग्रस्थानीं योजना केली, हें पाहून त्या दारिकेच्या मनांत तें अत्यन्त स्पृहणीय स्थान आपणहि मिळवावें असें येऊन, त्याप्रमाणें तिनें शास्त्यासमोर ती आपली उत्कटेच्छा वदवूनहि दाखविली. कालेंकरून तिला मृत्यु आला; व दीर्घकालपर्यंत देव व मानुषांच्या लोकांत जननमरणाचा संसार करीत करीत, गौतमबुध्दाच्या काळच्या सुमारास शाक्यकुलांतील सुप्रबुध्द नांवाच्या शाक्याची दुहिता म्हणून ती जन्मास आली. तिचें नांव यशोधरा असें होतें.

## ( २ )

## गौतमबुद्धकालीन-चारित्र.

तिच्याचप्रमाणें कपिलवस्तूंत शुध्दोदन राजाचा पुत्र म्हणून बोधिसत्वहि[1] जन्मास आला. त्याचें नांव सिध्दार्थ असें ठेविलें होतें. त्याची माता मायादेवी ही सिध्दार्थाच्या जन्माच्या सातव्या दिवशीं अन्तर्धान पावली.[2] व बाल सिध्दार्थाचें संगोपन महाप्रजापति गौतमीनें केलें.[3]

सिद्धार्थाचें चरित्र देण्याचें हें स्थळ नव्हे. त्याचा विवाह यशोधरेबरोबर झाला; व यशोधरा व सिद्धार्थ हें एक आनंदी जोडपें म्हणून त्या काळीं प्रख्यात होतें. त्यांच्या अत्युज्वल व अत्युत्कृष्ट प्रेमाचेंच चित्र पाली वाङ्मयांतुन दृष्टीस पडतें;व तेच जास्त विश्वसनीय व सत्याला धरून होतें असेंच मानणें भाग आहे. सिद्धार्थास यशोधरेची जोड मिळाल्यामुळें शुद्धोदनाला वाटलें कीं, आपला मुलगा आतां खास संसारांतच गर्क होऊन राहील.पण बोधिसत्वाची खरी पारख त्याला मायेच्या ऊतीं झाली नव्हती. असतु. बोधिसत्वाला चार दृश्यें कशीं दृग्गोचर झालीं, व

---

१: बोधिसत्व ( पाली–बोधिसत्त ) ज्याच्या अंगीं बोधि म्हणजे पूर्ण ज्ञान प्राप्त करून घेण्याची योग्यता आहे तो बोधिसत्व. " आपणास बुद्ध व्हावयाचें आहे, " अशा प्रकारची उत्कटेच्छा एखाद्या विद्यमान बुद्धा समोर केल्यानंतर व बुद्धानें त्यासंबंधीं ग्वाही दिल्यानंतर त्याला बोधिसत्त म्हणतात. अशाप्रकारची उत्कटेच्छा प्रथित केलेल्या कालापासून तों बोधिवृक्षाखालीं ज्ञानाचा साक्षात्कार होईपर्यंत त्याला बोधिसत्व असें म्हणतात. प्रस्तुत गौतमास अद्यापि बुद्धत्वाचा साक्षात्कार व्हावयाचा असल्यामुळें तो शुद्धोदनाचा पुत्र म्हणून जेव्हां जन्मास आला तेव्हां त्यास बोधिसत्वच म्हटलें आहे.

२: ज्या उदरांत भावी सम्यक्संबुद्ध गर्भवास करतो, तें उदर पुढें दुसरा एखादा प्राकृत गर्भ धारण करण्यास योग्यच नाहीं. म्हणून त्या मातेला मरणच प्राप्त होतें. हा जो बुद्धत्वासंबंधीं नियम त्यास " धम्मता " ( धर्मता ) असें नांव आहे.

३: महाप्रजापतीचें चरित्र पहा– रत्न १ लें.

४: चार दृश्यें:—जरा दाखविणारें एक; व्याधि दाखविणारें दुसरें; मृत्यु दाखविणारें तिसरें; व अनगार्यावस्था दाखविणारें भिक्षुरूप चवथें. कांहीच्या मतें ही सर्व सिद्धार्थास एकाच दिवशीं एकामागून एक दिसलीं; तर एकाच्या मतें तीं कालांतरानें दिसलीं, व प्रत्येक दृश्याचा परिणाम त्याच्या विचारशील मनावर होत होत त्याचें मन संसार सोडण्यास तयार झालें.

उद्यानांत न जातांना तो माघारी घरीं कसा परत आला; व त्याचें चित्त जातिदुःख जरादुःख व्याधिदुःख व मरणदुःख यांनीं कसें पर्याकुल झालें, हें सांगण्याचीहि ही वेळ नव्हे. तो जास्त विचारशील असल्यामुळें त्याला या दुःखापासून मुक्त होऊन, अजात, अमर व शांत अशा निर्वाणाचा मार्ग शोधण्याचा ध्यास लागला. यशोधरेला आपल्या पतीच्या या मानसिक स्थितीची बरोबर कल्पना आली नव्हती. तिचें त्यावरील प्रेम निर्व्याज होतें; पण पतीच्या उदात्त मनाची पारख करण्याचें त्यांत सामर्थ्य नव्हतें, असेंच म्हणावें लागतें. ज्यादिवशीं बोधिसत्वाचा महाभिनिष्क्रमणाचा[1] बेत झाला त्यादिवशीं रात्रीं यशोधरेच्या महालांत तो गेला; त्याला यशोधरेला भेटण्याची इच्छा नसून नुकत्याच जन्मलेल्या राहुलास पाहण्याची इच्छा झाली होती. तो राहुलमातेच्या मंदिरांत गेला तो त्याला जें दृश्य दृष्टीस पडलें, त्यामुळें एक क्षणभर तर तो स्तब्धच उभा राहिला. सुगंधि तेलाचा एक दीप आपल्या मंद प्रकाशानें तें मंदीर प्रकाशित करीत होता; सुमन, मल्लिका वगैरे पुष्पांनीं परिकीर्ण अशा एका पलंगावर राहुलमाता निजली असून तिच्यापुढें छोटा राहुलहि निद्रासुख अनुभवित होता. तिनें मुलाच्या मस्तकावर आपला हात ठेविला होता. बोधिसत्व हा सर्व देखावा उम्ब्र्यावर उभा राहूनच पहात होता! तो मनांत म्हणाला, जर मी यावेळीं देवीचा हात दूर करून पुत्राला हातांत घेईन, तर देवी प्रबुद्ध होत्साती माझ्या गमनास मात्र व्यत्यय येणार. आतां मागें फिरणेंच बरें. बुद्ध होऊन माघारी आल्यावर पुत्राला पाहीन, असें म्हणून तो तेथून परत फिरला.[2]

पुढें बोधिसत्वानें बुद्धत्व प्राप्त होण्याकरिता काय काय केलें, हें सांगण्याची येथें गरज नाहीं. या सर्व काळांत यशोधरेचें आयुष्य अत्यन्त आदर्शभूत होतें, यांत संशय नाहीं. बुद्धत्व प्राप्त झाल्यावर जेव्हां पुन्हां बुद्ध

---

१: महाभिनिष्क्रमण (पाली—महाभिनिक्खमन)—जराजन्मादि दुःखांतून मुक्त होण्याकरितां सिद्धार्थानें आपलें घर सोडणें. त्यानें संसाराचा संन्यास केला. हें त्याचें गमन म्हणजे महाभिनिष्क्रमण होय.

२: जातकट्ठकथा—निदानकथा— प्रो० कोसंबीकृत देवनागरी पुस्तक—पृष्ठें ७८–७९§९८.

भगवान् आपल्या बांधवांस भेटण्यासाठीं कपिलवस्तूस माघारी गेले[1], तेव्हा ही बातमी यशोधरेच्या कानीं आली. तिनें आपल्या मंदिराची खिडकी उघडली व तिला बुद्धाचें दर्शन झालें! ज्या शहरांत त्यानें राजोपभोग उपभोगिले त्याच शहरांत केशश्मश्रु काढून टाकून कषायवस्त्रें अंगावर परिधान करून, हातांत भिक्षापात्र घेऊन तो रस्त्यांतून हिंडतांना पाहून, तिच्या मनांत निराळाच भाव उत्पन्न झाला. त्याच्या शरीरप्रभेच्या योगानें जणूं काय राजधानीचे रस्तेच प्रकाशमान होत असलेले, तिच्या दृष्टीस पडले. त्याच्या शरिरावर महापुरुषलक्षणें दृग्गोचर होत होतीं; व अपूर्व अशी बुद्धश्री त्याच्या एकंदर शरिरावर विराजमान झालेली तिला भासली. "तथापि आपल्या प्रेमाचा मोबदला त्याच्याकडून आपणास कोणचा मिळाला? तर त्यानें आपणांस टाकून जाणें हाच नां?" हा विचार तिच्या हृदयांत उत्पन्न झाला व त्यामुळें शाक्यांच्या सर्व स्त्रिया, जरी बुद्धास भेटावयास गेल्या, तरी ती गेली नाहीं. इतर स्त्रियांनीं तिला तसें करण्यास सांगितलें असतां तिनें एकच उत्तर दिलें "जर माझ्यांत कांहीं गुण आहेत असें आर्यपुत्रांना वाटत असेल तर ते आपण होऊन माझ्या भेटीस येतील."

गौतमबुद्धासहि ही बातमी कळली म्हणून दोन अग्रश्रावक बरोबर घेऊन व राजाच्या हातांत पात्र देऊन "राजदुहिता ज्या रीतीनें वंदन करूं लागेल तसें तिला करूंद्या, कोणीही कांहीं बोलू नका", असें सांगून तो त्यांसह राहुलमातेच्या शयनागारांत गेला. तिनें भगवंतास पाहिल्याबरोबर ती पुढें धांवतच गेली, व त्याच्या चरणांवर डोकें ठेवून पायाच्या घोट्यांवर तें वारंवार घांसून, आपल्या इच्छेनुरूप तिनें त्यास वंदन केलें. राजा शुद्धोदनानें आपल्या सुनेचें जें वर्णन केलें आहे त्यांवरून यशोधरेच्या मनांत आपल्या पतीबद्दल केवढें प्रेम होतें हें स्पष्ट कळून येतें. "महाराज," राजा म्हणाला, "माझी

१: जातकट्ठकथा. निदानकथा — प्रो• कोसंबीचें देवनागरी पुस्तक. पृष्ठें १०९ § १४४, १४५.

२: जातकट्ठकथा–निदानकथा– प्रो• कोसंबीकृत–देवनागरी पुस्तक–पृष्ठ १११ § १४९. त्याचवेळीं "नरसिंह गाथा" म्हणून यशोधरेनें म्हटल्याचा असाहि उल्लेख आहे. त्या सर्व नरसिंह जो बुद्ध त्याच्या स्तुतिपर आहेत.

ही दुहिता आपण कषायवस्त्रें परिधान केलीत, हें ऐकल्या दिवसांपासून कषाय वस्त्रेंच परिधान करीत आहे;आपण एकवेळ जेवतां हें ऐकून तीहि पण एकभुक्ताच राहात आहे; आपण महाशयनाचा त्याग केला आहे, असें ऐकल्यापासून तीहि एका कांबळ्याच्या पट्टयावर निजत असते; आपण मालागन्ध वगैरे सोडून दिलीं आहेत असें ऐकल्यापासून, तिनेंहि मालागन्धभूषणादिकांना त्याज्य म्हणून ठरविलें आहे; आपल्या माहे-रच्या माणसांनीं "आम्हीं तुझी काळजी घेऊं" असा निरोप पाठविला असतांना सुध्दां, तिनें त्यांच्या पैकीं एकाचीहि अद्याप भेट घेतली नाहीं. भगवान्, अशा गुणांनीं संपन्न माझी ही दुहिता आहे."[1]

यावरून राहुलमातेचें चरित्र किती उदात्त आहे ह्याची कल्पना होते. शास्ता कपिलवस्तूंत रहात असतांना एक दिवस तिनें आपल्या राहुलास उत्तम प्रकारांनीं अलंकृत करून भगवन्ताकडे पाठविलें; व त्यास सांगितलें, "बाळ, २०,००० श्रमणांनीं परिवृत व सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान असा जो श्रमण दिसत आहे, तो तुझा पिता आहे. तो मोठा श्रीमंत आहे. त्याच्याजवळ मोठा निधी आहे. या संसाराचा त्याग केल्यापासून मला तो निधी पहावयास मिळाला नाहीं. तूं त्याजकडे जा व त्याला म्हण कीं,"माझे पितृधन द्या." राहुल हा आई-च्या सांगण्याप्रमाणें गौतमबुध्दाच्या मागून मागून जाऊं लागला, व "श्रमणा, माझें धन दे" म्हणून म्हणूं लागला. भगवन्तांनीं त्याला कांहींहि उत्तर दिलें नाहीं; त्याला आपल्या आरामापर्यंत येऊं दिलें; व आरामांत गेल्यावर सारिपुत्ताकडून त्याला प्रव्रजा देवविली. व तो प्रथम श्रामणेर म्हणून प्रख्यात झाला.[2]

महाप्रजापति गौतमीच्या चरित्रांत ज्या परिस्थीमुळें शाक्यांच्या कुलांत मोठा परिवर्त घडून आला व ज्यामुळें प्रजापतीचें चित्त निर्विण्ण होऊन ऐहिक जीवितांत तें रमेना, ती परिस्थिती मागें वर्णन केलेंच आहे.[3] त्याच परिस्थितीमुळें राहुलमातेसहि या आश्रमाचा कंटाळा आला.

---

१: जातकट्ठकथा—निदानकथा— प्रो॰कोसंबीकृत देवनागरी आवृत्ति-पृष्ठ ११४§५१.

२: जातकट्ठकथा—निदानकथा— प्रो॰ कोसंबीकृत—पृष्ठें ११४—११५ § ५२.

३: महाप्रजापतीचें चरित्र—रत्न १ लें.

तिच्या संसाराची केवढी वाताहात झाली होती ! तिच्या सुखस्वप्नांचा केवढा भंग झाला होता ! मुलगाहि श्रामणेर झालेला ! सिध्दार्थाच्या अभिनिष्क्रमणापासूनच तिचें लक्ष संसारावरून उडालेलें होतें. बोधिसत्वाच्या संगतींत तिचें ज्ञानहि परिपक्क झालेलें होतें. प्रजापती बरोबर ज्या पांचशें स्त्रियांनीं संसाराचा त्याग केला, त्यांत राहुलमाताहि एक होती. तिचा संघांत प्रवेश झाला व तिला " भद्दाकच्चाना " हें नांव मिळालें.

संघांत शिरल्यापासून तिचें लक्ष्य सर्वस्वीं आत्मोन्नतीकडे लागलें. संसाराचा पाश तुटला होता. आपल्या पूर्वाश्रमींच्या पतीच्या नात्याचें निराळ्या स्वरूपांत रूपांतर झालें.तीहि पण बुद्धाची पुराणदुतियिका झाली. मुलगाहि एक श्रामणेर झाला होता; व तीं तिघेहि शाक्यसिंहांच्या संघांत एकत्र राहूं लागलीं. खरोखर एकाच जन्मांत दोन भिन्नभिन्न नातीं उत्पन्न होऊन त्या नवीन परिस्थितींत सच्छीलपणानें राहणें, पूर्वाश्रमींच्या आठवणींचा कांहींहि भावी आयुष्यावर परिणाम घडवून न घेणें, हें जितकें अवघड तितकेंच श्लाध्यहि आहे. भद्दाकच्चाना भिक्षुणीनें संघांतील नियम व निर्बंध इतर भगिनींप्रमाणेंच पाळून भिक्षुणीशील संपादन केलें, व त्या पायावर विपश्यना वाढवून अर्हत्पद प्राप्त करून घेतलें व अभिज्ञांमध्यें प्राविण्य मिळविलें. एक दिवस ती बसली असतां एकाच जाग्यावर तिला एकावेळेसच शतसहस्राधिक असंख्येयपर्यंतच्या जन्माचें स्मरण झालें, व तिचा हा गुण विशेष सर्वत्र प्रकट झाला.

एक दिवस शास्ता जेतवनांत बसला होता. भिक्षुणीसंघहि जमला होता व भिक्षुणींना त्यांच्या योग्यतेनुरूप स्थान देत असतांना भद्रेची पाळी आली; तेव्हां शास्त्यानें तिला महाभिज्ञा प्राप्त झालेल्या भिक्षुणींमध्यें अग्रस्थान दिलें ! व अशारीतीनें तिची दीर्घकालीनची उत्कटेच्छा सफल झाली.

---

१: पुराणदुतियिका: पूर्वाश्रमांतील पत्नीस भिक्षु आगमनात त्या भिक्षुची ' पुराणदुतियका ' म्हणून म्हणतात.

# रत्न १२ वें.

## कृशागौतमी.*

### ( १ )

### पूर्वबुद्धकालीन–चरित्र.

गातमबुद्धाच्या भिक्षुणिसंघात रूक्ष व पंसुकूलचीवर धारण करणाऱ्या[१] भिक्षुणींत कृशागौतमी ही श्रेष्ठ आहे. संघांत प्रवेश करणें म्हणजे ऐहिक सुखांवर पाणी सोडणें, अशी प्रतिज्ञाच असल्यामुळें सुखलोलुप स्त्रियांच्या हातून इतका उज्वल आत्मत्याग होईल किंवा नाहीं, अशी शंका

---

* कृशा गौतमी ( पाली–किसा गोतमी ). चरित्रांत दोन्हीं नांवें वापरलीं आहेत. तीं एकाच व्यक्तीचीं निदर्शक समजावींत.

१: पांसुकूलचीवर ( पाली–पंसुकूलचीवर ). उकिरड्यावरील धुळीनें भरलेल्या चिंध्या गोळा करून त्या स्वच्छ धुतल्यावर त्यांचें तयार केलेलें वस्त्र भिक्षूनें किंवा भिक्षुणीनें वापरावें, अशी बुद्धाची पहिली आज्ञा होती; व हें श्रेष्ठतेचें लक्षणहि समजलें जाई. अशा प्रकारचें कायमचें व्रत घेतलेल्या माणसास पालींत " पंसुकूलिक " अशी संज्ञा आहे. पुढें उपासक व उपासिका यांचा वर्ग वाढल्यावर बुद्धानें इतर प्रकारचीं वस्त्रें वापरण्याची परवानगी भिक्षूंस व भिक्षुणींस दिली; पण भिक्षुत्वाची मूळ शपथ घेतांना जे " चार निश्रय " ( पाली–निस्सय ) सांगितलेले आहेत, त्यांत चीवराच्या बाबतींत अशाप्रकारचेंच वस्त्र वापरण्याची आवश्यकता प्रथम दाखविलेली आहे. इतर प्रकारचीं वस्त्रें वापरावयास मिळालीं तर तो " अतिरेक लाभ " नेहमींच्या पेक्षां जास्त–म्हणून प्रासंगिक–लाभ म्हणून उल्लेखिला आहे. ( महावग्ग -Oldenberg's Edition. pp, 57-58 ).

असलेल्या आमच्या बंधुवर्गास व भगिनींस कृशागौतमीची कथा बोधप्रद होईल, यांत शंका नाहीं. संसारांत असतांना उत्तम उत्तम वस्त्रें नेसणें, हें तर स्त्रियांच्या निसर्गसुंदर स्वभावास आवडतेंच; पण संघांत प्रवेश केल्यावरहि कार्पास, क्षौम, कंबल, इत्यादि चीवरें वापरण्याचीहि भिक्षूंना व भिक्षुणींना संवय असते—नव्हे तीं असावींत असें वाटतेंहि. पण हें असें वाटणें म्हणजे अल्पेच्छा, संतुष्टपणा किंवा आरामता यांचें लक्षण खास नव्हें. म्हणून ज्या भिक्षूनें किंवा भिक्षुणीनें पंसुकूलचीवराचें पवित्र व्रत अंगीकृत केलें आहे, त्याची किंवा तिची योग्यता अपूर्व आहे, असें गौतमानें वारंवार सांगितलें आहे. खुद्द गौतमाचें चीवरहि पंसुकूलचीवर म्हणूनच ख्यात होतें; व तें त्यानें परिनिर्वाणाच्या अगोदर महाकस्सप नांवाच्या भिक्षूस कृपाप्रसाद म्हणून दिलेलें होतें.[1] अस्तु. असें या चीवराचें माहात्म्य असल्यामुळें ज्या भिक्षुणीनें तें धारण करण्याचें खडतर व्रत अंगीकारिलें होतें, त्या भिक्षुणीचें उज्ज्वल व नैतिक तेज, अल्पसंतुष्टता, व भावनारामता हीं अपूर्व होत. अशा या कृशागौतमीचें संसारांतील चरित्र जितकें करुणपूर्ण आहे, तितकेंच तदनंतरचें चरित्र उदात्त आहे.

तिचें नांव गौतमी असें होतें. पण अत्यन्तकृश अशा शरीरसंपत्तीमुळें तिला "कृशा" हें विशेषण प्राप्त झालेलें होतें. हिच्या पूर्वकालीन

---

१: महाकस्सप ( संस्कृत—महाकाश्यप ) गौतमबुद्धाचा अत्यंत आवडता असा शिष्य. भद्रा "कापिलानी" ही पूर्वाश्रमांतील त्याची पत्नी होय. गौतमानें त्यास आपलें "पंसुकूलचीवर" मोठ्या प्रेमाची खूण म्हणून दिलेलें होतें. गौतमाच्या परिनिर्वाणानंतरहि गौतमाच्या चितेस अग्नि लावावयाच्या पूर्वी, महाकस्सप तेथें येऊन वंदन करीपर्यंत अग्निच लागेना. तेव्हां तो पावानगराहून त्या ठिकाणीं आला व तेथें येऊन त्यानें त्या चितेस वंदन केलें, तेव्हां चितेनें पेट घेतला. महापरिनिर्वाणानंतरहि बौद्धशासनास स्थैर्य प्राप्त व्हावें, व संघांत अधर्मवादी लोकांचें प्राबल्य होऊं नये म्हणून त्यानें राजगृहनगरीं पहिली महासंगीति ( सभा ) भरविली. त्यांत ५०० भिक्षूंनीं भाग घेतला होता. महाकस्सप अध्यक्ष होता. बौद्धधर्मांचीं धर्म व विनय हीं मुख्य अंगें ठरवून टाकण्यांत आलीं. अशारीतीनें कस्सपानें बौद्धधर्मास स्थैर्य देऊन त्याचें स्वरूप कायम करून ठेवलें व भगवन्ताच्या शासनाची परंपरा कायम ठेवण्यास मदत केली. ( प्रो० कोसंबीकृत—समन्तपासादिका—बाहिरनिदानवण्णना—देवनागरी आवृत्ति—पृष्ठ ४—६ ).

चरित्रास पद्मोत्तर बुद्धाच्या कालापासूनच आरंभ होतो. त्याकाळीं ती हंसवती नगरांत राहात असून तिचा जन्म एका कुलीन अशा घराण्यांत झाला. पद्मोत्तर बुद्धाच्या धर्मचक्रप्रवर्तनामुळें सर्व जनता हलवून सोडली जात होती; शास्त्याच्या धर्मदेशनेस हजारों श्रोते जमत असून त्याच्या सरळ, सोप्या, नैतिक व उपमाप्रचुर अशा भाषणानें त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम होत असे. हीच पहाना कृशा गौतमी. ती दररोज पद्मोत्तर बुद्धाच्या धर्मदेशनेस नियमानें जाई. एक दिवस ती तेथें गेली असतांना भिक्षुणीसंघ जमला होता, व त्यांत एका भिक्षुणीस शास्त्यानें एक महनीय व अग्रस्थान दिलें, असें तिनें पाहिलें. पंसुकूलचीवर धारण करणाऱ्या भिक्षुणींत तिचें अग्रेसरत्व शास्त्यानें ठरविल्यामुळें, आपणांसहि तें लोभनीय स्थान कां प्राप्त होऊं नये? हा प्रश्न तिच्यापुढें उभा राहिला; व शास्त्यासमोर तशा प्रकारची इच्छा तिनें प्रथित केली. पुढें ती लौकरच मरण पावली.

जननमरणाच्या संसारांत सांपडल्यामुळें, शतसहस्रकल्पेंपर्यंत ती देवमानवांच्या लोकांत फिरत होती, व त्यामुळें तिला नानाप्रकारचे जन्म घेऊन आपली उन्नति करून घेतां आली. या बुद्धोत्पादांत[1] श्रावस्ती नगरांत एका गरीब व दुर्गत अशा कुलांत तिचा जन्म झाला. तिचें नांव गौतमी असें ठेवलें होतें.

हिच्या लहानपणची हकीकत इतरत्र दिलेली आढळते.[2] श्रावस्ति नगरांत त्यावेळीं एका श्रेष्ठीचे ४० कोटी धन कोळसे होऊन पडलें होतें, व त्यायोगानें तो धनी शोकाकुल होत्साता अंथरुणाला खिळून राहिला होता. पुढें त्याच्या एका मित्रानें त्याला एक उपाय सांगितल्यामुळें त्यानें

१: बुद्धोत्पाद (पाली—बुदुप्पाद) ज्या काळांत बुद्धाचा अवतार झाला त्या काळांत बुद्धाचा उत्पाद—उत्पत्ति—अवतार. तो ज्या काळांत झाला, त्या काळासच बुद्धोत्पाद असें नांव दिलें आहे.

२: धम्मपदअट्ठकथा–Burmese Edition–या ग्रंथांत कृशा गौतमीची गोष्ट (पाली—किसागोतमी वत्थु) पृष्ठें ४८४–४८६ यांवर दिलेली आहे. "मनोरथपुरणी" या अर्थकथेंत या चरित्राचा पूर्वभाग नाहीं. गोष्टीचें एकंदर रहस्य लक्षांत यावें म्हणून पूर्वभागाचाहि साराश येथें दिला आहे.

ते कोळसे बाजारांत रास करून ठेवले, व आपण त्याच्याजवळ ते विकण्याकरितां बसला. जाणारे येणारे लोक कोळशाच्या ढिगाकडे पाहून विस्मयान्वित होत; व म्हणत, "इतर व्यापारी वस्त्रें,तेल, मधु, वगैरे जिन्नस विकावयास बसतात; पण हा मात्र कोळशांची रास विकावयास कीं हो बसला आहे!" अशा रीतीनें तो बाजारांत रोज बसत असतां एक दिवस कृशा गौतमी गरीबीमुळें स्वतःच बाजारांत गेली. तिच्या घरीं नोकरचाकर कोठून असणार? तेथें ती गेली असतांना तिची दृष्टी त्या कोळशाच्या राशीवर गेली, व तिच्या तोंडून पुढील उद्गार बाहेर पडले. "काय आश्चर्य इतर लोक तेल, वस्त्र, मधु वगैरे जिन्नस विकावयास बसतात, तर हा आपला श्रेष्ठि सुवर्णमोहरा कीं हो विकावयास बसला आहे?" तिचे हे उद्गार त्या श्रेष्ठीच्या कानांवर जातांच तो उठला व त्या मुलीकडे गेला व म्हणाला, "मुली, तूं आतां काय म्हणालीस? ही सुवर्णाच्या मोहोरांची रास आहे, हें कशावरून? मी म्हणतों ही कोळशाची रास आहे." तिनें पटकन् त्या राशींतून एक मूठभर मोहरा घेतल्या; तों त्या सुवर्णमय झालेल्या त्या श्रेष्ठीस दिसल्या! त्यावर श्रेष्ठीनें त्या मुलीचा ठिकाणा विचारून घेतला, व तीहि आपल्या मार्गाला लागली. त्या श्रेष्ठीचा आनंद गगनांत मावेना!

मागाहून तो श्रेष्ठी किसा गोतमीच्या घरीं गेला व तेथें गेल्यावर त्या कुलाची स्थिती फार विपन्न आहे, असें त्यास कळलें. त्या मुलीस कोणाचाहि आधार नाहीं, हें समजल्यावर त्यानें तीस आपल्या घरीं नेलें, व तिचें आपल्या पुत्राशीं लग्न लावून दिलें. तिनें तें चाळीस कोटी धन आपल्या हस्तस्पर्शानें सुवर्णमय करून टाकलें!

अशा रीतीनें जरी किसा गोतमीचा श्रीमंत कुलांत प्रवेश झाला तरी तिचा त्रास मात्र चुकला नाहीं. "बोलून चालून भिकाऱ्याची पोर," ही कल्पना तिच्या सासरच्या लोकांच्या पुढें वारंवार उभी राही. व ते तिच्यासमोर असें बोलून दाखविण्यासहि कमी करीत नसत.त्यामुळें तिच्या मनास त्रास होऊं लागला. तिचे त्या घरीं हालहि होऊं लागले व तिला तेथें आपलें जीवित कंटाळवाणें वाटावयास लागलें. परंतु सुदैवानें अशी एक गोष्ट घडून आली कीं, त्यायोगानें तिचे हाल कमी

होऊन उलट तिचा सन्मान होऊं लागला, व ती गोष्ट म्हटली म्हणजे ती गरोदर राहून तिला दहा महिन्यांनीं एक पुत्र होणें. आतां घरांतील माणसें तिला मान देऊं लागलीं व पुत्रवती म्हणून चाहूं लागलीं. गौतमीलाहि पुत्रसुखामुळें आनंद झाला. व आपले वाईट दिवस खरोखरच संपले असें तीस वाटावयास लागलें. इकडे तिचा कुमार रांगावयास लागला, उभा राहावयास लागला, व दुड् दुड् धांवावयास लागला! आपल्या निरनिराळ्या क्रीडांनीं तो आपल्या घरांतील माणसांची व मातापित्यांची करमणूक करूं लागला. गौतमी तर मातृप्रेमानें फुलून गेली होती. तिचें हृदय कुसुम तर पूर्णपणें विकसत होतें! पण........पण........काय? दैवविपाकामुळें म्हणा किंवा कांहीं अन्यकारणामुळें म्हणा तिला लौकरच पुत्रशोकाचें दारुण दुःख भोगावें लागलें. पुरुषापेक्षां स्त्रियांना पुत्रशोक अत्यन्त दारुण असा भासतो. त्या पुत्रशोकानें किसागोतमी वेडी झाली! अगोदरच पुत्रजननापूर्वी तिचे झालेले हाल तिच्यापुढें उभे होतेच व ती ते कोठें विसरते न विसरते तोंच हा पुत्रशोकाचा प्रसंग तिच्यावर गुजरलेला! "माझ्या तान्हुल्याला हे चांडाळ बाहेर फेंकून द्यावयास कमी करणार नाहींत" हा विचार मनांत एकसारखा घोळूं लागला. दुःखावेगानें उन्मत्त होत्साती तें प्रेत ती खांद्यावर घेऊन "माझ्या तान्हुल्याला रोग झाला आहे त्यावर एखादें औषध तुम्हांला ठाउक आहे कां हो!" असें विचारीत ती घरोघरीं फिरूं लागली! लोकांना काय? "ही वेडी झाली आहे; कारण मेलेल्या पुत्रासाठीं ही औषध विचारीत आहे; असें ते म्हणूं लागले. परंतु ती मात्र म्हणे, "माझ्या लाडक्याला जिवंत करणारें औषध असलेंच पाहिजे." व असें म्हणून ती इतरत्र भटकावयास लागे.

हें पाहून एका शहाण्या माणसानें असा विचार केला कीं, ह्या मुलीचें हें पहिलेंच मूल असल्यामुळें व हिनें पूर्वी मरण कधींहि न पाहिल्यामुळें, हिला चित्तविक्षेप झाला आहे. हिला आपण अवश्य आश्रयभूत झालें पाहिजे. परंतु हिला औषध देणारा दशबलाशिवाय दुसरा कोण समर्थ आहे? तोच हिचें औषध जाणतो! असा विचार करून तो तिजकडे गेला व म्हणाला, "बाई, तुझ्या मुलासाठीं औषध माहित असलेला श्रेष्ठ पुरुष ह्या सदेवक लोकांत दशबलाहून दुसरा कोणीहि

नाहीं! तो या शेजारच्या ध्रुव–विहारांत राहात आहे; त्याजकडे जाऊन त्याला औषध विचार."

त्या गृहस्थाच्या सांगण्यावर गौतमीचा विश्वास बसला व त्या मुलाचें प्रेत आपल्या खांद्यावर घेऊन ती ध्रुवविहाराकडे गेली. त्यावेळीं विहारांत परिषद् जमली होती, व शास्ता आसनावर बसून धर्मदेशना करीत होता. ती त्या प्रेतासह सभेच्या मागच्या बाजूस जाऊन उभी राहिली, व त्यास म्हणाली, "भगवन् माझ्या मुलाला औषध द्या हो!" शास्त्यानें तिच्याकडे वळून पाहिलें व तिच्या आंगीं पुढील उन्नतीचें बी आहे, असें जाणून तो तीस म्हणाला, "गौतमी, आपल्या पुत्राच्या औषधाकरितां तूं येथें येणें केलेंस हें फार सुंदर केलेंस. जा पाहूं, गांवांत जा, व ज्या घरांत आजपर्यंत कोणीहि मेलेलें नसेल त्या घरांतून थोड्या मोहऱ्या[1] घेऊन ये". या भगवंतांच्या भाषणानें तिला खरोखरच धीर आला. तिचा उन्माद जरा कमी झाला; व भगवान् माझ्या मुलाला औषध देणार या विचारानें हुरूप येऊन 'महाराज, फार चांगलें' असें म्हणून, ती विहारांतून बाहेर पडली; व सन्तुष्ट मनानें तें प्रेत बरोबर घेऊनच गांवांत शिरली. गांवांत गेल्यावर तिला प्रथम जें घर लागलें, त्या घरांत ती शिरली, व 'माझ्या मुलाला औषध देण्याकरितां दशबलांना थोड्या मोहऱ्या हव्या आहेत, त्या देतां कां हो?" म्हणून घरांतील माणसास विचारूं लागली. 'घेऊन जा, गौतमी," त्यांनीं उत्तर दिलें. "पण अशा तऱ्हेनें त्या घेऊन जावयाच्या नाहींत. प्रथम मी हें विचारत्यें, ह्या गृहांत कोणी पूर्वी मेलें आहे काय?" "काय म्हणत्येस गौतमी? ह्या घरांत मेलेल्यांची गणती करणें शक्य नाहीं!" "असें असेल तर मला त्या मोहोऱ्या नकोत. ज्या घरांत पूर्वी कोणी मेलेलें असेल तेथील मोहऱ्या न घेण्याविषयीं दशबलानें मला सांगितलें आहे," असें म्हणून ती त्या घरांतून बाहेर पडली; व याप्रमाणें घरोघर हिंडत असतांना तिला असें आढळून आलें कीं, मरण येणें हा सार्वत्रिक नियमच होऊन बसला आहे! जनहित व अनुकंपा यांनी प्रेरित झालेल्या बुद्धांनीं हें पाहिलें

---

१: पाली–सिद्धत्थक. पांढरी मोहरी असा अर्थ सांपडतो.

असलें पाहिजे; व या विचारानें तिच्या हृदयांत संवेग[1] उत्पन्न झाला; उन्माद नाहींसा होत चालला, व विचाराचा उदय होत असतांना पुत्र-स्नेहानें मृदु झालेलें हृदय कठीण होत चाललें; व पुत्राचें प्रेत घेऊन ती स्मशानभूमीकडे[2] गेली; "तान्हुल्या, तुलाच हें मरण प्राप्त झालें आहे; असें मला वाटलें होतें हें पण फक्त तुलाच आलें असें नसून सर्व जनांना साधारण असा हा धर्म आहे," असें त्या ठिकाणीं म्हणून तें प्रेत त्या भूमीवर फेंकून देऊन ती त्यावेळीं अशा अर्थाची गाथा उद्गारली, "ज्यांस अनित्यता असें म्हणतात, तो धर्म एखाद्या गांवापुरताच लागू नाहीं; खेड्यापुरताच लागू नाहीं किंवा एका घरापुरतांच लागू नाहीं, तर हा धर्म देवमनुष्यांच्या सर्व लोकांसहि लागू आहे।"[3]

---

१: संवेग: हा शब्द पाली वाङ्मयांत पुष्कळ अर्थांनीं वापरतात. मुख्यतः ह्याचा उपयोग चांगल्या अर्थानें करतात. चित्ताचा कठोरपणा किंवा क्रौर्य किंवा जडपणा नाहींसा होऊन त्याची चांगल्या विचारांत क्रांति व्हावयास लागणें, चित्तांत चलबिचल—अर्थात् चांगल्या अर्थानें—होणें तें भावप्रधान बनणें, ही सुधारणेच्या मार्गावर लागण्याचीं चिन्हें होत. संवेग यांचा अर्थ नुसता "पश्चाताप" मात्र नव्हे.

२:-स्मशानभूमि: मृतशरीरें जाळण्याची पद्धति पूर्वीपासूनची आहे यांत शंका नाहीं. परंतु पालीवाङ्मयांत "आमक सुसान" म्हणजे प्रेतें नुसतीं फेंकून देण्याचें स्मशान असाहि शब्द वारंवार आढळतो. त्या ठिकाणीं प्रेतास दहनसंस्कार न मिळाल्यामुळें तीं तेथें गिधाड, कोल्हीं वगैरेच्या तावडींत सांपडत व त्याचें निरनिराळे भाग इतस्ततः पडलेले असत. शरीरावरील आसक्ति नाहींशी करण्याकरितां अशा स्मशानांत जाऊन शरीराची ती अवस्था पाहून अशुभ भावना अंगीं बिंबविण्यासाठीं बौद्धभिक्षूंना तेथें जाण्याविषयीं बौद्धधर्मोपदेशांत सांगितलें आहे. ( संस्कृत-आमकस्मशान ) आमक सुसान ह्याचा उल्लेख जुन्या जातकांत सुद्धां आलेला आहे. पारशी लोकांतील मृतशरीरासंबंधींची पद्धत याच्याशीं किती जुळत आहे हें स्पष्ट होतें. असो. किसा गोतमी अशा प्रकारच्या स्मशानांत गेली होती.

३: मूळ गाथा अशी आहे:—

न गामधम्मो निगमस्स धम्मो ।
न चापियं एक कुलस्स धम्मो ॥
सब्बस्स लोकस्स सदेवकस्स ।
एसोऽव धम्मो यदिदं अनिच्चताऽति ॥

यानंतर ती शास्त्याकडे गेली. शास्त्यानें तिला विचारलें, 'गौतमी, तुला सिद्धार्थक मिळाले काय ?" "महाराज,' तिनें शास्त्यास उत्तर दिलें, "आतां सिद्धार्थाचें कांहीं काम उरलें नाहीं. आपण फक्त मला आतां शरण व्हा ! यावर शास्त्यानें तीस धम्मपदांतील एक गाथा म्हणून दाखविली तिचा अर्थ असा[१]'जो मनुष्य पत्र पशु(बैल)वगैरेंनी युक्त होत्साता त्यांतच आसक्तमन होऊन जातो. त्यास ज्याप्रमाणें निजलेला गांवच्या गांव महापूरानें वाहुन जातो, त्याप्रमाणें मृत्यू हा त्यास घेऊन जातो".'

ही गाथा संपते न संपते तोंच ती श्रोतापात्तिफलांत प्रतिष्ठित झाली व तिनें शास्त्याजवळ प्रव्रज्येची याचना केली. शास्त्यानेंहि अनुमति दिली. त्यानंतर गोतमीनें शास्त्यास त्रिवार प्रदक्षिणा करून त्याला वंदन केलें. ती भिक्षुणीसंघाकडे गेली व तेथे तिला प्रव्रज्या मिळाली. लवकरच तीस उपसंपदाही प्राप्त झाली; कारण तिच्यासारख्या परिणतप्रज्ञेस या पायऱ्या पटापट चढणें अशक्य नव्हतें. उपसंपदा मिळाल्यावर तिनें योनिसोमनसिकारावरचें[२] ध्यान लावून आपली विपश्यना वाढविली, व त्यानंतर शास्त्यानें तिच्यासंबंधानें पुढील अर्थाची अवभास गाथा[३] म्हटली, "अमृतपद (निर्वाण) न दिसतां

---

१: मूळगाथा अशी—तं पुत्तपसुसम्मत्तं ब्यासत्तमानसं नरं सुत्तं गामं महोघोऽव मच्चुआदाय गच्छति ॥ (धम्मपद—P. T.S, गाथानुक्रम नं. २८७).

२: योनिसोमनसिकार—योनिसो म्हणजे योनिशः— मूलभूत—प्रथम—मुख्य— मनसिकार म्हणजे चित्तांत वारंवार आणणें, त्यांवर घोळत राहणें, अवेक्षा असणें, कायमचा मनांत ठसविणें योनि याचा अर्थ प्रज्ञा, विद्या किंवा ज्ञान असाहि देतात. त्याप्रमाणें प्रज्ञावान् माणसांच्या मनाला ठसलेला विचार असाहि अर्थ होईल. जगतांतील सर्व गोष्टी वस्तू अनित्य दुःख व अनात्म आहेत असें सत्यानुरोधानें ठरविणें. ही कसोटी सर्व पदार्थांना लावून त्यांचें खरें स्वरूप तत्वज्ञानानें मनाशीं ठरविणें हा योनिसोमनसिकार याचा अर्थ आहे. अशा रीतीनें खरा अर्थ मनांत ठसला म्हणजे तेंच कर्मस्थान (समाधि लावण्याचें स्थान) करून त्यावर समाधि व निरनिराळीं अंगें प्राप्त करून घेणें म्हणजेच विपश्यना वाढविणें. विशेषण पश्यना विपश्यना.

३: ओभासगाथा—आपल्या भिक्षूला किंवा भिक्षुणीला प्रमुदित करण्यासाठीं किंवा त्यांची खात्री पटविण्यासाठीं भगवान् बुद्ध कित्येक वेळां शिष्यापासून लांब असतां स्वतःचा उज्वल रूपाविर्भाव त्यापुढें उभा करीत; व त्या दृश्याकरवी एखादी गाथा म्हणवीत. या गाथेस ओभासगाथा (संस्कृत—अवभास गाथा) असें म्हणतात.

मनुष्य १०० वर्षे जरी जगला, तरी त्या जगण्यापेक्षां अमृतपद पहातच एक दिवसच जगणें फार श्रेयस्कर होय. "[1]

या गाथेच्या शेवटीं गोतमीस अर्हत्पद प्राप्त झालें.त्यानंतर भिक्षुणींनें जे आठ परिष्कार[2] जवळ ठेवण्यासंबंधानें विनयांत नियम आहेत ते उत्कृष्ट रीतीनें ती पाळूं लागली, व फक्त तीन अशा रुक्षचीवरांनीं युक्त होत्साती ती राहूं लागली. इतर चीवर न नेसण्याचें तिनें व्रत घेतलें व शेवटपर्यंत तें चालविलें.[3]

एक दिवस शास्ता जेतवनांत संघासह बसला असतां, तो भिक्षुणींना त्यांचीं योग्य स्थानें देत होता. जेव्हां कृशागोतमीवर पाळी आली, तेव्हां तिची योजना त्यानें रूक्षचीवर धारण करणाऱ्या भिक्षूणीमध्यें अग्रस्थानीं केली, व अशा रीतीनें किसा गौतमीची दीर्घकालीन इच्छा परिपूर्ण झाली.[4]

---

१: मूळगाथा अशी-: योच वस्ससतं जीवे अपस्सं अमतं पदं । एकाहं जीवितं सेय्यो पस्सतो अमतं पदं ॥ धम्मपद-P. T. S.-गाथानुक्रम नं. ११४ )

२: आठ परिष्कार--श्रमणानें आठ जिन्नस जवळ ठेवावयाचे असतात, त्यास परिष्कार ( पाली—परिक्खार ) असें नांव आहे, ते जिन्नस म्हणजे, पत्त, तिचीवर कायबंधन, वासि, सूचि, परिस्सावन हे होत. भिक्षूचें पात्र, तीन चीवरें एकप्रकाचा कंबरपट्टा -अर्थात् कापडाचा-वस्तेरा, सुई, आणि पाणी गाळण्याकरितां फडकें, हे आठ जिन्नस श्रमणाजवळ असणें आवश्यक आहे.

३: अशा प्रकारच्या व्रतास पालीवाङ्मयांत " धुतङ्ग " असें नांव आहे. प्रस्तुतच्या विशिष्ठ धुतङ्गास " ते चीवरिकङ्ग " असें नांव आहे. संधाटि, उत्तरासंग व अन्तर्वासिक याशिवाय चौथें वस्त्र जवळ ठेवावयाचें नाहीं, अशा प्रकारानें निश्चय करून तें व्रत पाळणें हें जास्त श्लाघ्य समजतात. धुतङ्ग याचा अर्थ " पवित्राचार " असा आहे. हीं धुतङ्गें एकंदर तेरा आहेत. (विसुद्धिमग्ग-Burmese Edition-पृष्ठें५४-५५).

४: थेरीगाथेंतील किसागोतमीच्या तोंडीं घातलेल्या गाथा फारच मनोवेधक आहेत. परमार्थदीपनींतील तिचें चरित्र व मनोरथपूरणींतील चरित्र बहुतेक एक आहेत. गौतमीस बुद्धासारखा कल्याणमित्र मिळाला व त्यायोगानें तिला जडाची वैय्यर्थ्यता व अध्यात्माचें उदात्त स्वरूप हीं कळून आलीं; म्हणून तिनें आर्यसंगतीवर ज्या गाथा गाइलेल्या आहेत, त्या खरोखरच सुंदर आहेत. ती म्हणते, " मुनिबुद्धानें या जगतांत कल्याणमित्राच्या संगतीची थोरवी वर्णिलेली आहे. कल्याणमित्राचा आश्रय केल्यामुळें मूर्खसुद्धां शहाणा होतो. सत्पुरुषांना भजणेंच योग्य आहे; कारण त्यांना भजणाऱ्या

लोकांची प्रज्ञा वाढते व ते सर्व दुःखांतून मुक्त होतात. दुःख म्हणजे काय हें जाणून दुःखाचा उद्भव कसा होतो हें जाणावें; व दुःखाचा निरोध कोणता हें समजून घेऊन निरोध करणाऱ्या आर्यअष्टांगिक मार्गाचेंहि ज्ञान करून घ्यावें. यानंतर स्त्रियांचें जीवित किती खडतर आहे ह्याचें शब्दचित्र-स्वानुभवावरून-तिनें काढलेलें आहे; व त्यांतच तिनें पटाचारेची दुःखद कहाणी गोंविली आहे. अशाप्रकारानें अबलांचें दुःख वर्णिल्यानंतर ती सांगते, " मी अमृतत्वास नेणाऱ्या आर्यअष्टांगिक मार्गाचा अवलंब करून निर्वाणाचा साक्षात्कार करून घेतला आहे; धर्मरूप आदर्शांत स्वतःस पाहिलें आहे. माझ्या अंतरंगांतील शल्य मी काढून टाकलें आहें, मी भारमुक्त झालेली आहें; मी कर्तव्य बजावलें आहे.' सुविमुक्तचित्त होत्साती किसागोतमी स्थविरा अशाप्रकारानें गात आहे! अशा आनंदानें गाणाऱ्या स्थविरा समाजास ललामभूत कां होणार नाहींत? (थेर व थेरीगाथा-Oldenberg and Pischel-पृष्ठें १४३-१४४ गाथा २१३ते२२३)

# रत्न १३ वें.

## शृगालकमाता.*

### ( १ )

### पूर्वबुद्धकालीन चरित्र.

संघांत दृढ श्रद्धावती व श्रद्धाबलोपेता अशी भिक्षुणी म्हटली म्हणजे शृगालकमाता होय. बौद्धधर्मांत परमेश्वरांच्या आस्तिक्यबुद्धीस प्राधान्य नसल्यामुळें व विशेषतः बुद्धानें अतींद्रिय गोष्टीसंबंधानें बुद्धीचाच उपयोग विहित मानल्या कारणानें श्रद्धेला त्यांत स्थान नाहीं, असें पुष्कळांना वाटत असतें. श्रद्धेची महती, उदाहरणार्थ, गीतेंत गाइलेली आहे[1]. कारण हिंदुधर्मांत ईश्वरविषयकबुध्दि आवश्यकच मानिली आहे. ज्या ज्या इतर धर्मांत परमेश्वरांचें अस्तित्व मानिलेलें आहे, त्या त्या धर्मांत श्रध्देला प्रमुख स्थान मिळालेलें आहे. पण त्यावरून बुद्दाला श्रद्धेची महती कळत नव्हती, असें मात्र समजतां येत नाहीं. जरी त्यानें आपला धर्म म्हणजे प्रत्येकानें स्वतःशीच साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे[2], असें स्पष्ट म्हटलें

---

* शृगालकमाता ( पाली—सिगालक माता ) शृगाल या नांवाच्या उपासकाची आई. चरित्रांत दोन्हीहि शब्द वापरलेले आहेत. ते एकच व्यक्ति दर्शवितात.

१: उदाहरणार्थ—भगवद्गीता–गीतारहस्य अध्याय बारावा–पृष्ठें ७७४–७८१ पहा.

२: पाली–" पच्चत्तं वेदितब्बो विञ्ञूहि. " हा शब्दसमूह पालीवाङ्मयांत वारंवार आढळतो. जेथें जेथें बुद्धधर्माचें स्वरूप सांगण्याचा प्रसंग येतो, तेथें तेथें हा वाक्यांत आढळतो. उदाहरणार्थ–मज्झिमनिकाय मूलपण्णासक वत्थुपम–पृ. २७–राजवाडेकृत देवनागरींत छापलेला ग्रंथ.

आहे, तरी श्रध्दाबलावर मनुष्याचा आत्मोध्दार फार झपाट्यानें होतो, हें तत्वहि त्याला मान्य होतें. त्याच्या भिक्षुसंघांत व भिक्षुणीसंघांतहि अशा प्रकारची श्रद्धावान् माणसें होतीं. शृगालकमाता ही भिक्षुणीसंघांत अग्रस्थानीं होती.

तिचं जननहि पद्मोत्तर बुध्दाच्या काळीं हंसवती नगरींत एका कुलगृहांत झालें असून, शास्त्याचश धर्मप्रवचनांनींच तिच्या मनांत विलक्षण श्रद्धा उत्पन्न झाली होती. ती त्याच्या धर्मकथेस रोज जात असतांना, एक दिवस विहारांत गेल्यावर धर्मकथेनंतर शास्त्यानें संघांतील निरनिराळ्या घटकांस त्यांच्या योग्यतेनुरूप स्थानें देण्याचें काम सुरू केलें होतें, हें तिनें पाहिलें. त्यावेळीं श्रध्दावालेपिता भिक्षुणींपैकीं एका भिक्षुणीस अग्रस्थान देतांना पाहून, आपणासहि तें उच्चस्थान एक दिवस प्राप्त व्हावें, अशी उत्कटेच्छा तिनें बुद्धासमोर प्रथित केली !

( २ )

## गौतमबुध्दकालीन–चरित्र

या जन्मानंतर पुढें हजार कल्पेंपर्यंत देवमनुष्यलोकीं जन्म घेत घेत, भगवान् गौतम बुद्धाच्या काळीं राजगृह नगरांत एका श्रेष्ठ कुळांत तिनें जन्म घेतला. त्या ठिकाणीं विवाहदशा प्राप्त झाल्यावर ती एका समानकुलशील अशा गृहांत गृहिणीपदावर आरूढ झाली ! तेथें तिला शृगाल नांवाचा पुत्र झाला.

शृगालास भगवान् बुद्धानें गृहस्थांच्या कर्तव्यासंबंधानें एक अत्यंत ह्यदयस्पर्शी व सुंदर उपदेश केला आहे शृगालाच्या बापानें मरतेसमयीं त्यास सहा दिशांचीं पूजा करण्यास सांगितलें होतें.[1] आपल्या पित्याच्या आज्ञेनुसार तो तरुण कुलपुत्र दररोज सकाळींच शहरच्या बाहेर पडून स्नानकरून पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर, खालची व वरची अशा

१: दीघनिकाय–सिगालोवादसुत्त. या सुत्ताचें सुंदर मराठी भाषांतर प्रो० कोसंबीकृत बुद्धलीलासारसंग्रह या ग्रंथांत दिलेलें आहे. पृष्ठें २०१–२०६

सहा दिशांना ओल्यावस्त्रांनिशीं व ओल्याकेसानेंच नमस्कार करीत असे. एक दिवस बुध्दगुरूंना तो अशा स्थितींत भेटल्यावर त्यांनीं त्यास दिशा याचा खरा अर्थ समजावून दिला, व त्यांना वंदन करणें म्हणजे त्या विशिष्ट दिशेनें जे निरनिराळे नातेवाईक व्यक्त केले जातात, त्यांचा परामर्ष घेणें, त्यांची अनास्था न करणें, त्यांच्या पोषणासाठीं रक्षणासाठीं व हितासाठीं अहर्निश झटणें, असा अर्थ करून, त्याप्रमाणें गृहस्थाश्रमांतील कर्तव्यें करणें म्हणजेच दिशांची पूजा करणें, असा बहुमोल उपदेश त्यास केला. त्याचा परिणाम त्या कुलपुत्राच्या मनावर इतका झाला कीं, तो भगवंताचा उपासक बनला व विख्यात झाला. त्याच्यामुळें त्याची आईहि शृगालकमाता म्हणून लोकांत प्रसिध्द झाली.

आपल्या मुलाकडूनच तिला भगवान्‌बुध्दाची व त्यांच्या संघाची माहिती होणें शक्य आहे. आपल्या मुलाच्या प्रत्यक्ष उदाहरणावरून तिच्या मनांत ह्या सर्वांविषयीं पराकाष्ठेची श्रध्दा उत्पन्न झाली असावी, व म्हणूनच तिनें संघांत प्रवेश केला असावा !

संघांत प्रवेश केल्यावर तिच्या चारित्रावर फारसा प्रकाश चरित्रकारानें पाडलेला नाहीं व अन्यत्रहि तो बहुतेक आढळून येत नाहीं. संघांत तिनें प्रव्रज्येनंतर श्रध्देन्द्रियाचा[1] मात्र लाभ करून घेतला; व त्यांत पराकाष्ठेची पारंगतता मिळविली.

एक दिवस ती विहारांत गेली होती. त्या वेळीं शास्ता दशबल धर्मकथेचा लाभ आपल्या श्रोतृवृंदास करून देत होता. अगोदरच श्रद्धायुक्त अन्तःकरणानें युक्त अशी सिगालकमाता त्या दिवशीं धर्मकथारसानें इतकी तन्मय झाली कीं, भगवंतांच्या शरीरसंपत्तिवर व त्याच्या

---

१: श्रद्धेन्द्रिय—पालीवाङ्मयांत श्रद्धा या गुणास एकेठिकाणीं धन असें नांव दिलें आहे; तर दुसरें ठिकाणीं ‘ इन्द्रिय ’ असेंहि नांव दिलेलें आहे. उदाहरणार्थ—अंगुत्तर निकायाच्या सत्तनिपात्तांत ( सातव्या भागांत ) श्रद्धा, शील, लज्जा, अवत्रप्य, श्रुत, त्याग, आणि प्रज्ञा अशीं सात धनें सांगितलेलीं आहेत. पण इतरत्र श्रद्धा, वीर्य, स्मृति, समाधि आणि प्रज्ञा अशीं पांच इन्द्रियें ( नैतिक गुण ) म्हणून आलेलीं आहेत. श्रद्धा याचा अर्थ तथागतावर पूर्ण विश्वास. याच अर्थानें अवेच्च पसाद हाहि शब्दप्रयोग करतात.

तेजोयुक्त व महापुरुषलक्षणान्वित[१] अशा रूपावर तिनें ध्यानच लावलें! भगवंतांनीं तें पाहून तिच्यांत श्रद्धा पूर्णत्वास गेली आहे, हें जाणलें. तिनें-हि त्या ध्यानबलावरच विपश्यना वाढवून अर्हत्पदाची प्राप्ति करून घेतली.

पुढें एके दिवशीं जेतवनांत शास्ता संघासह बसला असतां, तो भिक्षुणींना त्याच्या योग्यतेनुरूप स्थानें देत होता व त्या वेळीं सिगालक-मातेस त्यानें निःसीमश्रध्दान्वित भिक्षुणींत अग्रस्थान दिलें. अशा रीतीनें तिची दीर्घकालीनची इच्छा तिच्याच परिश्रमामुळें ह्या जन्मांत त्या दिवशीं सफळ झाली!

---

१: महापुरुषलक्षणान्वित–पालीवाङ्मयांत महापुरुषाच्या अंगावर ३२ लक्षणें असतात, म्हणून सांगितलेलें आहे. ज्याच्या शरीरावर हीं ३२ लक्षणें असतात तो दोहों-पैकीं एका गतीप्रत जाणार म्हणून समजावें. तो जर घरांत राहिला तर चक्रवर्ति राजा होतो. धार्मिक, धर्मराज, चारी दिशा जिंकणारा, जनपदाला स्थावरत्व देणारा आणि सप्तरत्नांनीं युक्त असा तो होतो.पण जर अनगार्यावस्थेंत तो प्रविष्ट झाला,तर तो सम्यक् सम्बुद्ध होतो.व अज्ञानरूपपडदा नाहींसा करून टाकतो. उदाहरणार्थ, वाचकासाठीं कांहीं लक्षणांचा निर्देश करतों–सुप्रतिष्ठितपादता, आयतपार्ष्णिता, दीर्घाङ्गुलिता, सुवर्णवर्णता, लोमकूपेषु एकेकलोमता, सिंहपूर्वार्धकायता, सिंहहनुता, समदन्तता, प्रभूतजिव्हता, अभिनीलनेत्रता, वगैरे. (दीघनिकाय–महापदानसुत्त–P. T. S.–पृष्ठें. १७–१९)

**समाप्त.**

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | २५ | त्यांचें | त्याचे |
| १५ | १९ | Oldengber | Oldenberg |
| १८ | २ | पद्मोतर | पद्मोत्तर |
| २३ | १ | तजवीज | तजवीज |
| २३ | १० | भात्र | मात्र |
| २३ | २० | अवतरणचिन्ह बरोबर करणें. | |
| २६ | १२ | तिनं | तिने |
| २६ | १५ | चतार्विधज्ञान | चतुर्विधज्ञान |
| २८ | १४ | भिक्षूसघासह | भिक्षुसंघासह |
| ३३ | २ | रूपयौवनसपन्ना | रूपयौवनसंपन्ना |
| ३३ | १५ | सर्वत्र | सर्व एकत्र |
| ३४ | ८ | घालावी | घालावी |
| ३४ | २२ | संस्वदेज | संस्वेदज |
| ३६ | १८ | उघडल्याबरोबर | उघडल्याबरोबर |
| ३७ | ५ | तीबरोबर | त्याबरोबर |
| ४३ | १ | ह | हें |
| ४३ | १७ | हृदयाशी | हृदयाशीं |
| ४७ | ६ | दर्शनासा | दर्शनास |
| ४७ | ८ | विनयसंपंन्न | विनयसंपन्न |
| ४७ | १६ | बुद्धान्तरा | बुद्धान्तरा |
| ४८ | १ | जीवाचा | जिवाचा |
| ४८ | २९ | म्हणन | म्हणून |
| ५२ | १८ | तो | तो तरुण |
| ५६ | १८ | निर्भरसना | निर्भर्त्सना |
| ५९ | १० | अध्यन | अध्ययन |
| ६१ | १८ | प्रवज्य। | प्रव्रज्या |
| ६८ | १ | ? पार्त | वार्तील |

IRBK-0100504

| | | | |
|---|---|---|---|
| | | | गृहधर्म |
| | | | हाहाकार |
| | | | कर्मबंधांनी |
| ७१ | १८ | | मार्ग |
| ७५ | | पडणार | पाडणार |
| ७७ | | | सोणा |
| ७७ | | | सद्गुण |
| ७९ | | | माझ्या |
| ७९ | | झी | तीं माझी |
| ८० | | ो | ढुंकूनहि |
| ८० | २१ | वर | नरं |
| ८१ | ६ | पश्चत्तापानें | पश्चात्तापानें |
| ८१ | २४ | स्नायु | स्नायु |
| ८२ | १६ | श्रयस्कर | श्रेयस्कर |
| ८३ | २३ | हिली हकली | हिली होती |
| ८३ | २४ | आल्यवार | आल्यावर |
| ८४ | ११ | श्रावण | श्रवण |
| ८४ | १६ | झालां | झाला |
| ८५ | १४ | प्रज्ञात्र यांच्या | प्रज्ञा या त्रयींच्या |
| ८५ | १९ | योगात्रचाराची | योगावचराची |
| ८७ | २२ | शास्त्ता विषयीं | शास्त्याविषयीं |
| ९१ | ११ | गाष्टिविरून | गोष्टीवरून |
| ९१ | १६ | धर्मप्रवांचनाम | धर्मप्रवचनारा |
| ९२ | २०-२१ | चकचकति | चकचकीत |
| ९३ | २१ | घरफोडाकडे | घरफोडाकडे |
| ९६ | ६ | आपल्या गुह्याची गोष्ट | आपली गुह्य गोष्ट |
| १०१ | २४ | हककित | हकीकत |
| १०२ | १५ | एक नाप किं | एकनाम कि |
| १०४ | २३ | परम, | परामर्श |
| १०९ | २१ | अनु | अनुरूपशील |
| ,, | ,, | अनु | अनुरूपगुण |
| ११८ | २१ | प्र | प्रव्रज्या |
| ११९ | १० | पुराणद्युतयिका | पुराणद्युतियको |
| १२२ | २६-२७ | मनोरथ पूरणी | मनोरथपूरणी |
| १२३ | १-९ | काय आश्चर्य | काय आश्चर्य ? |
| १२६ | १६ | पश्चाताप | पश्चात्ताप |
| | २५ | अश | अर्श |